सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२.

# मुंबई पोलीस अधिनियम, १९५१

(दिनांक १३ सप्टेंबर, २००६ पर्यंत सुधारलेला)

BOMBAY ACT No. XXII OF 1951

# THE BOMBAY POLICE ACT, 1951

*(As modified upto 13th September, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात
मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००७

[किंमत रु. १६.००]

# मुंबई पोलीस अधिनियम, १९५१

अनुक्रमणिका

प्रकरण एक

## प्रारंभिक

उद्देशिका

**कलमे**


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ . . . . . . . . | ५ |
| २. | व्याख्या . . . . . . . . . . | ५ |


प्रकरण दोन

## पोलीस दलाचे अधीक्षण, नियंत्रण आणि संघटन


| | | |
|---|---|---|
| ३. | संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी एक पोलीस दल असणे. | ८ |
| ४. | पोलीस दलावरील अधीक्षण राज्य शासनाकडे निहित असणे. | ८ |
| ५. | पोलीस दल घटित करणे | ९ |
| ६. | महासंचालक व महानिरीक्षक, अपर व उपमहानिरीक्षक . . . . | ९ |
| ७. | आयुक्त . . . . . . . . . . . . | ९ |
| ८. | अधीक्षक आणि अपर अधीक्षक, सहायक अधीक्षक व उप-अधीक्षक यांची नेमणूक. | १० |
| ८-क. | बिनतारी संदेश यंत्रणा व मोटार परिवहन यंत्रणा यासाठी किंवा कोणतेही विशिष्ट कर्तव्य पार पाडण्यासाठी संचालक, पोलीस बिनतारी संदेश याची व अधीक्षकाची, सहायक अधीक्षकाची आणि उप-अधीक्षकांची नेमणूक. | १०-११ |
| ९. | पोलीस प्रशिक्षण संस्थांच्या प्राचार्यांची नेमणूक . . . . . . | ११ |
| १०. | आयुक्ताच्या हाताखालील उप-आयुक्त. . . . . . . . | १२ |
| ११. | आयुक्ताच्या अधिकारितेतील सहायक आयुक्त. . . . . . . | १२ |
| १२. | विभाग व पोटविभाग घटित करणे . . . . . . . . | १३ |
| | विभाग व पोटविभाग यांचे प्रभारी अधिकारी | |
| १२-क. | निरीक्षक. . . . . . . . . . . | १३ |
| १३. | (वगळण्यात आले.) . . . . . . . . . . | १३ |
| १४. | नेमणुकीचे प्रमाणपत्र. . . . . . . . . . | १३ |
| १५. | पोलीस अधिकाऱ्यास निलंबित केल्यास होणारा परिणाम. . . . | १४ |
| १६. | आयुक्त व अधीक्षक यांचे सर्वसाधारण अधिकार. . . . | १४ |
| १७. | जिल्ह्यातील पोलीस दलावर जिल्हा दंडाधिकाऱ्याचे नियंत्रण. . . | १४ |
| १८. | अधीक्षकाकडून अहवाल मागविण्याचा जिल्हा दंडाधिकाऱ्याचा अधिकार. . . | १४ |

| कलमे | प्रकरण दोन—चालू | पृष्ठ |
|---|---|---|
| १९. | जिल्हा दंडाधिका-याचा पर्यवेक्षण करण्याचा अधिकार. . . . . | १५ |
| २०. | पोलिसांसंबंधीच्या लेख्यांच्या बाबींची तपासणी करण्याचा व त्यांचे विनियमन करण्याचा महासंचालक व महानिरीक्षक यांचा आणि आयुक्ताचा अधिकार. | १५ |
| २१. | विशेष पोलीस अधिकारी . . . . . . . . . . . . | १५ |
| २२. | अपर पोलीस अधिका-याची नेमणूक . . . . . . | १६ |
| २२-क. | रेल्वे पोलिसांची नेमणूक. . . . . . . . . . . . | १६ |


प्रकरण तीन

**पोलीस दलाचे विनियमन, नियंत्रण व शिस्त.**


| | | |
|---|---|---|
| २३. | पोलिसांच्या प्रशासनासाठी नियम तयार करणे. . . . . | १७ |
| २४. | महासंचालक व महानिरीक्षक यास किंवा आयुक्त यास विवरणे मागविता येतील. | १८ |
| २५. | कर्तव्य बजावण्यात हयगय, वगैरे केल्याबद्दल विभागीय चौकशीद्वारे पोलीस दलातील दुय्यम दर्जाच्या सदस्यांना शिक्षा करणे.<br>महासंचालक व महानिरीक्षक, आयुक्त, (संचालक, पोलीस बिनतारी संदेश यांसह) उप महानिरीक्षक आणि अधीक्षक व प्रशिक्षण संस्थेचा प्राचार्य यांचे शिक्षा देण्याचे अधिकार. | १८-१९ |
| २६. | शिक्षा करण्याच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती. . . . . | २० |
| २७. | शिक्षेसंबंधीच्या आदेशांविरूद्ध अपिले. . . . . . . . . . | २० |
| २७-क. | राज्य शासन किंवा महासंचालक व महानिरीक्षक यांना कोणत्याही चौकशीचा किंवा कार्यवाहीचा अभिलेख मागवण्याचा अधिकार. | २१ |
| २७-ख. | कलम २५, २७ किंवा २७-क अन्वये संमत केलेल्या आदेशांचे पुनर्विलोकन करण्यासंबंधी राज्य शासन किंवा महासंचालक व महानिरीक्षक यांचा अधिकार. | २१ |
| २७-ग. | नियम तयार करण्याचा अधिकार. . . . . . . . . . | २१ |
| २८. | पोलिस अधिकारी हे, नेहमी कामावर आहेत असे समजणे आणि ते राज्याच्या कोणत्याही भागांत कामावर पाठविले जाण्यास पात्र असणे.<br>प्रस्तावित बदल्यांसंबंधी महासंचालक व महानिरीक्षक याने आयुक्तास व जिल्हा दंडाधिका-यास कळविणे. | २२ |
| २९. | पोलीस अधिका-यास कोणत्या शर्तीवर राजीनामा देता येईल. . .<br>या कलमाचे उल्लंघन करणा-या पोलीस अधिका-याच्या वेतनाची थकबाकी जप्त केली जाऊ शकेल. | २२ |
| ३०. | पोलीस अधिकारी असण्याचे बंद झालेल्या व्यक्तीने प्रमाणपत्र, शस्त्रे वगैरे सुपूर्द करणे आणि ती केली नाही तर झडतीच्या अधिपत्रान्वये ती जप्त केली जाणे.<br>विवक्षित वस्तुंचा अपवाद. | २३ |
| ३१. | पोलीस अधिका-यांना पुरविलेल्या जागेचा भोगवटा आणि त्या रिकाम्या करून देण्यासंबंधी त्यांचे दायित्व. | २३ |
| ३२. | सन १८९८ चा अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १४४ अन्वये राज्य शासनाला आदेश देता येईल. | २४ |

कलमे — प्रकरण चार — पृष्ठ

## पोलीस विनियम

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ३३. | सार्वजनिक ठिकाण, इत्यादींमध्ये रहदारीच्या विनियमनासाठी व सुव्यवस्था राखण्यासाठी नियम करण्याचा अधिकार. | २४ |
| ३३क. | खाद्यगृह, परमीट रूम किंवा बिअर बार यांमधील नृत्यविष्कारावर बंदी आणि इतर परिणामरूप तरतुदी. | ३१ |
| ३३ख. | विवक्षित प्रकरणांमध्ये कलम ३३क च्या तरतुदी लागू नसणे. | ३२ |
| ३४. | सक्षम प्राधिकारी रस्त्यावर अडथळे उभारण्याचा प्राधिकार देऊ शकेल. | ३३ |
| ३५. | वेगळ्या राखून ठेवलेल्या जागांव्यतिरिक्त इतर जागी मृतदेहांची विल्हेवाट. लावण्यास मनाई करण्याबाबत नियम करण्याचा अधिकार. | ३३ |
| ३६. | आयुक्त किंवा अधीक्षक यांचा व इतर अधिका-यांचा जनतेस निदेश देण्याचा अधिकार. | ३४ |
| ३७. | शांतता भंगास प्रतिबंध करण्यासाठी विवक्षित कृतींना मनाई करण्याचा अधिकार. | ३५ |
| ३८. | गायन-वादन, आवाज किंवा गोंगाट चालू ठेवण्यास मनाई, वगैरे करण्याचा अधिकार. | ३५ |
| ३९. | दंगा इत्यादींस प्रतिबंद करण्यासाठी आदेश देणे.. . . . . . | ३६ |
| | बंद केलेल्या किंवा ताब्यात घेतलेल्या इमारतीच्या किंवा जागेच्या कायदेशीर भोगवटदारास भरपाई देणे. | |
| | भरपाई देण्याबद्दलच्या विवादांबाबत निवाडा करणे. | |
| ४०. | धार्मिक समारंभ इत्यादींच्या जागी सुव्यवस्था राखण्याबद्दल आदेश काढणे. | ३६ |
| ४१. | मनोरंजनाची स्थाने व जाहीर सभा या ठिकाणचा शांतताभंग, इत्यादीबद्दल पोलिसांनी बंदोबस्त करणे. | ३७ |
| | पोलिसांना तेथे जाण्याची पूर्ण मुभा असणे. | |
| ४२. | (वगळण्यात आले.) . . . . . . . . . . | ३७ |
| ४३. | जिल्हा दंडाधिका-यास, जत्रा इत्यादी ठिकाणी साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ न देण्याबद्दल विशेष उपाययोजना करता येतील. | ३७ |
| ४४. | मोकाट कुत्र्यांचा नाश करणे. . . . . . . . . | ३७ |
| ४५. | यातनापिडित किंवा (शारीरिक दृष्ट्या) अयोग्य प्राण्यांचा नाश करणे. . . | ३८ |
| ४६. | अधीक्षकाने जिल्हा दंडाधिका-याच्या आणि आयुक्ताच्या नियंत्रणास अधीन राहून व जिल्हा दंडाधिका-यांनी राज्य शासनाच्या नियंत्रणास अधीन राहून या प्रकरणाखालील अधिकारांचा वापर करणे. | ३९ |

प्रकरण पाच

## सार्वजनिक सुव्यवस्था व राज्याची सुरक्षितता राखण्यासाठी विशेष उपाययोजना

### एक. जादा पोलीस कामावर नेमणे, त्यांचा खर्च व दंग्यातील नुकसानभरपाई वसूल करणे—तिची आकारणी व वसुली

| | | |
|---|---|---|
| ४७. | एखाद्या व्यक्तीने अर्ज केल्यावरून जादा पोलीस कामावर नेमणे. . . | ३९ |
| ४८. | मोठ्या बांधकामांवर आणि कर्मचा-यांच्या वर्तणुकीबद्दल शंका वाटत असेल त्या बाबतीत जादा पोलीस कामावर नेमणे. | ४० |
| ४९. | कलमे ४७ व ४८ याअन्वये कामावर नेमलेल्या जादा पोलिसांचा खर्च वसूल करणे. | ४० |

| कलमे | प्रकरण पाच—चालू | पृष्ठ |
|---|---|---|
| ५०. | सार्वजनिक शांततेस विशेष धोका निर्माण झाला असता जादा पोलीस कामावर नेमणे. | ४० |
| ५१. | बेकायदेशीर जमावाने केलेल्या हानीबद्दल भरपाई ती कशी वसूल करावी. दायित्वासाठी दिनांक निश्चित करणे | ४२ |
| ५२. | मुख्य इलाखा शहर दंडाधिका-याने किंवा जिल्हा दंडाधिका-याने नुकसान भरपाई देणे किंवा तिची प्रमाणशीर विभागाची करणे. | ४४ |
| ५३. | मुख्य इलाखा शहर दंडाधिका-याने किंवा जिल्हा दंडाधिका-याने राज्य शासनाच्या आदेशानुसार कामे पार पाडणे. | ४४ |
| ५४. | जादा पोलिसांच्या खर्चाची व बेकायदेशीर जमावाने केलेल्या हानीच्या भरपाईची प्रमाणशीर वसुली करणे. | ४५ |
| | **दोन. टोळ्यांना पांगवणे व विवक्षित अपराधांबद्दल दोषी ठरलेल्या व्यक्तींना व विवक्षित भिका-यांना घालवून देणे** | |
| ५५. | व्यक्तींच्या टोळ्या व गट पांगवणे . . . . . . | ४५ |
| ५६. | अपराध करण्याच्या बेतात असलेल्या व्यक्तींना घालवून देणे. . . | ४६ |
| ५७. | विवक्षित अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या व्यक्तींना घालवून देणे.. . . . | ४७ |
| ५७-क. | भिकारी म्हणून घोषित केलेल्या विवक्षित व्यक्तींना घालवून देणे. . . | ४९ |
| ५८. | कलमे ५५, ५६, ५७ व ५७-क याअन्वये दिलेले आदेश अमलात असण्याची मुदत. | ५० |
| ५९. | कलमे ५५, ५६, ५७ किंवा ५७-क याअन्वये आदेश देण्यापूर्वी बाजू मांडण्याची संधी देणे. | ५० |
| ६०. | अपील. . . . . . . . . . . . | ५१ |
| ६१. | विवक्षित बाबतीत राज्य शासनाने दिलेल्या आदेशाची अंतिमता. . . | ५१ |
| ६२. | एखाद्या व्यक्तीने क्षेत्र सोडून निघून जाण्यात कसूर केल्यास आणि घालविल्यानंतर तिने प्रवेश केल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती. | ५२ |
| ६३. | ज्या क्षेत्रातून एखाद्या व्यक्तीस स्वतःहून निघून जाण्याचा निदेश देण्यात आला असेल, त्या क्षेत्रात प्रवेश करण्याची किंवा त्या क्षेत्रात परत येण्याची तात्पुरती परवानगी. | ५३ |
| ६३-कक. | राज्य शासनाचे व विशेषरीत्या अधिकार दिलेल्या अधिका-यांचे हद्दपार करण्याविषयीचे अधिकार. | ५४ |
| | **तीन. शिबिरे, वगैरेंचे नियंत्रण व गणवेष** | |
| ६३-क. | शिबिरे, संचलने इत्यादींचे नियंत्रण व गणवेष वगैरेच्या उपयोगास मनाई करणे. | ५४ |
| | **चार. ग्राम संरक्षक पथके** | |
| ६३-ख. | ग्राम संरक्षक पथके घटित करणे . . . . . . . | ५५ |

## प्रकरण सहा

## पोलीसांचे कार्यकारी अधिकार व कर्तव्ये

| | | |
|---|---|---|
| ६४. | पोलीस अधिका-याची कर्तव्ये. . . . . . . . | ५७ |
| ६५. | सार्वजनिक जागेच्या ठिकाणी प्रवेश करण्याचा अधिकार. | ५८ |
| | रस्त्यातील संशयित व्यक्तींची झडती घेण्याचे अधिकार. | |

| कलमे | प्रकरण सहा—चालू | पृष्ठ |
|---|---|---|
| ६६. | जनतेप्रती पोलीस अधिका-यांची कर्तव्ये. | ५८ |
| ६७. | पोलिसाने रस्त्यांवरील रहदारी, वगैरेचे नियमन करणे. | ५९ |
| ६८. | पोलिसांच्या वाजवी आदेशांचे पालन करणे व्यक्तींवर बंधनकारक असणे. | ५९ |
| ६९. | अटकाव करणे, घालवून देणे, इत्यादींचा पोलीस अधिका-याचा अधिकार. | ५९ |
| ७०. | कलमे ३७, ३८ किंवा ३९ अन्वये दिलेले आदेश अमलात आणणे. | ५९ |
| ७१. | कलमे ४३, ५५, ५६, ५७, ५७-क किंवा ६३-कक याअन्वये दिलेले आदेश अमलात आणले आहेत, हे पहाणे हे पोलिसांचे कर्तव्य असेल. | ६० |
| ७२. | पोलीस अधिकारी, अधिपत्राशिवाय केव्हा अटक करू शकेल. | ६० |
| ७३. | पोलीस अधिपत्राशिवाय केव्हा अटक करू शकेल. | ६० |
| ७३-क. | (वगळण्यात आले) | ६० |
| ७४. | सन १९६० चा अधिनियम क्रमांक ५९ खालील अपराधांसंबंधीचे अधिकार. | ६१ |
| ७५. | ज्या व्यक्तीच्या ताब्यातून प्राणी घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस तो परत देण्याचा दंडाधिका-याचा अधिकार. | ६१ |
| ७६. | पशुवैद्यकीय अधिक-याने प्राण्याची तपासणी करणे. | ६२ |
| ७७. | सन १९६० चा अधिनियम क्रमांक ५९ या अन्वये प्राण्यासंबंधी करावयाची तरतूद. | ६२ |
| ७८. | प्राण्याचे खोगीर किंवा ओझे काढण्याचा पोलीस अधिका-याचा अधिकार. | ६२ |
| ७९. | जेव्हा पोलीस अधिका-याच्या समक्ष विशिष्ट अपराध केले जातील तेव्हा अधिपत्राशिवाय अटक करण्याचा पोलीस अधिका-याचा अधिकार. | ६२ |
| ८०. | अटक करण्यासंबंधीचे इतर अधिकार. | ६२ |
| ८१. | ताकीद मानण्याचे किंवा पोलिसाबरोबर जाण्याचे नाकारणे. | ६३ |
| ८२. | दावा न सांगितलेली मालमत्ता पोलिसाने ताब्यात घेणे. | ६३ |
| ८३. | चारशे रुपयांहून अधिक मूल्याची विनामृत्यूपत्र मालमत्ता. | ६३ |
| ८४. | चारशे रुपयांहून अधिक मूल्याची विनामृत्यूपत्र मालमत्ता | ६४ |
| ८५. | इतर बाबतीतील कामकाजाची पध्दती.<br>नाशिवंत माल ताबडतोब विकण्याचा अधिकार. | ६४ |
| ८६. | मालमत्ता, तिच्यावर हक्क असलेल्या व्यक्तीच्या स्वाधीन करणे.<br>प्रतिभूति घेण्याचा अधिकार. | ६४ |
| ८७. | मालमत्तेवर कोणी दावा न सांगितल्यास ती राज्य शासनाच्या स्वाधीन असणे. | ६४ |
| ८८. | भारतीय उत्तराधिकार अधिनियम किंवा महाप्रशासक अधिनियम किंवा सन १८२७ चा विनियम ८ किंवा तत्सम कायदा यामुळे कार्यपद्धतीस बाध न येणे. | ६५ |
| ८९. | पोलीस अधिका-यास मोकाट गुरे ताब्यात घेता येतील. | ६५ |
| ९०. | गुरांचे कोंडवाडे उघडण्याचा व कोंडवाड्यांचे रक्षक नेमण्याचा अधिकार. | ६५ |
| ९०-क. | गुराढोरांना रस्त्यावर भटकू देणे किंवा खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अपप्रवेश करु देणे याबद्दल शास्ती. | ६६ |
| ९१. | गुरांना कोंडवाड्यात टाकणे. | ६६ |

| कलमे | प्रकरण सहा—चालू | पृष्ठ |
|---|---|---|
| ९२. | दावा सांगितलेली गुरे स्वाधीन करणे. | ६७ |
| ९३. | दावा न सांगितलेल्या गुराढोरांची विक्री. | ६७ |
| ९४. | अधिसूचनेद्वारे दर ठरविणे. | ६७ |
| ९५. | खोटी वजने व मापे तपासणे, त्याबद्दल झडती घेणे आणि ती जप्त करणे यासंबंधीचे अधिकार. | ६७ |
| ९६. | विवक्षित बाबतीत अधिका-यांनी व दंडाधिका-यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती. | ६८ |
| ९७. | वरिष्ठ दर्जाच्या पोलीस अधिका-यास त्याच्यापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिका-याकडे सोपविलेली कर्तव्ये करता येतील. | ६९ |
| ९८. | निकडीच्या प्रसंगी पोलिसांची कर्तव्ये. | ६९ |


प्रकरण सात

## अपराध व शिक्षा


| | | |
|---|---|---|
| ९९. | सडकेसंबंधीचे नियम न पाळणे. | ७० |
| | अपुरी देखरेख केलेली गुरेढोरे, वगैरे रस्त्यावर सोडून देणे. | |
| १००. | प्राण्याकडून अडथळा किंवा खोडी करविणे. | ७० |
| १०१. | प्राणी भाड्याने देण्याकरिता किंवा विकण्याकरिता वगैरे ठेवणे. | ७० |
| १०२. | रस्त्यावर कोणताही अडथळा निर्माण करणे. | ७१ |
| १०३. | पायवाट अडवणे. | ७१ |
| १०४. | नकलांचे, गायन-वादनाचे किंवा इतर प्रकारचे खेळ करणे. | ७१ |
| १०५. | रस्त्यावर किंवा रस्त्याजवळ किंवा सार्वजनिक जागी किंवा त्या जागेजवळ क्षोभक कृत्ये करणे. | ७१ |
| १०६. | घोडे वगैरे मोकळे सोडणे व हिंस्त्र, कुत्री मोकळी राहू देणे. | ७१ |
| १०७. | स्वतंत्रपणे राखून न ठेवलेल्या जागी स्नान करणे किंवा धुणे. | ७२ |
| १०८. | सार्वजनिक विहिरी, वगैरेमधील पाणी दूषित करणे. | ७२ |
| १०९. | स्नान करण्यास अडथळा करणे. | ७२ |
| ११०. | लोकांसमोर असभ्य वर्तन करणे. | ७२ |
| १११. | रस्त्यावरील प्रवाशांना अडथळा करणे किंवा त्रास देणे. | ७२ |
| ११२. | शांततेचा भंग व्हावा अशा उद्देशाने गैरवर्तन करणे. | ७२ |
| ११३. | पतंग उडविण्यास मनाई. | ७२ |
| ११४. | (निरसित करण्यात आले) | ७३ |
| ११५. | रस्त्यात किंवा रस्त्याजवळ, इत्यादी ठिकाणी उपद्रव करणे. | ७३ |
| ११६. | सार्वजनिक इमारतीतील नोटिशींकडे दुर्लक्ष करणे. | ७३ |
| ११७. | कलमे ९९ ते ११६ अन्वये अपराध करणा-यास शास्ती. | ७३ |
| ११८. | गुरे, वगैरे कोंडून ठेवण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती. | ७३ |

| कलमे | प्रकरण सात—चालू | पृष्ठ |
|---|---|---|
| ११९. | प्राण्यांना निर्दयतेने वागविल्याबद्दल शिक्षा. . . . . . . | ७४ |
| १२०. | जाणूनबुजून अतिक्रमण करणे. . . . . . . | ७५ |
| १२१. | आगीची खोटी बातमी देणे किंवा आगीची सूचना देणा-या यंत्रास नुकसान पोचवणे. | ७५ |
| १२२. | सुर्यास्त व सूर्योदय यांच्या दरम्यान संशयास्पद स्थितीत सापडणे. . . | ७५ |
| १२३. | प्राधिकारावाचून शस्त्र बाळगणे. . . . . . . | ७५ |
| १२४. | ज्या मालमत्तेबद्दल कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण देता येत नाही अशी मालमत्ता ताब्यात असणे. | ७६ |
| १२५. | सरकारी रुग्णालयात किंवा बराकीत किंवा लष्करी किंवा लढाऊ जहाजावर दारु इत्यादी घेऊन जाणे. | ७६ |
| १२६. | चोरीचा संशय असलेली मालमत्ता ताब्यात असल्याबद्दल किंवा देऊ केल्याबद्दल तारण व्यवसायी, वगैरेंनी पोलिसास माहिती न देणे. | ७६ |
| १२७. | अशी मालमत्ता वितळविणे वगैरे. . . . . . . . . | ७७ |
| १२८. | मुलाकडून तारण घेणे. . . . . . . . . | ७७ |
| १२९. | सार्वजनिक मनोरंजन, वगैरेच्या जागी बेशिस्तपणे वागू देण्याच्या परवानगीबाबत. | ७७ |
| १३०. | खेळांमध्ये फसविणे. . . . . . . . . | ७७ |
| १३०-क. | रस्त्यावर जुगार खेळणे. . . . . . . . . | ७७ |
| १३१. | कलम ३३ अन्वये केलेले नियम वगैरेंचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. . . | ७८ |
| १३१-कक. | नोकरांनी केलेल्या कृत्याबद्दल लायसनधारकाचे सार्वजनिक करमणुकीच्या जागेसंबंधीचे दायित्व. . . . . . . . . | ७९ |
| १३१-क | सार्वजनिक करमणुकीच्या किंवा नृत्य शाळेच्या जागेच्या बाबतीत विनिर्दिष्ट मुदतीच्या आत लायसन न घेतल्याबद्दल किंवा खाद्यगृहाच्या बाबतीत नोंदणी प्रमाणपत्र न घेतल्याबद्दल किंवा लायसन किंवा प्रमाणपत्राचे नवीकरण करून न घेतल्याबद्दल शास्ती. . . . . . . . . | ७९ |
| १३२. | कलम ३१ अन्वये दिलेला आदेश न पाळल्याबद्दल शास्ती. . . | ८० |
| १३३. | कलम ३५ अन्वये केलेले नियम, वगैरेंचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. . . | ८० |
| १३४. | कलम ३६ अन्वये केलेले नियम, वगैरेंचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. . . | ८० |
| १३५. | कलमे ३७, ३९ किंवा ४० खालील नियमांचे किंवा निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. . . . . . . . . . . | ८० |
| १३६. | कलम ३८ अन्वये केलेले नियम, वगैरेंचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. . . | ८१ |
| १३७. | कलम ४१ अन्वये केलेले नियम, वगैरेंचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. . . | ८१ |
| १३८. | (वगळण्यात आले). . . . . . . . . . . | ८१ |
| १३९. | कलम ४३ अन्वये केलेल्या विनियमाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. . . | ८१ |
| १४०. | कलम ६८ अन्वये दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. . . | ८१ |

| कलमे | प्रकरण सात—चालू | पृष्ठ |
|---|---|---|
| १४१. | कलमे ५५, ५६, ५७, ५७-क किंवा ६३-कक अन्वये दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. .. .. .. .. | ८१ |
| १४२. | ज्या क्षेत्रातून निघून जाण्याबद्दल एखाद्या व्यक्तीस निदेश देण्यात आला असेल त्या व्यक्तीने त्या क्षेत्रात परवानगीवाचून प्रवेश केल्याबद्दल किंवा तात्पुरत्या मुदतीकरिता परत येण्यास परवानगी दिली असताना त्या मुदतीनंतरही तेथे राहण्याबद्दल किंवा निवासस्थान किंवा निर्गमन किंवा आगमन यासंबंधी कळविण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती. .. .. .. | ८२ |
| १४३. | कलम ६३ च्या पोट-कलम (३) अनुसार स्वाधीन होण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती. | ८३ |
| १४३-क. | कलम ६३-क अंन्वये दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. .. | ८३ |
| १४३-ख. | धोक्याचे प्रयोग. .. .. .. .. .. | ८३ |
| १४४. | विशेष पोलीस अधिकारी म्हणून काम करण्यात हयगय करणे किंवा काम करण्याचे नाकारणे. .. .. .. .. .. | ८३ |
| १४५. | खोटे निवेदन, वगैरे केल्याबद्दल आणि पोलीस अधिका-यांच्या गैरवर्तनाबद्दल शास्ती. | ८४ |
| | रजा संपल्यावर कामावर हजर होण्यात कसूर केल्याचा परिणाम. | |
| १४६. | नेमणुकीचे किंवा पदाचे प्रमाणपत्र किंवा इतर वस्तू देण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती. | ८४ |
| १४७. | पोलीस अधिका-याने तापदायक रीतीने प्रवेश करणे, झडती घेणे, अटक करणे, इत्यादी. | ८४ |
| १४८. | अटक केलेल्या व्यक्तीस पाठविण्यात तापदायक विलंब लावण्याबद्दल शास्ती. | ८५ |
| १४९. | कलम ७० अन्वये दिलेल्या निदेशास विरोध केल्याबद्दल किंवा त्याचे अनुपालन न केल्याबद्दल शास्ती. .. .. .. .. .. | ८५ |
| १४९-क. | पोलिसांच्या गणवेषाचा अनधिकृतपणे वापर केल्याबद्दल शास्ती. .. | ८५ |
| १५०. | अपराधी, जेव्हा शिपायाहून वरच्या दर्जाचा पोलीस अधिकारी असेल तेव्हाची अधिकारिता. | ८५ |
| १५१. | अधिनियमाविरुद्ध केलेल्या विशिष्ट अपराधासाठी खटला भरणे हे पोलिसांच्या स्वेच्छा-निर्णयानुसार असणे. .. .. .. .. | ८६ |
| १५१-क. | विशिष्ट खटले संक्षिप्त रीतीने निकालात काढणे. .. .. | ८६ |
| १५२. | इतर अधिनियमांखालील अपराधांबद्दल खटला भरण्यास बाधा न येणे. | ८६ |


## प्रकरण आठ

## संकीर्ण


| | | |
|---|---|---|
| १५३. | फी, बक्षिसे, वगैरेंचा विनियोग. .. .. .. .. | ८६ |
| १५४. | पोलिसांच्या इमारतींबद्दल राज्य शासनाने नगरपालिका कर किंवा इतर कर न देणे. | ८७ |
| १५५. | आदेश व अधिसूचना प्रसिद्ध करण्याची पद्धती. .. .. | ८७ |
| १५६. | कार्यपद्धतीत दोष असल्यावरून किंवा नियमबाह्यता झाल्यावरून नियम व आदेश बेकायदेशीर न ठरणे. .. .. .. .. | ८७ |
| १५७. | कलमे ५५, ५६, ५७, ५७-क किंवा ६३-कक याअन्वये दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दलच्या खटल्यात गृहीत धरावयाच्या गोष्टी. .. .. | ८८ |

| कलमे | प्रकरण आठ—चालू | पृष्ठ |
|---|---|---|
| १५७-क. | अधिकारांचा वापर करण्यास सक्षम असलेले, रिक्त जागांचा कार्यभार धारण करणारे किंवा त्या जागांवर येणारे अधिकारी. . . . . . . | ८८ |
| १५८. | ज्या क्षेत्रामधून निघून जाण्यासंबंधी निदेश देण्यात आला असेल अशा क्षेत्रात प्रवेश करण्याची किंवा परतण्याची परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तीने करून दिलेले बंधपत्र दंडनीय ठरणे. . . . . . . . . | ८८ |
| १५९. | कर्तव्यानुसार सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्याबद्दल कोणताही दंडाधिकारी किंवा पोलीस अधिकारी दंड भरण्यास किंवा नुकसान भरून देण्यास पात्र असणार नाही. | ८९ |
| १६०. | प्रत्यक्ष प्राधिकारान्वये केलेला कोणताही नियम किंवा दिलेला आदेश किंवा निदेश सद्भावनापूर्वक अमलात आणल्याबद्दल कोणताही लोकसेवक वर म्हटल्या-प्रमाणे पात्र असणार नाही. . . . . . . . . | ८९ |
| १६१. | वर म्हटल्याप्रमाणे कर्तव्याच्या निमित्ताने केलेल्या कृत्यांच्या बाबतीत वाद किंवा खटले. विहित मुदतीच्या आत दाखल न केल्यास ते विचारात न घेणे किंवा फेटाळून लावणे. उपरोक्त वादात एक महिन्याची नोटीस देणे व तक्रार केलेल्या अन्यायाचा पूर्ण तपशील देणे. नोटीस केव्हा देण्यात आली व प्रतिपूर्ती देण्यास तयार आहे किंवा नाही या गोष्टी वादपत्रात नमूद करणे.. . | ८९-९० |
| १६२. | लायसने आणि लेखी परवानगी यात शर्ती, वगैरे विनिर्दिष्ट करणे व त्यावर सही करणे. लायसने इत्यादी रद्द करणे.<br>लायसने इत्यादी रद्द केले गेले असेल तेव्हा ज्या व्यक्तीस ते देण्यात आले असेल त्या व्यक्तीजवळ ते नाही असे मानणे.<br>लायसन, इत्यादी मंजूर करण्यात आलेल्या व्यक्तीने फर्माविण्यात येईल तेव्हा ते सादर करणे. . . . . . . . . | ९०-९१ |
| १६३. | जाहीर नोटिसा कशा द्याव्यात . . . . . . . . | ९१ |
| १६४. | सक्षम प्राधिका-याची संमती वगैरे त्याच्या सहीच्या लेखी दस्तऐवजावरून सिध्द करणे. . . . . . . . . . . | ९१ |
| १६५. | नोटिसा, इत्यादींवर सहीचा ठसा मारता येईल. . . . . . . | ९२ |
| १६६. | हितसंबंधित व्यक्तीस कोणताही नियम किंवा आदेश विलोपित करण्याबद्दल, बदलण्याबद्दल किंवा त्यात फेरफार करण्याबद्दल राज्य शासनाकडे अर्ज करता येईल. . . . . . . . . . .<br>एखादा नियम किंवा आदेश बेकायदेशीर असल्याचे घोषित करण्याकरिता जिल्हा न्यायालयात वाद केव्हा दाखल करता येईल. . . . . . . | ९२ |
| १६७. | निरसन आणि व्यावृत्ती. . . . . . . . . . | ९२ |
| १६८. | ग्राम पोलीस आणि राखीव पोलीस यासंबंधीच्या कायद्यांची व्यावृत्ती . . | ९४ |
| **अनुसूची**— | | |
| | अनुसूची एक. . . . . . . . . . . | ९५ |
| | अनुसूची दोन. . . . . . . . . . . | ९६ |
| | अनुसूची तीन. . . . . . . . . . . | ९७ |
| | अनुसूची चार. . . . . . . . . . . | ९७ |

## सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२[१]

[ मुंबई पोलीस अधिनियम १९५१ ]*

[ राष्ट्रपतीची अनुमती दिनांक १ जून १९५१ रोजी मिळाली, मुंबई सरकारचे राजपत्र, भाग चारमध्ये दिनांक ११ जून १९५१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध करण्यात आला ]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, फेरबदल व सुधरणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७.
सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६.
सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १.
मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.
सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८.
सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४.
सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७.
सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६.
सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १०
सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याअन्वये सुधारणा केल्याप्रमाणे
सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५.
महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.
सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.
सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८.
सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

---

[१]उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता १९५० चे **मुंबई सरकारचे राजपत्र** (इंग्रजी), भाग ५, पृष्ट ३२४ पहा व निवड समितीच्या अहवालाकरिता १९५१ चे **मुंबई सरकारचे राजपत्र** (इंग्रजी), भाग५, पृष्ठे, ३४-३८पहा

*सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी हा अधिनियम मुंबई राज्याच्या ज्या प्रदेशास लागू नव्हता त्या प्रदेशास तो लागू करण्यात आला (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २ पहा)

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.†

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ (१ एप्रिल १९७४) §

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ (१ नोव्हेंबर १९७७) §

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ (१ मे १९७५) §

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१* (४ नोव्हेंबर १९७४) §

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५** (१३ फेब्रुवारी १९७६) §

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७*** (२७ ऑगस्ट १९८१) §

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ (१५ जुलै १९८१) §

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ ††(७ ऑगस्ट १९८७) §

---

† सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याचे कलम ७ हे पुढीलप्रमाणे आहे :–

कलमे २ ते ६ ही भूतलक्षी प्रभावासहित लागू करणे व अधिकारी इत्यादींची सोडवणूक.

"७. (१) या अधिनियमाची कलमे २ ते ६ (दोन्ही धरुन) अन्वये मुख्य अधिनियमात केलेल्या सुधरणा दिनांक २० नोव्हेंबर १९६३ रोजी करण्यात आल्या व त्या तारखेस त्या अंमलात आल्या आहेत असे समजण्यात येईल.

(२) दिनांक २० नोव्हेंबर १९६३ पासून मुंबई पोलीस (सुधारणा) अधिनियम, १९६४ याच्या प्रारंभाच्या तारखेपर्यंतच्याकालावधीत, या अधिनियमाद्वारे सुधारलेल्या मुख्य अधिनियमाची कलमे ७३ ते ७७ (दोन्ही धरून) अन्वये, कोणताही पोलीस अधिकारी, किंवा अपर पोलीस अधिकारी, पशुवैद्यक अधिकारी किंवा दंडाधिकारी यांस प्रदान केलेल्या अधिकारांस अनुसरून किंवा अनुसरण्याच्या उद्देशाने त्याने सद्‌भावनापूर्वक केलेली सर्व कृत्ये, ही कायदेशीररीत्या केली आहेत असे समजण्यात येईल व ती कायदेशीररीत्या करण्यात आली आहेत असे नेहमीच समजण्यात येईल आणि ज्या अधिकारांचा वापर करणे अभिप्रेत आहे अशा अधिकारांचा वापर करून त्याने उक्त कृत्ये केली त्यावेळी ते अधिकार त्याच्याकडे कायदेशीररीत्या निहित केलेले नव्हते याच केवळ कारणास्तव अशी कोणतीही कृत्ये बेकायदेशीर असल्याचे समजले जाणार नाही किंवा अशा कोणत्याही कृत्यास आक्षेप घेण्यात येणार नाही आणि असे सर्व अधिकारी व दंडाधिकारी यांची, याद्वारे, अशा कृत्यांच्या संबंधातील दिवाणी व फौजदारी जबाबदारातीतून सोडवणूक करण्यात येत आहे व त्यास मुक्त करण्यात येत आहे.".

१९६४ चा महा. २४.

§ ही खून अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवते.

* सन १९७४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ हा सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ द्वारे निरसित करण्यात आला.

** सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ५ द्वारे निरसित करण्यात आला.

*** सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ हा सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम १९ द्वारे निरसित करण्यात आला.

†† सन १९८७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ हा सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ६ द्वारे निरसित करण्यात आला.

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ †††*(११ नोव्हेंबर १९९३) §

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७. (२४ जून १९९४) §

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३. @ (१७ एप्रिल १९९५) §

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०. (९ ऑक्टोबर २०००) §

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५. (१४ ऑगस्ट २००५) §

---

§ ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवते.

††† सन १९९३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६, हा सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ६ द्वारे निरसित करण्यात आला.

* सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याची कलमे ४ व ५ ही पुढीलप्रमाणे आहेत :—

४. मुख्य अधिनियमाची कलमे ५६ आणि ५७ अन्वये काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचना जेथवर, त्या कलमाच्या प्रयोजनार्थ उप-विभागीय दंडाधिका-यांना अधिकार प्रदान करण्याशी संबंधित असतील तेथवर १९९४ च्या मुंबई पोलीस (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, १९९३ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या अशा चा त्या कलमान्वये राज्य शासनाने यथोचित व वैध रीतीने परंतु, त्यामध्ये असलेल्या " विशेषरीत्या " हा शब्द वगळण्यात येईल आणि तो नेहमीच वगळण्यात आलेला असल्याचे मानण्यात येईल. या फेरफाराच्या अधीन राहून काढलेल्या अधिसूचना आहेत असे मानण्यात येईल.

(डावा समास: १९९४ चा महा. २.)

(उजवा समास: सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याची कलमे ५६ आणि ५७ या अन्वये काढण्यात आलेल्या विवक्षित अधि-सूचनांची सुधारणा.)

५. (१) कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी,— विधीग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

१९९४ चा महा. २. (अ) उप-विभागीय दंडाधिका-यास अधिकार प्रदान करणारी कोणतीही अधिसूचना मग ती मुंबई पोलीस (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, १९९३ (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा केलेला आहे.) याच्या प्रारंभापूर्वी काढलेली असो किंवा काढण्यात आल्याचे अभिप्रेत असो ;

(ब) कोणत्याही उप-विभागीय दंडाधिका-याने उक्त अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी दिलेल्या मुख्य अधिनियमाच्या कलम ५६ किंवा ५७ अन्वये निदेश देणारा कोणताही आदेश,

जणू काही कायद्यानुसार मुख्य अधिनियमान्वये यथोचितरीत्या काढण्यात आलेला होता किंवा देण्यात आलेला होता अशा प्रकारे अशी अधिसूचना किंवा आदेश विधिग्राह्य व परिणामकारक असेल आणि विधिग्राह्य व परिणामकारक असल्याचे मानण्यात येईल, आणि असा प्रदान केलेला अधिकार किंवा आदेश यास कायद्याने प्राधिकार नसल्याच्या कारणावरून, असा प्रदान केलेला अधिकार किंवा आदेश विधिग्राह्य म्हणून घोषित करण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारच्या नुकसानीभरपाईची मागणी करण्यासाठी, कोणत्याही न्यायालयामध्ये किंवा कोणत्याही अधिका-यासमोर किंवा अन्य प्राधिकरणासमोर कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणर नाही, चालवता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही.

(२) शंकानिरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येते की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही मजकुरामुळे, उप-विभागीय दंडाधिकारा-याने दिलेल्या कोणत्याही आदेशाला मुख्य अधिनियमाच्या तरतुदीनुसार हरकत घेण्यास कोणत्याही व्यक्तीला प्रतिबधं होतो असा त्या मजकुराचा अर्थ लावण्यात येणार नाही.

@ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याची कलमे ४ व ६ पुढीलप्रमाणे आहेत:—

"४. मुख्य अधिनियमाच्या कलम ५५ च्या प्रयोजनाकरिता. राज्य शासनाकडून; जिल्हा दंडाधिकारी, उप-विभागीय दंडाधिकारी किंवा अधीक्षक यांना विशेष अधिकार देण्यासंबंधात त्या कलमान्वये काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचना किंवा आदेश, हे या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या त्या कलमान्वये, राज्य शासनाने यथायोग्य रीतीने आणि वैध रीतीने काढलेले आहेत असे समजण्यात येईल. परंतु, त्या अधिसूचना किंवा आदेश, त्यामध्ये असलेल्या " विशेषरीत्या " हा शब्द वगळण्यात येईल आणि तो नेहमीच वगळण्यात आलेला असल्याचे मानण्यात येईल या फेरबदलाच्या अधीन असतील.".

(डावा समास: १९९४ चा महा. २.)

(उजवा समास: सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याची कलमे ५६ आणि ५७ याअन्वये काढण्यात आलेल्या विवक्षित अधिसूचनांची सुधारणा.)

"(६) (१) कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामध्ये काही अंतर्भूत असले तरी— विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

(अ) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी मुख्य अधिनियमाच्या जिल्हा दंडाधिकारी किंवा उप-विभागीय दंडाधिकारी किंवा अधीक्षक याला अधिकार देण्यासाठी कलम ५५ अन्वये काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश ;

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी मुख्य अधिनियमाच्या कलम ५५ अन्वये निदेश देण्यासाठी कोणताही जिल्हा दंडाधिकारी, उप-विभागीय दंडाधिकारी किंवा अधीक्षक याने काढलेली कोणतीही अधिसूचना.

(क) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, मुख्य अधिनियमाच्या कलम ६० अन्वये राज्य शासनाने दिलेला कोणताही आदेश ;

जणूकाही, कायद्यानुसार, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमान्वये, अशी अधिसूचना किंवा आदेश यथायोग्यरीत्या काढण्यात आलेली किंवा दिलेला होता अशा प्रकारे ती अधिसूचना किंवा तो आदेश विधिग्राह्य व प्रभावी राहील आणि विधिग्राह्य व प्रभावी असल्याचे मानण्यात येईल, आणि अशी कोणतीही अधिसूचना किंवा आदेश काढण्यासाठी किंवा देण्यासाठी कायद्याने प्राधिकार दिलेला नव्हता या कारणावरून, अशी अधिसूचना किंवा आदेश विधिग्राह्य असल्याचे जाहीर करण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारच्या नुकसानभरपाईचा दावा करण्यासाठी, कोणताही वाद, अपील अर्ज किंवा इतर कार्यवाही, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही अधिका-यापुढे किंवा इतर प्राधिका-यापुढे दाखल करण्यात येणार नाही किंवा चालवण्यात येणार नाही किंवा पुढे चालू ठेवण्यात येणार नाही.

(२) शंकानिरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येते की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही मजकुरामुळे जिल्हा दंडाधिकारी, उप-विभागीय दंडाधिकारी, अधीक्षक किंवा राज्य शासन याने दिलेल्या कोणत्याही आदेशाला या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदीनुसार हरकत घेण्यास कोणत्याही व्यक्तीला प्रतिबंध होतो असा त्या मजकुराचा अर्थ लावण्यात येणार नाही."

# मुंबई राज्यातील पोलीस दलाचे नियमन करण्यासंबंधीचा कायदा एकत्रित करण्याबाबत व त्यात सुधारणा करण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी**, मुंबई राज्याचे जिल्हा पोलीस दल व बृहन्मुंबई पोलीस दल, [1][ तसेच मुंबई राज्याच्या सौराष्ट्र कच्छ व हैदराबाद क्षेत्रांची व विदर्भ प्रदेशाची पोलीस दले ] एकत्रित करून त्यांचे एक सामाईक पोलीस दल बनविणे आणि संपूर्ण राज्यात उक्त दलाच्या कार्यविषयक नियंत्रणाबसंबंधात एकरूप पध्दती सुरू करणे इष्ट आहे;

**आणि ज्याअर्थी**, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी उक्त दलाचे विनियमन करण्यासंबंधीचा आणि राज्य शासनाने व उक्त दलातील व्यक्तींनी अधिकारांचा वापर करण्यासंबंधीचा व कामे पार पाडण्यासंबंधीचा कायदा एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या विवक्षित इतर प्रयोजनांकरिता तरतूद करणे आवश्यक आहे ;

**त्याअर्थी**, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

१९५९ चा मुंबई ३४.

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१, असे म्हणावे.

[2][ (२) तो संपूर्ण [3][ महाराष्ट्र ] राज्यास लागू आहे.]

*(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील त्या दिनांकास [4][ पुनर्रचनापूर्व मुंबई राज्यात ] [5][ अंमलात येईल ; आणि मुंबई पोलीस (व्याप्ती वाढविणे व सुधारणा) अधिनियम, १९५९, याद्वारे तो राज्याच्या ज्या भागास लागू करण्यात आला, त्या भागात तो, राज्य शासन तत्सम अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा इतर दिनांकास अंमलात येईल.]

१९८८ चा मुंबई ३.

**२.** विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर, या अधिनियमात,—

१९४९ चा मुंबई ५९.

व्याख्या.

(१) " गुरेढोरे " यात हत्ती, उंट, घोडे, गाढवे, खेचरे, मेंढ्या, शेळ्या व डुकरे यांचा समावेश होतो;

१९५० चा मध्यप्रांत व व-हाड २.

(२) " महानगरपालिका " याचा अर्थ, मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ [6][ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८] याअन्वये घटित केलेली महानगरपालिका असा आहे;

---

[1]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ३ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2]वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[3]महाराष्ट्र निधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

*वरील आदेशान्वये पोट-कलम (३) मध्ये कोणताही बदल होणार नाही.

[4]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, याच्या कलम ४ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5]वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) अन्वये ' अंमलात येईल ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ५(१) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(३) " सक्षम प्राधिकारी " हा शब्दप्रयोग या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याच्या किंवा कोणतेही कर्तव्य किंवा काम पार पाडण्याच्या संदर्भात वापरण्यात आला असेल तेव्हा त्याचा अर्थ,—

(क) ज्याकरिता कलम ७ अन्वये पोलीस आयुक्ताची नेमणूक केलेली असेल तेव्हा बृहन्मुंबईच्या आणि इतर क्षेत्रांच्या संबंधात आयुक्त, असा आहे.

(ख) खंड (क) मध्ये निर्देश केलेल्या क्षेत्रांव्यतिरिक्त इतर क्षेत्रांच्या संबंधात, राज्य शासनाने त्याबाबतीत विशेष रीतीने अधिकार प्रदान केलेला असेल तेव्हा जिल्हा दंडाधिकारी किंवा [१][अधीक्षक] किंवा अपर अधीक्षक, असा आहे.

[२][(ग) महसूल विभागाच्या संबंधात, महसूल आयुक्त असा आहे;]

(४) " पोलीस शिपाई " याचा अर्थ, सर्वात कनिष्ठ श्रेणीचा पोलीस अधिकारी असा आहे;

[३][(४-क) " नृत्य शाळा " याचा अर्थ, जेथे फी भरल्यानंतर किंवा अन्य कोणताही मोबदला घेऊन किंवा घेतल्याशिवाय प्रवेश दिल्यानंतर व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे नृत्य शिकविण्यात येते किंवा त्यांच्याकडून नृत्याचा अभ्यास करण्यात येतो अशी कोणतीही जागा (मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) असा आहे; परंतु ज्या कोणत्याही संस्थेत अभ्यासक्रमाचा एक विषय म्हणून नृत्य शिकविण्यात येते किंवा त्याचा अभ्यास करण्यात येतो, व ती संस्था या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी शासनाद्वारे किंवा शासनाने त्या बाबतीत रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याद्वारे रीतसर मान्यता देण्यात आलेली संस्था असेल अशा कोणत्याही संस्थेचा त्यात समावेश होत नाही.]

(५) " जिल्हा " याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ †च्या प्रयोजनाकरिता जिल्हा म्हणून घटित झालेला प्रादेशिक विभाग असा आहे, परंतु, त्यामध्ये, [४][कलम ७ अन्वये ज्या क्षेत्रासाठी पोलीस आयुक्ताची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्राचा] समावेश होत नाही; १८९८ चा मुंबई ५.

[५][(५-क) " खाद्यगृह " याचा अर्थ, ज्या कोणत्याही जागेत लोकांना प्रवेश दिला जातो, व जेथे अशा जागेची मालकी असणा-या किंवा तीत हितसंबंध असणा-या किंवा तिची व्यवस्था पाहणा-या कोणत्याही व्यक्तीकडून त्या जागेवर सेवनाकरिता कोणत्याही प्रकारचे खाद्यपदार्थ किंवा पेय पुरविण्यात येते ती जागा असा होत असून त्यात अल्पोपहार, कक्ष, खानावळ, कॉफीगृह यांचा किंवा ज्या दुकानात किंवा दुकानाजवळ लोकांना सेवनाकरिता कोणत्याही प्रकारचे खाद्यपदार्थ किंवा पेय पुरविण्यात येते, अशा दुकानाचा समावेश होतो; परंतु त्यात, " सार्वजनिक करमणुकीच्या जागेचा " समावेश होत नाही;]

---

[१]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षक " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२]सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ अन्वये उप-खंड (ग) समाविष्ट करण्यात आले.

[३]सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २, अन्वये खंड (४-क) समाविष्ट करण्यात आले.

†आता फौजदारी संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

[४]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याचे कलम ३, अनुसूची अन्वये " बृहन्मुंबईचा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ (अ) अन्वये खंड (५क) समाविष्ट करण्यात आले.

[१][(६) " महासंचालक व महानिरीक्षक ", " अपर महासंचालक व महानिरीक्षक ", " विशेष महानिरीक्षक ", " आयुक्त ", " सहआयुक्त ", " अपर आयुक्त ", " उपमहानिरीक्षक ", " उप आयुक्त ", " सहायक आयुक्त ", " अधीक्षक ", " अपर अधीक्षक ", " सहायक अधीक्षक " व " उप अधीक्षक " याचा अर्थ, या अधिनियमान्वये नेमलेला किंवा नेमण्यात आल्याचे मानण्यात आलेला अनुक्रमे पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस आयुक्त, पोलीस सह आयुक्त, पोलीस अपर आयुक्त, पोलीस उप महानिरीक्षक (कलम ८-क अन्वये नेमलेला संचालक, पोलीस बिनतारी संदेश आणि पोलीस उप महानिरीक्षक, पोलीस मोटार परिवहन, यांसह) पोलीस उप आयुक्त, सहायक पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक (कलम ८-क किंवा २२-क अन्वये नेमलेल्या अधीक्षकासह), अपर पोलीस अधीक्षक, सहायक पोलीस अधीक्षक व पोलीस उप अधीक्षक असा आहे];

[२][(७) " नगरपालिका " याचा अर्थ, राज्याच्या कोणत्याही भागात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये स्थापन केलेली नगरपालिका किंवा बरो पालिका असा होतो, परंतु त्यात महानगरपालिकेचा समावेश होत नाही;];

[३][(७-क) नागपूर शहर महानगरपालिकेच्या संबंधात " महानगरपालिका आयुक्त " याचा अर्थ, मुख्य कार्यकारी अधिकारी असा होतो, मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो];

(८) " जागा " यात कोणतीही कायम किंवा तात्पुरत्या स्वरुपाची इमारत, तंबु, मंडप, इतर बांधकाम किंवा बंदिस्त किंवा खुले असे कोणतेही क्षेत्र यांचा समावेश होतो;

(९) " सार्वजनिक मनोरंजनाची जागा " याचा अर्थ, जेथे संगीत, गायन, नृत्य किंवा कोणतेही मनोरंजन किंवा खेळ यांची किंवा यांच्या साधनांची सोय ज्यात केलेली असते आणि जेथे पैसे घेऊन किंवा प्रवेश दिलेल्या व्यक्तीकडून पैसे गोळा करता यावेत या उद्देशाने लोकांना प्रवेश देण्यात येतो, अशी कोणतीही जागा, असा होतो व त्यात शर्यतीचे मैदान, सर्कस, नाट्यगृह, संगीतदालन, बिलियर्ड रूम, बॅगटेल रूम, व्यायाम शाळा, दांडपट्ट्याची शाळा, तरण तलाव किंवा नृत्य दालन यांचा समावेश होतो;

[४][(१०) " सार्वजनिक करमणुकीची जागा " याचा अर्थ, निवासगृह, भोजन-नि-निवासगृह किंवा निवासी हॉटेल असा होतो आणि त्यात, ज्यामध्ये लोकांना कोणत्याही प्रकारची दारू किंवा मादक द्रव्य त्याच जागेत किंवा जागेजवळ सेवनासाठी पुरविण्यात येते (अशा मदिरालय, दारूचे दुकान, बीअरचे दुकान किंवा मद्यार्क, माडी, ताडी, गांजा, भांग किंवा अफू याचे दुकान यासारख्या) कोणत्याही खाद्यगृहाचा समावेश होतो];

(११) " पोलीस अधिकारी " याचा अर्थ, या अधिनियमान्वये नेमलेला किंवा नेमण्यात आला आहे असे समजण्यात येणारा पोलीस दलाचा कोणताही सदस्य असा होतो आणि यात कलम २१ किंवा २२ अन्वये नेमलेल्या विशेष पोलीस अधिका-याचा किंवा जादा पोलीस अधिका-याचा समावेश होतो;

(१२) " विहित " याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेला असा होतो;

---

[१]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२]सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ५ (४) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३]वरील अधिनियमाच्या कलम ५ (५) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[४]सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ (ब) अन्वये खंड (१०) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

(१३) " सार्वजनिक जागा " यात, किना-यालगतचा प्रदेश, प्रत्येक सार्वजनिक इमारतीचा किंवा स्मारकाचा परिसर आणि पाणी काढण्याकरिता, धुण्याकरिता किंवा स्नानाकरिता किंवा मनोरंजनाकरिता जेथे लोकांना जाण्यायेण्याची मोकळीक असते त्या सर्व जागा यांचा समावेश होतो ;

[१][(१३-क) " महसूल आयुक्त " याचा अर्थ, मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९* याच्या कलम ६-अ अन्वये नेमलेला विभागाचा आयुक्त असा होतो;] १८७९ चा मुंबई ५.

(१४) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले नियम असा होतो;

(१५) " रस्ता " यात कोणताही महामार्ग, पूल, सेतुवरील मार्ग, पार सेतु, कमावनीवजा मार्ग, घाट किंवा धक्का किंवा जेथे लोकांस जाण्यायेण्याची मोकळीक असेल अशी कोणतीही सडक, गल्ली, पाऊलवाट, चौक, आवार, आळी किंवा वाट, मग ती रहदारीची असो किंवा नसो, यांचा समावेश होतो;

(१६) " दुय्यम दर्जाचे अधिकारी " याचा अर्थ, निरीक्षकापेक्षा खालच्या दर्जाच्या पोलीस दलातील व्यक्ती, असा होतो;

(१७) " वाहन " याचा अर्थ, कोणतीही वाहतूक गाडी, यान (व्हॅन), खटारा, मालमोटार, हातगाडी किंवा कोणत्याही प्रकारचे इतर वाहतूक साधन असा होतो व यात दुचाकी सायकल, तिचाकी सायकल, रिक्षा, स्वयंचलित गाडी, जहाज, किंवा विमान याचा समावेश होतो.

## प्रकरण दोन

## पोलीस दलाचे अधीक्षण, नियंत्रण आणि संघटन

[५][संपूर्ण [३][महाराष्ट्र राज्यासाठी] एक पोलीस दल असणे].

**३.** [२][संपूर्ण [३][महाराष्ट्र राज्यासाठी]] एक पोलीस दल असेल [४][आणि अशा पोलीस दलामध्ये कलम २ च्या खंड (६) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रत्येक पोलीस अधिका-याचा समावेश असेल];

परंतु, हा अधिनियम [६][राज्याच्या संबंधित भागात] अंमलात येणा-या निकटपूर्वी, अनुसूची एक मध्ये नमूद केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमांन्वये घटित करण्यात आलेल्या पोलीस दलातील व्यक्ती या उक्त दलातील व्यक्ती आहेत असे मानण्यात येईल.

पोलीस दलावरील अधीक्षण राज्य शासनाकडे निहित असणे.

**४.** संपूर्ण [७][ [८][महाराष्ट्र राज्यासाठी]] पोलिस दलावरील अधीक्षण राज्य शासनाकडे निहित असेल आणि ते राज्य शासनाकडून करण्यात येईल आणि [९][या अधीक्षणास अधीन राहून, गृह विभागच्या कायदा व सुव्यवस्था विभागाचा प्रभारी असलेला राज्य शासनाचा गृह विभागातील सचिव मग त्यास सचिव, गृह सचिव, विषेश सचिव, अपर मुख्य सचिव किंवा अन्यथा पदनामित करण्यात आलेले असो— या पोलीस दलावर नियंत्रण, निदेशन व पर्यवेक्षण करण्याचे काम करील.];

---

[१]सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याचे कलम ३, अनुसूची या अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

*आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा ४१) पहा.

[२]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ६ अन्वये "संबंध राज्यासाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई राज्यासाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ३ अन्वये हा मजकूर नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[५]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ६ अन्वये "संबंध राज्यासाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७]वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये "राज्यातील" या ऐवजी "मुंबई राज्यातील" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८]महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई राज्यासाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ४ अन्वये "आणि कोणत्याही अधिका-यास" या मजकुराने सुरु होणा-या व "अधीन राहून गेले पाहिजे" या मजकुराने संपणा-या मजकुराऐवजी हा मजकूर नेहमीकरिता दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

**५.** या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून,– पोलीस दल घटित करणे.

(क) पोलीस दल, राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्धारित करील इतके निरनिराळ्या दर्जातील अधिकारी मिळून बनलेले असेल आणि अशा आदेशाद्वारे राज्य शासन निर्धारित करील असे त्यांचे संघटन आणि त्यांना असे अधिकार, कार्ये व कर्तव्ये असतील ;

(ख) पोलीस दलातील सेवाप्रवेश, वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती, राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी निर्धारित करील, अशा असतील :

परंतु —

[१][(एक) अनुसूची एकचा भाग एक किंवा दोन यात उल्लेख केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमांन्वये घटित केलेल्या पोलीस दलाच्या व्यक्तीचा आणि कलम ३ अन्वये पोलीस दलातील व्यक्ती म्हणून मांडण्यात येणा-या व्यक्तीचा सेवाप्रवेश, वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती याचे नियमन करणारे नियम व आदेश खंड (ख) अन्वये बदलण्यात किंवा रद्द करण्यात येईपर्यन्त अंमलात असण्याचे चालू राहतील ; मात्र त्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये उल्लेख केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये घटित केलेल्या पोलीस दलांतील व्यक्तींच्या बाबतीत, नियमात व आदेशात बदल करणे किंवा ते रद्द
१९५६ करणे हे राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ याचे कलम ११५, पोट कलम (७) याच्या परंतुकाच्या अधीन
चा ३७. असेल; ]

(दोन) भारतीय पोलीस व भारतीय पोलीस सेवा यातील व्यक्तींचा सेवाप्रवेश, त्यांचे वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती यांच्या बाबतीत या खंडात काहीही लागू होणार नाही.

**६.** (१) [२][कलम ४ च्या तरतुदींना अधीन राहून पोलीस दलास निदेशन देण्याकरिता व पर्यवेक्षण करण्याकरिता] राज्य शासन पोलीस [३][महासंचालक व महानिरीक्षक याची] नेमणूक करील व तो, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये किंवा राज्य शासनाने दिलेल्या आदेशाद्वारे किंवा तदनुसार ज्यांची तरतूद करण्यात येईल अशा अधिकाराचा वापर करील आणि अशी कार्ये व कर्तव्ये पार पाडील आणि त्याच्यावर अशा जबाबदा-या असतील व त्यास असा प्राधिकार असेल. [३][महासंचालक व महानिरीक्षक,] अपर व उप [३][महानिरीक्षक].

(२) [४][(क) राज्य शासनाला एक किंवा अधिक अपर महासंचालक व महानिरीक्षक आणि एक किंवा अधिक विशेष महानिरीक्षक आणि एक किंवा अधिक उप महानिरीक्षक नेमता येतील.

(ख) राज्य शासनाला, महासंचालक व महानिरीक्षक याचे अधिकार, कामे, कर्तव्ये व जबाबदा-या यांपैकी कोणतेही अधिकार, कर्तव्ये व जबाबदा-या आणि त्याचा प्राधिकार अपर महासंचालकाला व महानिरीक्षकाला किंवा एखाद्या विशेष महानिरीक्षकाला किंवा उप-महानिरीक्षकाला किंवा यथास्थिति, वापरता, बजावता किंवा पार पाडता येईल, असा निदेश देता येईल.

(ग) राज्य शासनाला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे असा देखील निदेश देता येईल की, अपर महासंचालक व महानिरीक्षक किंवा एखादा विशेष महानिरीक्षक किंवा एखादा उप-महानिरीक्षक हा, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशारीतीने व अशा मर्यादेपर्यन्त महासंचालक व महानिरीक्षक यांस त्याचे अधिकार, कार्ये, कर्तव्ये, जबाबदा-या व प्राधिकार यांचा वापर करण्याच्या आणि पार पाडण्याच्या कामी मदत व सहाय्य करील.]

**७.** (क) राज्य शासनाला , बृहन्मुंबईकरिता किंवा राज्य शासनाने याबाबतीत काढलेल्या व राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही क्षेत्राकरिता, एखाद्या पोलीस अधिका-यास पोलीस आयुक्त म्हणून नेमता येईल. आयुक्त.

---

[१]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ८ अन्वये मूळ उपखंडाऐवजी हा उपखंड दाखल करण्यात आला.

[२]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर नेहमीकरिता दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[३]वरील अधिनियमाच्या कलम २ अन्वये "पोलीस महानिरीक्षक" आणि "महानिरीक्षक" या मजकुराऐवजी हे शब्द १८ डिसेंबर १९८२ पासून दाखल करण्यात आले आहेत, असे मानण्यात येईल.

[४]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३ अन्वये मूळ खंडाऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

(ख) राज्य शासनाला खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या [१][क्षेत्रांपैकी कोणत्याही क्षेत्रांकरिता एक किंवा अधिक अपर पोलीस आयुक्त [२][आणि एक किंवा अधिक सह आयुक्त] देखील नेमता येतील.]

(ग) आयुक्त, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये तरतूद करण्यात आली असेल, अशा किंवा राज्य शासनाने सर्वसाधारणपणे किंवा विशेष आदेशाद्वारे अन्यथा निदेश दिला असेल अशा अधिकारांचा वापर करील व अशी कार्ये व कर्तव्ये पार पाडील व त्याच्यावर अशा जबाबदा-या असतील व त्यास असा प्राधिकार असेल :

परंतु, आयुक्ताने ज्याचा वापर करावयाचा असेल किंवा जे पार पाडावयाचे असतील असे अधिकार किंवा बजावयाचे प्राधिकार, कामे, कर्तव्ये किंवा जबाबदा-या [३][महासंचालक व महानिरीक्षक याच्या] नियंत्रणास अधीन राहून वापरण्यात येतील किंवा पार पाडण्यात येतील, असा निदेश राज्य शासन देऊ शकेल :

परंतु आणखी असे की, या कलमान्वये ज्या क्षेत्राकरिता आयुक्त नेमण्यात आला असेल ते क्षेत्र, असे क्षेत्र त्याकरिता जिल्हा दंडाधिकारी किंवा [४][अधीक्षक] नेमण्यात आला असेल त्या जिल्ह्याच्या प्रादेशिक अधिकारितेतील जिल्ह्याचा एक भाग असेल तरीही या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद केलेली नसेल तर, या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी जिल्हा दंडाधिका-याच्या किंवा [४][अधीक्षकाच्या] प्रभाराखाली असणार नाही.

[७][अधीक्षक आणि] अपर अधीक्षक, सहायक अधीक्षक व उप अधीक्षक यांची नेमणूक.

८. (१) राज्य शासनाला, प्रत्येक जिल्ह्यासाठी किंवा जिल्ह्याच्या भागासाठी किंवा एका किंवा त्याहून अधिक जिल्ह्यासाठी [५][एक पोलीस अधीक्षक] व त्यास इष्ट वाटेल त्याप्रमाणे एक किंवा त्याहून अधिक अपर पोलीस अधीक्षक, सहायक पोलीस अधीक्षक आणि पोलीस उप अधीक्षक नेमता येतील.

(२) राज्य शासनाला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, अपर अधीक्षकास, ज्या जिल्ह्यासाठी त्याला नेमले असेल त्या जिल्ह्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात, या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये [४][अधीक्षकाने] वापरावयाच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकाराचा वापर करण्याचा व त्या अधीक्षकाने पार पाडावयाची सर्व किंवा कोणतीही कार्ये किंवा कर्तव्ये पार पाडण्याचा अधिकार देता येईल.

(३) [६][अधीक्षकास], राज्य शासनाची पूर्वपरवानगी घेऊन, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्याला देण्यात आलेले कोणतेही अधिकार व कार्ये सहायक अधीक्षकाकडे किंवा उप अधीक्षकाकडे सोपविता येतील :

[८][परंतु, कलम ३३ अन्वये कोणतेही नियम करण्याचे, त्यात फेरफार करण्याचे किंवा ते रद्द करण्याचे अधीक्षकाने वापरावयाचे अधिकार सहायक अधीक्षकाकडे किंवा उप अधीक्षकाकडे सोपविण्यात येणार नाही.]

बिनतारी संदेश यंत्रणा व मोटार परिवाहन यंत्रणा यासाठी किंवा कोणतेही विशिष्ट कर्तव्य पार

[९][**८-क.** (१) राज्य शासनास, संपूर्ण राज्याकरिता अथवा त्याच्या कोणत्याही भागाकरिता --

(क) पोलीस बिनतारी संदेश यंत्रणेसाठी ;

(ख) पोलीस मोटार परिवाहन यंत्रणेसाठी ; किंवा

(ग) या बाबतीत राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील

---

[१]सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम २ अन्वये " क्षेत्रांकरिता एक अपर पोलीस आयुक्त नियुक्त करता येईल " या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २ अन्वये " पोलीस महानिरीक्षक " आणि " महानिरीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर १३ डिसेंबर १९८२ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[४]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम ३, अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षकाच्या " व " जिल्हा अधीक्षक " या मजकुराऐवजी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]वरील अधिनियमाच्या कलम ३, अनुसूची अन्वये "अधीक्षक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]वरील अधिनियमाच्या कलम ३, अनुसूची अन्वये "जिल्हा अधीक्षक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७]वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये, "जिल्हा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८]सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २ अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

[९]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २ अन्वये हे दाखल करण्यात आले.

अशी विशिष्ट कर्तव्ये पार पाडण्यासाठी; पाडण्यासाठी [३][संचालक, पोलीस बिनतारी संदेश, याची व अधीक्षकाची], सहायक अधीक्षकाची आणि उप अधीक्षकांची नेमणूक.

[१][(एक) त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे एक किंवा अधिक संचालक; पोलीस बिनतारी संदेश, व [२][विशेष पोलीस महानिरीक्षक], पोलीस बिनतारी संदेश यंत्रणा (ज्याचा यापुढे " संचालक, पोलीस बिनतारी संदेश " असा निर्देश केला आहे.) याची, आणि

(दोन) त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, एक किंवा अधिक पोलीस अधीक्षकांची आणि सहायक पोलीस अधीक्षकांची व पोलीस उप अधीक्षकांची, नेमणूक करता येईल.]

(२) अशा रीतीने नेमलेला [४][कोणताही पोलीस बिनतारी संदेश संचालक आणि पोलीस अधीक्षक] राज्य शासन [५][त्यांच्यापैकी प्रत्येकाकडे वेळोवेळी नेमून देईल] या अधिकारांचा वापर करील व सोपविलेली कार्ये पार पाडील. [६][संचालक, या अधिनियमांद्वारे किंवा तद्न्वये त्यास देण्यात आलेले अधिकार आणि कार्ये यांपैकी कोणताही अधिकार आणि कार्ये राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने अधीक्षकाकडे किंवा एखाद्या सहायक किंवा उप अधीक्षकाकडे सोपविता येतील, आणि अधीक्षकास, तशाच प्रकारच्या पूर्वपरवानगीस अधीन राहून, असे अधिकार व कार्ये एखाद्या सहायक किंवा उप अधीक्षकाकडे सोपविता येतील :]

परंतु, [७][संचालक, अधीक्षक] किंवा सहायक अधीक्षक किंवा उप अधीक्षक हा [८][महासंचालक व महानिरीक्षक याच्या] नियंत्रणास अधीन राहून, पूर्वोक्त अधिकाराचा वापर करील आणि पूर्वोक्त कार्ये पार पाडील.]

[९][**९.** (१) राज्य शासनाला, अधीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही पोलीस अधिका-यास नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयाचा किंवा राज्य शासनाने स्थापन केलेल्या इतर कोणत्याही पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून नेमता येईल. राज्य शासनाला त्यास योग्य वाटतील असे अधिकार, अशी कार्ये व कर्तव्ये उपरोक्त प्रत्येक प्राचार्याकडे सोपविता येतील. पोलीस प्रशिक्षण संस्थांच्या प्राचार्यांची नेमणूक.

---

[१]सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४(ई) अन्वये " अधीक्षकांची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]वरील अधिनियमाच्या कलम ४(ब)(एक) अन्वये " कोणत्याही अधीक्षकाने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]वरील अधिनियमाच्या कलम ४(ब)(दोन) अन्वये " त्याजकडे वेळोवेळी अभिहस्तांकित करील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]वरील अधिनियमाच्या कलम ४(क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७]वरील अधिनियमाच्या कलम ४(ड) अन्वये " अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ अन्वये " महानिरीक्षकाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर १३ डिसेंबर १९८२ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

[९]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, याच्या कलम ३ अन्वये कलम ९ दाखल करण्यात आले.

(२) राज्य शासनाला, सहायक अधीक्षकाच्या किंवा उप अधीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही पोलीस अधिका-यास राज्य शासनाने स्थापन केलेल्या कोणत्याही पोलीस प्रशिक्षण शाळेचा प्राचार्य म्हणून नेमता येईल. राज्य शासनाने त्या बाबतीत प्राधिकृत केलेल्या (उपमहानिरीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा) अधिका-यास, राज्य शासनाच्या नियंत्रणास अधीन राहून, त्यास योग्य वाटतील असे अधिकार, अशी कार्ये व कर्तव्ये अशा रीतीने नेमलेल्या प्रत्येक प्राचार्याकडे सोपविता येतील.]

आयुक्ताच्या हाताखालील उपआयुक्त. [२][***]

**१०.** (१) राज्य शासनाला, बृहन्मुंबईत किंवा ज्या क्षेत्रात कलम ७, खंड (क) अन्वये आयुक्त नेमलेला असेल अशा कोणत्याही क्षेत्रात, एक किंवा अनेक पोलीस उपआयुक्त [१][***] नेमता येतील.

(२) असा प्रत्येक उपआयुक्त, [३][***] आयुक्ताच्या आदेशानुसार, [४][*****] या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये त्याने वापरावयाचे आयुक्ताचे अधिकार व पार पाडावयाची कार्ये व कर्तव्ये यांपैकी कोणत्याही अधिकाराचा वापर करील व कोणतेंही कार्ये व कर्तव्ये पार पाडील :

परंतु, [५][कलम ३३ अन्वये नियम करणे, त्यांत फेरफार करणे किंवा ते रद्द करणे यासंबंधीच्या] आयुक्ताने वापरावयाच्या अधिकाराचा उपआयुक्तास [३][***] वापर करता येणार नाही.

[६][आयुक्तां-च्या अधिकारि-तेतील, [७][सहायक आयुक्त]]

**११.** (१) राज्य शासनाला [८][कलम ७ अन्वये ज्या क्षेत्रासाठी पोलीस आयुक्ताची नेमणूक करता आली असेल, अशा कोणत्याही क्षेत्रासाठी] त्यास इष्ट वाटतील इतके [९][सहायक पोलीस आयुक्त] नेमता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये नेमण्यात आलेल्या [१०][सहायक आयुक्त], या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याअन्वये वापरता येतील किंवा पार पाडता येतील किंवा राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये आयुक्ताने त्याच्याकडे सोपविले असतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये व कार्ये पार पाडील :

---

[१]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " आणि एक किंवा अनेक सहायक पोलीस आयुक्त " हा मजकूर वगळण्यात आला.

[२]वरील अधिनियमाच्या कलम ३, अनुसूची अन्वये " व सहाय्यक आयुक्त " हा मजकूर वगळण्यात आला.

[३]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " किंवा सहायक कमिशनराने " व " किंवा सहायक कमिशनर " हा मजकूर वगळण्यात आला.

[४]सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, याच्या कलम २ अन्वये " याबाबत केलेल्या राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अनुसरून " हा मजकूर वगळण्यात आला व तो नेहमीकरिता वगळण्यात आलेला असल्याचे मानन्यात येईल.

[५]सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम ३ अन्वये " कलम १३ किंवा ३३ अन्वये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६, याच्या कलम ३, अनुसूची अन्वये मूळ समास टीपेऐवजी ही समास टीप दाखल करण्यात आली.

[७]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " बृहन्मुंबईसाठी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " पोलीस अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०]वरील अधिनियमाच्या कलम ३, अनुसूची अन्वये " अधीक्षकाने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, [१][कलम ३३ अन्वये नियम करणे, त्यात फेरफार करणे किंवा ते रद्द करणे यासंबंधीच्या] आयुक्ताने वापरावयाच्या अधिकारांचा [२][सहायक आयुक्तास] वापर करता येणार नाही.

विभाग व पोटविभाग घटित करणे.

**१२.** (१) राज्य शासनाच्या नियंत्रणास अधीन राहून, [३][कोणत्याही क्षेत्राचा] पोलीस आयुक्त, त्यास योग्य वाटेल तर—

(क) [४][त्याच्या प्रभाराखाली असलेल्या क्षेत्रात] पोलीस विभाग घटित करील;

(ख) त्या विभागांची पोटविभागात विभागणी करील; आणि

(ग) अशा विभागांच्या व पोटविभागाच्या सीमा व व्याप्ती निश्चित करील.

विभाग व पोटविभाग यांचे प्रभारी अधिकारी.

(२) असा प्रत्येक विभाग [५][सहायक आयुक्तांच्या] प्रभाराखाली असेल व प्रत्येक पोटविभाग पोलीस निरीक्षकाच्या प्रभाराखाली असेल.

निरीक्षक.

[६][ **१२-क.** राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, ज्या क्षेत्रासाठी आयुक्ताची नेमणूक करण्यात आली असेल त्या क्षेत्राच्या बाबतीत आयुक्त आणि इतर क्षेत्राच्या बाबतीत [७][महासंचालक व महानिरीक्षक] निरीक्षकांची नेमणूक करील.]

**१३.** [महानिरीक्षक व आयुक्त यांनी पहिल्या वर्गाच्या दंडाधिका-यांच्या व इलाखा शहर दंडाधिका-याच्या अधिकाराचा वापर करणे.] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१ याच्या दुस-या अनुसूचीद्वारे वगळण्यात आले.

नेमणुकीचे प्रमाणपत्र.

**१४.** (१) [८][निरीक्षकाच्या [९][* * *] श्रेणींच्या किंवा त्याहून निम्न श्रेणीच्या] प्रत्येक पोलीस अधिका-यास, त्याची नेमणूक झाल्यानंतर अनुसूची दोनमध्ये तरतूद केलेल्या नमुन्यात एक प्रमाणपत्र देण्यात येईल. असे प्रमाणपत्र राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल अशा अधिका-याच्या मुद्रेनिशी देण्यात येईल.

---

[१]सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, याच्या कलम २ अन्वये " कलम १३ किंवा ३३ अन्वये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " अधीक्षकास " या मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६, याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " बृहन्मुंबईचे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये " बृहन्मुंबईत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " पोलीस अधीक्षकाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, याच्या कलम २, अन्वये " कलम १२-क " समाविष्ट करण्यात आले.

[७]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, याच्या कलम २, अन्वये " महानिरीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८]सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३, अन्वये " निरीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९]सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याचा कलम ३ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

(२) नेमणुकीच्या प्रमाणपत्रात नाव नमूद असलेली व्यक्ती ही पोलीस दलात असण्याचे बंद होईल त्यावेळी, ते प्रमाणपत्र रद्दबातल होईल, किंवा ज्या मुदतीत अशा व्यक्तीस अशा दलातून निलंबित केले असेल त्या मुदतीपर्यन्त ते अंमलात राहणार नाही.

**१५.** पोलीस अधिका-याकडे निहित केलेले अधिकार, कामे व विशेष अधिकार, अशा पोलीस अधिका-यास पदावरून निलंबित केले असेल त्या मुदतीत निलंबित राहतील : पोलीस अधि-का-यास निलंबित केल्यास होणारा परिणाम.

परंतु, अशा रीतीने निलंबित केलेले असले तरी, अशी व्यक्ती पोलीस अधिकारी म्हणून असण्याचे बंद होणार नाही आणि त्या व्यक्तीस निलंबित करण्यात आले नसते तर ती ज्या प्राधिका-याच्या नियंत्रणाच्या अधीन राहिली असती त्याच प्राधिका-याच्या नियंत्रणाधीन राहील.

**१६.** आयुक्त हा [१][महासंचालक व महानिरीक्षक यांच्या] आदेशास अधीन राहून आणि [२][अधीक्षक] हा, [१][महासंचालक व महानिरीक्षक] व जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशांस अधीन राहून, आपापल्या प्राधिकाराच्या क्षेत्रात शस्त्रे, कवाईत, कसरती, व्यक्ती व घटना यांवर लक्ष ठेवणे परस्परसंबंध, कर्तव्याचे वाटप, कायद्यांचा, आदेशांचा आणि कार्यवाहीच्या पद्धतींचा अभ्यास, यासंबंधीच्या सर्व बाबींचे तसेच बजावणी संबंधीच्या तपशीलाच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली पोलीस दलाकडून त्याच्या कर्तव्यांची पूर्तता करण्यासंबंधीच्या सर्व बाबींचे निदेश देऊन नियमन करील. आयुक्त व [२][अधीक्षक] यांचे सर्वसाधारण अधिकार.

**१७.** (१) कोणत्याही जिल्ह्याचा [२][अधीक्षक] व जिल्ह्याचे पोलीस दल जिल्हा दंडाधिका-याच्या नियंत्रणाखाली राहील. जिल्ह्यातील पोलीस दलावर जिल्हा दंडा-धिका-याचे नियंत्रण.

(२) असे नियंत्रण ठेवतांना जिल्हा दंडाधिका-यास राज्य शासन याबाबतीत करील असे नियम व आदेश लागू असतील [३][व तो महसूल आयुक्ताच्या कायदेशीर आदेशास अधीन असेल].

**१८.** जिल्हा दंडाधिका-यास, [२][अधीक्षकाकडून] गुन्हे, सराईत गुन्हेगार, शांतता भंगास प्रतिबंध, जमाव व मनोरंजनाचे कार्यक्रम यांचे नियमन, पोलीस दलाचे वाटप, [१][अधीक्षकाच्या] हाताखालील कोणत्याही पोलीस अधिका-याची वर्तणूक व चारित्र्य, इतर सहाय्यकारी साधनांचा उपयोग यांच्याशी संबंधीत कोणतीही बाब आणि पोलीस दलावरील आपले नियंत्रण ठेवण्यास आणि सुव्यवस्था राखण्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व बाबी यांविषयी विशेष किंवा सर्वसाधारण अहवाल मागविता येतील. [२][अधी-क्षका-कडून] अहवाल मागविण्याचा जिल्हा दंडा-धिका-याचा अधिकार.

---

[१]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ अन्वये " महानिरीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर १३ डिसेंबर १९८२ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

[२]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, याचे कलम २, अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकुर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[३]सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, याच्या कलम ३, अनुसूची अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

**१९.** जर जिल्हा दंडाधिका-यास, [१][अधीक्षकाच्या] हाताखालील कोणत्याही पोलीस अधिका-याची, विशिष्ट स्थानाच्या बाबतीत किंवा त्याच्या विशिष्ट कर्तव्यांच्या बाबतीत लक्षणीय अक्षमता किंवा अयोग्यता दिसून येईल तर तो [१][अधीक्षकाला] ज्या कोणत्याही अधिका-याची बदली करण्याचा त्यास अधिकार असेल त्या अधिका-याऐवजी दुसरा अधिकारी नेमण्यास फर्मावू शकेल आणि अशा आदेशाचे पालन करणे [१][अधीक्षकावर] बंधनकारक असेल : जिल्हा दंडाधिका-याचा पर्यवेक्षण करण्याचा अधिकार.

परंतु, संबंधित अधिकारी हा [२][निरीक्षकाच्या श्रेणीपेक्षा वरिष्ठ श्रेणीचा] अधीकारी असेल तर, जिल्हा दंडाधिका-यास त्याच्या वर्तणुकीविषयी [३][महासंचालक व महानिरीक्षक] याच्याकडे अहवाल पाठविता येईल. [३][महासंचालक व महानिरीक्षक] यांस त्यानंतर कोणती कारवाई करावयाची हे ठरविता येईल व त्यांस योग्य वाटतील असे आदेश देता येतील, आणि तो अशा उपाययोजनेसंबंधी किंवा आदेशासंबंधी जिल्हा दंडाधिका-यास कळवील.

पोलीसां-संबंधीच्या लेख्यांच्या बाबींची तपासणी करण्याचा व त्यांचे विनियमन करण्याचा [३][महा-संचालक व महा-निरीक्षक यांचा आणि] आयुक्ताचा अधिकार.

**२०.** [३][महासंचालक व महानिरीक्षक] यांस [४][संपूर्ण राज्यात], व आयुक्तास ज्या क्षेत्रासाठी त्याची नेमणूक करण्यात आली असेल त्या क्षेत्रात, राज्य शासनाच्या आदेशांस अधीन राहून, यथास्थिति, [४][राज्यातील] किंवा त्या क्षेत्रातील पोलिसांसंबंधीच्या लेख्यांच्या सर्व बाबींची तपासणी करण्याचा व त्यांचे विनियमन करण्याचा प्राधिकार असेल आणि संबंधित सर्व व्यक्तींना अशी तपासणी करण्याच्या कामी त्यास योग्य ती मदत करणे व सुविधा देणे व त्यानंतरच्या त्याच्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक असेल.

विशेष पोलीस अधिकारी.

**२१.** (१) आयुक्तास, [५][अधीक्षकास] किंवा राज्य शासनाने याबाबतीत विशेषरीत्या अधिकार दिलेल्या [६][* * *] कोणत्याही दंडाधिका-यास आपल्या प्रभाराखाली येणा-या हद्दीत कोणताही दंगा किंवा गंभीर स्वरुपाचा शांतताभंग होण्याची भिती आहे असे सकारण वाटत असेल आणि नेहमीचे पोलीस दल रहिवाशांचे संरक्षण करण्यासाठी व मालमत्तेच्या संरक्षणासाठी पुरेसे नाही असे त्याचे मत होईल तेव्हा, त्यास कोणत्याही वेळी स्वतःच्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिलेल्या आदेशाद्वारे, पोलीस दलास कोणत्याही प्रसंगी मदत करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा, १८ ते ५० वर्षे वयाच्या कोणत्याही धडधाकट पुरुषाची विशेष पोलीस अधिकारी म्हणून नेमणूक करता येईल.

---

[१]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, याचे कलम २, अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणीक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२]सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ४ अन्वये " निरीक्षकाच्या दर्जाच्या किंवा त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ अन्वये " महानिरीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर १३ डिसेंबर १९८२ पासून दाखल करण्यात आला असल्याचा मानण्यात येईल.

[४]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ११ अन्वये " दुस-या राज्यात घातलेले प्रदेश वगळून, पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३, दुसरी अनुसूची अन्वये " दुस-या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटपेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या " हा मजकूर वगळण्यात आला.

(२) अशा रीतीने नेमण्यात आलेल्या प्रत्येक विशेष पोलीस अधिका-यास त्याची नेमणूक झाल्यावर, —

(क) राज्य शासनाने याबाबत मंजूर केलेल्या नमुन्यामध्ये एक प्रमाणपत्र मिळेल.

(ख) साधारण पोलीस अधिका-यास जे अधिकार व विशेषाधिकार असतील व जी उन्मुक्ती मिळेल व जी कर्तव्ये व जबाबदा-या असतील, तेच अधिकार व विशेषाधिकार असतील व तीच उन्मुक्ती मिळेल व तीच कर्तव्ये व जबाबदा-या असतील व साधारण पोलीस अधिकारी म्हणून ज्या प्राधिका-यांच्या हाताखाली राहावे लागते त्याच प्राधिका-याच्या हाताखाली रहावे लागेल.

**२२.** (१) या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये किंवा तद्नुसार त्याबाबतीत विनिर्दिष्ट केलेला प्राधिकारी ठरवील अशा मुदतीसाठी व अशा वेतनावर असा प्राधिकारी ठरवील अशा दर्जाचे किंवा श्रेणीचे अपर पोलीस अधिकारी अशा तरतुदींमध्ये नमूद केलेल्या प्रयोजनासाठी नेमता किंवा प्रतिनियुक्त करता येतील. अपर पोलीस अधि-का-याची नेमणूक.

(२) नेमलेल्या प्रत्येक अपर पोलीस अधिका-याची नेमणूक झाल्यानंतर, —

(क) त्यास, राज्य शासनाने याबाबत मंजूर केलेल्या नमुन्यामध्ये, एक प्रमाणपत्र मिळेल ;

(ख) पोलीस अधिका-याकडे निहित असलेले सर्व अधिकार, विशेषाधिकार व कर्तव्ये किंवा त्यांपैकी प्रमाणपत्रात विशेषरीतीने नमूद करण्यात आले असतील असे अधिकार, विशेषाधिकार व कर्तव्ये त्याच्यामध्ये निहित होतील ; आणि

(ग) तो, यथास्थिति, आयुक्ताच्या किंवा [1][अधीक्षकाच्या] आदेशास अधीन असेल.

(३) अशा अपर पोलीस अधिका-यांची नेमणूक किंवा प्रतिनियुक्ती अशा पोलीसांची आवश्यकता असणा-या कोणत्याही व्यक्तीने विनंती केल्यास, करता येईल आणि अशा नेमणुकीचा खर्च या अधिनियमानुसार किंवा या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये तरतूद केलेल्या रीतीने वसूल करण्यात येईल.

[2][**२२-क.** (१) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, ते विनिर्दिष्ट करील अशी रेल्वे क्षेत्रे अंतर्भूत असलेले एक किंवा अधिक विशेष पोलीस जिल्हे निर्माण करता येतील, आणि अशा प्रत्येक विशेष पोलीस जिल्ह्यासाठी एक पोलीस अधीक्षक, [3][एक किंवा अधिक सहायक अधीक्षक व उप-अधीक्षक] व त्यास योग्य वाटतील असे इतर पोलीस अधिकारी नेमता येतील. रेल्वे पोलीसांची नेमणूक.

(२) [4][महासंचालक व महानिरीक्षक] यांच्या नियंत्रणास अधीन राहून, असे पोलीस अधिकारी आपापल्या प्रभाराखाली असलेल्या रेल्वेच्या प्रशासनाशी संबद्ध असलेली पोलीसांची कार्ये आणि राज्य शासन वेळोवेळी त्याच्यावर सोपवील अशी इतर कार्ये पार पाडतील.

(३) या पोट-कलमान्वये काम करण्यासाठी जिल्हा राज्य शासन, सर्वसाधारणतः किंवा विशेषतः अधिकार देईल, अशा उक्त पोलीस दलातील कोणत्याही सदस्यास, राज्य शासन याबाबत देईल अशा कोणत्याही आदेशास अधीन राहून विशेष जिल्ह्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात त्या जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिका-यांच्या अधिकारांपैकी कोणत्याही अधिकाराचा वापर करता येईल आणि जेव्हा तो अशा अधिकारांचा वापर करीत असेल तेव्हा तो सदस्य, वर सांगितल्याप्रमाणे अशा कोणत्याही आदेशास अधीन राहून, पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी आहे व तो आपल्या ठाण्याच्या हद्दीत अशा अधिका-याची कामे पार पाडीत आहे असे मानण्यात येईल.

---

[1]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, याचे कलम ३, अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षक " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १२ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[3]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ४ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ अन्वये १३ डिसेंबर १९८२ पासून हा मजकूर दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(४) राज्य शासन याबाबत देईल अशा कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, राज्याच्या प्रत्येक भागात अशा पोलीस अधिका-यांकडे, या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये, पोलीस अधिका-यांना जे अधिकार व विशेषाधिकार असतात, तेच अधिकार व विशेषाधिकार निहित करण्यात येतील व ते ज्या दायित्वांना अधीन असतात त्या दायित्वांस ते अधीन असतील.]

[१][(५) पोलीस अधीक्षकास, राज्य शासनाची पूर्व परवानगी घेऊन या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार, त्याच्याकडे जे कोणतेही अधिकार व कार्ये प्रदान करण्यात आले असतील त्यांतपैकी कोणतेही अधिकार व कार्ये सहायक अधीक्षकाकडे किंवा उप-अधीक्षकाकडे सोपविता येतील.]

## प्रकरण तीन

## पोलीस दलाचे विनियमन, नियंत्रण व शिस्त.

पोलिसांच्या प्रशासनासाठी नियम तयार करणे.

**२३.** राज्य शासनाच्या आदेशास अधीन राहून आयुक्तास, बृहन्मुंबईसाठी व त्यास ज्या क्षेत्राकरिता नेमण्यात आलेले असेल अशा इतर क्षेत्रांसाठी नेमून देण्यात आलेल्या पोलीस दलाच्या बाबतीत आणि [२][महासंचालक व महानिरीक्षक] याला, इतर क्षेत्रांसाठी नेमून देण्यात आलेल्या पोलीस दलाच्या बाबतीत, पुढील गोष्टीसाठी या अधिनियमाशी किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर अधिनियमितीशी विसंगत नसतील असे नियम करता येतील किंवा आदेश देता येतील :—

(क) त्याच्या हाताखालील अधिका-यांनी करावयाच्या पोलीस दलाच्या तपासणीचे विनियमन करणे ;

(ख) पोलिसांना शस्त्रे, साजसरंजाम, पोषाख व इतर आवश्यक गोष्टी कोणत्या प्रकारच्या व किती द्यावयाच्या हे ठरविणे ;

(ग) पोलीस दलातील सदस्याच्या निवासी जागा विहित करणे ;

(घ) पोलीस प्रशासनासंबंधीच्या कोणत्याही प्रयोजनासाठी कोणत्याही पोलीस निधीची स्थापना, व्यवस्थापन व विनियमन करणे ;

(ङ) कलम १७ च्या तरतुदीस अधीन राहून, पोलिसांचे वाटप, त्यांची हलवाहलव व स्थाननिश्चिती यांचे विनियमन करणे ;

(च) सर्व दर्जांच्या व श्रेणीच्या पोलीस अधिका-यांकडे कर्तव्ये प्रदान करणे, आणि

(एक) ज्या रीतीने, आणि

(दोन) ज्या शर्तीनुसार ते आपापल्या अधिकारांचा वापर करतील व कर्तव्ये पार पाडतील ती रीत व त्या शर्ती विहित करणे ;

(छ) पोलिसांनी गुप्तवार्ता व माहिती गोळा करणे व ती कळविणे यांचे विनियमन करणे ;

(ज) एकंदरीत, पोलिसांना कार्यक्षम करणे आणि कर्तव्यांचा गैरवापर अगर ती बजाविण्यातील हयगय यास प्रतिबंध करणे.

---

[१]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, याच्या कलम ४ (ब) अन्वये पोट-कलम (५) जादा दाखल करण्यात आले.

[२]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ अन्वये १३ डिसेंबर १९८२ पासून हा मजकूर दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

¹[महासंचालक व महानिरीक्षक यांस] किंवा आयुक्त यास विवरणे मागविता येतील.

**२४.** (१) राज्य शासनाच्या नियमास व आदेशास अधीन राहून, ¹[महासंचालक व महानिरीक्षक] याला, त्याच्या हाताखालील व्यक्तींना, गुन्ह्याला आळा घालणे, सुव्यवस्था राखणे व त्यांची कर्तव्ये बजावणे या गोष्टींशी संबंधित विषयांबद्दल त्याच्याकडे सादर करणे शक्य असतील अशी विवरणे, अहवाल व निवेदने, मागविता येतील ¹[महासंचालक व महानिरीक्षक], उपरोक्त कारणांसाठी त्यांनी दिलेले अगर त्यास पुरविण्यात आलेल्या माहितीवरून, त्यांनी दिलेले सर्वसाधारण आदेश व तसेच, राज्य शासन विनिर्दिष्ट करील असे आदेश, जिल्हा दंडाधिका-यास ²[व महसूल आयुक्तास] कळवील.

(२) आयुक्तास, उपरिनिर्दिष्ट गोष्टीस अधीन राहून, त्याच्या प्रभाराखाली असलेल्या क्षेत्राच्या संबंधात, पोट-कलम (१) मध्ये तरतूद करण्यात आलेली असे अहवाल, विवरणे, निवेदने मागविता येतील.

कर्तव्य बजावण्यात हयगय, वगैरे केल्याबद्दल विभागीय चौकशीद्वारे पोलीस दलातील दुय्यम दर्जाच्या सदस्यांना शिक्षा करणे.

**२५.** ³[(१) राज्य शासनास किंवा पोट-कलम (२) अन्वये त्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याला, निरीक्षक किंवा पोलीस दलातील दुय्यम दर्जाचा कोणताही सदस्य, आपले कर्तव्ये बजावण्याच्या बाबतीत क्रुर, विकृत, बेपर्वा अगर निष्काळजी आहे किंवा आपली कर्तव्ये बजावण्यास अयोग्य आहे असे राज्य शासनाचे, किंवा पोट-कलम (२) अन्वये त्याबाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिका-याचे मत झाल्यास, त्यास त्यांच्यावर खालीलपैकी एक किंवा त्यापेक्षा अधिक शास्ती लादता येईल.

(क) अशा निरीक्षकाच्या किंवा पोलीस दलात दुय्यम दर्जाच्या कोणत्याही सदस्यांच्या निष्काळजीपणामुळे किंवा आदेशभंगामुळे झालेल्या शासनाच्या कोणत्याही आर्थिक हानीची संपूर्ण किंवा अंशतः वसुली त्याच्या वेतनातून करणे;

(ख) निलंबन;

(ग) खालच्या दर्जावर, श्रेणीवर किंवा वेतनश्रेणीवर आणणे, किंवा कोणत्याही मानविशिष्ट पदावरून काढून टाकणे किंवा विशेष वित्तलब्धी काढून घेणे;

(घ) सक्तीची निवृत्ती;

(ङ) भविष्यात पोलीस सेवेतून काढून टाकणे. खात्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही शासकीय खात्यामध्ये नोकरीसाठी अनर्ह ठरणार नाही;

(च) भविष्यात शासनाच्या सेवेत नोकरीसाठी अनर्ह ठरवील अशी बडतर्फी;

परंतु, त्यांच्या वर्तणुकीसंबंधीची चौकशी किंवा कोणत्याही फौजदारी गुन्ह्यासंबंधित त्याच्याविरुद्ध आलेल्या तक्रारीचे अन्वेषण प्रलंबित असतानाच्या काळात एखाद्या पोलीस अधिका-याला निलंबित करणे ही, खंड (ख) खालील शिक्षा आहे, असे मानण्यात येणार नाही.

(१-क) राज्य शासनास किंवा पोट-कलम (२) अन्वये त्याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास शिस्तभंगाबद्दल किंवा गैरवर्तणाबद्दल अगर, आपले कर्तव्य बजावण्यास अयोग्य ठरवील अशा कृत्याबद्दल दोषी असलेला निरीक्षक किंवा पोलीस दलातील दुय्यम दर्जाचा कोणताही सदस्य, यांचा दोष पोट-कलम (१) मध्ये निर्दिशिलेली कोणतीही शिक्षा देण्यासारख्या स्वरूपाचा नाही असे राज्य शासनाचे किंवा अशा प्राधिकृत केलेल्या अधिका-याचे मत असेल तर, अशा निरीक्षकावर किंवा दलातील दुय्यम दर्जाच्या कोणत्याही सदस्यावर पुढीलपैकी कोणतीही एक किंवा अधिक शिक्षा लादता येतील :—

(क) ताकीद देणे;

(ख) ताशेरे ओढणे (ज्याची नोंद त्याच्या सेवापुस्तकात घेतली जाईल);

(ग) अतिरिक्त कवायत;

---

¹सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ अन्वये १३ डिसेंबर १९८२ पासून हा मजकूर दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

²सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

³सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम ६ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

डा.एम.पटारकर

(घ) एक महिन्याच्या पगाराहून अधिक होणार नाही इतका दंड करणे;

(ङ) वेतनवाढ रोखून धरणे;

परंतु,—

(एक) खंड (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शिक्षा, पोलीस शिपायाच्या दर्जापेक्षा वरील दर्जाच्या कर्मचा-याला देण्यात येणार नाही;

(दोन) खंड (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शिक्षा, निरीक्षकाला देण्यात येणार नाही.]

[२][महासंचालक व महानिरीक्षक] आयुक्त, [११][(संचालक, पोलीस बिनतारी संदेश यांसह).] [१०][उपमहानिरीक्षक] आणि [१२][अधिक्षक] [१३][व प्रशिक्षण संस्थेचा प्राचार्य] यांचे शिक्षा देण्याचे अधिकार.

(२) [१][(क) अपर महासंचालक, विशेष महानिरीक्षक यांसह महासंचालक व महानिरीक्षक, सहआयुक्त, अपर आयुक्त यांसह आयुक्त किंवा उपमहानिरीक्षक यांनी पोट-कलम (१) किंवा (१-क) अन्वये निरीक्षकास किंवा दुय्यम दर्जाच्या कोणत्याही सदस्यास, शिक्षा करण्याचा प्राधिकार असेल. अधीक्षकास, त्याला दुय्यम असणारा हाताखालचा जो कोणताही पोलीस अधिकारी निरीक्षकाच्या श्रेणीहून खालच्या श्रेणीचा असेल त्या पोलीस अधिका-याच्या बाबतीत तसाच प्राधिकार असेल आणि त्यास त्याच्या हाताखालील निरीक्षकास, त्याच्याविरुद्ध केलेल्या तक्रारीची चौकशी पूर्ण होईपर्यंत आणि पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक किंवा पोलीस अपर महासंचालक व अपर महानिरीक्षक, आणि संचालक, पोलीस बिनतारी संदेश व पोलीस उप महानिरीक्षक, अपर महानिरीक्षक यांचा आदेश मिळेपर्यंत, निलंबित करण्याचा अधिकार असेल.]

(ख) [३][पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयाच्या] प्राचार्यासहित निरीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जाची पोलीस दलातील दुय्यम दर्जाचा जो कोणताही सदस्य [४][ [५][अशा [६][महाविद्यालयात] प्रशिक्षण घेत असेल] किंवा] त्याच्या नियंत्रणाखाली काम करीत असेल त्या व्यक्तीच्या संबंधात, तसेच [७][ज्या जिल्ह्यात [६][असे महाविद्यालय] असेल त्या जिल्ह्याच्या] पोलीस दलातील किंवा त्याच्या नियंत्रणाखाली काम करण्यासाठी [५][अशा [६][महाविद्यालयास] जोडलेल्या] इतर कोणत्याही जिल्ह्याच्या पोलीस दलातील हवालदाराच्या व पोलीस शिपायांच्या संबंधात असाच प्राधिकार राहील. [८][तसेच त्यास [९][ [५][अशा [६][महाविद्यालयात] प्रशिक्षण घेत असलेल्या] किंवा] त्याला दुय्यम असलेल्या निरीक्षकास, त्याच्याविरुद्ध केलेल्या तक्रारीची चौकशी पूर्ण होईतोपर्यंत आणि [१०][महासंचालक व महानिरीक्षक] किंवा [१०][उपमहानिरीक्षक] यांचा आदेश मिळेपर्यंत, निलंबित करता येईल.]

---

[१]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ६(२) (क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम-२ अन्वये १३ डिसेंबर, १९८२ पासून हा मजकूर दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[३]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ५ (अ) अन्वये " पोलीस प्रशिक्षण " शाळेचे या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १३(१) (ब) अन्वये " सदरहू शाळेत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ५(अ) अन्वये " अशी शाळा ", " शाळेस ", " शाळेत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १३ (एक) (क) अन्वये " नाशिक जिल्ह्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८]सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४(२) अन्वये हा मजकूर बगळण्यात आला व सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ५(३) अन्वये पुन्हा समाविष्ट करण्यात आला.

[९]सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१०]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ कलम २ अन्वये १३ डिसेंबर, १९८२ पासून हा मजकूर दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[११]सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१२]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३ अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१३]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९८ याच्या कलम ५(ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[1][(खक) पोलीस प्रशिक्षण शाळेच्या प्राचार्यास जी कोणतीही निरीक्षकाच्या श्रेणीपेक्षा खालच्या श्रेणीची पोलीस दलातील दुय्यम दर्जाचा जो कोणताही सदस्य, अशा शाळेत प्रशिक्षण घेत असेल किंवा जो त्याच्या अधिपत्याखाली काम करीत असेल किंवा ज्याला त्याच्या अधिपत्याखाली काम करण्याकरिता अशा शाळेत नेमून देण्यात आले असेल अशा कोणत्याही सदस्याच्या संबंधात, तसाच प्राधिकार असेल.]

[2] * * * * * *

(ग) या पोट-कलमान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर, त्याबाबत राज्य शासन देईल अशा आदेशांस आणि नियमांस नेहमी अधीन राहून करण्यात येईल.

(३) [3][पोट-कलमे (१), (१-क)] आणि (२) यातील कोणत्याही तरतुदींमुळे, —

(क) कोणत्याही पोलीस अधिका-यावर जो कोणताही अपराध केल्याबद्दल आरोप ठेवण्यात आला असेल त्या अपराधाच्या बाबतीत फौजदारी खटला चालविला जाण्याबद्दल त्याची जी कोणतीही जबाबदारी असेल तिला बाध येणार नाही ; अथवा

(ख) ज्या प्राधिका-याने अशा पोलीस अधिका-याची नेमणूक केली असेल त्या प्राधिका-याला दुय्यम असणा-या कोणत्याही प्राधिका-यास अशा पोलीस अधिका-यास पदच्युत करण्याचा किंवा कामावरुन दूर करण्याचा हक्क असणार नाही.

शिक्षा करण्याच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती

[4][**२६.** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३११, खंड (२) च्या दुस-या परंतुकामध्ये उल्लेखिलेल्या बाबींव्यतिरिक्त विहित केलेली कार्यवाही अनुसरल्याशिवाय कलम २५ याच्या पोटकलम (१) अन्वये कोणताही शिक्षेचा आदेश देण्यात येणार नाही.]

शिक्षे-संबंधीच्या आदेशा-विरुद्ध अपिले.

**२७.** कलम २५ अन्वये किंवा त्यानुसार केलेले नियम किंवा दिलेले आदेश याअन्वये पोलीस अधिका-याच्या बाबतीत दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे, किंवा राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अधिका-याकडे अपील करता येईल ;

[5][परंतु, अशा वाढ करावयाच्या किंवा, यथास्थिती, देण्यात यावयाच्या अधिक कडक शिक्षेविरुद्ध कारणे दाखवा नोटीस दिल्याशिवाय, आणि त्यात दाखविलेले कोणतेही कारण विचारात घेतल्याशिवाय, अपिलातील शिक्षा वाढविली जाणार नाही किंवा शिक्षा अधिक कडक केली जाणार नाही.]

---

[1]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ६ (क) अन्वये खंड (खक) दाखल करण्यात आला.
[2]सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ५ (२) अन्वये खंड (बब) वगळण्यात आले.
[3]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ६ (३) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[4]वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये मूळ कलम २६ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.
[5]वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[१][२७-क. राज्य शासन किंवा, यथास्थिति, महासंचालक व महानिरीक्षक, स्वाधिकारे किंवा याबाबतीत विहित केलेल्या कालावधीत त्याच्याकडे अर्ज केल्यावरुन, या प्रकरणाअन्वये कोणत्याही पोलीस अधिका-याविरुद्ध कोणत्याही प्राधिका-याने चालविलेल्या कोणत्याही चौकशीचा किंवा कार्यवाहीचा अभिलेख, अशा कोणत्याही चौकशीमध्ये घेण्यात आलेला कोणताही निर्णय किंवा देण्यात आलेला कोणताही आदेश यांच्या वैधतेविषयी किंवा योग्यतेविषयी तसेच अशा अधिका-याविरुद्ध करण्यात येणा-या कार्यवाहीच्या नियमिततेबद्दल स्वतःची खात्री करुन घेण्यासाठी, मागवू शकेल, आणि त्याची तपासणी करू शकेल आणि कोणत्याही वेळी,—

राज्य शासन किंवा महासंचालक व महानिरीक्षक यांना कोणत्याही चौकशीचा किंवा कार्यवाहीचा अभिलेख मागविण्याचा अधिकार.

(क) असा कोणताही आदेश कायम करील, त्यात, फेरबदल करील किंवा तो मागे घेईल ;

(ख) अशा आदेशाद्वारे कोणतीही शिक्षा देऊ शकेल किंवा ती रद्द करू शकेल, कमी करू शकेल, कायम करू शकेल किंवा शिक्षेमध्ये वाढ करू शकेल ;

(ग) पुढील चौकशी करावी असा निदेश देईल ; किंवा

(घ) प्रकरणाच्या परिस्थितीनुसार, ते शासन किंवा, यथास्थिती, तो अधिकारी त्यास योग्य वाटेल असा इतर आदेश देईल ;

परंतु, बाधा पोचलेल्या पोलीस अधिका-यास, अशा शिक्षेविरुद्ध जे निवेदन करण्याची इच्छा असेल ते करण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज शिक्षा करण्याचा किंवा शिक्षा वाढविण्याचा पुनरीक्षणान्ती आदेश काढला जाणार नाही ;

परंतु, आणखी असे की, पुनरीक्षणान्ती आदेश,—

(एक) त्या प्रकरणी, अशा चौकशीत किंवा कार्यवाहीत दिलेल्या निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यात आलेले असेल व असे अपील प्रलंबित असेल तेव्हा ;

(दोन) ज्या प्रकरणी अशा निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यात आले नसेल तेथे असे अपील दाखल करण्यासाठी तरतूद केलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वी ; आणि

(तीन) इतर कोणत्याही प्रकरणी, पुनरीक्षणाधीन निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, काढता येणार नाही.

**२७-ख.** राज्य शासनास, किंवा पोलीस महासंचालक व महानिरीक्षकास, पुनर्विलोकनाधीन आदेश काढते वेळी, जे सादर करणे शक्य झाले नव्हते किंवा जे उपलब्ध नव्हते आणि ज्याच्या परिणामी प्रकरणाच्या स्वरूपात बदल होऊ शकला असता, असे कोणतेही नवीन साहित्य किंवा पुरावा त्यांच्या निदर्शनास आल्यास किंवा आणून दिल्यास, त्यांनी कलम २५, २७ किंवा २७-क अन्वये दिलेल्या आदेशाचे, एकतर स्वाधिकारे किंवा अन्य प्रकारे, कोणत्याही वेळी पुनर्विलोकन करता येईल ;

कलम २५, २७ किंवा २७ क अन्वये संमत केलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासंबंधी राज्य शासन किंवा महासंचालक व महानिरीक्षक यांचा अधिकार.

परंतु, संबंधित पोलीस अधिका-यास, प्रस्तावित शास्तीविरुद्ध किंवा जेव्हा कलम २५ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कडक शास्तीपैकी कोणतीही शास्ती करण्याचे प्रस्तावित केले असेल किंवा पुनर्विलोकन करावयाच्या आदेशाद्वारे लादलेली सौम्य शास्ती वाढवून ती कडक शास्ती करण्याचे प्रस्तावित केले असेल त्याविरुद्ध, प्रतिवेदन करण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, राज्य शासन किंवा महासंचालक व महानिरीक्षक, शास्ती लादण्यासाठी किंवा शास्ती वाढविण्यासाठी कोणताही आदेश देणार नाही ;

परंतु तसेच, विहित केलेल्या नियमांन्वये या प्रकरणी कोणतीही चौकशी अगोदर करण्यात आली नसेल तर नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने चौकशी केल्याखेरीज अशी शास्ती लादता येणार नाही.

**२७-ग.** कलम ५ च्या खंड (ख) मध्ये अंतर्भूत असलेल्या अधिकारास बाध न आणता, राज्य शासन, कलम २७, २७-क व २७-ख ची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करील.]

नियम करण्याचा अधिकार.

---

[१]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९ अन्वये ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

पोलीस अधिकारी हे, नेहमी कामावर आहेत असे समजणे आणि ते राज्याच्या कोणत्याही भागात कामावर पाठविले जाण्यास पात्र असणे.

**२८.** (१) रजेवर नसलेला किंवा निलंबित नसलेला असा प्रत्येक पोलीस अधिकारी हा, नेहमी कामावर आहे, असे या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांसाठी मानण्यात येईल आणि राज्याच्या एका भागात कर्तव्य बजावण्यासाठी तैनात केलेल्या कोणत्याही पोलीस अधिका-यास किंवा कितीही पोलीस अधिका-यांना किंवा अशा पोलीस अधिका-यांच्या समूहास, राज्य शासन किंवा [१][महासंचालक व महानिरीक्षक] असा निदेश देईल तर, राज्याच्या कोणत्याही इतर भागात कोणत्याही वेळी जोपर्यंत त्याची सेवा तेथे आवश्यक असेल तोपर्यंत पोलीस कामावर ठेवता येईल.

प्रस्तावित बदल्यांसंबंधी [१][महासंचालक व महानिरीक्षक याने] आयुक्तास व जिल्हा दंडाधिका-यास कळविणे.

(२) अत्यंत निकडीचे प्रसंग वगळता इतर प्रसंगी, या कलमान्वये जी कोणतीही बदली करण्याचे योजिले असेल त्याविषयी [१][महासंचालक व महानिरीक्षक हा] [२][महसूल आयुक्ताला] व जिल्हादंडाधिका-याला कळवील आणि गुप्तता राखण्याची आवश्यकता असेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत अशा बदलीच्या कारणांचा खुलासा करील आणि मग उक्त अधिकारी व त्यांच्या हाताखालील व्यक्ती अशा बदलीबाबतची पुढील सर्व वाजवी कार्यवाही करतील.

पोलीस अधिका-यास कोणत्या शर्तीवर राजीनामा येईल.

**२९.** [३][ (१) आयुक्ताच्या किंवा गुन्हा अन्वेषण विभागाच्या उपनिरीक्षकाच्या किंवा [४][पोलीस [५][प्रशिक्षण महाविद्यालयाच्या] प्राचार्याच्या किंवा [६][अधीक्षकाच्या] लेखी परवानगीशिवाय किंवा अशी परवानगी देण्यासाठी [७][महासंचालक व महानिरीक्षक याने] किंवा आयुक्ताने अधिकार प्रदान केलेल्या इतर कोणत्याही पोलीस अधिका-याच्या लेखी परवानगीशिवाय, [८][निरीक्षकाच्या श्रेणीचा कोणताही पोलीस अधिकारी किंवा] दुय्यम दर्जाचा कोणताही पोलीस अधिकारी आपल्या पदाचा राजीनामा देणार नाही किंवा आपल्या पदाची कर्तव्ये बजावण्याचे सोडून देणार नाही ;

परंतु, पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, अशा कोणत्याही पोलीस अधिका-यास, शासनाला किंवा कोणत्याही पोलीस निधीला त्याच्याकडून पोलीस अधिकारी या नात्याने देय असलेल्या कोणत्याही कर्जाची संपूर्ण फेड करीपर्यंत, अशी कोणतीही परवानगी दिली जाणार नाही.]

(२) जर असा कोणताही पोलीस अधिकारी रोगाच्या किंवा मानसिक व शारीरिक असमर्थतेच्या कारणामुळे पोलिसात आणखी सेवा करण्यास अयोग्य आहे असे घोषित करणारे, पोलीस शल्यचिकित्सकाच्या किंवा जिल्हा शल्यचिकित्सकाच्या सहीचे प्रमाणपत्र तो सादर करील तर, शासनाला किंवा कोणत्याही पोलीस निधीला त्याच्याकडून पोलीस अधिकारी या नात्याने देय असलेले कोणतेही कर्ज त्याने फेडल्यावर किंवा ते फेडण्याबद्दल समाधानकारक प्रतिभूती दिल्यावर त्यास राजीनामा देण्याची आवश्यक ती लेखी परवानगी देण्यात येईल.

---

[१]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ अन्वये १३ डिसेंबर, १९८२ पासून हा मजकूर दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[२]सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "कमीशनरास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[४]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १४ (१) अन्वये "नाशिक येथील केंद्रीय प्रशिक्षण शाळेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ६ (ब) अन्वये "पोलीस प्रशिक्षण शाळेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "जिल्हाधीक्षकांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २ अन्वये १३ डिसेंबर १९८२ पासून हा मजकूर दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[८]सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) जर उपरोक्त कोणताही पोलीस अधिकारी या कलमाचे उल्लंघन करून राजीनामा देईल अगर आपल्या पदाची कर्तव्ये बजावण्याचे सोडून देईल तर तो, यथास्थिती, आयुक्ताच्या किंवा गुन्हा अन्वेषण विभागाच्या उप महानिरीक्षकाच्या किंवा [1][पोलीस [2][प्रशिक्षण महाविद्यालयाच्या]] प्राचार्याच्या किंवा [3][अधीक्षकाच्या] आदेशावरून त्यास त्या वेळेस देय असलेली वेतनाची सर्व थकबाकी सरकार जमा केली जाण्यास पात्र होईल. सरकार जमा करण्याची कार्यवाही ही उक्त अधिकारी या अधिनियमाच्या कलम १४५ अन्वये किंवा अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये ज्या शास्तीस पात्र असेल त्या शास्तीव्यतिरिक्त असेल.

या कलमाचे उल्लंघन करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याच्या वेतनाची थकबाकी जप्त केली जाऊ शकेल.

पोलीस अधिकारी असण्याचे बंद झालेल्या व्यक्तीने प्रमाणपत्र, शस्त्रे वगैरे सुपूर्द करणे आणि ती केली नाही तर झडतीच्या अधिपत्रान्वये ती जप्त केली जाणे.

**३०.** (१) कोणत्याही कारणावरून पोलीस अधिकारी असण्याचे संपुष्टात आलेली प्रत्येक व्यक्ती तिच्या नेमणुकीचे अगर पदाचे प्रमाणपत्र आणि तिच्या पदाशी निगडित असलेली कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी दिलेली शस्त्रे, साजसरंजाम, पोषाख, इतर आवश्यक वस्तू, आयुक्त किंवा गुन्हा अन्वेषण विभागाचा उपमहानिरीक्षक यांनी किंवा [1][पोलीस [2][प्रशिक्षण महाविद्यालयाच्या किंवा शाळेच्या]] प्राचार्याने किंवा असा पोलीस अधिकारी ज्याच्या हाताखाली असेल त्या [3][अधीक्षकाने] त्या घेण्याचा ज्यास अधिकार दिला असेल अशा कोणत्याही अधिका-याकडे ताबडतोब सुपूर्द करील.

(२) कोणताही दंडाधिकारी, आणि त्यावेळी लेखी नमूद केली जातील अशा विशेष कारणांसाठी आयुक्त किंवा गुन्हा अन्वेषण विभागाचा उपमहानिरीक्षक किंवा [1][पोलीस [2][प्रशिक्षण महाविद्यालयाचा किंवा शाळेच्या]] प्राचार्य किंवा कोणताही [3][अधीक्षक], सहायक अधीक्षक किंवा उप-अधीक्षक, अशाप्रकारे सुपूर्द न केलेले कोणतेही प्रमाणपत्र, शस्त्रे, साजसरंजाम, पोषाख किंवा इतर आवश्यक वस्तू यासाठी झडती घेवून त्या जेथे
१८९८ असतील तेथून जप्त करण्यासाठी अधिपत्र काढील. अशाप्रकारे काढलेले प्रत्येक अधिपत्र हे, * फौजदारी
चा ५. प्रक्रिया संहिता, १८९८ च्या तरतुदींअन्वये पोलीस अधिका-यांकडून बजावण्यात येईल किंवा अधिपत्र काढणारा दंडाधिकारी, आयुक्त, गुन्हा अन्वेषण विभागाचा उपमहानिरीक्षक [1][पोलीस [2][प्रशिक्षण महाविद्यालयाचा किंवा शाळेचा]] प्राचार्य, [3][अधीक्षक], सहायक अधीक्षक किंवा उपअधीक्षक जर असा निदेश देईल तर ते दुस-या कोणत्याही व्यक्तीकडून बजावण्यात येईल.

विवक्षित वस्तुंचा अपवाद.

(३) कोणत्याही व्यक्तीस पुरविलेली जी कोणतीही वस्तू, यथास्थिती, [4][महासंचालक व महानिरीक्षक यांच्या] किंवा आयुक्ताच्या आदेशानुसार त्या व्यक्तीची मालमत्ता झाली असेल, त्या वस्तुच्या बाबतीत कलमातील कोणतीही तरतूद लागू होते, असे मानण्यात येणार नाही.

पोलीस अधिका-यांना पुरविलेल्या जागेचा भोगवटा आणि त्या रिकाम्या करून देण्यासंबंधीचे दायित्व.

**३१.** (१) पोलीस अधिका-यास राहण्यासाठी राज्य शासनाने पुरविलेल्या कोणत्याही जागेचा भोगवटा करणारा कोणताही पोलीस अधिकारी,—

---

[1]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १४ (१) अन्वये "नाशिक येथील केंद्रीय प्रशिक्षण शाळेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ६ (ब) अन्वये "पोलीस प्रशिक्षण शाळेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "जिल्हा अधीक्षकांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

*आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

[4]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २ अन्वये १३ डिसेंबर, १९८२ पासून हा मजकूर करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(क) राज्य शासन सर्वसाधारणपणे किंवा विशेष बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा शर्तीनुसार व अटीनुसार तिचा भोगवटा करील; आणि

(ख) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, पोलीस अधिकारी म्हणून असण्याचे संपुष्टात आल्यावर किंवा ज्या ज्या वेळी राज्य शासनास किंवा राज्य शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास ती जागा रिक्त करुन देण्यास भाग पाडणे आवश्यक व इष्ट वाटेल त्या त्या वेळी ती रिक्त करून देईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही जागा रिकामी करुन देण्यास बांधील असलेली किंवा भाग पाडण्यात आलेली कोणतीही व्यक्ती तसे करण्यात कसूर करील तर, राज्य शासनास किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याला अशा व्यक्तीस जागा रिकामी करुन देण्याविषयी आदेश देता येईल आणि त्याला, कोणत्याही पोलीस अधिका-यास आवश्यक असेल अशी मदत घेऊन त्या जागेत प्रवेश करण्याविषयी आणि तीत आढळून आलेल्या कोणत्याही व्यक्तीस तेथून बाहेर काढून टाकण्याविषयी आणि त्या जागेचा कब्जा घेऊन तो निदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करण्याविषयी निदेश देता येईल.

सन १८९८ चा अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १४४ अन्वये राज्य शासनाला आदेश देता येईल.

[१][**३२.** राज्य शासनाला, ज्या ज्या वेळी आवश्यक वाटेल त्या त्या वेळी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा आशयाचा आदेश काढता येईल की, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ ** च्या कलम १४४ अन्वये दंडाधिका-याने जर कोणताही आदेश दिला तर राज्य शासनाला तो उक्त संहितेअन्वये अंमलात असल्याचे चालू ठेवता येईल.] १८९८ चा ५

## प्रकरण चार
## पोलीस विनियम

सार्वजनिक ठिकाण, इत्यादीमध्ये रहदारीच्या विनियमनासाठी व सुव्यवस्था राखण्यासाठी नियम करण्याचा अधिकार.

***† ३३.** (१) [२][या पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात आयुक्तास, उपरोक्त बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात (या कलमाचे [३][खंड (क), (ख), (घ), (घख), (ङ), (छ), (द), (न) आणि (प)] यांखाली येणा-या बाबी सोडून) जिल्हा दंडाधिका-यास, आणि या पोट-कलमाचा खंड (म) धरून उपरोक्त खंडाखाली येणा-या बाबींच्या संबंधात पोलीस अधीक्षकास] त्यांच्या प्रभाराखाली क्षेत्रात किंवा त्यांच्या कोणत्याही भागात पुढील गोष्टींच्या संबंधात, या अधिनियमाशी विसंगत नसतील असे नियम किंवा आदेश करता येतील, त्यात फेरफार करता येतील किंवा ते विखंडित करता येतील :—

---

[१]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १६ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

** आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

[२]सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३ (अ) अन्वये " आयुक्त व जिल्हा दंडाधिकारी यांस " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[३]सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम २ (अ) अन्वये " खंड (ब), (ड), (अब), (ई) आणि (ग) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

* १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याचे कलम ४ पुढीलप्रमाणे आहे:—

" ४. निकट पूर्ववर्ती कलमान्वये मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ मध्ये दुरुस्त्या करण्यात आल्या असल्या तरीही उक्त कलम ३३, पोट-कलम (१), खंड (ब), (ड), (डब), (इ) व (ण) आणि खंड (य) याअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून जिल्हा दंडाधिका-याने केलेले आणि ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी कोणत्याही क्षेत्रात अंमलात असलेले सर्व नियम व आदेश हे सक्षम प्राधिका-याकडून त्यात फेरफार करण्यात येईपर्यंत किंवा ते निरसित करण्यात येईपर्यंत किंवा त्यात दुरुस्ती करण्यात येईपर्यंत त्या क्षेत्रात अंमलात असण्याचे चालू राहील."

† १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याचे कलम ४ पुढीलप्रमाणे आहे:—

" ४. या अधिनियमाच्या कलम २, खंड (अ) अन्वये मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ मध्ये आणखी सुधारणा करण्यात आल्या असल्या तरी, उक्त कलम ३३, पोट-कलम (१), खंड (वाय), व खंड (अ), (आर), (टी) व (यू) या अन्वये देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन जिल्हा दंडाधिका-याकडून करण्यात व देण्यात आलेले आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी कोणत्याही क्षेत्रात अंमलात असलेले, सर्व नियम व आदेश सक्षम प्राधिकरणाकडून त्यामध्ये फेरबदल करण्यात येईतोपर्यंत किंवा ते निरसित करण्यात येईतोपर्यंत किंवा त्यात सुधारणा करण्यात येईतोपर्यंत उक्त क्षेत्रात असण्याचे चालू राहील."

(क) घाटांवर, धक्क्यांवर व उतरण्याच्या जागांवर व रेल्वे स्थानकांबाहेर, उतारुंचे सामान वाहून नेण्याकरिता काम करु इच्छित असलेल्या व्यक्तींना लायसन देणे व त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे व अशा रीतीने कामावर लावलेल्या व्यक्तींच्या मजुरीचे निर्धारित दर अंमलात आणण्याची तरतूद करणे;

(ख) जनतेला धोका, अडथळा किंवा गैरसोय होऊ नये म्हणून रस्त्यांवरील व सार्वजनिक जागांवरील सर्व प्रकारच्या रहदारीचे व सवारी करणा-या, वाहन चालविणा-या, सायकल चालविणा-या किंवा पायी जाणा-या व्यक्तींकडून किंवा गुरे नेणा-या किंवा त्यांच्याबरोबर असणा-या व्यक्तींकडून होणा-या रस्त्याच्या व सार्वजनिक जागांच्या वापराचे विनियमन करणे;

(ग) वाहने, रस्त्यांवर व सार्वजनिक जागांवर ज्या शर्तीवर उभी करून ठेवता येतील त्या शर्तीचे व वाहने किंवा जनावरे उभी करण्याच्या जागा म्हणून होणा-या रस्त्यांच्या वापराचे विनियमन करणे;

(घ) वाहने रस्त्यांवर असतांना त्यावर किती व कोठे दिवे असावेत आणि ते कोणत्या वेळेच्या दरम्यान वापरावेत ते विहित करणे;

[१][(घक) राष्ट्रीय जलमार्गाव्यतिरिक्त क्षेत्रीय जलधी किंवा देशांर्तगत जलमार्गावरील जलयानांवर किंवा बोटींवर कोणतीही चित्रे, जाहिराती, वृत्त फलक किंवा जाहीर नोटिसा लावण्याबाबत लायसन देणे, त्यावर नियंत्रण ठेवणे किंवा त्यास मनाई करणे;]

[२][(घख) जे कोणतेही चिन्ह, साधन किंवा प्रतिरूपण कोणत्याही रस्त्याच्या एखाद्या ठिकाणाहून आकाशाच्या पार्श्वभूमीवर दिसण्याजोगे असेल आणि सदरहू नियमात किंवा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या उंचीवर (जवळची वाहतूक विचारात घेऊन आणि त्या उंचीवरील असे चिन्ह, साधन किंवा प्रतिरूपण लक्ष विचलित करण्याचा किंवा अशा वाहतुकीस अडथळा आणण्याचा संभव आहे हे विचारात घेऊन) कोणत्याही जागेवर, इमारतीवर किंवा संरचनेवर उभारले असेल किंवा उंचावर धरले असेल, असे कोणतेही चिन्ह, साधन, किंवा प्रतिरूपण, जाहिरातीच्या प्रयोजनाकरिता उभारण्यास, प्रदर्शित करण्यास, बसविण्यास किंवा ते ठेवण्यास लायसन देणे, त्यावर नियंत्रण ठेवणे किंवा त्यास मनाई करणे]

(ङ) तो याबाबत विहित करील अशा विनियमांनुसार असेल, त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत दिवसाच्या ज्या विवक्षित वेळात रस्त्यातून किंवा विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित रस्त्यांतून गुरे नेता येणार नाहीत त्या वेळा विहित करणे;

(च) कोणताही हत्ती किंवा वन्य किंवा घातक प्राणी कोणत्याही रस्त्याने किंवा रस्त्यातून हाकणे, घेऊन जाणे किंवा वाहून नेणे याबाबत विनियमन करणे;

(छ) इमारती लाकडे, परांची वासे, शिड्या, लोखंडी तुळ्या, तुळ्या किंवा कांबी, बाष्पित्र किंवा इतर अवजड वस्तू रस्त्यातून वाहून नेण्याची रीत व पद्धती आणि त्या वाहून नेण्याचे मार्ग व वेळा यांचे विनियमन करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे;

(ज) बंदुकीची दारू किंवा इतर कोणताही स्फोटक पदार्थ, रस्त्यांमधून व सार्वजनिक जागांतून वाहून नेण्यासाठी लायसन देणे, त्यावर नियंत्रण ठेवणे किंवा त्या परिसरात राहणा-या किंवा तेथून ये-जा करणा-या लोकांना अडथळ्याचे, गैरसोयींचे, उपद्रवाचे, जोखमीचे, धोक्याचे किंवा नुकसानीचे ठरू नये म्हणून असे पदार्थ रस्त्यांवरुन व सार्वजनिक जागांतून वाहून नेण्यास मनाई करणे;

(झ) विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित रस्त्यांव्यतिरिक्त इतर रस्त्यांमधून व विनिर्दिष्ट केलेल्या वेळांव्यतिरिक्त इतर वेळांत आणि त्या बाबत तो विहित करील अशा विनियमांस अधीन राहून, सांसर्गिक किंवा संक्रामक रोग झालेल्या व्यक्ती अगर जनावरे आणि मृत जनावरे किंवा त्यांचे अवयव आणि मनुष्यांचे मृतदेह उघडे ठेवण्यास किंवा नेण्याआणण्यास मनाई करणे ;

---

[१]सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६(१) अन्वये खंड (घक) समाविष्ट करण्यात आला.

[२]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २ अन्वये खंड (घख) समाविष्ट करण्यात आला.

(ञ) त्याबाबत तो जे नियम करील त्यास अधीन असेल त्याव्यतिरिक्त, इतर बाबतीत ज्या वेळात मैला किंवा दुर्गंधीयुक्त पदार्थ किंवा वस्तू विवक्षित रस्त्यांवरील घरातून किंवा इमारतीतून बाहेर नेऊ नयेत, किंवा त्या अशा घरात अगर इमारतीत नेऊ नयेत किंवा त्या अशा रस्त्यांतून वाहून नेऊ नयेत त्या वेळा विहित करणे ;

(ट) प्राण्यांची कत्तल करण्यासाठी, मृत प्राणी किंवा कातडी साफ करण्यासाठी, उपद्रवकारक किंवा दुर्गंधीयुक्त पदार्थ टाकण्यासाठी आणि बहिर्विधीसाठी वेगळ्या जागा राखून ठेवणे ;

(ठ) मनुष्यांच्या किंवा प्राण्यांच्या साथीच्या किंवा संक्रामक रोगाचा प्रादुर्भाव झाला असेल किंवा होण्याची भीती असेल त्याप्रसंगी, तो रोग होऊ नये अगर त्याचा फैलाव होऊ नये यासाठी, राज्य शासनाकडून निदेश देण्यात येईल किंवा मान्यता देण्यात येईल त्याप्रमाणे, जागेच्या भोगवटादारांनी आणि रहिवाशांनी ती स्वच्छ ठेवणे आणि निर्जंतुक करणे, आणि तो रोग झालेल्या किंवा झाला आहे असे वाटत असलेल्या व्यक्तींना किंवा प्राण्यांना वेगळे ठेवून त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(ड) पाण्याचा कोणताही स्त्रोत किंवा पुरवठा किंवा पात्र यांचा वापर पूर्णपणे किंवा विवक्षित प्रयोजनासाठी बंद करण्याचा किंवा वापर न करण्याचा किंवा असा वापर केवळ विवक्षित प्रयोजनांसाठीच मर्यादित करण्याचा आणि असा स्त्रोत किंवा पात्र किंवा त्यातील पाणी दूषित होऊ नये याविषयी तजवीज करण्याचा निदेश देणे ;

(ढ) रस्त्यांमध्ये किंवा सार्वजनिक जागांमध्ये किंवा त्यांच्याजवळ गायन वादन करणे, ढोल, ताशे किंवा इतर वाद्ये बडवणे आणि शिंगे फुंकणे, भोंगे वाजवणे किंवा इतर कर्कश वाद्ये वाजविणे यासाठी लायसन देणे, त्यावर नियंत्रण ठेवणे किंवा त्या परिसरात राहणा-या किंवा तेथून ये-जा करणा-या लोकांना अडथळ्याचे, गैरसोयीचे, उपद्रवाचे, जोखमीचे, धोक्याचे किंवा नुकसानीचे ठरू नये म्हणून त्यांना मनाई करणे ;

(ण) रस्त्यांतून किंवा रस्त्यावरून जाणा-या जमावातील व मिरवणुकीतील व्यक्तींचे आचरण व वागणूक किंवा कृती यांचे विनियमन करणे व मिरवणुकांच्या बाबतीत त्यांनी ज्या मार्गांनी, ज्या पद्धतीने व ज्या वेळी जावे ते मार्ग, ती पद्धत व त्या वेळा विहित करणे ;

(त) कोणत्याही रस्त्यात अगर रस्त्याच्या भागात कोणतीही दोरी अगर खांब आडवा टांगण्यास किंवा ठेवण्यास किंवा रहदारीस अडथळा होईल किंवा उजेड व हवा निर्वेधपणे येण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने प्रक्षेप किंवा संरचना उभारण्यास मनाई करणे ;

(थ) तो करील अशा वाजवी नियमानुसार असेल त्या व्यतिरिक्त, इतर बाबतीत कोणत्याही रस्त्यात किंवा सार्वजनिक ठिकाणी बांधकाम सामग्री अगर इतर वस्तू ठेवण्यास किंवा एखादा घोडा किंवा इतर प्राणी बांधून ठेवण्यास अगर त्यांना अटकावून ठेवण्यास मनाई करणे ;

(द) पुढील गोष्टी करण्यास लायसन देणे, त्यावर नियंत्रण ठेवणे किंवा त्या परिसरात राहणा-या किंवा तेथून ये-जा करणा-या लोकांस अडथळ्याचे, गैरसोईचे, उपद्रवाचे, जोखमीचे, धोक्याचे किंवा नुकसानीचे ठरू नये म्हणून त्यांना मनाई करणे, —

(एक) त्याबाबत योग्य रीतीने प्राधिकृत केलेले शासकीय कर्मचारी किंवा नगरपालिका अधिकारी याव्यतिरिक्त इतर व्यक्तींनी रस्त्यांवर आणि सार्वजनिक जागेवर व त्यालगत असलेल्या इमारतीच्या बाहेरच्या बाजूस रोषणाई करणे ;

(दोन) रस्त्यांमध्ये किंवा सार्वजनिक जागांमध्ये किंवा त्यांच्या जवळपास खडकांना सुरुंग लावणे किंवा खड्डे खणणे ;

(तीन) कोणत्याही सार्वजनिक जागेत [१][किंवा सार्वजनिक जागेजवळ किंवा कोणत्याही] सार्वजनिक करमणुकीच्या जागी ध्वनिक्षेपकाचा उपयोग करणे ;

---

[१]सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ७ अन्वये "कोणत्याही सार्वजनिक जागी किंवा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ध) मोडकळीस आलेल्या इमारतींमुळे किंवा इतर कारणांमुळे धोका उत्पन्न होईल अशा बाबतीत, वाजवी वाटतील अशा गोष्टींचा अपवाद करून, विवक्षित रस्ते किंवा जागा तात्पुरत्या बंद करणे ;

(न) ज्यापासून, जाणा-या-येणा-यांस, जवळपास राहणा-या व्यक्तींस किंवा जनतेस धोका उत्पन्न होण्याचा संभव असेल अशा इमारती, ओटे व इतर संरचना बांधण्याचे, ती दुरुस्त करण्याचे व ती पाडण्याचे काम करताना व्यक्तीस व मालमत्तेस हानी पोहोचणार नाही अशी तजवीज करणे ;

(प) या बाबतीत तो जे वाजवी नियम करील त्या नियमांस अधीन असेल त्या व्यतिरिक्त इतर रीतीने, कोणत्याही रस्त्यात किंवा इमारतीत किंवा कोणत्याही रस्त्यावर किंवा इमारतीवर किंवा कोणत्याही रस्त्यापासून किंवा इमारतीपासून ५० फुटांच्या आत कोणतेही गवत किंवा इतर वस्तू पेटविणे किंवा जाळणे किंवा होळी पेटविणे किंवा कोणतेही अग्निशस्त्र किंवा हवेच्या दाबाने उडणारी बंदूक (एअरगन) स्वैरपणे उडविणे किंवा दारुकाम करणे किंवा फेकणे अगर फायर बलून किंवा अग्निबाण सोडणे, उडविणे किंवा रस्त्यावर दिवे किंवा तशा प्रकारची रोषणाईची इतर साधने लावण्यासाठी कोणताही खांब किंवा इतर वस्तू, कोणत्याही रस्त्याच्या बाजूस ठेवणे किंवा रस्त्यावर आडवी बसविणे या गोष्टीस मनाई करणे ;

(फ) मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी असलेली कोणतीही जागा, कोणतीही धर्मशाळा, गावची वेस किंवा इतर कोणतीही सार्वजनिक निवा-याची जागा यांचा फायदेशीर व सोयीस्कर उपयोग सर्वांस सारखा व योग्य रीतीने व्हावा म्हणून आणि तेथे येणा-या लोकांनी व्यवस्थित रीतीने वागावे म्हणून, व्यवस्था करण्यासाठी तिचा उपयोग कोणत्या वेळी आणि कोणत्या रीतीने करावा याचे विनियमन करणे ;

(ब) (एक) सार्वजनिक मनोरंजनाच्या जागेला किंवा सार्वजनिक करमणुकीच्या जागेला लायसन देणे किंवा त्यावर नियंत्रण ठेवणे ;

(दोन) त्या परिसरात राहणा-या किंवा तेथून ये-जा करणा-या लोकांस अडथळ्याचे, गैरसोईचे, उपद्रवाचे, जोखमीचे, धोक्याचे किंवा नुकसानीचे ठरु नये म्हणून सार्वजनिक मनोरंजनाची जागा किंवा सार्वजनिक करमणुकीच्या किंवा संमेलनाच्या जागा चालविण्यास मनाई करणे ;

(तीन) सार्वजनिक मनोरंजनाच्या जागेत किंवा सार्वजनिक करमणुकीच्या किंवा सार्वजनिक संमेलनाच्या जागेतील प्रवेश आणि निर्गम मार्गाचे विनियमन करणे आणि सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी व तेथे अशांतता निर्माण होऊ नये म्हणून तरतूद करणे ;

[१][(बक) (एक) [२][सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता व नीतिमत्ता यासाठी किंवा जनतेच्या हिताच्या दृष्टीने] विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अपवादात्मक गोष्टी वगळून, सार्वजनिक मनोरंजनासाठी मेळे व तमाशे यांसहित गायनाच्या, नृत्याच्या, नकलांच्या किंवा रंगभूमीविषयक किंवा इतर प्रयोगांना लायसन देणे किंवा त्यावर नियंत्रण ठेवणे;

(दोन) सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता किंवा नीतिमत्ता राखण्याच्या दृष्टीने किंवा जनतेच्या हिताच्या दृष्टीने कलावंताचा उपयोग करून घेणे व अशा प्रयोगाच्यावेळी कलावंत व प्रेक्षक यांच्या वर्तणुकीचे विनियमन करणे ;

---

[१]सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६ (१) अन्वये खंड (बक) समाविष्ट करण्यात आला.
[२]सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम (२) (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(तीन) अशा प्रयोगांचे [१][आणि त्या संबंधात कोणत्याही संहिता असल्यास, त्या संहितांचे आणि कोणत्याही शर्ती असल्यास, त्या शर्तींना अधीन राहून, त्याबद्दलचे योग्यता प्रमाणपत्र देण्याकरिता] [२][राज्य शासनाच्या मते, साहित्य, रंगभूमी आणि अशा परिनिरीक्षणासंबंधीच्या इतर बाबी यांचे ज्ञान किंवा अनुभव असलेल्या व्यक्ती] ज्याच्या सदस्य असतील अशा, [३][संपूर्ण राज्यासाठी किंवा संबंधित क्षेत्रासाठी या प्रयोजनार्थ राज्य शासनाने नेमलेल्या मंडळाकडून] किंवा आयुक्ताने किंवा जिल्हा दंडाधिका-याने, याबाबत नेमलेल्या सल्लागार समितीकडून पूर्वपरिनिरीक्षण करणे, [४][मंडळाच्या आदेशाविरुद्ध किंवा निर्णयाविरुद्ध विहित प्राधिकरणाकडे अपील करणे, त्याची (प्राधिकरणाची) नेमणूक किंवा घटना, त्याची कार्यपद्धती आणि त्यास सहाय्यभूत अशा इतर बाबी आणि अशा प्रयोगांच्या किंवा संहितांच्या परिनिरीक्षणासाठी, अशी प्रमाणपत्रे मिळविण्याकरिता आणि त्यांच्या दुस-या प्रती देण्याकरिता केलेल्या अर्जासाठी आणि अशा अपिलांच्या संबंधात, आकारण्यात यावयाची फी (मग ती न्यायालय-फी मुद्रांकाच्या स्वरूपात असो किंवा अन्य स्वरूपात असो) या गोष्टींची तरतूद करणे ;]

(चार) ज्या वेळात व ज्या ठिकाणी असे प्रयोग करता येतील त्या वेळेचे व त्याठिकाणांचे विनियमन करणे ;

[५][(बख) सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता किंवा नीतिमत्ता यासाठी किंवा जनतेच्या हिताच्या दृष्टीने (विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अपवादात्मक गोष्टी वगळून) नृत्यशाळा म्हणून वापरण्यात येणा-या जागांना लायसन देणे किंवा त्यावर नियंत्रण ठेवणे ;]

(भ) सार्वजनिक मनोरंजनाच्या ठिकाणी प्रवेशासाठीच्या कोणत्याही तिकिटाच्या किंवा प्रवेशिकेच्या मग ती कोणत्याही नावाने ओळखली जात असो–विक्रीचे विनियमन करणे किंवा तिला मनाई करणे ;

[६][(भक) खाद्यगृहांची नोंदणी करणे,—ज्यात, खाद्यगृहे चालविण्यासाठी या अधिनियमान्वये आवश्यक असलेली व मिळविलेली लेखी परवानगी मानली जाईल असे नोंदणी प्रमाणपत्र प्रत्येक बाबतीत देणे व विहित मुदतीत अशा नोंदणीचे वार्षिक नवीकरण करणे याचा समावेश असेल ;]

(म) या अधिनियमान्वये जे कोणतेही लायसन किंवा जी कोणतीही परवानगी मिळवावयाची असेल किंवा मिळविणे आवश्यक असेल त्या लायसनसाठी किंवा परवानगीसाठी अर्ज करण्याकरिता अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे व अशा कोणत्याही लायसनसाठी किंवा परवानगीसाठी आकारावयाची फी विहित करणे ;

---

[१]सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२]वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३]सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम २ (ब) अन्वये " राज्य सरकारने नेमलेल्या मंडळाकडून" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]वरील अधिनियमाच्या कलम २ (क) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[५]सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ (अ) (एक) अन्वये खंड (बख) समाविष्ट करण्यात आला.

[६]सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ (अ) (एक) अन्वये खंड (भक) समाविष्ट करण्यात आला.

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे व या कलमान्वये केलेल्या कोणत्याही नियमानुसार दिलेल्या कोणत्याही लायसनमुळे [१][किंवा नोंदणी प्रमाणपत्रामुळे] कोणत्याही व्यक्तीस, ज्या कोणत्याही मद्याबद्दल किंवा मादक द्रव्याबद्दल, मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ अन्वये [२][किंवा [३][***] अबकारी अधिनियम, हैदराबादच्या मादक औषधी द्रव्यांबाबत अधिनियम, मध्यप्रांत व व-हाड उत्पादन शुल्क अधिनियम, १९१५, किंवा मध्यप्रांत व व-हाड दारूबंदी अधिनियम, १९३८ अन्वये] किंवा [४][अबकारी महसुलासंबंधीच्या किंवा मद्य तयार करणे, त्याची विक्री करणे व ते सेवन करणे यास मनाई करण्यासंबंधीच्या] त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र आवश्यक असते असे मद्य किंवा मादक द्रव्य आयात करण्याचा, निर्यात करण्याचा, त्याची वाहतूक करण्याचा, ते तयार करण्याचा, विकण्याचा किंवा जवळ बाळगण्याचा प्राधिकार मिळणार नाही किंवा त्यामुळे, अशा कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही व्यक्तीच्या दायित्वास बाध येणार नाही, किंवा त्यामुळे शस्त्र अधिनियम, १८७८ * याच्या किंवा स्फोटक पदार्थ अधिनियम, १८८४ याच्या, किंवा यांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदीस किंवा याखालील कोणत्याही व्यक्तीच्या दायित्वास कोणत्याही रीतीने बाध येणार नाही ;

१९४९ चा मुंबई २५.
१३१६ फसलीचा हैद्राबाद १.
१९१५ चा मध्यप्रांत २.
१९३८ चा मध्यप्रांत व व-हाड ७.
१८७८ चा ११.
१८८४ चा ४.

परंतु आणखी असे की, या पोट-कलमान्वये केलेले कोणतेही नियम किंवा आदेश यानुसार केलेली कोणतीही कार्यवाही किंवा असे नियम किंवा आदेश या अन्वये लायसन [५][किंवा नोंदणीप्रमाणपत्र] देणे या गोष्टी राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या व पर्यवेक्षणाच्या अधीन असतील ;

[६][परंतु तसेच, [७][कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या जवळ किंवा कोणत्याही सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यासाठी किंवा सार्वजनिक मनोरंजनाच्या किंवा करमणुकीचा [८][किंवा नृत्यशाळा म्हणून वापरण्यात येणा-या] कोणत्याही जागांसाठी] कोणतेही लायसन देणा-या किंवा ते मंजूर करण्यास किंवा त्याचे नवीकरण करण्यास नकार देणा-या किंवा ते रद्द करणा-या [९][किंवा कोणत्याही खाद्यगृहास कोणतेही नोंदणी प्रमाणपत्र देण्यास किंवा त्याचे नवीकरण करण्यास नकार देणा-या किंवा ते रद्द करणा-या] कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीस, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत खुद्द राज्य शासनाकडे किंवा राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अधिका-याकडे, अपील सादर करता येईल.]

[१०][(१-क) [११][पोट-कलम (१) च्या] खंड (ब), (बक) व (भ) अन्वये नियम करण्याचा किंवा आदेश देण्याचा अधिकार प्रथमतः [१२][महाराष्ट्र राज्याच्या केवळ मुंबई क्षेत्राच्या] संबंधातच अंमलात असेल ; परंतु राज्य शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे उक्त खंडांपैकी सर्व किंवा कोणत्याही खंडांखालील असा अधिकार, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून राज्याच्या इतर कोणत्याही क्षेत्रात अंमलात येईल, अशी तरतूद करता येईल.]

---

[१]सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[२]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १७ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[३]महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, अन्वये "मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशात किंवा कच्छ प्रदेशात अंमलात असलेला तो अधिनियम " हा मजकूर वगळण्यात आला.
[४]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १७ (१) अन्वये "अबकारी महसुलासंबंधीच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[५]सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[६]सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम २ (क) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.
[७]सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २ द्वारे "सार्वजनिक करमणुकीच्या [किंवा नृत्यशाळा म्हणून वापरण्यात येणा-या] कोणत्याही जागेसाठी " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[८]सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ (अ) (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[९]सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
* आता शस्त्र अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५४) पहा.
[१०]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १७ (२) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.
[११]सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[१२]महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, अन्वये "दुस-या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्याच्या प्रदेशाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(१-ख) खंड (ब), (ब-क), [२][(भ) आणि (भक)] अन्वये नियम करण्याच्या, आदेश देण्याच्या किंवा नेमणुका करण्याच्या अधिकाराचा आणि अशा अधिकाराचा त्या खंडापैकी कोणत्याही खंडाअन्वये लायसन किंवा परवानगी देण्याशी त्यांचा जेथवर संबंध असेल तेथवर त्याचा पोट-कलम (१), खंड (म) अन्वये, पोट-कलम (१-क) च्या तरतुदींना अधीन राहून, महसूल आयुक्ताला सुद्धा त्याच्या प्रभाराखालील महसूल विभागात त्याचा वापर करता येईल.]

(२) (एक) पोट-कलम (१), [३][खंड (क) व (ग) या अन्वये नियम करण्याचा त्यात फेरफार करण्याचा किंवा ते विखंडित करण्याचा अधिकार राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीन असेल.

(दोन) पोट-कलम (१) च्या उरलेल्या खंडाखालील नियम करण्याचा, त्यात फेरफार करण्याचा किंवा ते विखंडित करण्याचा अधिकार त्या शासनाच्या पूर्वमंजुरीच्या अधीन असेल.

(३) मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी एखाद्या जागेचा उपयोग करण्यासंबंधात पोट-कलम (१) खंड (फ) अन्वये केलेला प्रत्येक नियम हा, सर्वसाधारण व रूढ प्रथा आणि त्या त्या मृतदेहाच्या बाबतीतील ताबडतोब विल्हेवाट लावण्याची आवश्यकता योग्यप्रकारे लक्षात घेऊन तयार करण्यात येईल.

(४) पोट-कलम (१), खंड (ठ) च्या प्राधिकाराखाली प्रख्यापित केलेला प्रत्येक नियम, [४][आयुक्तांच्या प्रभाराखाली नसलेल्या कोणत्याही क्षेत्रासंबंधात] केला असेल तर तो ताबडतोब [५][महसूल आयुक्ताला आणि राज्य शासनाला कळविण्यात येईल.]

(५) जर या कलमान्वये केलेला किंवा प्रख्यापित केलेला कोणताही नियम किंवा आदेश हा, कोणत्याही नगरपालिका किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कायद्यात, नियमात किंवा उपविधित स्थानिक विभागातील लोकांचे आरोग्य, सौय किंवा सुरक्षितता यासंबंधीच्या ज्या कोणत्याही बाबीची तरतूद केली असेल अशा बाबीसंबंधात असेल, तर असा नियम किंवा आदेश हा, यथास्थिती, नगरपालिका किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या अशा कायद्यास, नियमास किंवा उपविधिस अधीन असेल.

(६) या कलमांन्वये नियम करण्याच्या, त्यात फेरफार करण्याच्या किंवा ते विखंडित करण्याच्या अधिकाराचा वापर हा, केलेले फेरफार केलेले किंवा विखंडित केलेले नियम पूर्व प्रकाशित करण्याच्या शर्तीस अधीन राहून करण्यात येईल आणि या कलमाअन्वये केलेला, फेरफार केलेला किंवा विखंडित केलेला प्रत्येक नियम राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, त्याचा परिणाम होणा-या स्थानिक क्षेत्रात, यथास्थिती, ज्या इमारतीशी, संरचनेशी, कामाशी किंवा जागेशी त्याचा विशेष संबंध असेल ती इमारत, संरचना, काम किंवा जागा यांच्या जवळील ठळक ठिकाणी त्याच्या प्रती लावून किंवा दवंडी पिटवून प्रसिद्ध करण्यात येईल किंवा

---

१. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ अन्वये पोट-कलम (१-ख) समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(ब) "अन्वये आणि (एक्स)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३ (ब) अन्वये, "खंड (अ), (ब) आणि (क)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "बृहन्मुंबईबाहेरील कोणत्याही क्षेत्रासंबंधाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याचे कलम ३, अनुसूची अन्वये "राज्य सरकारास" या मजकुराने सुरू होणा-या व "कळविला पाहिजे " या मजकुराने संपणा-या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

तो नियम करणा-या, त्यात फेरफार करणा-या किंवा तो विखंडित करणा-या प्राधिका-यास योग्य वाटेल अशा इंग्रजी किंवा स्थानिक भाषेतील स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्रसिद्ध करण्यात येईल किंवा या साधनांपैकी कोणत्याही दोन किंवा अधिक साधनांद्वारे किंवा त्या प्राधिका-यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही साधनांद्वारे प्रसिद्ध करण्यात येईल :

परंतु, असे कोणतेही नियम करणे किंवा त्यात फेरफार करणे किंवा ते विखंडित करणे ही गोष्ट ताबडतोब अंमलात आणणे आवश्यक आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याविषयी, [१][महसूल आयुक्त, आयुक्त], [२][जिल्हा दंडाधिकारी किंवा अधीक्षक] यांची खात्री होईल तर, पूर्व प्रसिद्धीशिवाय असे नियम करता येतील किंवा त्यात फेरफार करता येतील किंवा ते विखंडित करता येतील.

(७) या कलमात यापूर्वी काहीही अंतर्भूत असले तरी किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, सक्षम प्राधिका-याने, वाईट चालीची म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या कोणत्याही व्यक्तीस कोणतीही सार्वजनिक मनोरंजनाची किंवा करमणुकीची जागा चालविण्याकरिता [३][किंवा नृत्यशाळा चालविण्यासाठी वापरण्यात येणा-या कोणत्याही जागेसाठी] लायसन, देण्याचे नाकारणे किंवा ती चालविण्यास मनाई करणे [४][किंवा कोणत्याही खाद्यगृहास, यथास्थिती, कोणतेही नोंदणी प्रमाणपत्र देण्याचे नाकारणे किंवा ते चालविण्यास मनाई करणे] हे नेहमी कायदेशीर असेल.

(८) उपरोक्त प्रमाणे योग्यरीतीने दिलेला कोणताही आदेश अंमलात असेपर्यंत, त्याचे पालन करणे हे संबंधित सर्व व्यक्तींचे कर्तव्य असेल.

२००५ चा महा. ३५. [५]["**३३क.** (१) या अधिनियमामध्ये, किंवा, पोलीस आयुक्ताने किंवा जिल्हा दंडाधिका-याने आपापल्या प्रभारांखालील क्षेत्रांकरिता कलम ३३ च्या पोट-कलम (१) अन्वये केलेल्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, मुंबई पोलीस (सुधारणा) अधिनियम, २००५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास आणि तेव्हापासून,— खाद्यगृह, परमीट रूम किंवा बिअर बार यांमधील नृत्याविष्कारावर बंदी आणि इतर परिणामरूप तरतुदी.

**(क) खाद्यगृहामध्ये, परमीट रूममध्ये किंवा बिअर बारमध्ये कोणत्याही त-हेचा किंवा प्रकारचा (of any kind or type) नृत्याविष्कार आयोजित करण्यावर बंदी घालण्यात आली आहे ;**

**(ख) खाद्यगृहामध्ये, परमीट रूममध्ये किंवा बिअर बारमध्ये कोणत्याही त-हेचा किंवा प्रकारचा नृत्याविष्कार आयोजित करण्यासाठी लायसन प्राधिकारी असलेल्या पोलीस आयुक्ताने, जिल्हा दंडाधिका-याने किंवा यथास्थिति, इतर कोणत्याही अधिका-याने, उपरोक्त नियमांन्वये दिलेली सर्व नृत्याविष्कार लायसने रद्द ठरतील.**

---

१. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ (क) अन्वये " आयुक्त " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

२. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३(क) अन्वये " किंवा जिल्हा दंडाधिकारी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम २ अन्वये ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

(२) कलम १३१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) चे उल्लंघन करून, खाद्यगृहामध्ये, परमीट रूममध्ये किंवा बिअर बारमध्ये कोणत्याही त-हेचा किंवा प्रकारचा नृत्याविष्कार आयोजित करणा-या किंवा आयोजित करण्याची व्यवस्था करणा-या किंवा आयोजित करण्यास परवानगी देणा-या कोणत्याही व्यक्तीस, दोषसिद्धीनंतर, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची आणि दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील अशी, त्याविरुद्ध विशेष व पुरेशी कारणे नसतील तर अशी कारावासाची शिक्षा तीन महिन्यांहून कमी असणार नाही आणि दंड पन्नास हजार रुपयांहून कमी असणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये जिचे नृत्याविष्कार लायसन रद्द करण्यात आले आहे अशी कोणतीही व्यक्ती, तिच्या खाद्यगृहात, परमीट रूममध्ये किंवा बिअर बारमध्ये कोणत्याही त-हेचा किंवा प्रकारचा नृत्याविष्कार, आयोजित करीत आहे किंवा आयोजित करण्याची व्यवस्था करीत आहे किंवा आयोजित करण्यास परवानगी देत आहे असे, लायसन प्राधिका-याच्या निदर्शनास आले तर, लायसन प्राधिकारी, कलम ३३ अन्वये तयार केलेल्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, खाद्यगृह म्हणून दिलेले नोंदणी प्रमाणपत्र आणि परमीट रूम किंवा बिअर बारला सार्वजनिक करमणुकीची जागा ठेवण्यासाठी दिलेले लायसन (PPEL) निलंबित करील आणि लायसनधारकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, ते नोंदणी प्रमाणपत्र आणि लायसन निलंबित केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत एकतर, नोंदणी प्रमाणपत्र आणि लायसन निलंबित करण्याबाबतचा आदेश मागे घेईल किंवा नोंदणी प्रमाणपत्र आणि लायसन रद्द करील.

(४) पोट-कलम (३) अन्वये, नोंदणी प्रमाणपत्र आणि लायसन रद्द करणा-या, लायसन प्राधिका-याच्या आदेशाने व्यथित झालेल्या व्यक्तीस, आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत राज्य शासनाकडे अपील करता येईल. राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(५) पोट-कलम (१) अन्वये जिचे नृत्याविष्कार लायसन रद्द झाले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, असे लायसन ज्याने दिले असेल अशा लायसन प्राधिका-याकडे, योग्य प्रमाणात लायसन फी परत मिळण्यासाठी अर्ज करता येईल. असा लायसन प्राधिकारी, योग्य ती चौकशी केल्यानंतर, असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत, यथाप्रमाण तत्त्वानुसार लायसन फी परत करील.

(६) या कलमाखाली शिक्षापात्र असलेला अपराध हा, दखलपात्र व अजामीनपात्र असेल.

विवक्षित प्रकरणांमध्ये कलम ३३क च्या तरतुदी लागू नसणे.

**३३ख.** या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या अन्य तरतुदींना अधीन राहून, नाट्यगृह, सिनेमागृह, श्रोतृगृह ; अथवा जेथे फक्त त्याच्या सदस्यांनाच प्रवेश आहे अशा खेळाच्या क्लबमध्ये किंवा जिमखान्यामध्ये ; किंवा त्रितारांकित किंवा त्याच्या वरच्या दर्जाच्या हॉटेलमध्ये होणा-या, अथवा (अ) राज्यातील पर्यटनविषयक उपक्रमांना चालना मिळावी म्हणून केंद्र वा राज्य शासन राबवीत असलेले पर्यटन धोरण किंवा (ब) सांस्कृतिक उपक्रम विचारात घेऊन, राज्य शासन यासंदर्भात विशेष वा सर्वसाधारण आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य कोणत्याही आस्थापनेमध्ये किंवा आस्थापनांच्या वर्गामध्ये होणा-या, नृत्याविष्काराच्या आयोजनास, कलम ३३क मधील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

१९५० चा मुंबई २९. १८६० चा २१. १९५६ चा १.

**स्पष्टीकरण**.— या कलमाच्या प्रयोजनासाठी, "खेळाचा क्लब " किंवा " जिमखाना " याचा अर्थ, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० किंवा कंपनी अधिनियम, १९५६ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यांच्या तरतुदीन्वये, खेळाचा क्लब किंवा जिमखाना म्हणून नोंदणी करण्यात आलेली आस्थापना, असा आहे." ]

सक्षम प्राधिकारी रस्त्यावर अडथळे उभारण्याचा प्राधिकार देऊ शकेल.

**३४.** आयुक्त व [1][अधीक्षक] यांस आपापल्या प्रभाराखाली असलेल्या क्षेत्रात, जेव्हा त्याच्या मते अशी कार्यवाही करणे आवश्यक असेल तेव्हा, त्यास योग्य वाटेल अशा पोलीस अधिका-यास कोणत्याही रस्त्यावर वाहने हाकण्याचे तात्पुरते बंद करण्याच्या प्रयोजनाकरिता अशा रस्त्यावर अडथळे उभारण्याचा प्राधिकार देता येईल आणि त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील तरतुदींचे अशा कोणत्याही वाहनांच्या संबंधात किंवा अशा वाहनाच्या चालकाकडून किंवा ते ताब्यात असलेल्या व्यक्तीकडून उल्लंघन करण्यात आलेले नाही याबद्दल आपली खात्री करून घेता येईल. तसेच उक्त प्राधिका-यास अशा अडथळ्याच्या वापराचे विनियमन करण्याकरिता त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील.

वेगळ्या राखून ठेवलेल्या जागांव्यतिरिक्त इतर जागी मृतदेहांची विल्हेवाट लावण्यास मनाई करण्याबाबत नियम करण्याचा अधिकार.

**३५.** (१) मृतदेहांची विल्हेवाट लावण्याकरिता वेगळ्या राखून ठेवलेल्या जागांव्यतिरिक्त इतर जागी मृतदेहांचे दहन करून, दफन करून किंवा अन्य त-हेने त्यांची विल्हेवाट लावण्यास मनाई करण्याबाबत सक्षम प्राधिका-यास वेळोवेळी नियम करता येतील.

परंतु, ज्या कोणत्याही शहरात किंवा ठिकाणी अशा रीतीने जागा वेगळ्या राखून ठेवण्यात आल्या नसतील त्या शहराच्या किंवा ठिकाणाच्या बाबतीत असे कोणतेही नियम करण्यात येणार नाहीत.

परंतु, आणखी असे की, उक्त सक्षम प्राधिका-यास किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास, कोणत्याही व्यक्तीने त्याच्याकडे अर्ज केल्यास, अशा रीतीने वेगळ्या राखून ठेवलेल्या जागेव्यतिरिक्त इतर जागेत कोणत्याही व्यक्तीच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यामुळे, त्याच्या मते वाहतुकीस अडथळा होण्याचा किंवा सार्वजनिक शांततेचा भंग होण्याचा संभव नसेल किंवा तसे करण्यास इतर कोणत्याही कारणास्तव हरकत घेण्याजोगी नसेल तर, अशा व्यक्तीस, स्वेच्छानिर्णयानुसार, अशा रीतीने मृतदेहाची विल्हेवाट लावण्याची परवानगी देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या कोणत्याही नियमात, निरनिराळ्या समाजाच्या किंवा समाजाच्या घटकातील व्यक्तींच्या मृत देहाची विल्हेवाट लावण्यासाठी वेगळ्या राखून ठेवलेल्या जागा विनिर्दिष्ट करण्यात येतील.

१९०४ चा मुंबई १.

(३) असे सर्व नियम, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील आणि मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४, कलम २४, खंड (ग) अन्वये विनिर्दिष्ट करावयाचा दिनांक हा, प्रस्तावित नियमाचा मसुदा ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात आला असेल त्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या मुदतीपेक्षा आधीचा असणार नाही.

**स्पष्टीकरण**.— या कलमाच्या प्रयोजनाकरिता, मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी वेगळी राखून ठेवलेली जागा याचा अर्थ, त्या त्या वेळी अंमलात असलेली कोणतीही रुढी, परिपाठ किंवा कायदा याअन्वये अशा प्रयोजनाकरिता वेगळी राखून ठेवलेली जागा, असा आहे.

---

१. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

आयुक्त किंवा [१][अधीक्षक] यांचा व इतर अधिका-यांचा जनतेस निदेश देण्याचा अधिकार.

३६. आयुक्तास, व त्याच्या आदेशास अधीन राहून, निरीक्षकाहून कनिष्ठ दर्जाचा नसेल अशा प्रत्येक पोलीस अधिका-यास व [१][अधीक्षकास] व त्याच्या आदेशांस अधीन राहून, त्याबाबतीत राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही पोलीस अधिका-यास, आपापल्या प्रभाराखाली असलेल्या क्षेत्रात प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, परंतु कलम ३३ अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा आदेशाचे उल्लंघन होणार नाही अशा रीतीने पुढील गोष्टींसाठी आवश्यक असे सर्व मौखिक किंवा लेखी आदेश वेळोवेळी देता येतील.

(क) रस्त्यावरील किंवा रस्त्याने जाणा-या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांचे आचरण किंवा वागणूक किंवा कृती याविषयी निदेश देणे;

(ख) अशा कोणत्याही मिरवणुका कोणत्या मार्गांनी व कोणत्या वेळात काढाव्यात किंवा काढू नयेत, ते मार्ग व त्या वेळा विहित करणे;

(ग) सर्व मिरवणुकींच्या व जमावांच्या प्रसंगी व उपासनेच्या सर्व जागांच्या आसपास उपासनेच्या वेळी व कोणत्याही रस्त्यावर किंवा सार्वजनिक जागी किंवा सार्वजनिक निवा-याच्या जागी गर्दी होणार असेल किंवा अडथळा होण्याचा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळे होऊ न देणे;

(घ) सर्व रस्त्यांवर व रस्त्यांमध्ये, घाटांत किंवा घाटांवर, सर्व धक्क्यांवर व धक्क्यांमध्ये आणि सार्वजनिक स्नानाच्या, कपडे धुण्याच्या व उतरण्याच्या जागांच्या ठिकाणी व जागांमध्ये, जत्रा, मंदिरे या ठिकाणी आणि इतर सर्व सार्वजनिक निवा-याच्या जागी सुव्यवस्था राखणे ;

(ङ) कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्याजवळ किंवा सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ गायनवादन करणे किंवा ढोल, ताशे व इतर वाद्ये बडवणे आणि शिंगे फुंकणे व भोंगे वाजविणे यांचे व इतर कर्कश वाद्ये वाजविणे यांचे विनियमन करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे;

[२][(ङक) कोणत्याही सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ किंवा कोणत्याही सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी ध्वनिक्षेपकाचा वापर करण्याचे विनियमन करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे;]

(च) सक्षम प्राधिका-याने या अधिनियमाची कलमे ३३, ३५, ३७ ते ४०, ४२, ४३ व ४५ या अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उपादेश असलेले व त्यास पुष्टी देणारे योग्य आदेश देणे.

---

१. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ८ अन्वये खंड (ङक) समाविष्ट करण्यात आले.

शांतता भंगास प्रतिबंध करण्यासाठी विवक्षित कृतींना मनाई करण्याचा अधिकार.

३७. (१) आयुक्त आणि जिल्हा दंडाधिकारी यांस आपापल्या प्रभाराखाली असलेल्या क्षेत्रात सार्वजनिक शांतता किंवा सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल त्यावेळी व तितक्या मुदतीपर्यन्त जाहीररीत्या प्रख्यापित केलेल्या किंवा व्यक्तींना उद्देशून प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, कोणत्याही शहरात, गावात किंवा जागी किंवा अशा कोणत्याही शहराच्या, गावाच्या किंवा जागेच्या आसपास खालील गोष्टींस मनाई करता येईल :—

(क) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडुके, बंदुका, सूरे, काठ्या किंवा लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगणे,

(ख) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ जवळ बाळगणे,

(ग) दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने जवळ बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे,

(घ) व्यक्तींचे अथवा मृतदेहांचे किंवा त्यांच्या आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे,

(ङ) सार्वजनिक ठिकाणी आरडाओरड करणे, गाणी म्हणणे, वाद्ये वाजविणे.

(च) अशा प्राधिका-याच्या मते ज्यामुळे सभ्यता अगर नीतिमत्ता यास धक्का पोचेल अशी किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये राज्य उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, अंगविक्षेप करणे किंवा विडंबन करणे आणि अशी चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणताही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन करणे किंवा त्यांचा प्रसार करणे.

(२) अशा मनाईचे उल्लंघन करून जर कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही वस्तूनिशी सशस्त्र होऊन जात असेल किंवा कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ किंवा क्षेपणास्त्र जवळ बाळगील तर ती कोणत्याही पोलीस अधिका-याकडून निःशस्त्र केली जाण्यास, किंवा दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ किंवा क्षेपणास्त्र त्यांच्याकडून जप्त केली जाण्यास पात्र होईल आणि अशा त-हेने जप्त केलेली वस्तू, दाहक पदार्थ, स्फोटक पदार्थ किंवा क्षेपणास्त्र राज्य शासनाकडे सरकारजमा होईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये अधिकार दिलेल्या प्राधिका-याच्या मते सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी कोणत्याही जमावास किंवा मिरवणुकीस जेव्हा व जितक्या मुदतीपर्यन्त मनाई करणे आवश्यक असेल तेव्हा आणि तितक्या मुदतीपर्यन्त, लेखी आदेशाद्वारे, त्याला तशी मनाई करता येईल :

परंतु, अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय पंधरा दिवसांपेक्षा जास्त मुदतीपर्यन्त अंमलात राहणार नाही.

(४) त्याचप्रमाणे पोट-कलम (१) अन्वये अधिकार दिलेल्या प्राधिका-यास जाहीर नोटिशीद्वारे, कोणताही रस्ता किंवा सार्वजनिक जागा सार्वजनिक प्रयोजनासाठी तात्पुरती राखून ठेवता येईल आणि असा प्राधिकारी विहित करील त्या शर्तीनुसार असलेल्या प्रवेशाव्यतिरिक्त अन्य बाबतीत कोणत्याही व्यक्तीला अशा राखून ठेवलेल्या जागेत प्रवेश करण्यास मनाई करता येईल.

गायन-वादन, आवाज किंवा गोंगाट चालू ठेवण्यास मनाई, वगैरे करण्याचा अधिकार.

३८. (१) पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-याच्या अहवालावरून किंवा त्याला मिळालेल्या इतर माहितीवरून, जर आयुक्ताची किंवा [१][अधीक्षकाची] अशी खात्री होईल की, जनतेला किंवा त्या परिसरात राहणा-या किंवा त्या परिसरातील मालमत्तेचा भोगवटा करणा-या कोणत्याही व्यक्तींना, त्रास, अशांतता, अस्वस्थता किंवा नुकसान होऊ नये किंवा त्रास, अशांतता, अस्वस्थता किंवा नुकसान होण्याचा धोका निर्माण होऊ नये म्हणून तसे करणे आवश्यक आहे तर त्यास, लेखी आदेशाद्वारे पुढील गोष्टींना प्रतिबंध करण्यासाठी, मनाई करण्यासाठी, त्यांचे नियंत्रण किंवा विनियमन करण्यासाठी, त्यास योग्य वाटतील असे निदेश कोणत्याही व्यक्तीस देता येतील—

(क) कोणत्याही जागेत किंवा जागेवर—

(एक) कोणतेही गायन किंवा वादन,

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "जिल्हा अधीक्षक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(दोन) कोणतेही वाद्य, साधन अगर उपकरण किंवा जे [1][आवाज किंवा प्रतिध्वनी निर्माण करू शकेल] असे यंत्रक वाजविल्यामुळे, बडविल्यामुळे, आपटल्यामुळे किंवा फुंकल्यामुळे किंवा कोणत्याही प्रकारे वापरल्यामुळे होणारा आवाज,

करणे किंवा तो चालू ठेवणे, किंवा

(ख) कोणत्याही जागेत किंवा जागेवर, ज्याच्या परिणामी किंवा जो करीत असताना गोंगाट होतो, असा व्यापार, व्यवसाय किंवा काम चालविणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये अधिकार दिलेल्या प्राधिका-यास एक तर स्वतःहोऊन किंवा पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीने अर्ज केल्यावरून, असा कोणताही आदेश एक तर विखंडित करता येईल, किंवा त्यात फेरबदल किंवा फेरफार करता येईल :

परंतु, असा कोणताही अर्ज निकालात काढण्यापूर्वी उक्त प्राधिकारी अर्जदारास स्वतः किंवा वकिलामार्फत आपल्यासमोर हजर होण्याची आणि आदेशाविरूद्ध कारण दाखविण्याची संधी देईल आणि असा कोणताही अर्ज त्याने पूर्णपणे किंवा अंशतः नामंजूर केल्यास अशा नामंजुरीची कारणे तो नमूद करील.

दंगा, इत्यादींस प्रतिबंध करण्यासाठी आदेश देणे.

**३९.** (१) आयुक्ताला व [2][अधीक्षकाला] आपापल्या प्रभाराखालील क्षेत्रात कोणताही दंगा किंवा गंभीर स्वरूपाचा शांतता भंग होऊ न देण्यासाठी किंवा त्यास आवर घालण्यासाठी कोणतीही इमारत किंवा जागा तात्पुरती बंद करता येईल, किंवा ताब्यात घेता येईल आणि तीत सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीस जाण्यास प्रतिबंध करता येईल, किंवा त्यास इष्ट वाटतील अशाच केवळ व्यक्तींस व अशा अटींवर तीत जाण्याची परवानगी देता येईल. या कलमान्वये त्याच्याकडे निहित असलेल्या प्राधिकाराचा वापर करून आदेश देणारा प्राधिकारी जे आदेश देईल व अधिसूचित करील त्या आदेशाप्रमाणे अनुरूप वर्तन ठेवणे सर्व संबंधित व्यक्तींवर बंधनकारक असेल.

बंद केलेल्या किंवा ताब्यात घेतलेल्या इमारतीच्या किंवा जागेच्या कायदेशीर भोगवटादारास भरपाई देणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये कारवाई केल्यामुळे अशा इमारतीच्या किंवा जागेच्या कायदेशीर भोगवटादाराचे मोठे नुकसान किंवा हानी झाली असेल तर त्यास अशा इमारतीचा किंवा जागेचा जो वापर करण्यात आला किंवा करण्याचा हेतू होता त्या वापरामुळे किंवा तेथे जाण्याची मुभा असलेल्या व्यक्तींच्या गैरवर्तनामुळे कारवाई करणे आवश्यक होते असे अशा प्राधिका-याचे मत नसेल तर त्याने संबंधित प्राधिका-याकडे अशा कारवाईच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत अर्ज केल्यावर अशा नुकसानीबद्दल किंवा हानीबद्दल वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क राहील.

भरपाईबाबतच्या विवादांचा निवाडा करणे.

(३) पोट-कलम (२) खालील कोणत्याही प्रकरणात कोणताही विवाद उपस्थित झाल्यास, द्यावयाची रक्कम (कोणतीही असल्यास) व ज्यांना ती द्यावयाची त्या व्यक्ती त्यांच्या बाबतीत, यथास्थिति, मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा, जिल्हा दंडाधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल.

धार्मिक समारंभ इत्यादींच्या जागी सुव्यवस्था राखण्याबद्दल आदेश काढणे.

**४०.** (१) ज्याच्या संबंधात किंवा ज्याच्या आयोजना संबंधात किंवा ज्यातील सहभागासंबंधात गंभीर स्वरूपाचा शांतताभंग होण्याची ज्यामुळे शक्यता आहे असा एखादा विवाद किंवा तंटा अस्तित्वात आहे असे सक्षम प्राधिका-यास दिसून येईल अशा कोणत्याही रस्त्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी प्रत्यक्ष चालू असलेला किंवा उद्देशित असलेला धार्मिक किंवा समारंभयुक्त किंवा सामुदायिक देखाव्याच्या किंवा प्रदर्शनाच्या किंवा संघटित जमावाच्या कोणत्याही बाबतीत अशा प्राधिका-यास संबंधित व्यक्तींनी परस्परांशी व जनतेशी कशी वागणूक ठेवावी त्याप्रसंगी याबद्दल त्यास आवश्यक व वाजवी वाटतील असे आदेश हितसंबंध असलेल्या पक्षांचे व व्यक्तींचे स्पष्ट कायदेशीर हक्क व प्रस्थापित प्रथा लक्षात घेऊन देता येतील. असा प्रत्येक आदेश तो ज्या शहरात अगर जागी अंमलात यावयाचा असेल त्या शहरात अगर ठिकाणी प्रसिद्ध करण्यात येईल आणि त्यानुसार वागणूक ठेवणे सर्व संबंधित व्यक्तींवर बंधनकारक असेल.

---

[1] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ९ अन्वये "आवाज निर्माण करू शकेल" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "जिल्हा अधीक्षकाला" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या कोणताही आदेश हा अधिकारिता असलेल्या न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्यास, मनाई हुकूमास किंवा आदेशास अधीन राहील आणि पूर्वोक्त आदेशामुळे व्यथित झालेल्या ज्या कोणत्याही व्यक्तीच्या हक्कांच्या व कर्तव्यांच्या संबंधात हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या फिर्यादीवर, दाव्यावर किंवा अर्जावर त्या न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही निर्णयाशी, हुकूमनाम्याशी, मनाई हुकूमाशी किंवा आदेशाशी तो विसंगत आहे असे, तो आदेश देणा-या प्राधिका-याच्या निदर्शनास आणून दिले तर, असा आदेश मागे घेण्यात येईल किंवा त्यात फेरफार करण्यात येईल.

मनोरंजनाची स्थाने व जाहीर सभा या ठिकाणचा शांतताभंग, इत्यादीबद्दल पोलिसांनी बंदोबस्त करणे.

**४१.** (१) जेथे लोकांस निमंत्रित करण्यात आलेले असेल किंवा जी लोकांसाठी खुली असेल अशी कोणतीही मनोरंजनाची सार्वजनिक जागा किंवा कोणताही जमाव किंवा सभा येथे गंभीर स्वरूपाचा शांतताभंग किंवा कायदेभंग किंवा तेथे जमलेल्या लोकांना असलेला उघड व निकटवर्ती धोका यांस प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनासाठी अशा मनोरंजनाच्या जागी किंवा अशा जमावाच्या किंवा सभेच्या ठिकाणी पोलीस शिपायाच्या दर्जाहून उच्च दर्जाचा जो कोणताही वरिष्ठ पोलीस अधिकारी हजर असेल त्यास, कायदेशीररीत्या करण्यात आले असतील अशा नियमांस व आदेशांस अधीन राहून त्या मनोरंजनाच्या जागी किंवा जमावाच्या किंवा सभेच्या ठिकाणी लोकांस प्रवेश देण्यासंबंधात आणि तेथे चालवावयाचे काम शांतपणे व कायदेशीररीतीने चालविण्यात यावे यासाठी, आणि सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी, त्यास आवश्यक वाटतील ते वाजवी निदेश देता येतील, आणि अशा प्रत्येक वाजवी निदेशाला अनुरूप वर्तन ठेवणे सर्व व्यक्तींवर बंधनकारक असेल.

पोलिसांना तेथे जाण्याची पूर्ण मुभा असणे.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींची आणि त्याअन्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी मनोरंजनाच्या, जमावाच्या किंवा सभेच्या अशा प्रत्येक ठिकाणी जाण्याची पोलिसांना पूर्ण मुभा असेल.

**४२.** [ कुंटणखाने बंद करणे ] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ८ अन्वये वगळण्यात आले.

जिल्हा दंडाधिका-यास, जत्रा, इत्यादी ठिकाणी साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ न देण्याबद्दल विशेष उपाययोजना करता येतील.

**४३.** (१) जेव्हा आयुक्तास किंवा जिल्हा दंडाधिका-यास असे दिसून येईल की, आपल्या प्रभाराखाली असलेल्या क्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी यात्रेमुळे, जत्रेमुळे किंवा तशा दुस-या प्रसंगामुळे मोठा जनसमुदाय जमला असून किंवा जमण्याचा संभव असून त्या ठिकाणी कोणत्याही साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे किंवा होण्याचा संभव आहे, तेव्हा त्यास, त्या साथीचा प्रादुर्भाव किंवा फैलाव होऊ नये म्हणून त्यास आवश्यक वाटतील अशा विशेष उपाययोजना करता येतील आणि उक्त ठिकाणच्या रहिवाशांनी आणि त्या ठिकाणी हजर असलेल्या किंवा त्या ठिकाणी परत येत असलेल्या किंवा तेथून परत जात असलेल्या व्यक्तींनी पाळावयाचे असे विनियम जाहीर नोटिशीद्वारे त्यांस विहित करता येतील.

(२) जिल्हा दंडाधिका-याने किंवा जिल्हाधिका-याने अथवा आयुक्ताच्या किंवा जिल्हा दंडाधिका-याच्या मागणीवरून मुख्य इलाखा शहर दंडाधिका-याने, जमावाच्या ठिकाणी व सभोवताली स्वच्छता व सुव्यवस्था राखण्यासाठी व्यवस्था करण्यासाठी लागणा-या खर्चाची तरतूद करता येईल इतकी वाजवी फी पोट-कलम (१) च्या तरतुदीखाली येणा-या व्यक्तींवर बसविणे व ती वसूल करणे हे कायदेशीर असेल.

(३) जमावाचे ठिकाण नगरपालिकेच्या किंवा महानगरपालिकेच्या हद्दीत असेल तेव्हा उपरोक्त प्रयोजनासाठी आवश्यक असलेल्या रकमा नगरपालिकेकडून किंवा महानगरपालिकेकडून वसूल करता येतील.

मोकाट कुत्र्यांचा नाश करणे.

**४४.** (१) आयुक्ताला आणि [१][अधिक्षकाला] आपापल्या प्रभागांखाली असलेल्या क्षेत्रांत जाहीर नोटिशीद्वारे वेळोवेळी असे घोषित करता येईल की, उक्त नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत रस्त्यांमध्ये किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी भटकत असल्याचे आढळून येणा-या कोणत्याही मोकाट कुत्र्यांचा नाश करता येईल आणि त्याप्रमाणे अशा मुदतीत आढळून आलेल्या अशा कोणत्याही कुत्र्यांचा नाश करता येईल.

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "जिल्हा अधीक्षक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) अन्वये अधिकार प्रदान केलेल्या प्राधिका-यास जाहीर नोटीस देऊन असे फर्मावित येईल की, कोणत्याही रस्त्यात किंवा सार्वजनिक ठिकाणी असलेल्या व बरोबर कोणी व्यक्ती नसेल अशा कुत्र्यास, श्वासोच्छवास करण्यास किंवा पिण्यास त्यास अडथळा न होता, चावण्यास प्रभावीपणे प्रतिबंध होईल अशा रीतीने मुसक्या बांधण्यात येतील आणि अशी नोटीस अंमलात असेपर्यन्त आपल्या मालकाच्या जागेबाहेरील कोणत्याही रस्त्यात किंवा ठिकाणी मुसकी शिवाय मोकळ्या आढळून आलेल्या कोणत्याही कुत्र्याचा पोलिसास नाश करता येईल किंवा त्याला कब्ज्यात घेता येईल आणि त्यास अटकावून ठेवता येईल :

परंतू, अशा प्रकारे आढळून आलेल्या कोणत्याही कुत्र्याच्या गळ्यात मालकाचे खरे नाव व पत्ता लिहिलेला पट्टा असेल तर ते पिसाळलेले असल्याखेरीज त्याचा तात्काळ नाश करण्यात येणार नाही, परंतु, त्याला अटकावून ठेवण्याबद्दलची खबर त्या मालकाकडे टपालाने किंवा इतर रीतीने ताबडतोब पाठविण्यात येईल.

(३) ज्या कुत्र्यास, पोट-कलम (२) अन्वये पूर्ण तीन दिवस अटकावून ठेवलेले असताना त्याच्या मालकाने त्याच्या मुसक्या बांधल्या नाहीत आणि त्याला अशा प्रकारे अटकावून ठेवण्याबद्दलचा सर्व खर्च दिला नाही तर, सक्षम प्राधिका-याच्या मंजुरीने आणि आदेशाने अशा कोणत्याही कुत्र्याचा नाश करता येईल किंवा त्याची विक्री करता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये कोणत्याही कुत्र्याच्या विक्रीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा विनीयोग शक्यतोवर, त्याला अटकावून ठेवण्याच्या संबंधात झालेला खर्च भागविण्यासाठी करण्यात येईल व त्यातून काही शिल्लक राहिल्यास ती राज्याच्या एकत्रित निधीचा भाग होईल.

(५) या कलमान्वये कोणत्याही कुत्र्याचा नाश करण्यासंबंधात किंवा त्याला अटकावून ठेवण्यासंबंधात करण्यात आलेला कोणताही खर्च हा, पोट-कलम (४) च्या तरतुदीस अधीन राहून सक्षम प्राधिका-याने काढलेल्या अधिपत्रान्वये, जणू ते फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ *च्या कलम ३८६ अन्वये काढलेले अधिपत्र असल्याप्रमाणे त्या कुत्र्याच्या मालकाकडून वसूल करण्यात येईल. १८९८ चा ५.

यातनापिडित किंवा (शारीरिक दृष्ट्या) अयोग्य प्राण्यांचा नाश करणे.

**४५.** (१) ज्या कोणत्याही पोलीस अधिका-यास, कोणत्याही रस्त्यावर किंवा उपासना स्थानाखेरीज अन्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी बैल किंवा गाय याशिवाय इतर कोणताही प्राणी, त्याच्यामते, निर्दयपणे कृती केल्याशिवाय त्यास हलविता येणार नाही इतका रोगाने पिडलेला किंवा इतका जबर दुखापत झालेला आणि इतक्या वाईट शारीरिक अवस्थेत असलेला आढळेल तर, तो, जर मालक गैरहजर असेल किंवा त्या प्राण्याचा नाश करण्यास संमती देण्याचे नाकारीत असेल तर, ज्या क्षेत्रात तो प्राणी आढळलेला असेल त्या क्षेत्राच्या प्रभारी पशुवैद्यक व्यवसायीस ताबडतोब बोलावून घेईल आणि जर, पशुवैद्यक व्यवसायी, त्या प्राण्यास इतकी प्राणांतिक दुखापत झालेली आहे किंवा इतकी जबर दुखापत झालेली आहे किंवा तो इतका रोगपिडित किंवा इतक्या वाईट शारीरिक अवस्थेत आहे की, त्यास जिवंत ठेवणे हेच क्रूरपणाचे ठरेल असे प्रमाणपत्र देईल तर, त्या पोलीस अधिका-यास, मालकाच्या संमतीशिवाय, त्या प्राण्याचा नाश करता किंवा करविता येईल :

परंतु, जर,पशुवैद्यक व्यवसायीच्या मते तो प्राणी जेथे आढळून आलेला असेल त्या ठिकाणाहून त्याचे फार हाल होऊ न देता हलवता येण्यासारखा असेल आणि जर त्या प्राण्याचा मालक किंवा तो ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल अशी व्यक्ती, किंवा त्याच्या गैरहजेरीत त्या ठिकाणी जी कोणतीही अन्य व्यक्ती, पशुवैद्यक व्यवसायीस योग्य वाटेल अशा मुदतीत त्या प्राण्यास पशुवैद्यक रुग्णालयात किंवा पांजरपोळात, हलविण्यास कबूल असेल तर, अशा मालकाने, तो प्राणी ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल अशा व्यक्तीने किंवा अन्य

---

* आता फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ (सन १९७४ चा २) पहा.

व्यक्तीने, तो प्राणी तेथून हलविण्यास पशुवैद्यक व्यवसायी परवानगी देईल ; जर तो मालक, किंवा प्राणी ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल ती व्यक्ती, किंवा अन्य व्यक्ती, तो प्राणी हलवण्यास नाकबूल असेल किंवा तसे हलविण्यात कसूर करील तर, पशुवैद्यक व्यवसायीस, त्या प्राण्याचा नाश करण्यापूर्वी तो प्राणी जेथे आढळून आला असेल त्या ठिकाणाहून त्यास योग्य वाटेल अशा इतर ठिकाणी त्या प्राण्याला हलवण्याचा पोलीस अधिका-यास निदेश देता येईल :

परंतु आणखी असे की, जेव्हा त्या प्राण्याचा कोणत्याही रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी नाश करण्यात येईल तेव्हा त्याचा नाश करतेवेळी आडोसा करून तो प्राणी शक्यतोवर लोकांच्या नजरेआड ठेवण्यात येईल.

(२) राज्य शासनाला पशुवैद्यक व्यवसायी म्हणून त्याला योग्य वाटतील अशा व्यक्ती नेमता येतील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता त्यांच्या प्रभाराखाली जी क्षेत्रे येतील ती क्षेत्रे घोषित करता येतील.•

[१][अधीक्षकाने] जिल्हा दंडाधिका-याच्या आणि आयुक्ताच्या नियंत्रणास अधीन राहून व जिल्हा दंडाधिका-यांनी राज्य शासनाच्या नियंत्रणास अधीन राहून या प्रकरणाखालील अधिकारांचा वापर करणे.

**४६.** या प्रकरणान्वये प्रदान केलेल्या ज्या अधिकाराचा वापर करण्याचा अधिकार राज्य शासनाकडून ज्याला विशेषरीत्या प्रदान करण्यात आलेला नाही अशा एखाद्या [१][अधीक्षकास] किंवा त्याच्या हाताखालील कोणत्याही अधिका-यास या प्रकरणान्वये प्रदान केलेल्या प्रत्येक अधिकाराचा वापर, जिल्हा दंडाधिका-याच्या आदेशांस अधीन राहून करता येईल आणि या प्रकरणान्वये केलेले सर्व नियम, विनियम व आदेश हे [२][महसूल आयुक्ताने किंवा आयुक्ताने] केले असतील तर, त्यांना, राज्य शासन याबाबतीत वेळोवेळी करील असे नियम व आदेश लागू होतील व जिल्हा दंडाधिका-याने किंवा त्याबाबतीत विशेषरीत्या अधिकार प्रदान केलेल्या [१][अधीक्षकाने] ते केले असतील तर ते, कलम १७ च्या तरतुदींना अधीन असतील.

## प्रकरण पाच

## सार्वजनिक सुव्यवस्था व राज्याची सुरक्षितता राखण्यासाठी विशेष उपाययोजना

### एक. जादा पोलीस कामावर नेमणे, त्यांचा खर्च व दंग्यातील नुकसानभरपाई वसूल करणे-तिची आकारणी व वसुली

एखाद्या व्यक्तीने अर्ज केल्यावरुन जादा पोलीस कामावर नेमणे.

**४७.** (१) आयुक्तास किंवा [१][अधीक्षकास], कोणत्याही व्यक्तीने अर्ज केला असता, शांतता राखण्यासाठी, सुव्यवस्था ठेवण्यासाठी किंवा कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या किंवा प्रकारांच्या अपराधांच्या संबंधात या किंवा इतर कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणतीही तरतूद अमलात आणण्यासाठी किंवा आपल्या प्रभाराखाली असलेल्या कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी कोणतीही इतर पोलिसी कामे करण्यासाठी जादा पोलीस कामावर पाठविता येतील.

(२) असे जादा पोलीस, अर्ज करणा-या व्यक्तीच्या खर्चाने कामावर ठेवण्यात येतील, परंतु ते पोलीस प्राधिका-याच्या आदेशाच्या अधीन असतील आणि नेमणूक करणा-या प्राधिका-यास योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत त्यांना कामावर ठेवले जाईल.

(३) ज्या व्यक्तीच्या अर्जावरुन असे जादा पोलीस कामावर ठेवण्यात आले असतील त्या व्यक्तीने, ज्या नेमणूक प्राधिका-याकडे असे जादा पोलीस ठेवण्यासाठी अर्ज करण्यात आला होता त्या प्राधिका-याकडे, उक्त पोलीस काढून घेण्याबद्दल लेखी मागणी केली तर ती मागणी मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याहून जास्त नसेल इतकी यथास्थिति, राज्य शासन, किंवा नेमणूक करणारा प्राधिकारी निश्चित करील ती मुदत संपल्यानंतर त्या जादा पोलिसांच्या खर्चापासून ती व्यक्ती मुक्त होईल.

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "जिल्हा अधीक्षक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४ अन्वये "आयुक्ताने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

मोठ्या बांधकामांवर आणि कर्मचा-यांच्या वर्तणुकीबद्दल शंका वाटत असेल त्या बाबतीत जादा पोलीस कामावर नेमणे.

**४८.** (१) जेव्हा राज्य शासनाला किंवा सक्षम प्राधिका-याला,—

(क) चालू असलेले कोणतेही मोठे बांधकाम किंवा चालवण्यात येणारे कोणतेही सार्वजनिक मनोरंजन स्थान यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होण्याचा किंवा मोठ्या संख्येने लोक त्याकडे आकर्षिले जाण्याचा संभव आहे असे दिसून येईल, किंवा

(ख) कोणत्याही जागी बांधण्यात येत असलेल्या किंवा चालू असलेल्या कोणत्याही रेल्वेच्या, कालव्याच्या किंवा इतर सार्वजनिक बांधकामावर, किंवा कोणताही कारखाना किंवा अन्य व्यापारी संस्था यामध्ये किंवा त्यावर कामावर लावलेल्या इतर व्यक्तींच्या वर्तणुकीमुळे किंवा वर्तणुकीच्या वाजवी धास्तीमुळे त्या ठिकाणी जादा पोलीस ठेवणे आवश्यक आहे, असे दिसून येईल, तेव्हा, राज्य शासनास किंवा सक्षम प्राधिका-यास, त्यास योग्य वाटतील इतके जादा पोलीस उक्त ठिकाणी पाठविता येतील आणि ते पोलीस, जितके दिवस अशी आवश्यकता आहे असे त्यास दिसून येईल तितके दिवस, अशा ठिकाणी नेमता येतील.

(२) ते बांधकाम, मनोरंजन स्थान, कारखाना किंवा व्यापारी संस्था, जी व्यक्ती बांधीत असेल, आयोजित करीत असेल किंवा चालवित असेल तिच्या खर्चाने असे जादा पोलीस कामावर नेमण्यात येतील आणि ती व्यक्ती, यथास्थिति, राज्य शासन, किंवा, सक्षम प्राधिकारी वेळोवेळी फर्मावील त्या दरांनी त्याबद्दलचा खर्च देईल.

कलमे ४७ व ४८ या अन्वये कामावर नेमलेल्या जादा पोलिसांचा खर्च वसूल करणे.

**४९.** कलमे ४७ किंवा ४८ खाली कोणताही वाद उपस्थित झाल्यास, बृहन्मुंबईत मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी व जिल्ह्यात जिल्हा दंडाधिकारी यांचा, रक्कम किती द्यावयाची व कोणी द्यावयाची याबाबतचा निर्णय अंतिम असेल आणि याप्रमाणे निश्चित केलेली रक्कम ही, मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशावरुन, ती देण्यास जबाबदार असल्याचे आढळून आलेल्या व्यक्तीकडून येणे असलेली जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे जिल्हाधिकारी वसूल करील.

सार्वजनिक शांततेस विशेष धोका निर्माण झाला असता जादा पोलीस कामावर नेमणे.

**५०.** (१) जर राज्य शासनाच्या मते, कोणत्याही क्षेत्रात अशांततेची किंवा धोक्याची परिस्थिती असेल किंवा कोणत्याही क्षेत्रातील रहिवाश्यांच्या किंवा, त्यांच्यापैकी कोणत्याही विशिष्ट गटाच्या वर्तणुकीमुळे जादा पोलीस कामावर नेमणे इष्ट असेल तर त्यास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे,—

(क) ज्या क्षेत्रात जादा पोलीस कामावर नेमावयाचे ते क्षेत्र (यात यापुढे ज्यास " अशांत क्षेत्र " असे संबोधण्यात आले आहे),

(ख) ज्या कालावधीकरिता राज्य पोलीस कामावर नेमावयाचे असतील तो कालावधी,

विनिर्दिष्ट करता येईल :

परंतु, राज्य शासनाच्या मते जनतेच्या सर्वसाधारण हिताच्या दृष्टीने खंड (ख) अन्वये निश्चित केलेली मुदत वाढविणे आवश्यक असेल तर त्याला वेळोवेळी तसे करता येईल. जादा पोलिसांबाबतचा खर्च या कलमान्वये बसविलेला कर असेल आणि तो नंतरच्या पोट-कलमांमध्ये विहित केलेल्या रीतीने वसूल करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (क) व (ख) अन्वये राज्य शासनाने दिलेला निर्णय अंतिम असेल.

(३) अशी अधिसूचना काढण्यात आल्यावर राज्य शासनाला,—

(क) महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या कोणत्याही अशांत क्षेत्रात नगरपालिका आयुक्तास, जिल्हाधिका-यास किंवा कोणत्याही अन्य प्राधिका-यास,

(ख) नगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या कोणत्याही अशांत क्षेत्रात, नगरपालिकेस, जिल्हाधिका-यास किंवा कोणत्याही अन्य प्राधिका-यास,

(ग) खंड (क) व (ख) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्राबाहेरील कोणत्याही अशांत क्षेत्रात, जिल्हाधिका-यास किंवा कोणत्याही अन्य प्राधिका-यास,

अशा जादा पोलिसांचा खर्च अशांत असलेल्या क्षेत्राचे रहिवाशी असलेल्या सर्वसाधारणतः सर्व व्यक्तींकडून किंवा विशेषकरुन अशा व्यक्तींच्या कोणत्याही विशिष्ट गटाकडून किंवा गटांकडून किंवा वर्गाकडून किंवा वर्गांकडून आणि राज्य शासन निदेश देईल अशा प्रमाणात, एक तर पूर्णपणे किंवा अंशतः वसूल करण्यास फर्माविता येईल :

परंतु, जेव्हा महानगरपालिका आयुक्तास किंवा नगरपालिकेस असा खर्च वसूल करण्याचा निदेश देण्यात आला असेल त्या बाबतीत अशा खर्चाच्या जास्तीत जास्त तीन टक्क्यांइतकी जादा रक्कम देखील वसुली योग्य असेल.

(४) (एक) राज्य शासन, महानगरपालिका आयुक्तास किंवा नगरपालिकेस असा खर्च व जादा रक्कम ही सर्वसाधारण कर किंवा मालमत्ता कर यात वाढ करुन वसूल करण्यास फर्मावू शकेल आणि असा खर्च व जादा रक्कम सर्व नगरपालिका प्रभागांत किंवा राज्य शासन निदेश देईल अशा प्रभागांमध्ये, उप-प्रभागांमध्ये किंवा त्यांच्या पोट-विभागांमध्ये बसविण्यात व वसूल करण्यात येईल. सर्वसाधारण कर किंवा मालमत्ता कर यातील या पोट-कलमान्वये लादलेली प्रत्येक वाढ ही, ती भरण्यास जबाबदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून, तिच्याकडून येणे असलेला सर्वसाधारण कर किंवा मालमत्ता कर ज्या रीतीने वसूल केला जातो त्याच रीतीने महानगरपालिका आयुक्त किंवा नगरपालिका वसूल करील. संबंधित नगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अशा कोणत्याही वाढीस, जणू ती वाढ उक्त अधिनियमाखाली बसविलेल्या सर्वसाधारण कराचा किंवा मालमत्ता कराचा भाग असल्याप्रमाणे लागू असतील. अशी वाढ अशा नगरपालिका प्रभागांतील किंवा उप-प्रभागांतील किंवा त्यांच्या पोट-विभागांतील सर्वसाधारण कर किंवा मालमत्ता कर याबरोबरच अशा मालमत्तांवरील भार असेल.—

(दोन) तसेच, राज्य शासनाला असा खर्च व जादा रक्कम, पोट-कलम (३) अन्वये ती देण्यास जबाबदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून, राज्य शासन निदेश देईल अशा रीतीने वसूल करण्यास देखील महानगरपालिका आयुक्तास किंवा नगरपालिकेस फर्माविता येईल.

(तीन) महानगरपालिका आयुक्त किंवा नगरपालिका असा कोणताही कर बसविण्यात किंवा आकारण्यात किंवा अशी वसुली करण्यात कसूर करील त्याबाबतीत, राज्य शासनाला, असा कर बसविण्याचा आणि आकारण्याचा किंवा अशी वसुली करण्याचा निदेश जिल्हाधिका-यास देता येईल.

(५) जिल्हाधिका-याने किंवा इतर प्राधिका-याने या कलमान्वये वसूल करावयाची प्रत्येक रक्कम, जणू ती भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीकडून येणे असलेली जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

(६) अशा जादा पोलिसांच्या खर्चाचा कोणताही भाग सोसण्याच्या दायित्वापासून कोणत्याही व्यक्तीस राज्य शासनाने आदेशाद्वारे सूट देणे हे कायदेशीर असेल.

(७) हा अधिनियम अमलात येण्यापूर्वी किंवा अमलात आल्यानंतर महानगरपालिका आयुक्ताने किंवा नगरपालिकेने पोट-कलम (४) किंवा (५) अन्वये वसूल केलेल्या एकूण रकमेतून ही खर्चाची रक्कम राज्य शासनाला देण्यात येईल व कोणतीही शिल्लक असल्यास ती, संबंधित नगरपालिका अधिनियमान्वये स्थापन केलेल्या नगरपालिका निधीत जमा करण्यात येईल. खर्चाची अशी रक्कम प्रत्येक तिमाहीस राज्य शासनाला देण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**— या कलमातील " रहिवासी " ही संज्ञा जेव्हा कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात वापरली असेल तेव्हा तीत, ज्या व्यक्ती स्वतः किंवा आपल्या अभिकर्त्यामार्फत किंवा नोकरामार्फत अशा क्षेत्रात जमिनीचा किंवा इतर स्थावर मालमत्तेचा भोगवटा करीत असतील किंवा ती धारण करीत असतील अशा व्यक्तींचा आणि जे जमीन मालक स्वतः किंवा आपल्या अभिकर्त्यामार्फत किंवा नोकरांमार्फत, अशा क्षेत्रातील जमिनींच्या धारकांकडून किंवा भोगवटादारांकडून भाडे वसूल करीत असतील अशा जमीन मालकांचा, ते तेथे प्रत्यक्ष राहत नसले तरी, समावेश होतो.

**बेकायदेशीर जमावाने केलेल्या हानीबद्दल भरपाई, ती कशी वसूल करावी, दायित्वासाठी दिनांक निश्चित करणे.**

**५१.** (१) जेव्हा एखाद्या बेकायदेशीर जमावाने आपले समान उद्दिष्ट साधण्यासाठी केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे कोणत्याही मालमत्तेची हानी किंवा तिचे नुकसान झाले असेल, किंवा जेव्हा कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना मृत्यू आला असेल किंवा जबर दुखापत झाली असेल, तेव्हा, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे,—

(क) ज्या क्षेत्रात त्याच्या मते असा बेकायदेशीर जमाव जमला होता ते क्षेत्र (यात यापुढे ज्यास " अशांत क्षेत्र " असे संबोधण्यात आले) ;

(ख) असा बेकायदेशीर जमाव ज्या दिनांकास किंवा ज्या कालावधीत जमला असेल तो दिनांक किंवा तो कालावधी, विनिर्दिष्ट करता येईल.

(२) पोट-कलम (१), च्या खंड (क) व (ख) खालील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढण्यात आल्यानंतर, बृहन्मुंबई मध्ये मुख्य इलाखा शहर दंडाधिका-यास, व जिल्ह्यात जिल्हा दंडाधिका-यास [१][ महसूल आयुक्ताच्या पूर्वमंजुरीने ] त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, उपरोक्त हानीच्या किंवा नुकसानीच्या किंवा मृत्यूच्या किंवा जबर दुखापतीच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना भरपाई म्हणून जी रक्कम देण्यात यावी असे त्याचे मत असेल ती रक्कम निर्धारित करता येईल. भरपाईची रक्कम ही या कलमान्वये बसविलेला कर असेल आणि ती यानंतरच्या पोट-कलमांमध्ये विहित केलेल्या रीतीने वसूल करण्यात येईल.

(४) मुख्य इलाखा शहर दंडाधिका-याला, किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिका-याला,—

(क) महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या कोणत्याही अशांत क्षेत्रात महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी किंवा कोणताही अन्य प्राधिकारी यास,

(ख) नगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या कोणत्याही अशांत क्षेत्रात नगरपालिका, जिल्हाधिकारी किंवा कोणताही अन्य प्राधिकारी यास, आणि

(ग) खंड (क) व (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्राबाहेर असलेल्या कोणत्याही अशांत क्षेत्रात जिल्हाधिकारी किंवा कोणताही अन्य प्राधिकारी यास,

पोट-कलम (३) अन्वये निर्धारित केलेली रक्कम (यात यापुढे जिला " नुकसानभरपाईची रक्कम " असे संबोधण्यात आले आहे) संपूर्णपणे किंवा अंशतः वसूल करण्यास फर्मांविता येईल आणि महानगरपालिका आयुक्ताला किंवा नगरपालिकेला अशी रक्कम वसूल करण्यास फर्माविण्यात आले असेल त्याबाबतीत, सर्वसाधारणपणे अशांत क्षेत्रातील रहिवासी असलेल्या सर्व व्यक्तींकडून किंवा विशेषकरून उक्त क्षेत्रातील अशा व्यक्तींच्या कोणत्याही विशिष्ट गटाकडून किंवा गटांकडून, किंवा वर्गाकडून किंवा वर्गांकडून अशा भरपाईच्या रकमेच्या जास्तीत जास्त तीन टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी जादा रक्कम (यात यापुढे जिचा निर्देश "नगरपालिका वसुली खर्च " असा करण्यात आला आहे) मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी निदेश देईल अशा प्रमाणात वसूल करण्यास फर्माविता येईल.

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(५) (एक) यथास्थिति, मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा, जिल्हा दंडाधिकारी याला संबंधित महानगरपालिका आयुक्तास किंवा नगरपालिकेस भरपाई रक्कम व नगरपालिका वसुली खर्च, सर्वसाधारण कर किंवा मालमत्ता कर यात वाढ करून वसूल करण्यास फर्माविता येईल आणि तो अशांत क्षेत्रात बसविण्यात व वसूल करण्यात येईल. सर्वसाधारण कर किंवा मालमत्ता कर यात या पोट-कलमान्वये बसविलेली प्रत्येक वाढ ही, ती भरण्यास जबाबदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून, तिच्याकडून येणे असलेला सर्वसाधारण कर किंवा मालमत्ता कर ज्या रीतीने वसूल केला जातो त्याच रीतीने संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा नगरपालिका वसूल करील. संबंधित नगरपालिका अधिनियमाच्या तरतूदी अशा कोणत्याही वाढीस, जणू ती, उक्त नगरपालिका अधिनियमान्वये बसविलेल्या सर्वसाधारण करांचा किंवा मालमत्ता कराचा भाग असल्याप्रमाणे लागू होतील. अशी वाढ ही सर्वसाधारण कर किंवा मालमत्ता कर याबरोबरच, उपरोक्त क्षेत्रातील मालमत्ता भार असेल.

(दोन) मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी, किंवा यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी यास, संबंधित महानगरपालिका आयुक्तास किंवा नगरपालिकेस नुकसानभरपाईची रक्कम व नगरपालिका वसुली खर्च, पोट-कलम (४) अन्वये तो भरण्यास जबाबदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून, तो निदेश देईल त्या रीतीने वसूल करण्यास फर्माविता येईल.

(६) महानगरपालिका आयुक्त किंवा नगरपालिका असा कोणताही कर बसविण्यात किंवा आकारण्यात किंवा अशा रीतीने कोणतीही वसुली करण्यात कसूर करील त्याबाबतीत राज्य शासनाला, असा कर बसविण्याचा आणि आकारण्याचा किंवा अशी वसुली करण्याचा जिल्हाधिका-यास निदेश देता येईल.

(७) या कलमान्वये जिल्हाधिकारी किंवा अन्य प्राधिकारी यांनी वसूल करण्याजोगी प्रत्येक रक्कम ही जणू ती भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीकडून येणे असलेल्या जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

(८) हा अधिनियम अमलात येण्यापूर्वी किंवा अमलात आल्यानंतर पोट-कलम (५) किंवा (७) अन्वये महानगरपालिका आयुक्ताने किंवा नगरपालिकेने वसूल केलेल्या एकूण रकमेतून, नगरपालिका वसुली खर्चाची प्रमाणशीर रक्कम वजा करण्यात येईल आणि मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी, किंवा यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी याने पोट-कलम (३) अन्वये ठरविलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम, ती मिळविण्याचा हक्क असलेल्या व्यक्तींना नुकसानभरपाई देण्याकरिता त्याला देण्यात येईल आणि कोणतीही शिल्लक राहिल्यास ती, संबंधित नगरपालिका अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या नगरपालिका निधीत जमा करण्यात येईल. अशी रक्कम मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी यांना प्रत्येक तीन महिन्यांनी देण्यात येईल.

(९) अशा नुकसानभरपाईच्या रकमेचा कोणताही भाग देण्याच्या दायित्वापासून कोणत्याही व्यक्तीस मुख्य इलाखा शहर दंडाधिका-याने, किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिका-याने आदेशाद्वारे सूट देणे कायदेशीर असेल.

(१०) राज्य शासनाला— (क) स्वतः होऊन, किंवा (ख) यथास्थिति, मुख्य इलाखा शहर दंडाधिका-याच्या किंवा जिल्हा दंडाधिका-याच्या सूट देणा-या किंवा ती नाकारणा-या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत एखाद्या व्यक्तीने अर्ज केल्यावरून— असा आदेश रद्द करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल.

**स्पष्टीकरण**.— या कलमातील " रहिवासी " ही संज्ञा, जेव्हा कोणत्याही अशांत क्षेत्राच्या संबंधात वापरली असेल तेव्हा, त्या संज्ञेत ज्या व्यक्ती स्वतः किंवा त्यांच्या अभिकर्त्यामार्फत किंवा नोकरांमार्फत अशा क्षेत्रांत जमिनीचा किंवा इतर स्थावर मालमत्तेचा भोगवटा करीत असतील किंवा ती धारण करीत असतील अशा व्यक्तींचा आणि जे जमीन मालक स्वतः किंवा त्यांच्या अभिकर्त्यामार्फत किंवा नोकरामार्फत अशा प्रदेशातील जमीनधारकांकडून किंवा भोगवटादारांकडून भाडे वसूल करीत असतील अशा जमीन मालकांचा, ते तेथे प्रत्यक्ष राहत नसले तरी, समावेश होतो.

मुख्य इलाखा शहर दंडाधिका-याने किंवा जिल्हा दंडाधिका-याने नुकसान भरपाई देणे किंवा तिची प्रमाणशीर विभागणी करणे.

५२. (१) मुख्य इलाखा शहर दंडाधिका-याने किंवा यथास्थिति, जिल्हा दंडाधिका-याने [1][ महसूल आयुक्ताच्या पूर्व मंजुरीने ], कलम ५१ याच्या पोट-कलमे (३) ते (८) याअन्वये नुकसानभरपाई दाखल वसूल केलेल्या सर्व किंवा कोणत्याही रकमा उपरोक्त हानी किंवा नुकसान किंवा मृत्यू किंवा जबर दुखापत याच्या संबंधात ज्या व्यक्तींना नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क आहे असे त्यास वाटत असेल, अशा सर्व किंवा कोणत्याही व्यक्तींना देणे किंवा त्यांच्यात त्या रकमेची प्रमाणशीर विभागणी करणे, हे कायदेशीर असेल.

(२) कलम ५१ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने काढलेल्या अधिसूचनेच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत हक्क-मागणी करण्यात आल्याशिवाय आणि नुकसानभरपाईची हक्क-मागणी करणारी व्यक्ती किंवा अशी हक्क-मागणी कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूसंबंधात करण्यात आली असेल त्याबाबतीत ती व्यक्ती देखील स्वतः उपरोक्त हानी, नुकसान, मृत्यू किंवा जबर दुखापत ज्या गोष्टीमुळे घडली त्या गोष्टींच्या संबंधात निर्दोष आहे अशी, मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी यांची खात्री झाल्याशिवाय, या कलमान्वये कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

(३) मृत्यूच्या किंवा जबर दुखापतीच्या संबंधात कलम ५१ अन्वये कोणत्याही व्यक्तीस देय असलेली नुकसानभरपाईची रक्कम अभिहस्तांकित करण्याजोगी असणार नाही किंवा तिच्यावर भार निर्माण करता येण्याजोगी असणार नाही किंवा ती जप्ती आणण्यायोग्य किंवा कायद्यान्वये ती मिळण्याचा जिला हक्क असेल अशा व्यक्तीव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस दिली जाण्यायोग्य असणार नाही, तसेच, तिच्यातून कोणत्याही हक्क-मागणीच्या रकमेची वजावट करण्यात येणार नाही.

(४) मुख्य इलाखा शहर दंडाधिका-याने किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिका-याने या किंवा पूर्ववर्ती कलमान्वये दिलेला प्रत्येक निदेश किंवा आदेश हा राज्य शासनाकडून पुनरीक्षणास योग्य असेल, परंतु उपरोक्त प्रमाणे असेल त्याव्यतिरिक्त, तो अंतिम असेल.

(५) या कलमान्वये नुकसानभरपाई देण्यात आलेली कोणतीही हानी किंवा क्षती याच्या संबंधात कोणताही दिवाणी दावा चालविणे योग्य असणार नाही.

मुख्य इलाखा शहर दंडाधिका-याने किंवा जिल्हा दंडाधिका-याने राज्य शासनाच्या आदेशानुसार कामे पार पाडणे.

५३. मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी कलमे ५१ व ५२ खालील त्याची कामे, राज्य शासनाने, त्याबाबतीत दिलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांना अधीन राहून पार पाडील.

---

[1] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४५ठा९७ । ३१.८ ।

१९४७ चा मुंबई ५७. **५४.** (१) मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ [१][किंवा [२][ महाराष्ट्र राज्याच्या ] कोणत्याही क्षेत्रात अमलात असलेला कोणताही तत्सम कायदा ] यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ५० किंवा ५१ च्या तरतुदीखाली, यथास्थिति, महानगरपालिका आयुक्ताला, नगरपालिकेला किंवा जिल्हाधिका-याला जेव्हा कलम ५० पोट-कलम (३) मध्ये निर्देश केलेली जादा रक्कम (यात यापुढे ज्यास "जादा खर्च" असे संबोधण्यात आले आहे) धरून किंवा नुकसानभरपाईची रक्कम व नगरपालिकेचा वसुली खर्च (यात यापुढे ज्यास "दंग्यांबाबत कर" असे संबोधण्यात आले आहे.) धरून जादा पोलिसांचा खर्च सर्वसाधारण करात किंवा मालमत्ता करात वाढ करून वसूल करावा लागेल तेव्हा, ज्याच्याकडून कोणत्याही जागेच्या संबंधात जादा खर्च किंवा दंग्याबाबतचा कर यांचा कोणताही भाग वसूल करण्यात आला असेल अशा त्या जागेच्या मालकास, अशा भागापैकी ७५ टक्के रक्कम, कलम ५० च्या पोट-कलम (१) अन्वये दर्शविलेल्या कालावधीत किंवा यथास्थिति, कलम ५१, पोट-कलम (१), खंड (ख) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत ब-याच काळापर्यन्त त्या जागेचा भोगवटा करीत असलेल्या भाडेक-यांकडून पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने वसूल करण्याचा हक्क असेल.

जादा पोलिसांच्या खर्चाची व बेकायदेशीर जमावाने केलेल्या हानीच्या भरपाईची प्रमाणशीर वसुली करणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेली रक्कम व त्यात निर्देश केलेल्या भाडेक-यांकडून वसूल करावयाची रक्कम यांचे प्रमाण हे, त्यांच्या भोगवट्यात असलेल्या जागेच्या संबंधात त्याने भरावयाच्या भाड्याचे, अशी संपूर्ण जागा भाड्याने दिल्यास भाड्याच्या एकूण रकमेशी जे प्रमाण असेल तेवढेच असेल आणि ती रक्कम कमीत कमी चार समान हप्त्यांमध्ये भाडेकरांकडून वसुलीयोग्य असेल.

(३) पोट-कलम (१) च्या तरतुदी, भाडेक-यांकडून दंग्याबाबत कराची रक्कम वसूल करण्याशी त्यांचा १९४७ चा मुंबई ५७. जेथवर संबंध असेल तेथवर, मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याचे कलम १०-ख हे बृहन्मुंबईत जेवढ्या मुदतीत अमलात असेल तेवढ्या मुदतीत उक्त क्षेत्रात लागू असणार नाही.

### दोन. टोळ्यांना पांगवणे व विवक्षित अपराधांबद्दल दोषी ठरलेल्या व्यक्तींना [३][ व विवक्षित भिका-यांना ] घालवून देणे

**५५.** जेव्हा कलम ७ अन्वये बृहन्मुंबईसाठी व इतर क्षेत्रासाठी आयुक्ताची नेमणूक करण्यात आली असेल तेव्हा, बृहन्मुंबईत व अशा इतर क्षेत्रात आयुक्तास आणि त्याबाबत राज्य शासनाकडून [४][ * * * ] *अधिकार देण्यात आलेला जिल्हा दंडाधिकारी, उप-विभागीय दंडाधिकारी किंवा [५] [ अधीक्षक ] यास जिल्ह्यात, व्यक्तींच्या कोणत्याही टोळीच्या अगर गटाच्या आपल्या प्रभारातील क्षेत्रामधील हालचालीमुळे किंवा ते तळ ठोकून राहिल्यामुळे तेथे धोका उत्पन्न झाला आहे किंवा संभवनीय आहे किंवा त्या टोळीचा किंवा गटाचा किंवा गटातील व्यक्तींचा बेकायदेशीर रीतीने वागण्याचा हेतू असल्याबद्दल भय किंवा वाजवी संशय उत्पन्न झाला आहे किंवा होण्याचा संभव आहे, असे दिसून येईल तेव्हा, त्या टोळीतील किंवा गटातील

व्यक्तींच्या टोळ्या व गट पांगवणे.

---

[१]. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १८ अन्वये, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२]. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० या अन्वये "मुंबई राज्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४, अनुसूची अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४]. सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३, द्वारे "विशेषरीत्या" हा मजकूर वगळण्यात आला. व तो नेहमीकरीता वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

* सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ द्वारे वगळलेला "विशेषरीत्या" हा शब्द असताना काढलेल्या सर्व अधिसूचना, आदेश इ. "विशेषरीत्या" या शब्दांच्या सुधारणेनंतरही अमलात राहातील मात्र त्यातला "विशेषरीत्या" हा शब्द वगळण्यात येईल.

[५]. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "जिल्हा" अधीक्षक या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

व्यक्तींनी हिंसा व भय यांस प्रतिबंध होण्याच्या दृष्टीने आवश्यक असेल तसे वागण्याबद्दल किंवा त्या टोळीची किंवा त्या गटाची पांगापांग करून त्यातील प्रत्येक व्यक्तीने अशा अधिका-यांच्या अधिकारितेतील स्थानिक हद्दीच्या क्षेत्राबाहेर [1] [ किंवा त्याच्या लगत असलेल्या अशा क्षेत्राबाहेर आणि कोणत्याही जिल्ह्याबाहेर किंवा जिल्ह्यांबाहेर किंवा त्याच्या कोणत्याही भागाबाहेर ] निघून जाण्याबद्दल किंवा, तो विहित करील अशा वेळात निघून जाण्याबद्दल व त्या प्रत्येकास, ज्या क्षेत्राच्या किंवा जागेच्या बाहेर निघून जाण्याचा निदेश देण्यात आला असेल त्या क्षेत्रात [2] [ किंवा, यथास्थिति, त्यालगत असलेले कोणतेही क्षेत्र किंवा जिल्हा किंवा जिल्हे किंवा त्यांचा कोणताही भाग ] यांत पुन्हा प्रवेश न करण्याबद्दल किंवा त्या त्या जागेत पुन्हा न परतण्याबद्दल अशा टोळीचे किंवा गटाचे म्होरके किंवा प्रमुख आहेत असे वाटत असतील त्यांना संबोधून अधिसूचना काढून व ती अधिसूचना दवंडी पिटवून, किंवा त्यास योग्य वाटेल त्या इतर रीतीने प्रसिद्ध करून, आदेश देता येईल.

अपराध करण्याच्या बेतात असलेल्या व्यक्तींना घालवून देणे.

**५६.** [3] [ (१) ] जेव्हा कलम ७ अन्वये बृहन्मुंबईसाठी व इतर क्षेत्रांसाठी आयुक्त नेमलेला असेल तेव्हा बृहन्मुंबईत व अशा इतर क्षेत्रात आयुक्तास आणि राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या कलमाच्या तरतुदी ज्या क्षेत्राला किंवा क्षेत्रांना लागू करील अशा इतर क्षेत्रात किंवा क्षेत्रांत जिल्हा दंडाधिका-यास किंवा त्याबाबत राज्य शासनाने [4] [ * * * * ] अधिकार दिलेल्या उप-विभागीय दंडाधिका-यास जेव्हा असे आढळून येईल की, (क) कोणत्याही व्यक्तीच्या हालचाली किंवा कृत्ये ही, व्यक्तीस किंवा मालमत्तेस भय, धोका किंवा अपाय निर्माण करतील किंवा त्यापासून भय, धोका किंवा अपाय निर्माण होण्याचा धोका संभव आहे, किंवा (ख) अशी व्यक्ती बळाचा किंवा हिंसेचा वापर करण्याचा ज्यात अंतर्भाव होईल असा अपराध किंवा भारतीय दंड संहितेतील प्रकरण बारा, सोळा किंवा सतरा या अन्वये शिक्षेस पात्र असा अपराध करीत आहे किंवा करण्याच्या बेतात आहे किंवा कोणताही असा अपराध करण्यास अपप्रेरणा देत आहे, किंवा देण्याच्या बेतात आहे, आणि अशा अधिका-याच्या मते साक्षीदार त्यांच्या स्वतःच्या किंवा मालमत्तेच्या सुरक्षिततेस धोका पोचण्याच्या भीतीमुळे जाहीररीत्या अशा व्यक्तीविरुद्ध साक्ष देण्याकरिता पुढे येण्यास तयार नाहीत, किंवा [5] [ (खख) ] ती व्यक्ती, (१) महाराष्ट्र जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्यांबाबत अधिनियम, १९८० यामध्ये व्याख्या करण्यात आली असेल अशा, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यास बाध आणणा-या कोणत्याही रीतीने, किंवा (२) काळ्या बाजारास प्रतिबंध आणि जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याची व्यवस्था अधिनियम, १९८० चे कलम ३, पोट-कलम (१) च्या स्पष्टीकरणामध्ये व्याख्या करण्यात आली असेल अशा, समाजासाठी जीवनावश्यक असणा-या वस्तूंच्या पुरवठ्याच्या व्यवस्थेस बाध आणणा-या कोणत्याही रीतीने कृत्य करीत आहे किंवा तसे कृत्य करण्याच्या बेतात आहे, असे मानण्यास वाजवी कारणे असतील, किंवा (ग) बाहेरुन आलेल्या व्यक्तीच्या सततच्या वास्तव्यामुळे साथीचा रोग उद्‌भवण्याचा संभव असेल तेव्हा, उक्त अधिका-यास तिच्यावर योग्य रीतीने लेखी आदेश बजावून किंवा दवंडी पिटवून किंवा त्याला योग्य वाटेल

१८६० चा ४५.

१९८१ चा महा. ७.

१९८० चा ७.

---

[1]. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2]. वरील अधिनियमाच्या कलम ३ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3]. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम २ (१) अन्वये कलम ५६ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला.

[4]. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ अन्वये, " विशेषरीत्या " हा शब्द वगळण्यात आला व तो नेहमीकरिता वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[5]. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम १७ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

त्या इतर रीतीने, अशा व्यक्तीस किंवा बाहेरुन आलेल्या व्यक्तीस, हिंसा व भय [१] [किंवा असे बाधक कृत्य] यास प्रतिबंध व्हावा म्हणून किंवा अशा रोगाचा प्रादुर्भाव किंवा फैलाव होऊ नये म्हणून आवश्यक असेल तसे वागण्याबद्दल किंवा [२] [या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी, उक्त अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा, महाराष्ट्र राज्यातील, एका किंवा अधिक क्षेत्रांमधून (मग ती क्षेत्रे त्या अधिका-याच्या स्थानिक अधिकारितेतील असोत किंवा नसोत आणि ती लगतची असोत किंवा नसोत) आणि अशा मार्गाने आणि अशा वेळेच्या आत निघून जाण्याबद्दल निदेश देता येईल आणि त्याला जेथून निघून जाण्याबद्दल निदेश देण्यात आला असेल अशा विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये (यात यापुढे ज्याचा निर्देश " विनिर्दिष्ट क्षेत्र किंवा क्षेत्रे " असा केला आहे ) पुन्हा प्रवेश न करण्याबद्दल किंवा न परतण्याबद्दल निदेश देता येईल.]

[३] [(२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्तीला राज्यातील कोणत्याही एका किंवा अधिक विनिर्दिष्ट क्षेत्रांमधून निघून जाण्याचा निदेश देणा-या अधिका-यास, अशा व्यक्तीला आणखी असा निदेश देता येईल की, तिच्याविरुद्धचा आदेश अंमलात असेतोपर्यंत, जेव्हा ती राज्यातील इतर कोणत्याही क्षेत्रात राहील तेव्हा, ती तिच्या पत्त्यामध्ये कोणताही बदल झालेला नसला तरी प्रत्येक महिन्यात एकदा सर्वांत जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-यास आपले राहण्याचे ठिकाण कळवील. उक्त अधिका-यास असाही निदेश देता येईल की, अशा कालावधीत ती व्यक्ती राज्यातून बाहेर जाईल तेव्हा ती राज्याबाहेर गेल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत आपल्या जाण्याचा दिनांक डाकेने किंवा अन्य प्रकारे, उक्त अधिका-याला लेखी कळवील आणि ती जेव्हा राज्यामध्ये परत आली असेल व येईल तेव्हा, ती राज्यात आल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत, ती जेथे राहत असेल त्या ठिकाणच्या सर्वांत जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-याला आपल्या येण्याचा दिनांक कळवील.]

[४] [ ५७. [४] [(१)] जर एखाद्या व्यक्तीला,— विवक्षित अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या व्यक्तींना घालवून देणे.

१८६० चा ४५. (क) (एक) भारतीय दंड संहिता यातील प्रकरण बारा, सोळा किंवा सतरा खालील अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल ; किंवा

१९४९ चा मुंबई २५. (दोन) मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ याच्या कलम ६५, ६६-क किंवा ६८ याखालील कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल ; किंवा

१९५६ चा १०४. (तीन) स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यापारास आळा घालण्याबाबत अधिनियम, १९५६ याच्या कलम ३, ४, ५, ६ किंवा ९ याखालील अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल ; किंवा

१९६२ चा ५२. (चार) सीमा शुल्क अधिनियम, १९६२ याच्या कलम १३५ खालील अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल ; किंवा

१८८७ चा मुंबई चार. (पाच) मुंबईचा जुगार खेळण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८८७, याच्या कलम ४ खालील अपराधाबद्दल किंवा कलम १२ च्या खंड (क) अन्वये कोणत्याही सार्वजनिक रस्त्यांत किंवा रहदारीच्या मार्गात किंवा जेथे लोकांना प्रवेश असेल किंवा प्रवेश करण्याची परवानगी असेल अशा कोणत्याही ठिकाणी किंवा कोणत्याही रेसकोर्सवर पैज स्वीकारण्याबद्दल किंवा कलम १२-क अन्वये दोषी ठरविण्यात आले असेल ; किंवा

---

१. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम १७ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम २(१) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

३. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम २(२) अन्वये पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

४. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २ अन्वये कलम ५७ बदली दाखल करण्यात आले आणि सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ३ (१) अन्वये त्याला पोट-कलम (१) असा फेर क्रमांक देण्यात आला.

(ख) मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ याखालील परंतु क कलम ६५, ६६-क किंवा ६८ खालील दोषी नसतील अशा अपराधाबद्दल दोनदा किंवा अधिक वेळा दोषी ठरविण्यात आले असेल ; किंवा १९४९ चा मुंबई २५.

[1][ (खक) रेल्वे मालमत्ता (बेकायदेशीररीत्या ताब्यात ठेवणे) अधिनियम, १९६६ याच्या कलम ३ किंवा ४ खालील अपराधाबद्दल दोनदा किंवा अधिक वेळा दोषी ठरविण्यात आले असेल ; किंवा ] १९६६ चा २९.

(ग) या अधिनियमाच्या कलम १२२ किंवा १२४ खालील अपराधाबद्दल तीनदा किंवा अधिक वेळा दोषी ठरविण्यात आले असेल ;

तर आयुक्तास, जिल्हा दंडाधिका-यास, किंवा याबाबतीत राज्य शासनाने [2][ * * * ] अधिकार प्रदान केलेल्या उप-विभागीय दंडाधिका-यास, अशा व्यक्तीला ज्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले होते त्या अपराधासारखा अपराध ती पुन्हा करण्याचा संभव आहे असे सकारण वाटत असेल तर त्यास [3][ या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी उक्त अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा, महाराष्ट्र राज्यातील क्षेत्रातून किंवा क्षेत्रांमधून (मग ती क्षेत्रे त्या अधिका-याच्या स्थानिक अधिकारितेतील असोत किंवा नसोत आणि ती लगतची असोत किंवा नसोत) आणि अशा मार्गाने आणि अशा वेळेच्या आत, निघून जाण्याबद्दल निदेश देता येईल आणि त्याला जेथून निघून जाण्याबद्दल निदेश देण्यात आला असेल अशा विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये (यात यापुढे ज्याचा निर्देश " विनिर्दिष्ट क्षेत्र किंवा क्षेत्रे " असा केला आहे.) पुन्हा प्रवेश न करण्याबद्दल किंवा न परतण्याबद्दल त्याला निदेश देता येईल.]

[4] [(२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही राज्यातील कोणत्याही एका किंवा अधिक विनिर्दिष्ट क्षेत्रांमधून निघून जाण्याचा निदेश देणा-या अधिका-यास, अशा व्यक्तीला आणखी असा निदेश देता येईल की, तिच्या विरुध्दचा आदेश अंमलात असेतोपर्यंत, जेव्हा ती राज्यातील इतर कोणत्याही क्षेत्रात राहील तेव्हा, ती, तिच्या पत्यामध्ये कोणताही बदल झालेला नसला तरी सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-यास दर महिन्यात एकदा आपले राहण्याचे ठिकाण कळवील. उक्त अधिका-यास असा देखील निदेश देता येईल की, अशा कालावधीत, ती व्यक्ती राज्यातून बाहेर जाईल तेव्हा राज्याबाहेर गेल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत आपल्या जाण्याचा दिनांक डाकेने किंवा अन्य प्रकारे, उक्त अधिका-याला लेखी कळवील आणि ती जेव्हा राज्यामध्ये परत आली असेल व येईल तेव्हा, ती राज्यात आल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत, ती जेथे राहत असेल त्या ठिकाणच्या सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-याला आपल्या येण्याचा दिनांक कळवील.]

---

[1]. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ३ (१) (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2]. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याद्वारे " विशेषरीत्या " हा शब्द वगळण्यात आला व तो नेहमीकरिता वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[3]. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ३ (१) (ब) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[4]. वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

**स्पष्टीकरण.**—— या कलमाच्या प्रयोजनाकरिता " एखाद्या व्यक्तीस ज्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले होते त्या अपराधासारखा अपराध " याचा अर्थ,—

१८६० चा ४५. (एक) खंड (क) (एक) मध्ये नमूद केलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, भारतीय दंड संहितेच्या कोणत्याही प्रकरणाखाली येणारा अपराध, असा आहे, आणि

(दोन) खंड (क) [ त्याच्या उप-खंड (एक) व्यतिरिक्त ], (ख) आणि (ग) मध्ये नमूद केलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, त्या त्या उक्त खंडांमध्ये नमूद केलेल्या अधिनियमाच्या तरतुदीखाली येणारा अपराध, असा आहे. ]

१९६० चा मुंबई ४०. [1] [**५७-क.** मुंबईचा भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९५९ जेथे अंमलात असेल अशा कोणत्याही क्षेत्रामध्ये त्या क्षेत्रावर अधिकारिता असलेला आयुक्त किंवा जिल्हा दंडाधिकारी त्या अधिनियमाचे कलम ५, पोट-कलम (५), खंड (ख) अन्वये न्यायालयाने काढलेल्या आदेशाची प्रत मिळाल्यानंतर, ज्या व्यक्तीस त्याच्यासमोर हजर राहण्याबाबतचे निदेश देण्यात आले आहेत अशा व्यक्तीची तपासणी करील आणि जर अशी व्यक्ती उक्त क्षेत्रामध्ये कोणत्याही कायदेशीर व्यवसायात, व्यापारात, आजीविकेत किंवा नोकरीत स्वतःला गुंतवून घेण्याची शक्यता नाही याबाबत आयुक्ताची किंवा जिल्हा दंडाधिका-याची खात्री झाली तर, अशा अधिका-यास, अशा व्यक्तीवर योग्य रीतीने बजावलेल्या लेखी आदेशाद्वारे अशा व्यक्तीला, उक्त अधिनियम जेथे अंमलात आहे अशा क्षेत्रामधून किंवा क्षेत्रांमधून आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आला असेल अशा कालावधीत स्वतः बाहेर निघून जाण्याबद्दल आणि जेथून तिला स्वतः बाहेर निघून जाण्याबाबतचे निदेश दिले असतील त्या क्षेत्रामध्ये, किंवा यथास्थिति, क्षेत्रांमध्ये प्रवेश न करण्याचे किंवा, न परतण्याचे निदेश देता येतील : भिकारी म्हणून घोषित केलेल्या विवक्षित व्यक्तींना घालवून देणे.

परंतु, असा आदेश कोणत्याही व्यक्तीवर बजावण्यापूर्वी, आयुक्त किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी, राज्य शासनाशी विचारविनिमय करून किंवा राज्य शासनाने या प्रयोजनासाठी काढलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशानुसार, त्याबाबतीत त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर, कोणत्याही उपक्रमात, सार्वजनिक बांधकामावर किंवा अन्यथा, नोकरी स्वीकारण्याचा विकल्प अशा व्यक्तीस देऊ करील. असा विकल्प स्वीकारण्यात आला असेल त्याबाबतीत अशा स्वीकृतीची हद्दपारीच्या आदेशात नोंद करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, अशी व्यक्ती कोणत्याही कामास अयोग्य आहे, अशी आयुक्ताची किंवा जिल्हा दंडाधिका-याची खात्री झाली असेल त्याबाबतीत तो, अशा व्यक्तीचे प्रकरण, मुंबईचा भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९५९ याच्या कलम ५, पोट-कलम (५) च्या खंड (ग) मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे त्या व्यक्तीस एखाद्या प्रमाणित संस्थेमध्ये अटकावून ठेवण्याचा आदेश न्यायालयाने द्यावा, या विनंतीसह न्यायालयाकडे निर्णयार्थ पाठवील. ]

---

[1]. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ३, अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

कलमे ५५, [3][ ५६, ५७ व ५७-क ] याअन्वये दिलेले आदेश अमलात असण्याची मुदत.

५८. कोणत्याही विशिष्ट क्षेत्रात, [1][ किंवा, यथास्थिति, त्या लगत असलेल्या अशा क्षेत्रात [2][ किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये ] किंवा कोणताही जिल्हा किंवा जिल्हे यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात ] प्रवेश न करण्याबद्दल कलम ५५, [3][ ५६, ५७ किंवा ५७-क ] या अन्वये दिलेला निदेश, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीपुरता असेल आणि कोणत्याही बाबतीत अशी मुदत [4][ ती व्यक्ती ज्या दिनांकास त्या क्षेत्रामधून, त्या जिल्ह्यातून किंवा जिल्ह्यांतून किंवा उपरोक्त भागातून, [5][ किंवा, यथास्थिति, विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रांमधून ] स्वतः निघून गेली असेल किंवा तिला घालवून देण्यात आले असेल त्या दिनांकापासून ] दोन वर्षाच्या मुदतीपेक्षा अधिक असणार नाही.

१९६० चा मुंबई ४०.

कलमे ५५, [3][ ५६, ५७ किंवा ५७-क ] या अन्वये आदेश देण्यापूर्वी बाजू मांडण्याची संधी देणे.

५९. (१) कलम ५५, [3][ ५६, ५७ किंवा ५७-क ] याअन्वये कोणत्याही व्यक्तींविरुध्द आदेश देण्यापूर्वी उक्त कलमांपैकी कोणत्याही कलमान्वये काम करणारा अधिकारी किंवा त्या अधिका-याने प्राधिकार दिलेला निरीक्षकापेक्षा वरच्या दर्जाचा कोणताही अधिकारी तिच्याविरुध्द करण्यात आलेल्या महत्वाच्या आरोपांचे सर्वसाधारण स्वरुप त्या व्यक्तीस लेखी कळवील व त्यांविषयी स्पष्टीकरण करण्याची वाजवी संधी तिला देईल. जर अशी व्यक्ती तिने हजर केलेल्या कोणत्याही साक्षीदाराची तपासणी करण्याविषयी अर्ज करील तर संबंधित प्राधिकारी किंवा अधिकारी कारणे लेखी नमूद करून, असा अर्ज त्रास देण्याच्या किंवा विलंब लावण्याच्या कारणासाठी केलेला आहे असे त्याचे मत असेल त्याव्यतिरिक्त, असा अर्ज मंजूर करील व अशा साक्षीदाराची तपासणी करील. अशा व्यक्तीने सादर केलेले कोणतेही लेखी निवेदन त्या प्रकरणाच्या कागदपत्रांना जोडील. अशा व्यक्तीस, आपले स्पष्टीकरण देण्यासाठी किंवा तिने हजर केलेल्या साक्षीदारांची तपासणी करविण्यासाठी, अधिवक्त्यामार्फत किंवा न्याय प्रतिनिधीमार्फत या कलमान्वये काम चालविणा-या अधिका-यासमोर हजर राहण्याचा हक्क राहील.

(२) पोट-कलम (१) अन्वये कार्यवाही करणा-या प्राधिका-यास किंवा अधिका-यास जिच्याविरुध्द कलम ५५, [3][ ५६, ५७ किंवा ५७-क ] अन्वये कोणताही आदेश काढण्याचे प्रस्तावित केले असेल अशी कोणतीही व्यक्ती हजर राहील अशी व्यवस्था करण्यासाठी, अशा व्यक्तीस हजर राहण्यास व चौकशीच्या वेळी जामीनदारांसह किंवा जामीनदारांशिवाय प्रतिभूति बंधपत्र करून देण्यास फर्मावता येईल. जर ती व्यक्ती असे प्रतिभूति बंधपत्र करून देण्यात कसूर करील किंवा चौकशीच्या वेळी अधिका-यासमोर किंवा प्राधिका-यासमोर हजर राहण्यात कसूर करील तर ; त्या अधिका-याने किंवा प्राधिका-याने चौकशीचे काम पुढे चालविणे हे कायदेशीर असेल आणि त्यानंतर, तिच्याविरुध्द जो आदेश देण्याचे योजिले होते तो आदेश देता येईल.

---

[1] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ४ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४, अनुसूची अन्वये " ५६ किंवा ५७ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३ अन्वये " तो ज्या तारखेस दिला असेल त्या तारखेपासून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ४ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६०. [1][ (१) ] कलम ५५, [2][ ५६, ५७ किंवा ५७-क ] याअन्वये आदेश दिल्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत राज्य शासनाकडे [3][ किंवा राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अधिका-याकडे (यात यापुढे ज्याचा निर्देश " विनिर्दिष्ट अधिकारी " असा करण्यात आला आहे) ] अपील करता येईल. अपील.

[4][ (२) या कलमान्वये करावयाचे अपील दोन प्रतींमध्ये ज्ञापनाच्या स्वरुपात दाखल करण्यात येईल व त्यात ज्या आदेशावर अपील करण्यात येत असेल त्या आदेशास ज्या मुद्यांवर हरकत घेण्यात आली असेल ते मुद्दे थोडक्यात दिलेले असतील व त्यासोबत तो आदेश किंवा त्याची प्रमाणित प्रत असेल.

(३) असे अपील मिळाल्यावर, राज्य शासन [5][ किंवा विनिर्दिष्ट अधिकारी ] अपील करणा-या व्यक्तीस आपले म्हणणे जातीने किंवा वकील, अधिवक्ता किंवा न्यायप्रतिनिधी यांच्यामार्फत मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी कोणतीही चौकशी करावयाची असल्यास ती केल्यानंतर, ज्या आदेशावर अपील करण्यात आले असेल तो आदेश कायम करु शकेल, त्यात बदल करू शकेल किंवा तो रद्द करू शकेल, किंवा ठरवू शकेल [6][ किंवा राज्य शासनाला किंवा अधिका-याला योग्य वाटेल अशा निदेशांसह ते प्रकरण निकालात काढण्यासाठी परत पाठवू शकेल आणि त्याप्रमाणे स्वतःचा आदेश देऊ शकेल : ]

परंतु, राज्य शासन [7][ किंवा विनिर्दिष्ट अधिकारी ] अन्यथा निदेश देईल त्याव्यतिरिक्त, अपील निकालात काढण्यात येईपर्यंत, ज्या आदेशाविरुध्द अपील करण्यात आले असेल तो आदेश अंमलात राहील.

[8][ **स्पष्टीकरण**— या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी, ज्या आदेशावर अपील करण्यात आले असेल त्यात बदल करण्याच्या अधिकारामध्ये, तो आदेश आस्थगित ठेवण्याच्या अधिकाराचा आणि त्या व्यक्तीला ज्या क्षेत्रातून किंवा अशा क्षेत्रातून अथवा त्या लगतच्या कोणत्याही जिल्ह्यातून किंवा त्याच्या भागातून, अथवा यथास्थिति, विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रांमधून निघून जाण्याचे निदेश दिले असतील अशा ठिकाणी प्रवेश करण्याची किंवा त्यामधून बाहेर जाण्याची परवानगी देण्याचा सशर्त आदेश काढण्याच्या अधिकाराचा समावेश असेल व तो नेहमीच असल्याचे मानण्यात येईल.]

(४) या कलमाखालील अपिलासाठी तरतूद केलेली तीस दिवसांची मुदत मोजताना, ज्या आदेशाविरुध्द अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची प्रमाणित प्रत देण्यास लागलेला कालावधी वगळण्यात येईल.]

६१. कलम ५५, [2] [ ५६, ५७ किंवा ५७-क ] याअन्वये काढलेल्या किंवा राज्य शासनाने कलम ६० अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशास, तो आदेश देणा-या प्राधिका-याने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याने कलम ५९, पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेली कार्यपध्दती अनुसरली नव्हती किंवा जिच्या आधारे त्याला आदेश देता आला असता अशी सामग्री संबंधित प्राधिका-यापुढे नव्हती, किंवा जिच्या संबंधात कलम ५६ अन्वये आदेश देण्यात आला होता त्या व्यक्तीविरुध्द उघडपणे साक्ष देण्यासाठी पुढे येण्यास साक्षीदार तयार नव्हते, असे उक्त प्राधिका-याचे मत नव्हते ही कारणे वगळता कोणत्याही न्यायालयात हरकत घेता येणार नाही. विवक्षित बाबतीत राज्य शासनाने दिलेल्या आदेशाची अंतिमता.

[1] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २० अन्वये या कलमास पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[2] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४, अनुसूची अन्वये " ५६ किंवा ५७ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ (अ) द्वारे " राज्य शासनाकडे " या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २० द्वारे पोट-कलमे (२), (३), व (४) जादा दाखल करण्यात आली.

[5] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ (ब) (एक) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या वरील कलम ५ (ब) (तीन) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[8] वरील अधिनियमाच्या कलम ५ (चार) द्वारे हे स्पष्टीकरण ज्यादा दाखल करण्यात आले.

एखाद्या व्यक्तीने क्षेत्र सोडून निघून जाण्यात कसूर केल्यास आणि घालविल्यानंतर तिने प्रवेश केल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती.

६२. [1][ (१) ] कलम ५५, [2][ ५६, ५७ किंवा ५७-क ] अन्वये स्वतः [3][ कोणतेही क्षेत्र, जिल्हा किंवा त्याचा भाग किंवा कोणतेही विनिर्दिष्ट क्षेत्र ] यातून निघून जाण्याबद्दल जिला आदेश देण्यात आला असेल अशी व्यक्ती,—

(एक) निदेश दिल्याप्रमाणे स्वतः निघून जाण्यात कसूर करील,

किंवा

(दोन) अशा रीतीने स्वतः निघून गेल्यानंतर [4][ पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ] आदेश देणा-या प्राधिका-याच्या लेखी परवानगीखेरीज, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत उक्त [5][ क्षेत्रात, जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रात प्रवेश करील तर, ]

संबंधित प्राधिका-यास तिला अटक करविता येईल व प्रत्येक बाबतीत उक्त प्राधिकारी विहित करील अशा, [6][ उक्त क्षेत्र, जिल्हा किंवा यथास्थिति, त्याचा भाग किंवा विनिर्दिष्ट क्षेत्र याबाहेरील ] ठिकाणी पोलिसांच्या अभिरक्षेत नेऊन ठेवता येईल.

[7][ (२) कलमे ५५, [2][ ५६, ५७ किंवा ५७-क ] अन्वये आदेश देणा-या प्राधिका-यास, ज्या व्यक्तीबाबत अशा रीतीने आदेश देण्यात आला असेल त्या व्यक्तीस, ज्या क्षेत्रातून [8][ किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रांतून ] तसेच त्यालगत असलेले कोणतेही जिल्हे वा त्यांचे भाग यातून निघून जाण्याबाबत निदेश देण्यात आला होता, त्या क्षेत्रात व त्यालगत असलेल्या कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात, अशा परवानगीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तात्पुरत्या मुदतीसाठी व विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून प्रवेश करण्याची किंवा परत येण्याची पनवानगी देता येईल, तसेच त्यास, लादण्यात आलेल्या शर्तीचे योग्य रीतीने पालन करण्यासाठी जामीनदारासह किंवा जामीनदाराशिवाय बंधपत्र करून देण्यास अशा व्यक्तीस फर्मावता येईल. उपरोक्त अधिका-यास कोणत्याही वेळी अशी कोणतीही परवानगी रद्द करता येईल. अशी परवानगी घेऊन [9][ त्या क्षेत्रात, जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात किंवा अशा विनिर्दिष्ट क्षेत्रात] प्रवेश करणारी किंवा परत येणारी कोणतीही व्यक्ती, लादलेल्या शर्तीचे पालन करील आणि ज्या तात्पुरत्या मुदतीसाठी तिला प्रवेश करण्याची किंवा परत येण्याची परवानगी देण्यात आली असेल ती मुदत संपल्यावर किंवा अशी परवानगी त्यापूर्वीच रद्द करण्यात आली असेल तर ती, अशा क्षेत्रातून, किंवा ते क्षेत्र आणि त्यालगत असलेले कोणतेही जिल्हे किंवा त्यांचा भाग यातून [10][ किंवा अशा विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रांतून ] स्वतः होऊन निघून जाईल आणि कलमे ५५, [2][ ५६, ५७ किंवा ५७-क ] अन्वये दिलेल्या आदेशात जी मुदत विनिर्दिष्ट करण्यात आली असेल त्या मुदतीपैकी उरलेल्या मुदतीत, ती त्यात पुन्हा परवानगी घेतल्याशिवाय, प्रवेश करणार नाही किंवा परत येणार नाही. जी कोणतीही व्यक्ती, लादलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात किंवा त्यानुसार स्वतः होऊन निघून जाण्यात कसूर करील किंवा अशा रीतीने स्वतः होऊन निघून गेल्यावर, पुन्हा परवानगी घेतल्याशिवाय त्या क्षेत्रातून किंवा ते क्षेत्र आणि त्यालगत असलेले कोणतेही

[1] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३ अन्वये या कलमास पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[2] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४, अनुसूची अन्वये " ५६ किंवा ५७ " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ५ (अ) (एक) अन्वये " क्षेत्र " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ५ (अ) (दोन) अन्वये " क्षेत्रात प्रवेश करील तर " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ५ (अ) (तीन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[7] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३(२) अन्वये हे पोटकलम जादा दाखल करण्यात आले.

[8] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ५(ब)(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[9] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब)(दोन) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[10] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब)(तीन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

जिल्हे किंवा त्यांचे भाग यात [१][किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये ] प्रवेश करील किंवा परत येईल तर, संबंधित प्राधिका-यास, त्या व्यक्तीस अटक करविता येईल व प्रत्येक बाबतीत संबंधित प्राधिकारी, विहित करील अशा [२][ क्षेत्रांबाहेरील व जिल्ह्यांबाहेरील किंवा त्याच्या भागाबाहेरील किंवा यथास्थिती, विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेरील किंवा क्षेत्रांबाहेरील ] ठिकाणी पोलीसांच्या अभिरक्षेत नेऊन ठेवता येईल.

ज्या क्षेत्रातून एखाद्या व्यक्तीस स्वतःहून निघून जाण्याचा निदेश देण्यात आला असेल, त्या क्षेत्रात प्रवेश करण्याची किंवा त्या क्षेत्रांत परत येण्याची तात्पुरती परवानगी.

६३. (१) राज्य शासनास [३][ किंवा राज्य शासनाने त्याबाबत विशेषरीत्या अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिका-यास आदेश देऊन, जिच्या संबंधात कलम ५५ [४] [५६, ५७ किंवा ५७-क ] अन्वये आदेश देण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, यथास्थिति, [५][ज्या क्षेत्रातून किंवा क्षेत्रांतून] व त्याच्या लगत असलेल्या कोणत्याही जिल्ह्यातून किंवा त्याच्या भागातून [६][ किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रांतून किंवा क्षेत्रांमधून] निघून जाण्याचा निदेश दिला असेल [५][त्या क्षेत्रात किंवा अशा क्षेत्रांमध्ये] व त्या लगत असलेल्या कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात [६][किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये] ते [७][किंवा तो] सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, व अशी व्यक्ती मान्य करील अशा शर्तीस अधीन राहून, तात्पुरत्या मुदतीकरिता प्रवेश करण्याची किंवा परत येण्याची परवानगी देता येईल आणि राज्य शासनास, किंवा या संबंधात राज्य शासनाने विशेषरीत्या अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिका-यास अशी कोणतीही परवानगी कोणत्याही वेळी मागे घेता येईल.

(२) ज्या [५][ क्षेत्रातून किंवा क्षेत्रांतून ] व त्यालगत असलेल्या कोणत्याही जिल्ह्यातून किंवा त्याच्या भागातून [८][ किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रांमधून ] निघून जाण्याबद्दल एखाद्या व्यक्तीस निदेश देण्यात आला असेल, [५][ त्या क्षेत्रात किंवा अशा क्षेत्रांमध्ये ] व त्यास जोडून असलेल्या कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात किंवा यथास्थिति, [८][ विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रांमध्ये ] प्रवेश करण्याची किंवा परत येण्याची पोट-कलम (१) अन्वये परवानगी देताना राज्य शासनास [९] [ किंवा अशा अधिका-यास ], लादलेल्या शर्तीचे पालन करण्यासाठी जामीनदारासह किंवा जामीनदारावाचून बंधपत्र करून देण्यास अशा व्यक्तीस फर्मावता येईल.

(३) ज्या [५][ क्षेत्रातून किंवा क्षेत्रांतून ] व त्यालगत असलेल्या कोणत्याही जिल्ह्यातून किंवा त्याच्या भागातून [१०][ किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रांमधून ] निघून जाण्याचा निदेश देण्यात आला होता, [५][ त्या क्षेत्रात किंवा अशा क्षेत्रांमध्ये ] व त्यालगत असलेल्या कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात किंवा यथास्थिति, [१०][ विनिर्दिष्ट क्षेत्र किंवा क्षेत्रांमध्ये ] प्रवेश करण्याची किंवा परत येण्याची पोट-कलम (१) अन्वये परवानगी मिळालेली कोणतीही व्यक्ती, यथास्थिति, उक्त आदेशात किंवा उक्त आदेश मागे घेणा-या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या वेळी व ठिकाणी व त्यात विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिका-याच्या स्वतः स्वाधीन होईल.

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ५ (ब) (चार) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) (घ) (पाच) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[३] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २१ (१) (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४, अनुसूची अन्वये " ५६ किंवा ५७ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ६ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २१ (१) (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ६ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[९] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २१ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१०] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ६ (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

राज्य शासनाचे व विशेषरीत्या अधिकार दिलेल्या अधिका-यांचे हद्दपार करण्याविषयीचे अधिकार.

[१][ ६३-कक (१) राज्य शासनास किंवा राज्य शासनाने त्याबाबत विशेषरीत्या अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिका-यास, कलम ५५, [२][ ५६, ५७ व ५७-क ] या अन्वये [३][ ज्या क्षेत्रासाठी आयुक्ताची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रात ] आयुक्ताने व एखाद्या जिल्ह्यात त्याबाबत राज्य शासनाकडून [४][ * * * * ] अधिकार दिलेला जिल्हा दंडाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी किंवा यथास्थिति, [५][ अधीक्षक ] याने वापरावयाच्या अधिकारामध्ये, राज्य शासनाने किंवा विशेषरीत्या अधिकार दिलेल्या अधिका-याने, यथास्थिति, [६][ टोळीतील किंवा गटातील व्यक्तीला किंवा व्यक्तींना ] [७][ किंवा भिकारी म्हणून घोषित करण्यात आलेल्या व्यक्तींना ] कोणतेही स्थानिक क्षेत्र किंवा असे कोणतेही क्षेत्र किंवा कोणतेही जिल्हे किंवा त्यांचा भाग-मग तो त्या लगत असो अगर नसो-यांतून निघून जाण्याबद्दल आणि त्यात पुन्हा प्रवेश न करण्याबद्दल अथवा न परतण्याबद्दल [८][ कलमे ५५ व ५७-क अन्वये ] निदेश देणे कायदेशीर असेल, असा फेरबदल करून त्या अधिकारांचा त्याच परिस्थितीत व त्याच रीतीने, वापर करता येईल.

(२) कलमे ५८, ५९, ६०, ६१, ६२ आणि ६३ यांच्या तरतूदी, ज्याप्रमाणे त्या कलम ५५, [२][ ५६, ५७ किंवा ५७-क ] या अन्वयेच्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासंबंधात लागू होतात त्याप्रमाणे, या कलमाखालील कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासंबंधात योग्य त्या फेरफारासह लागू होतील. ]

## [९][ तीन. शिबिरे, वगैरेंचे नियंत्रण व गणवेष

शिबिरे, संचलने इत्यादींचे नियंत्रण व गणवेष वगैरेच्या उपयोगास मनाई करणे.

६३-क. (१) सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे अशी राज्य शासनाची खात्री होईल तर, त्यास सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून संपूर्ण [१०][ महाराष्ट्र राज्यात ] ; किंवा त्याच्या कोणत्याही भागात, हत्यारांचा उपयोग करण्याचे प्रशिक्षण घेण्याच्या किंवा दिले जाण्याच्या किंवा कवायत करण्याच्या किंवा कवायती करून घेतल्या जाण्याच्या किंवा लष्करी कसरती, डावपेच किंवा शिस्तबध्द हालचाली यांचा सराव करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा कोणत्याही शिबिरात, संचलनात किंवा मिरवणुकीत हजर राहण्याच्या किंवा ते भरविण्याच्या किंवा त्यात भाग घेण्याच्या उपरिनिर्दिष्ट प्रयोजनासाठी भरणा-या व्यक्तींच्या सर्व सभांना किंवा जमावांना मनाई करता येईल किंवा त्यावर निर्बंध घालता येतील.

---

[१] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ८ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४, अनुसूची अन्वये " ५६ किंवा ५७ " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " बृहन्मुंबईत " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ७ अन्वये " विशेषरित्या " हा मजकूर वगळण्यात आला व तो नेहमीकरिता वगळण्यात आलेला असल्याचे मानण्यात येईल.

[५] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " जिल्हा पोलीस अधीक्षक " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ७ (ब) अन्वये " अशा टोळीतील किंवा जमावातील व्यक्तीस किंवा व्यक्तींना किंवा बाहेरून आलेल्या व्यक्तींना किंवा सिद्धापराध व्यक्तींना " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४, अनुसूची अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ७ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[९] सन १९५३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ७ अन्वये हे शीर्षक व कलम ६३-क समाविष्ट करण्यात आले.

[१०] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई राज्यात " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

डॉ.एन. पटारकर

(२) जर राज्य शासनाची अशी खात्री होईल की, याअन्वये काढावयाच्या आदेशात विनिर्दिष्ट करावयाच्या मंडळातील किंवा संस्थेतील किंवा संघटनेतील कोणत्याही व्यक्तीने, संघराज्याच्या सशस्त्र दलातील व्यक्तीने किंवा पोलीस दलातील किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेल्या कोणत्याही दलातील व्यक्तीने परिधान करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही गणवेषासारखा किंवा गणवेषाच्या भागासारखा पोषाख किंवा परिधान वस्तू सार्वजनिक ठिकाणी घालण्यामुळे राज्याच्या सुरक्षिततेस किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेच्या कामात बाध येण्याचा संभव आहे तर, राज्य शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून, अशा मंडळातील, संस्थेतील किंवा संघटनेतील कोणत्याही व्यक्तीने असा कोणताही पोषाख किंवा परिधान वस्तू सार्वजनिक ठिकाणी घालण्यास किंवा प्रदर्शित करण्यास मनाई करता येईल किंवा त्यावर निर्बंध घालता येईल.

(३) पोट-कलमे (१) व (२) खालील प्रत्येक सर्वसाधारण किंवा विशेष आदेश, कलम १६३ खालील जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यासाठी ठरविलेल्या रीतीने प्रसिध्द करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**— पोट-कलम (२) च्या प्रयोजनासाठी, पोषाख किंवा परिधान वस्तू जर, लोकांना जेथे जाण्यायेण्याची मोकळीक आहे अशा कोणत्याही ठिकाणी घातली किंवा प्रदर्शित केली तर, सार्वजनिक ठिकाणी तो पोषाख घातला किंवा ती वस्तू प्रदर्शित केली असे समजण्यात येईल. ]

### [१] [ चार. ग्राम संरक्षक पथके

**६३-ख.** (१) गावातील व्यक्तींच्या रक्षणासाठी, मालमत्तेच्या सुरक्षेसाठी आणि सार्वजनिक सुरक्षिततेसाठी [२][ अधीक्षकास ], त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, त्याच्या अधिकारितेतील कोणत्याही गावांकरिता स्वयंसेवी गट (ज्यांना या कलमात यापुढे " ग्राम संरक्षक पथके " असे संबोधण्यात आले आहे) घटित करता येतील. ग्राम संरक्षक पथके घटित करणे.

[१] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ९ अन्वये हे शीर्षक व कलम ६३ ख समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) राज्य शासन याबाबत जे कोणतेही सर्वसाधारण किंवा विशेष आदेश देईल त्यास अधीन राहून २० आणि ५० या वर्षांच्या दरम्यानच्या वयाची असलेली आणि गावात रहात असलेली आणि या कलमाच्या तरतुदीन्वये पार पाडावयाच्या कर्तव्यांचे आणि कामांचे स्वरुप लक्षात घेता [१][अधीक्षकाच्या] मते, जी पात्र आणि योग्य व्यक्ती आहे अशी प्रत्येक व्यक्ती या गावासाठी स्थापन करण्यात आलेल्या ग्राम संरक्षक पथकाचा सदस्य म्हणून नेमणूक केली जाण्यास पात्र असेल.

(३) [१][अधीक्षकास], त्याने सही केलेल्या आणि स्वतःची मुद्रा वठविलेल्या लेखी आदेशाद्वारे पोट-कलम (२) अन्वये पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तींची ग्राम संरक्षक पथकाचा सदस्य म्हणून नेमणूक करता येईल.

(४) [१][अधीक्षकास], प्रत्येक ग्राम संरक्षक पथकासाठी पोट-कलम (२) अन्वये पात्र असलेल्या व्यक्तींची, कोतवाल म्हणून संबोधण्यात येणारा मानसेवी समादेशक म्हणून नेमणूक करील.

(५) तालुक्यातील ग्राम संरक्षक पथकांच्या मार्गदर्शनासाठी आणि त्यावर देखरेख ठेवण्यासाठी [१][अधीक्षकास], हवालदाराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा पोलीस अधिका-यास तालुका ग्राम संरक्षक अधिकारी म्हणून, आणि जी कोणतीही व्यक्ती काम करण्यास इच्छुक असेल आणि जी [१][अधीक्षकाच्या] मते पात्र असेल त्या कोणत्याही व्यक्तीस सह तालुका ग्राम संरक्षक अधिकारी म्हणून नेमता येईल.

(६) [१][अधीक्षकास], जिल्ह्यातील ग्राम संरक्षक पथकांच्या मार्गदर्शनासाठी आणि त्यावर देखरेख करण्यासाठी उपनिरीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा पोलीस अधिका-यास जिल्हा ग्राम संरक्षक अधिकारी म्हणून, आणि जी कोणतीही व्यक्ती काम करण्यास इच्छुक असेल आणि जी [१][अधीक्षकाच्या] मते पात्र असेल त्या कोणत्याही व्यक्तीस संयुक्त जिल्हा ग्राम संरक्षक अधिकारी म्हणून नेमता येईल.

(७) या कलमान्वये नेमलेले ग्राम संरक्षक पथकाचे सदस्य आणि अधिकारी हे, [१][अधीक्षकाच्या] मार्गदर्शनाखाली व नियंत्रणाखाली असतील आणि त्यांना, [१][अधीक्षक] ठरवील त्याप्रमाणे प्रशिक्षण मिळेल व ते अशी कर्तव्ये पार पाडतील.

(८) या कलमान्वये नेमलेले ग्राम संरक्षक पथकांचे सदस्य आणि (पोलीस अधिका-यांव्यतिरिक्त इतर) अधिकारी हे, [१][अधीक्षक] राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने निर्धारित करील अशा सेवेच्या अटींच्या व शर्तींच्या अधीन असतील.

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षक " या मजकुराऐवजी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

(९) [1][अधीक्षकास] किंवा या कलमान्वये नेमलेल्या कोणत्याही अधिका-यांस त्यांच्या हाताखाली असलेल्या अधिका-यांस, किंवा ग्राम संरक्षक पथकाच्या कोणत्याही सदस्यांस प्रशिक्षण देण्यासाठी किंवा त्यास नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी कोणत्याही वेळी बोलावता येईल.

(१०) या कलमान्वये नेमलेल्या ग्राम संरक्षक पथकाच्या प्रत्येक सदस्यास व प्रत्येक अधिका-यास,—

(क) त्याची नेमणूक झाल्यानंतर, राज्य शासनाने यासंबंधात मान्य केलेल्या नमुन्यात एक प्रमाणपत्र मिळेल;

(ख) कर्तव्य बजावण्यासाठी बोलाविण्यात आले असता त्यास या अधिनियमान्वये नेमलेल्या पोलीस अधिका-यास असतात तेच अधिकार व विशेषाधिकार असतील व तसेच संरक्षण मिळेल.

(११) त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात या व्यतिरिक्त काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये नेमलेल्या ग्राम संरक्षक पथकाचा सदस्य किंवा (पोलीस अधिका-या व्यतिरिक्त) कोणताही अधिकारी तो ग्राम संरक्षक पथकाचा सदस्य किंवा असा अधिकारी आहे याच केवळ कारणावरुन,—

(क) [2][महाराष्ट्र] विधानसभेचा किंवा [2][महाराष्ट्र] विधानपरिषदेचा; किंवा

(ख) कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा

सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा असण्यास अपात्र ठरणार नाही.]

[3][(१२) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा जिल्ह्यांत [1][अधीक्षक], जिल्हा ग्राम संरक्षक अधिकारी व तालुका ग्राम संरक्षक अधिकारी यांचे या कलमाखालील अधिकार, कर्तव्ये व कामे अनुक्रमे वापरतील, मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७ अन्वये नेमलेला महासमादेशक निदेश देईल असे होमगार्डचे अधिकारी बजावतील व पार पाडतील आणि त्यानंतर या कलमाच्या सर्व पूर्ववर्ती तरतुदी त्यांना लागू होतील परंतु, त्यातील [1][अधीक्षक], जिल्हा ग्राम संरक्षक अधिकारी व तालुका ग्राम संरक्षक अधिकारी, यासंबंधीचे निर्देश हे होमगार्डच्या संबंधित अधिका-यांसंबंधीचेच निर्देश आहेत असे समजण्यात येईल.]

१९४७ चा मुंबई ३.

## प्रकरण सहा

## पोलिसांचे कार्यकारी अधिकार व कर्तव्ये

६४. खालील कामे करणे हे प्रत्येक पोलीस अधिका-यांचे कर्तव्य असेल :— पोलीस अधिका-याची कर्तव्ये.

(क) सक्षम प्राधिका-याने त्यास कायदेशीररीत्या दिलेले प्रत्येक समन्स तत्परतेने बजावणे व प्रत्येक अधिपत्र किंवा इतर आदेश याचे तत्परतेने पालन करणे व त्याची अंमलबजावणी करणे आणि आपल्या वरिष्ठ अधिका-याचे कायदेशीर समादेश अमलात आणण्याचा सर्व कायदेशीर मार्गांनी प्रयत्न करणे ;

(ख) आपल्या संपूर्ण क्षमतेचा वापर करून, दखलपात्र अपराधांच्या कृत्यासंबंधात किंवा असे अपराध करण्याच्या कारस्थानांच्या संबंधी गुप्त माहिती मिळविणे आणि अपराध्यांना न्यायासनासमोर आणण्यासाठी किंवा दखलपात्र अपराध व आपल्या दृष्टिपथात बिनदखली अपराध केला जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी योग्य असेल अशी कायद्याशी आणि आपल्या वरिष्ठाच्या आदेशांशी सुसंगत असणारी माहिती देणे व अशी इतर उपाययोजना करणे ;

---

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "जिल्हा अधीक्षक" या मजकुराऐवजी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २३ अन्वये पोट-कलम (१२) समाविष्ट करण्यात आले.

(ग) आपल्या संपूर्ण क्षमतेचा वापर करून, सार्वजनिक उपद्रव निर्माण होण्यास आळा प्रतिबंध करणे,

(घ) ज्या व्यक्तींना पकडण्यासाठी त्यास कायदेशीररीत्या प्राधिकार देण्यात आलेला असेल आणि ज्यांना पकडण्यास पुरेसे कारण असेल अशा सर्व व्यक्तींना गैरवाजवी विलंब न लावता पकडणे ;

(ङ) अन्य पोलीस अधिकारी बोलावील तेव्हा, किंवा त्याचे काम करतेवेळी मदतीची गरज लागेल तेव्हा त्यास, ज्यास मदत करावयाची त्या अधिका-याच्या बाबतीत कायदेशीर व वाजवी असेल अशा रीतीने मदत करणे ;

(च) त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार त्याच्याकडे सोपविण्यात आलेली असतील अशी कर्तव्ये पार पाडणे.

सार्वजनिक जागेच्या ठिकाणी प्रवेश करण्याचा अधिकार.

६५. (१) राज्य शासनाने किंवा कायदेशीररीत्या प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने केलेले नियम आणि आदेश यांना अधीन राहून प्रत्येक पोलीस अधिका-यास ज्या कोणत्याही सार्वजनिक जागेचा, दारुचा गुत्ता किंवा मादक द्रव्याच्या विक्रीसाठी दुकान किंवा स्वैर व बेशिस्त वर्तणुकीच्या लोकांची ये-जा असलेली जागा म्हणून वापर होत असतो असे त्यास सकारण वाटत असेल त्या जागेत कलम ६४ मध्ये निर्देश केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी अधिपत्राशिवाय प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल.

रस्त्यातील संशयित व्यक्तींची झडती घेण्याचे अधिकार.

(२) जेव्हा रस्त्यात किंवा सार्वजनिक जागेच्या ठिकाणी पोलीस अधिका-यास चोरीची मालमत्ता असल्याचा खरोखर संशय वाटत असेल अशी कोणतीही वस्तू एखाद्या व्यक्तीच्या ताब्यात असेल किंवा ताब्यात असल्याचे दिसून येत असेल तेव्हा, त्या पोलीस अधिका-यास तीसाठी झडती घेता येईल आणि तिची तपासणी करता येईल व तीबद्दल स्पष्टीकरण मागता येईल आणि (ती मालमत्ता) ताब्यात असलेल्या व्यक्तीने दिलेले स्पष्टीकरण उघडपणे खोटे किंवा संशयास्पद असेल तर ती वस्तू अटकावून ठेवता येईल आणि ती हकीकत दंडाधिका-यास कळविता येईल आणि त्यानंतर दंडाधिकारी * फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ ची १८९८ चा ५
कलमे ५२३ आणि ५२५ अनुसार किंवा त्या वेळी अमलात असलेल्या इतर कायद्यानुसार कार्यवाही करील.

जनतेप्रती पोलीस अधिका-यांची कर्तव्ये.

६६. खालील कामे करणे हे प्रत्येक पोलीस अधिका-याचे कर्तव्य असेल :—

(क) रस्त्यातील अपंग असहाय्य व्यक्तींना आपल्या अधिकारात असेल असे सर्व प्रकारचे सहाय्य करणे आणि ज्या धोकादायक किंवा स्वतःस सांभाळण्यास असमर्थ वाटत असतील अशा नशा चढलेल्या व्यक्तींना आणि इतस्ततः फिरणा-या वेड्या लोकांना आपल्या ताब्यात घेणे ;

(ख) अटक केलेली किंवा अभिरक्षेत ठेवलेली कोणतीही व्यक्ती जखमी किंवा आजारी असल्यास तिच्यासाठी आवश्यक असेल ती मदत मिळविण्याची तात्काळ उपाययोजना करणे आणि अशा व्यक्तीवर पहारा करताना किंवा तिला बरोबर घेऊन जातांना तिच्या अवस्थेकडे योग्य लक्ष पुरविणे ;

(ग) अटक केलेल्या किंवा अभिरक्षेत ठेवलेल्या प्रत्येक व्यक्तीला योग्य अन्न व निवारा देण्याची व्यवस्था करणे ;

(घ) झडत्या घेताना निष्कारण उद्धटपणा न करणे व विनाकारण त्रास न देणे ;

(ङ) स्त्रिया व मुले यांच्याशी वागताना सभ्यतेचे काटेकोरपणे पालन करुन वाजवी सौम्यपणाने वागणे ;

(च) आगीमुळे हानी किंवा नुकसान होऊ न देण्यासाठी आपल्या प्रयत्नांची शिकस्त करणे ;

(छ) जनतेस कोणताही अपघात किंवा धोका होऊ नये म्हणून आपल्या प्रयत्नांची शिकस्त करणे.

---

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

**पोलिसाने रस्त्यांवरील रहदारी, वगैरेचे नियमन करणे.**

६७. खालील कामे करणे हे पोलीस अधिका-याचे कर्तव्ये असेल :—

(क) रस्त्यांवरील रहदारीचे नियमन व नियंत्रण करणे, रस्त्यात अडथळे येऊ न देणे आणि त्यास आपल्या संपूर्ण क्षमतेचा वापर करुन लोकांकडून रस्त्यात किंवा रस्त्यांजवळ पालन केले जाण्यासाठी, या अधिनियमान्वये किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये केलेला कोणताही नियम किंवा आदेश याच्या उल्लंघनास प्रतिबंध करणे ;

(ख) रस्त्यात आणि स्नानाची, धुण्याची व उतरण्याची सार्वजनिक ठिकाणे, जत्रा, देवळे आणि सार्वजनिक जागेची इतर सर्व ठिकाणे येथे व यामध्ये आणि सार्वजनिक उपासना स्थानांच्या आसपास सार्वजनिक उपासनेच्या वेळी सुव्यवस्था राखणे ;

(ग) स्नानाच्या, धुण्याच्या आणि उतरण्याच्या सार्वजनिक जागी लोकांच्या येण्याजाण्याचे नियमन करणे, त्या जागी आणि सार्वजनिक तरींवर फार गर्दी होऊ न देणे आणि आपल्या संपूर्ण क्षमतेचा वापर करून अंशा कोणत्याही जागी किंवा तरींवर लोकांकडून पालन केले जाण्यासाठी कायदेशीररीत्या केलेला कोणताही नियम किंवा आदेश यांच्या उल्लंघनास प्रतिबंध करणे.

**पोलिसांच्या वाजवी आदेशांचे पालन करणे व्यक्तींवर बंधनकारक असणे.**

६८. एखाद्या पोलीस अधिका-याने या अधिनियमाखालील त्याच्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य पार पाडताना दिलेल्या वाजवी निदेशांचे पालन करणे हे सर्व व्यक्तींवर बंधनकारक असेल.

**अटकाव करणे, घालवून देणे, इत्यादींचा पोलीस अधिका-याचा अधिकार.**

६९. पोलीस अधिका-यास, कलम ६८ मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही निर्देशाचे पालन करण्यास विरोध करणा-या किंवा नकार देणा-या किंवा पालन न करणा-या कोणत्याही व्यक्तीस अटकाव करता येईल किंवा घालवून देता येईल आणि अशा व्यक्तीस दंडाधिका-यापुढे नेता येईल किंवा क्षुल्लक बाबतीत, कारण संपल्यावर तिला सोडून देता येईल.

**कलमे ३७, ३८ किंवा ३९ अन्वये दिलेले आदेश अंमलात आणणे.**

७०. जेव्हा कलम ३७ अन्वये एखादी अधिसूचना यथोचित रीतीने काढण्यात आली असेल किंवा कलम ३८ किंवा ३९ अन्वये एखादा आदेश काढण्यात आला असेल तेव्हा, जिल्ह्यातील कोणत्याही दंडाधिका-याने किंवा पोलीस अधिका-याने, त्या विरुद्ध वागणा-या किंवा वागण्याच्या बेतात असलेल्या कोणत्याही व्यक्तीस तसे करण्यापासून परावृत्त होण्यास किंवा दूर राहण्यास फर्माविणे आणि तिने तसे करण्याचे नाकारल्यास किंवा अवज्ञा केल्यास अपराध करणा-या व्यक्तीस अटक करणे हे, कायदेशीर असेल. अशा दंडाधिका-यास किंवा पोलीस अधिका-यास उपरोक्त प्रमाणे अशा अधिसूचनेचे किंवा आदेशाचे उल्लंघन करताना वापरलेली किंवा वापरली जाण्याच्या बेतात असलेली वस्तू किंवा जिन्नस जप्तसुद्धा करता येईल, आणि अशा जप्त केलेल्या जिनसेची विल्हेवाट त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या जिल्हा दंडाधिका-याच्या आदेशानुसार लावण्यात येईल.

कलमे ४३, ५५, ५६, [1][५७, ५७ क किंवा ६३-कक] याअन्वये दिलेले आदेश अंमलात आणले आहेत, हे पहाणे हे पोलिसांचे कर्तव्य असेल.

**७१.** कोणत्याही प्राधिका-याने कलम ४३, ५५, ५६, [1][५७, ५७-क किंवा ६३-कक] या अन्वये केलेला प्रत्येक विनियम आणि निदेश यांचे योग्यरीतीने पालन होत आहे हे पाहणे, अज्ञानामुळे त्याचे पालन करीत नसतील अशा व्यक्तीला ताकीद देणे आणि जाणूनबुजून याचे पालन करीत नसेल अशा कोणत्याही व्यक्तीस अटक करणे हे पोलिसांचे कर्तव्य असेल.

पोलीस अधिकारी, अधिपत्राशिवाय केव्हा अटक करू शकेल.

**७२.** कोणत्याही पोलीस अधिका-यास, दंडाधिका-याच्या कोणत्याही आदेशाशिवाय आणि अधिपत्राशिवाय,—

(१) कलम १२१ अन्वये शिक्षापात्र असलेल्या एखाद्या अपराधाशी संबंध असेल अशा किंवा अशा अपराधाशी संबंध असल्याबद्दल जिच्याविरुद्ध वाजवी तक्रार करण्यात आली असेल किंवा विश्वासार्ह माहिती मिळाली असेल किंवा वाजवी संशय असेल अशा कोणत्याही व्यक्तीस ;

(२) कलम ३३ चे पोट-कलम (१) चा खंड (भ) अन्वये केलेल्या नियमाचे किंवा आदेशाचे किंवा कलम ३६, ३७, ५६, [1][५७, ५७-क किंवा ६३-कक] या अन्वये काढलेल्या आदेशाचे किंवा अधिसूचनेचे उल्लंघन करील अशा कोणत्याही व्यक्तीस ;

[2][(२-क) कलम ६३-क च्या पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील अशा व्यक्तीस ; ]

(३) जिने कलम १२२ किंवा कलम १३६ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केलेला असेल अशा व्यक्तीस ;

अटक करता येईल.

पोलीस अधिपत्राशिवाय केव्हा अटक करू शकेल.

**७३.** कोणत्याही पोलीस अधिका-यास, [3][प्राण्यास निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६०, याच्या कलम ११, पोट-कलम (१) च्या खंड (क), (ख), (ग), (घ), (ङ) (च), (छ), (ज), (झ), (ञ), (ट) किंवा (ड)] अन्वये शिक्षा पात्र असलेला कोणताही अपराध त्याच्या समक्ष करणा-या कोणत्याही व्यक्तीस दंडाधिका-याच्या आदेशाशिवाय आणि अधिपत्राशिवाय अटक करता येईल. १९६० चा ५९.

**७३-क.** [पुनर्रचनेपूर्वीच्या राज्यात अंमलात असल्याप्रमाणे, सन १८९० च्या अधिनियम क्रमांक ११ चे कलम ६-ख हे, कलम ७४ ते ७७ च्या प्रयोजनासाठी उर्वरित राज्यास लागू करणे] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ३ अन्वये वगळण्यात आले.

---

[1] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४, अनुसूची अन्वये "५७ किंवा ६३अअ" या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[2] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ८ अन्वये खंड (२-क) दाखल करण्यात आला.

[3] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ अन्वये "प्राण्यास निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९० याची कलमे ३, ३अ, ४, ५, ६ किंवा ६ क याअन्वये किंवा प्राण्यास निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम याच्या कलम ३, ४, ५, किंवा ५ अ अन्वये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२][सन १९६० चा अधिनियम क्रमांक ५९] खालील अपराधां-संबंधीचे अधिकार.

१९६० चा ५९. **७४.** [१][प्राण्यास निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० (या कलमात आणि कलमे ७५ व ७७ यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा करण्यात आला आहे) याच्या कलम ११, पोट-कलम (१) किंवा कलम १२] अन्वये एखाद्या प्राण्याच्या संबंधात अपराध करण्यात आला असेल किंवा जेव्हा असा अपराध करण्यात आला आहे असा संशय घेण्यास वाजवी कारण असेल तेव्हा पोलीस अधिका-यास—

(क) प्राण्याला दंडाधिका-याकडे घेऊन जाता येईल; किंवा

(ख) जर आरोपी व्यक्तीचे तसे म्हणणे असेल तर, याबाबत राज्य शासनाने अधिकार दिलेला कोणताही पशुवैद्यकीय अधिकारी असल्यास त्याच्याकडे त्या प्राण्यास घेऊन जाता येईल; किंवा

(ग) उक्त कलम [३][* * *] अन्वये दंडाधिकारी निदेश देईपर्यंत, उक्त अधिनियमाच्या [४][कलम ३५] अन्वये नेमलेल्या कोणत्याही रुग्णावासात असलेल्या प्राण्याला उपचारासाठी व तेथे अटकावून ठेवण्यासाठी नेता येईल; किंवा

(घ) जेव्हा उक्त प्राण्याची शारीरिक अवस्था अशी असेल की, त्यास पशुवैद्यकीय अधिका-याकडे किंवा दंडाधिका-याकडे नेता येणार नाही तेव्हा, उक्त प्राण्याच्या अंगावर आढळून येतील अशा जखमा, व्रण, अस्थिभंग, ओरखडे किंवा दुखापतीच्या इतर खुणा यांचे वर्णन करणारा उक्त प्राण्याच्या अवस्थेसंबंधीचा एक अहवाल दोन किंवा अधिक प्रतिष्ठित व्यक्तींच्या समक्ष तयार करता येईल :

परंतु, खंड (ख) किंवा (घ) खाली येणा-या प्रकरणांच्या बाबतीत पोलीस अधिका-यास उक्त प्राण्याला एखाद्या दवाखान्यात किंवा राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे मान्यता दिलेल्या कोणत्याही योग्य ठिकाणी अटकावून ठेवण्यासाठी पाठविण्यात यावे आणि त्याला दंडाधिका-यासमोर हजर करण्यात येईपर्यंत तेथे अटकावून ठेवण्यात यावे असा निदेश देता येईल :

परंतु आणखी असे की, अशा रीतीने अटकावून ठेवण्यात आलेल्या प्राण्याला शक्य तितक्या कमी वेळात आणि अटकावून ठेवण्यासाठी त्याला ज्या दिनांकास पाठविण्यात आले असेल त्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत दंडाधिका-यासमोर हजर करण्यात येईल आणि रुग्णावासात त्याला आणखी मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याबद्दल दंडाधिका-याने आदेश दिला नसेल तर त्याला त्याच्या मालकाच्या स्वाधीन करण्यात येईल.

ज्या व्यक्तीच्या ताब्यातून प्राणी घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस तो परत देण्याचा दंडाधिका-याचा अधिकार.

**७५.** जेव्हा कलम ७४ अन्वये एखादा प्राणी दंडाधिका-यापुढे आणण्यात आला असेल तेव्हा त्या दंडाधिका-यास, ज्या व्यक्तीच्या ताब्यातून तो प्राणी घेण्यात आला असेल त्या व्यक्तीने फर्मावण्यात येईल तेव्हा तो प्राणी हजर करणे आपल्यावर बंधनकारक असेल अशा आशयाचे, दंडाधिका-याची खात्री होईल असे, हमीपत्र दिल्यावर तो प्राणी तिला परत करण्याबद्दल निदेश देता येईल किंवा तो प्राणी उपचारासाठी व काळजी घेण्यासाठी एखाद्या रुग्णावासात पाठवण्यात यावा आणि उक्त अधिनियमाच्या [५][कलम ३५] मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तो तेथे अटकावून ठेवण्यात यावा असा निदेश देता येईल किंवा त्या प्राण्याची व्यवस्था किंवा सांभाळ व तो हजर करणे या बाबतीत त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम ४ (अ) अन्वये " प्राण्यास निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९० याचे कलम ३ किंवा कलम ५ किंवा कलम ६ किंवा प्राण्यास निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम यांचे कलम ३ किंवा ४ किंवा ५ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४ (क) अन्वये " सन १८९० चा अधिनियम क्रमांक ११ व तत्सम विधि " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) (दोन) अन्वये "पोट-कलम (२) आणि (३)" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) (एक) अन्वये "कलम ६ ब चे पोट-कलम (१)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ५ अन्वये " कलम ६-ब ची पोट-कलमे (२) आणि (३) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

पशुवैद्यकीय अधिका-याने प्राण्याची तपासणी करणे.

**७६.** कलम ७४ अन्वये ज्याच्याकडे प्राणी आणण्यात आला असेल तो पशुवैद्यकीय अधिकारी शक्य तितक्या त्वरेने त्याची तपासणी करील व अशा तपासणीचा अहवाल तयार करील. जर आरोपी व्यक्तीने अहवालाच्या प्रतीकरिता अर्ज केला असेल तर त्याची एक प्रत तिला विनामूल्य देण्यात येईल.

[१][सन १९६० चा अधिनियम क्रमांक ५९] या अन्वये प्राण्यासंबंधी करावयाची तरतूद.

**७७.** जेव्हा कलम ७४ अन्वये एखादा प्राणी दंडाधिका-यापुढे हजर करण्यात येण्यापूर्वी एखाद्या दवाखान्यात किंवा कोणत्याही योग्य ठिकाणी अटकावून ठेवण्यासाठी पाठविण्यात यावा असा निदेश पोलीस अधिकारी देईल किंवा कलम ७४ अन्वये एखादा प्राणी, उपचारासाठी व काळजी घेण्यासाठी एखाद्या रुग्णावासात पाठविण्यात यावा व तेथे तो अटकावून ठेवण्यात यावा असा निदेश दंडाधिकारी देईल तेव्हा उक्त अधिनियमाच्या [२][कलम ३५] च्या तरतुदी शक्य असेल तेथवर लागू होतील.

प्राण्याचे खोगीर किंवा ओझे काढण्याचा पोलीस अधिका-याचा अधिकार.

**७८.** जेव्हा कोणत्याही कामावर किंवा ओझे वाहण्यासाठी लावण्यात आलेला कोणताही प्राणी कोणतीही जखम झाल्यामुळे अशा रीतीने कामावर लावला जाण्यास अयोग्य आहे असा कोणत्याही पोलीस अधिका-यास खरोखर संशय येईल तेव्हा त्यास असा प्राणी ताब्यात असणा-या व्यक्तीस त्या प्राण्यास कोणतीही जखम आहे किंवा काय याबद्दल खात्री करून घेण्यासाठी त्याचे खोगीर किंवा ओझे काढण्यास फर्मावता येईल आणि जर अशी व्यक्ती तसे करण्याचे नाकारील तर त्यास स्वतः उक्त प्राण्याचे खोगीर किंवा ओझे काढता येईल किंवा त्याचे खोगीर किंवा ओझे काढण्याची व्यवस्था करता येईल.

जेव्हा पोलीस अधिका-याच्या समक्ष विशिष्ट अपराध केले जातील तेव्हा अधिपत्राशिवाय अटक करण्याचा पोलीस अधिका-याचा अधिकार.

[३][**७९.** कोणत्याही पोलीस अधिका-यास कलम ३९ किंवा ४० अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्याच्या बाबतीत त्याच्या समक्ष कलम ११७ किंवा कलम १२५ किंवा कलम १३० किंवा कलम १३१ चा उपखंड (एक), (चार) किंवा (पाच) किंवा कलम १३५ च्या खंड (एक) अन्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, दंडाधिका-याच्या आदेशाशिवाय व अधिपत्राशिवाय अटक करता येईल.]

अटक करण्यासंबंधीचे इतर अधिकार.

**८०.** (१) सक्षम अधिका-याने याबाबतीत विशेषरीत्या कामावर नेमलेला कोणताही पोलीस अधिकारी कलम ११० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या अपराधाबद्दल अधिपत्राशिवाय अटक करू शकेल.

---

[१] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ५ अन्वये " कलम ६-ब ची पोटकलमे (२) आणि (३) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) अन्वये "१८९० चा अधिनियम ११" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३, दुसरी अनुसूची अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(२) कोणत्याही पोलीस अधिका-यास, कोणत्याही राहत्या घराचा, खाजगी जागेचा किंवा त्याला किंवा तिला जोडून असलेल्या कोणत्याही जमिनीचा किंवा जागेचा ताबा किंवा प्रभार असलेल्या कोणत्याही व्यक्तीने दिलेल्या माहितीवरून त्यामध्ये किंवा त्यावर जिने कलम १२० खालील शिक्षापात्र अपराध केल्याचे अभिकथित असेल अशा व्यक्तीस अधिपत्राशिवाय अटक करता येईल.

**८१.** पोलीस अधिकारी, जी कोणतीही व्यक्ती, त्याच्या समक्ष कोणत्याही रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी या अधिनियमान्वये किंवा त्या अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमान्वये शिक्षा पात्र असेल असा आणि ज्याबद्दल इतरत्र किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये कोणतीही स्पष्ट तरतूद केली नसेल असा बिनदखली अपराध करीत असेल व अशी व्यक्ती जर— ताकीद मानण्याचे किंवा पोलिसाबरोबर जाण्याचे नाकारणे.

(एक) पोलीस अधिका-यांकडून ताकीद मिळाल्यानंतर असा अपराध करण्याचे चालू ठेवील, किंवा

(दोन) पोलीस अधिका-याने आपल्याबरोबर पोलीस ठाण्यावर येण्यास सांगितले असता त्याच्या बरोबर तेथे जाण्याचे, नाकारील,

तर तिला अधिपत्राशिवाय अटक करू शकेल.

**८२.** (१) पोलीस,— दावा न सांगितलेली मालमत्ता पोलिसाने ताब्यात घेणे.

(क) त्यांना सापडलेल्या किंवा त्यांच्या स्वाधीन केलेल्या, दावा न सांगितलेल्या सर्व मालमत्तेचा व त्याचप्रमाणे;

(ख) जी कोणतीही मालमत्ता सार्वजनिक रस्त्यावर असल्याचे आढळून येईल ती मालमत्ता काढून नेण्याविषयी तिच्या मालकास किंवा ती स्वाधीन असलेल्या व्यक्तीस निदेश देण्यात आला असताही ती, मालमत्ता काढून नेण्याचे नाकारील किंवा तसे करण्याचे टाळील; तर त्या सर्व मालमत्तेचा तात्पुरता ताबा घेतील.

(२) [1][ज्या क्षेत्रासाठी आयुक्ताची नेमणूक करण्यात आली आहे अशा कोणत्याही क्षेत्रात] ज्या मालमत्तेचा पोलिसांनी पोट-कलम (१) अन्वये ताबा घेतला असेल ती मालमत्ता आयुक्ताच्या स्वाधीन करण्यात येईल.

**८३.** (१) [1][आयुक्ताच्या प्रभाराखालील कोणत्याही क्षेत्रात] जर कलम ८२ मध्ये निर्देश केलेल्या स्वरूपाची कोणतीही मालमत्ता मृत्यूपत्र न करता मरण पावलेल्या व्यक्तीने मागे ठेवलेली असून ती चारशे रुपयांहून कमी किंमतीची नाही असे आढळून आले तर, आयुक्त, महाप्रशासक अधिनियम, १९१३ याच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कायद्याच्या तरतुदींअन्वये तिची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने महाप्रशासकाला कळवील. चारशे रुपयांहून अधिक मूल्याची विनामृत्यूपत्र मालमत्ता.

१९१३ चा २.

(२) [2][ आयुक्ताच्या प्रभाराबाहेरील क्षेत्रात ] ती मालमत्ता, ज्या नगरात किंवा गावात ती आढळून आली असेल त्या नगराचा किंवा गावाचा कोणताही पोलीस पाटील असल्यास त्याच्या स्वाधीन करण्यात येईल आणि त्यादाखल पोलीस पाटलाकडून पावती घेण्यात येईल, आणि पोलीस पाटील ज्या दंडाधिका-यास तो दुय्यम असेल त्या दंडाधिका-याकडे अशी मालमत्ता पाठवील. जर अशा कोणत्याही बाबतीत अशा नगराचा किंवा गावाचा पोलीस पाटील नसेल तर, पोलीस त्या जिल्ह्याचा दंडाधिकारी याबाबतीत वेळोवेळी नियुक्त करील अशा दंडाधिका-याकडे ताबडतोब प्रतिवृत्त पाठवील आणि त्यांनतर प्रथम निर्देश केलेला उक्त दंडाधिकारी निदेश देईल त्यानुसार कृती करील.

---

[1] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "बृहन्मुंबईत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३, अनुसूची अन्वये "बृहन्मुंबईबाहेरील प्रदेशात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

चारशे रुपयांहून अधिक मूल्याची विनामृत्यूपत्र मालमत्ता.

८४. कलम ८३ अन्वये किंवा मुंबई ग्राम पोलीस अधिनियम, १८६७ याच्या [१][ किंवा मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशात अंमलात असलेल्या त्या अधिनियमाच्या कलम १९ अन्वये किंवा सौराष्ट्र ग्राम पोलीस अध्यादेश, १९४९ याच्या कलम २१ अन्वये ] ज्या मालमत्तेसंबंधी दंडाधिका-याकडे प्रतिवृत्त पाठविण्यात आले असेल ती मालमत्ता मृत्यूपत्र न करता मरण पावला आहे आणि जिचे ज्ञात वारस नाहीत अशा व्यक्तीने मागे सोडलेली असून ती जाहीर लिलावात विकल्यास तिचे चारशे रुपयांहून अधिक निव्वळ उत्पन्न येण्याचा संभव आहे असे जर दंडाधिका-यास आढळून येईल तर तो सन १८२७ चा मुंबई विनियम ८ च्या कलम १० च्या तरतुदींअन्वये (वारस इत्यादींस रीतसर मान्यता देण्याकरिता तरतूद करणारा विनियम) किंवा अंमलात असलेल्या इतर कायद्यान्वये तिची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने जिल्हा न्यायाधीशास कळवील.

१८६७ चा मुंबई ८. १९४९ चा सौराष्ट्र अध्या-देश ३१.

इतर बाबतीतील कामकाजाची पद्धती.

८५. (१) कलम ८३ किंवा ८४ च्या कक्षेत नसलेल्या कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत, संबंधित आयुक्त [२][अधीक्षक] किंवा, यथास्थिति, दंडाधिकारी एक उद्‌घोषणापत्र काढील व त्याद्वारे, अशा मालमत्तेमध्ये ज्यांच्या समावेश असेल त्या वस्तू विनिर्दिष्ट करील व त्यावर ज्या कोणत्याही व्यक्तीचा हक्क असेल तिने अशा उद्‌घोषणापत्राच्या दिनांकापासून [३] [दोन महिन्यांच्या आत] आपल्या समक्ष किंवा याबाबतीत तो ज्या कोणत्याही इतर अधिका-यास नेमील त्याच्या समक्ष उपस्थित राहण्यास व आपला हक्क प्रस्थापित करण्यास फर्मावील.

नाशिवंत माल ताबडतोब विकण्याचा अधिकार.

(२) जर ती मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग त्वरित व स्वाभाविकरीत्या लवकर नाश पावणारा असेल किंवा तीत पशुधन समाविष्ट असेल तर किंवा ती मालमत्ता [४][दोन हजार पाचशे रुपयांहून कमी किंमतीची] दिसून येत असेल तर, तिची संबंधित आयुक्ताच्या [५][अधीक्षकाच्या] किंवा, यथास्थिति, दंडाधिका-याच्या आदेशान्वये ताबडतोब लिलावाने विक्री करण्यात येईल आणि अशा विक्रीच्या निव्वळ उत्पन्नाची व्यवस्था उक्त मालमत्तेच्या विल्हेवाटीच्या, यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीनेच करील.

मालमत्ता, तिच्यावर हक्क असलेल्या व्यक्तीच्या स्वाधीन करणे.

८६. (१) संबंधित, आयुक्त [६][किंवा अधीक्षक] किंवा, यथास्थिति, दंडाधिकारी कलम ८५ च्या पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या उद्‌घोषणापत्रात विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेच्या कब्जाबाबत किंवा प्रशासनाबाबत दावा सांगणा-या कोणत्याही व्यक्तीच्या हक्काबद्दल त्याची खात्री झाल्यानंतर, ती ताब्यात घेण्यासाठी किंवा अटकावून ठेवण्यासाठी पोलिसांनी योग्यरीतीने केलेला खर्च वजा करून किंवा तो देण्यात आल्यानंतर ती त्या दावा सांगणा-याच्या स्वाधीन करावी असा आदेश देईल.

प्रतिभूती घेण्याचा अधिकार.

(२) संबंधित, आयुक्त [७][किंवा अधीक्षक] किंवा, यथास्थिति, दंडाधिकारी यास, स्वेच्छानिर्णयानुसार, पोट-कलम (१) अन्वये कोणताही आदेश देण्यापूर्वी, उक्त मालमत्ता ज्या व्यक्तीच्या स्वाधीन करावयाची असेल त्या व्यक्तीकडून त्यास योग्य वाटेल अशी प्रतिभूती घेता येईल आणि अशा आदेशान्वये ती मालमत्ता ज्या व्यक्तीच्या स्वाधीन केली असेल त्या व्यक्तीकडून ती संबंध मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग परत घेण्याबद्दलच्या कोणत्याही व्यक्तीच्या हक्कास, यात याआधी अंतर्भूत असलेल्या कोणत्याही मजकुरामुळे बाध येणार नाही.

मालमत्तेवर कोणी दावा न सांगितल्यास ती राज्य शासनाच्या स्वाधीन असणे.

८७. उद्‌घोषणापत्रात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत कोणत्याही व्यक्तीने अशा मालमत्तेवर आपला हक्क प्रस्थापित केला नाही तर ती राज्य शासनाच्या स्वाधीन राहील व कलम ८५ च्या पोट-कलम (२) अन्वये ती मालमत्ता किंवा तिचा न विकलेला भाग, संबंधित आयुक्ताच्या [८] [किंवा अधीक्षकाच्या] किंवा, यथास्थिति, दंडधिका-याच्या आदेशान्वये लिलावाने विकता येईल.

---

[१] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८४ याच्या कलम २७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १० (अ) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १० (अ) (दोन) अन्वये " सहा महिन्यांच्या आत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १० (ब) (एक) अन्वये " पाच रुपयांहून कमी किंमतीची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १० (ब) (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ११ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ११ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम १२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

१९२५ चा ३९, १९१३ चा ३. **८८.** भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ किंवा महाप्रशासक अधिनियम, १९१३, यामधील कोणताही मजकूर कलम ८५ च्या पोट-कलम (१) अन्वये आयुक्ताने जिची व्यवस्था केली आहे अशा विनामृत्युपत्र मालमत्तेस लागू होणार नाही ; तसेच सन १८२७ चा विनियम ८ कलम १० च्या [१] [किंवा अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्याच्या] तरतुदी कलम ८५, पोट-कलम (१) अन्वये दंडधिका-याने जिची व्यवस्था केली आहे अशा विनामृत्युपत्र मालमत्तेस लागू होतात असे समजण्यात येणार नाही. भारतीय उत्तराधिकार अधिनियम किंवा महाप्रशासक अधिनियम किंवा सन १८२७ चा विनियम ८ [२] [किंवा तत्सम कायदा] यामुळे कार्यपध्दतीस बाध न येणे.

**८९.** [३] [आयुक्ताच्या प्रभाराबाहेरील कोणत्याही क्षेत्रात] पोलीस अधिका-यास गुरे अपप्रवेश अधिनियम, १८७१ [४][[५][* * * किंवा, यथास्थिति, हैद्राबाद गुरे अपप्रवेश अधिनियम] यांच्या तरतुदींच्या] कक्षेत येणारे जे कोणतेही जनावर रस्त्यावर भटकताना आढळून येईल ते ताब्यात घेता येईल आणि त्यास जवळच्या कोंडवाड्यात घेऊन जाता येईल किंवा पाठविता येईल आणि त्यानंतर त्या जनावराचा मालक व इतर संबंधित व्यक्ती [६] [संबंधित अधिनियमाच्या] तरतुदीच्या अधीन असतील. पोलीस अधिका-यास मोकाट गुरे ताब्यात घेता येतील.

१८७१ चा १, १३३७ फसलीचा हैदराबाद ५.

**९०.** (१) [७] [आयुक्ताच्या प्रभाराखालील [८] [ (बृहन्मुंबईव्यतिरिक्त) ] कोणत्याही क्षेत्रात] आयुक्त [९][* * *] वेळोवेळी त्यास योग्य वाटतील अशा जागा सार्वजनिक कोंडवाड्यासाठी नेमून देईल ; व त्यास, राज्य शासन, संमत करील अशा दर्जाच्या पोलीस अधिका-यांना अशा कोंडवाड्यांचे रक्षक म्हणून नेमता येईल. गुरांचे कोंडवाडे उघडण्याचा व कोंडवाड्यांचे रक्षक नेमण्याचा अधिकार.

(२) अशा रीतीने नेमलेला प्रत्येक कोंडवाडा रक्षक आपली कर्तव्ये करीत असताना, आयुक्ताच्या [१०][* * *] निदेशाच्या व नियंत्रणाच्या अधीन असेल.

---

१. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २८ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
२. वरील अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
३. १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " बृहन्मुंबईबाहेरील कोणत्याही प्रदेशात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
४. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २९ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
५. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " किंवा मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशात अंमलात असलेल्या अधिनियमाच्या " हा मजकूर वगळण्यात आला.
६. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २९ (२) अन्वये " उक्त अधिनियमाचे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
७. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " बृहन्मुंबई " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
८. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ५ व ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
९. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ९ अन्वये " आणि राज्य सरकार सरकारी राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द करून या कलमाचे उपबंध व या अधिनियमाची कलमे ९१, ९२, ९३ व ९४ यांचे उपबंध ज्या क्षेत्रांना लागू करील अशा इतर क्षेत्रात राज्य सरकारने त्याबाबतीत नेमलेल्या कोणत्याही अधिका-याने " हा मजकूर वगळण्यात आला.
१०. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ९ अन्वये " अथवा उपनिर्दिष्ट अशा अधिका-याचा " हा मजकूर वगळण्यात आला.

गुराढोरांना रस्त्यावर भटकू देणे किंवा खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अपप्रवेश करु देणे याबद्दल शास्ती.

[१][९०-क. (१) [२][आयुक्ताच्या प्रभाराखालील [३][(बृहन्मुंबईव्यतिरिक्त)] कोणत्याही क्षेत्रातील] जी कोणतीही व्यक्ती आपल्या मालकीची किंवा आपल्या ताब्यात असलेली गुरेढोरे कोणत्याही रस्त्यावर भटकू देईल किंवा त्यांना खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अपप्रवेश करु देईल अशा व्यक्तीस अपराधसिध्दीनंतर—

(एक) पहिल्या अपराधाबद्दल एक महिन्यापर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा [४] [तीन हजार रुपयापर्यंत] असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(दोन) दुस-या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल सहा महिन्यापर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा [५] [पाच हजार रुपयापर्यंत] असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये न्यायचौकशी करणा-या दंडाधिका-यास खालील आदेश देता येतील :–

(क) आरोपी, त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या गुराढोरांनी ज्या व्यक्तीच्या जमिनीवर अपप्रवेश केल्यामुळे तिच्या मालमत्तेस किंवा जमिनीच्या उत्पन्नास कोणतेही नुकसान झाल्याचे सिध्द झाले आहे अशा कोणत्याही व्यक्तीस, दंडाधिका-यास, वाजवी वाटेल अशी [६] [दोन हजार रुपयांहून अधिक] नसणारी नुकसानभरपाई देईल ; आणि तसेच

(ख) ज्या गुराढोरांच्या बाबतीत अपराध घडला आहे अशी गुरेढोरे राज्य शासनाकडे सरकार जमा करण्यात येतील.

(३) पोट-कलम (२) अन्वये मंजूर केलेली कोणतीही नुकसानभरपाई, जणू या कलमान्वये लादण्यात आलेला दंड आहे असे समजून वसूल करता येईल.

(४) या कलमाखालील अपराध हा दखलपात्र असेल.]

गुरांना कोंडवाड्यात टाकणे.

**९१.** जी कोणतीही गुरे [२] [आयुक्तांच्या प्रभाराखालील [३] [(बृहन्मुंबईव्यतिरिक्त)] कोणत्याही क्षेत्रात] [७][* * *] कोणत्याही रस्त्यावर भटकतांना किंवा कोणत्याही खाजगी, किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण करताना आढळतील अशी गुरे पकडणे व ती अशा कोणत्याही सार्वजनिक कोंडवाड्यात कोंडून ठेवण्याकरता नेणे हे प्रत्येक पोलीस अधिका-याचे कर्तव्य असेल व इतर कोणत्याही व्यक्तीने तसे करणे हे कायदेशीर असेल.

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम १० अन्वये कलम ९०-क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " बृहन्मुंबईत " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या अनुक्रमे कलमे ५ व ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, याच्या कलम १३ (अ) (एक) अन्वये " तीनशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या, कलम १३ (अ) (दोन) अन्वये " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या, कलम १३ (अ) (तीन) अन्वये " दोनशे पन्नास रुपयांहून अधिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९५३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ११ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

**९२.** कलम ९१ अन्वये कोंडवाड्यात घातलेल्या गुरांच्या मालकाने किंवा त्याच्या अभिकर्त्याने हजर होऊन त्या गुरांवर हक्क सांगितला तर त्या कोंडवाड्याचा रक्षक अशा गुरांच्या संबंधाने कलम ९४ अन्वये आकारण्याजोगी कोंडवाड्याची फी व खर्च देण्यात आल्यावर, ती त्याच्या स्वाधीन करील. दावा सांगितलेली गुरे स्वाधीन करणे.

**९३.** (१) एखाद्या जनावरास कोंडवाड्यात घातल्यानंतर दहा दिवसांच्या आत, त्या जनावराचा मालक म्हणून कोणत्याही व्यक्तीने कलम ९४ अन्वये आकारण्यात आलेली कोणतीही कोंडवाड्याची फी व खर्च दिला नाही तर, असे जनावर ताबडतोब लिलावाने विकण्यात येईल आणि विक्रीपासून आलेल्या उत्पन्नातून उपरिनिर्दिष्ट फी व खर्च वजा करण्यात आल्यावर शिल्लक राहिलेली रक्कम, जी कोणतीही व्यक्ती, विक्रीनंतर पंधरा दिवसाच्या आत या संबंधात आयुक्त प्राधिकृत करील अशा अधिका-याची [१][* * *] खात्री होईल अशा रीतीने आपण त्या जनावराचा मालक होतो, असे सिद्ध करील, तिला देईल आणि इतर कोणत्याही बाबतीत ती राज्याच्या एकत्रित निधीचा भाग होईल. दावा न सांगितलेल्या गुराढोरांची विक्री.

(२) कोणताही पोलीस अधिकारी किंवा कोंडवाड्याचा रक्षक, पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेल्या विक्रीच्या वेळी कोणतीही गुरे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने विकत घेणार नाही.

**९४.** (१) आकारावयाची कोंडवाड्याची फी ही, राज्य शासन जनावराच्या प्रत्येक जातीसाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे [२][* * *] वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल. अधिसूचनेद्वारे दर ठरविणे.

(२) आकारण्यात येणारा खर्च हा, जनावराला ज्या दिवसाच्या कोणत्याही भागामध्ये कोंडवाड्यात ठेवले असेल त्या प्रत्येक दिवसाबद्दल,आयुक्त [३][* * *] अशा जनावराच्या संबंधात वेळोवेळी ठरवील त्या दराप्रमाणे असेल.

१८९८ चा ५ **९५.** (१) * फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या कलम १५३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी [४][आयुक्ताच्या प्रभाराखाली असलेल्या कोणत्याही क्षेत्रात] आयुक्ताने आणि इतरत्र [५][अधीक्षकाने] किंवा राज्य शासनाने या बाबतीत विशेष रीतीने अधिकार दिलेल्या इतर कोणत्याही अधिका-याने, सामान्यतः किंवा विशेष रीतीने प्रतिनियुक्त केलेल्या कोणत्याही पोलीस अधिका-यास कोणत्याही दुकानात किंवा जागेत जी कोणतीही वजने किंवा मापे किंवा वजन करण्याची किंवा मापण्याची कोणतीही उपकरणे वापरण्यात येत असतील किंवा ठेवण्यात येत असतील ती तपासण्यासाठी किंवा झडती घेण्यासाठी त्या दुकानात किंवा जागेत अधिपत्राशिवाय प्रवेश करता येईल. खोटी वजने व मापे तपासणे, त्याबद्दल झडती घेणे आणि ती जप्त करणे यासंबंधीचे अधिकार.

---

१. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १२ अन्वये " अथवा कलम ९० अन्वये नेमलेल्या इतर कोणत्याही अधिका-याची " हा मजकूर वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १३(१) अन्वये " संबंध राज्यासाठी अथवा या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रवेशासाठी " हा मजकूर वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या, कलम १३ (२) अन्वये " अथवा वर सांगितल्याप्रमाणे नेमण्यात आलेला कोणताही अधिकारी " हा मजकूर वगळण्यात आला.

४. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " बृहन्मुंबई " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " जिल्हा अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २), पहा.

(२) जर अशा दुकानात किंवा जागेत जी खोटी असल्याचे त्यास सकारण वाटत असेल अशी वजने किंवा मापे किंवा वजन करण्याची किंवा मापण्याची उपकरणे सापडली तर, ती त्यास जप्त करता येतील आणि तो अशा रीतीने जप्त करण्यात आल्याबद्दलची माहिती अधिकारिता असणा-या दंडाधिका-यास ताबडतोब देईल आणि अशी वजने, मापे किंवा उपकरणे खोटी असल्याचे दंडाधिका-यास आढळून आले तर तो ती नष्ट करील;

(३) वेळोवेळी, अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये ज्यांची मानके ठरविण्यात आलेली आहेत अशी वजने व मापे म्हणून त्याच अभिधानाची असल्याचे अभिप्रेत असलेली वजने व मापे ही त्या मानकांनुसार नसल्यास या कलमाच्या अर्थांतर्गत खोटी असल्याचे समजण्यात येईल.

विवक्षित बाबतीत अधिका-यांनी व दंडाधिका-यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती.

**९६.** (१) *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ याची कलमे १२९, १३०, १६७ चे पोट-कलम (२) आणि कलम १७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,— १८९८ चा ५.

(एक) [1][आयुक्ताच्या प्रभाराखालील कोणत्याही क्षेत्रात] आयुक्तास, त्या संहितेची कलमे १२९ आणि १३० खालील दंडाधिका-याच्या अधिकारांचा वापर करता येईल आणि कर्तव्ये पार पाडता येतील.

(दोन) संहितेच्या कलम १६७ च्या पोट-कलम (२) अन्वये एखाद्या आरोपी व्यक्तीस ज्या इलाखा शहर दंडाधिका-याकडे पाठविण्यात आले असेल त्या इलाखा शहर दंडाधिका-यास, उक्त खटला चालविण्याची त्यास अधिकारिता असो, वा नसो, उक्त आरोपीस त्यास योग्य वाटेल अशा अभिरक्षेत एका वेळेस जास्तीत जास्त पंधरा दिवसांच्या मुदतीसाठी अटकावून ठेवण्याबद्दल वेळोवेळी प्राधिकृत करता येईल.

(तीन) पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी संहितेच्या कलम १७३ अन्वयेचे खालील त्याचे प्रतिवृत्त आयुक्ताकडे किंवा आयुक्त या बाबतीत निदेश देईल अशा इतर अधिका-याकडे पाठवील.

(२) *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या कलम ६२ मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट [1][आयुक्ताच्या प्रभाराखालील कोणत्याही क्षेत्रातील] पोलीस ठाण्याचा प्रभारी असलेल्या कोणत्याही अधिका-यास उक्त कलमात तरतूद करण्यात आलेले कोणतेही प्रतिवृत्त कोणत्याही दंडाधिका-याकडे सादर करण्यास भाग पाडण्यासाठी लागू होणार नाही. १८९८ चा ५.

(३) *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ ची कलमे १२७ आणि १२८ ही बृहन्मुंबईस [2][आणि ज्या क्षेत्रासाठी आयुक्ताची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही इतर क्षेत्रास] लागू करताना त्यांच्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :— १८९८ चा ५.

---

[1] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " बृहन्मुंबई " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमान्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २), पहा.

(क) कलम १२७ मधील " पोलीस ठाणे स्वाधीन असणा-या अंमलदारास " या मजकुराऐवजी " विभाग स्वाधीन असणा-या अधिका-यास " किंवा या बाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या उपनिरीक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिका-यास हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ख) कलम १२८ मधील " पोलीस ठाणे स्वाधीन असणा-या अंमलदारास " मग तो इलाखा शहरातील असो किंवा त्या शहराबाहेरील असो, या मजकुराऐवजी विभाग स्वाधीन असणा-या अधिका-यास किंवा कलम १२७ अन्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही पोलीस अधिका-यास हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**९७.** पोलीस शिपायाच्या दर्जाहून वरच्या दर्जाच्या कोणत्याही पोलीस अधिका-यास, आपल्या हाताखालील कोणत्याही अधिका-यास, कायद्याद्वारे किंवा कायदेशीर आदेशाद्वारे नेमून दिलेले कोणतेही कर्तव्य पार पाडता येईल, आणि अशा हाताखालच्या अधिका-याकडे सोपविण्यात आलेल्या कोणत्याही कर्तव्याच्या बाबतीत, वरिष्ठ अधिका-यास त्यास आवश्यक वाटेल त्याबाबतीत कायद्याची पूर्णपणे किंवा सुकर अंमलबजावणी व्हावी किंवा त्याचे उल्लंघन होऊ नये म्हणून तसे आवश्यक व इष्ट वाटेल तेव्हा त्याच्या हाताखालच्या अधिका-याच्या कार्यवाहीत स्वतःच्या किंवा त्याच्या समादेशानुसार किंवा प्राधिकारान्वये कायदेशीर कार्यवाही करणा-या कोणत्याही व्यक्तीच्या कार्यवाहीद्वारे मदत करता येईल, भर घालता येईल, ती निष्प्रभावी करता येईल किंवा तीस प्रतिबंध करता येईल.

वरिष्ठ दर्जाच्या पोलीस अधिका-यास त्यांच्यापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिका-याकडे सोपविलेली कर्तव्ये करता येतील.

**९८.** (१) राज्य शासनाला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणतीही विनिर्दिष्ट सेवा समाजास अत्यावश्यक सेवा म्हणून घोषित करता येईल;

निकडीच्या प्रसंगी पोलिसांची कर्तव्ये.

परंतु, अशी अधिसूचना, प्रथमतः एक महिन्यासाठी अंमलात राहील, परंतु तिची मुदत वेळोवेळी तशाच अधिसूचनेद्वारे वाढविता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये घोषणा केल्यानंतर, आणि जोपर्यंत ती अंमलात असेल तोपर्यंत, घोषणेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सेवेवर रुजू होण्याच्या संबंधात किंवा सेवेच्या बाबतीत वरिष्ठ अधिका-याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करणे हे प्रत्येक पोलीस अधिका-याचे कर्तव्य असेल, आणि असा प्रत्येक आदेश हा, या अधिनियमाच्या अर्थांतर्गत व प्रयोजनांकरिता कायदेशीर आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण सात

# अपराध व शिक्षा

सडकेसंबंधीचे नियम न पाळणे.

**९९.** कोणतीही व्यक्ती,—

(क) रस्त्यावरून वाहन चालवतेवेळी आणि विचलित होण्यासाठी प्रत्यक्ष आवश्यकता किंवा पुरेसे कारण असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, अशा सडकेच्या डाव्या बाजूने जाण्यात कसूर करणार नाही आणि ती पुढे जात असेल आणि त्याच दिशेने अन्य वाहन जात असेल तेव्हा अशा वाहनाच्या उजव्या बाजूस राहण्यात कसूर करणार नाही ; किंवा

अपुरी देखरेख असलेली गुरे-ढोरे वगैरे रस्त्यावर सोडून देणे.

(ख) कोणत्याही रस्त्यात किंवा सार्वजनिक ठिकाणी अपु-या रीतीने देखरेख किंवा सुरक्षा ठेवण्यात आलेला कोणताही प्राणी किंवा वाहन सोडून जाणार नाही.

प्राण्याकडून अडथळा किंवा खोडी करविणे.

**१००.** कोणतीही व्यक्ती,—

(एक) कोणताही प्राणी किंवा वाहन हाकताना, सांभाळताना, हाताळताना किंवा त्याची काळजी घेताना कोणत्याही प्रकारच्या गैरवर्तनाने, निष्काळजीपणाने किंवा गैर वापराने , किंवा

(दोन) इमारती लाकूड, काठ्या किंवा अवजड वस्तू यांनी लादलेले कोणतेही वाहन किंवा प्राणी, त्याबाबतीत सक्षम प्राधिका-याने केलेल्या व प्रसिध्द केलेल्या कोणत्याही विनियमाविरुध्द सडकेवरून किंवा सार्वजनिक जागेमधून हाकण्याने;

कोणत्याही सडकेवर किंवा सार्वजनिक जागेत अडथळा, नुकसान, हानी, धोका, भय किंवा अपाय करणार नाही.

प्राणी भाड्याने देण्याकरिता किंवा विकण्याकरिता, वगैरे ठेवणे.

**१०१.** कोणतीही व्यक्ती, सक्षम प्राधिकारी परवानगी देईल त्या वेळेखेरीज व त्या जागेखेरीज कोणत्याही रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी रहदारीस गंभीर स्वरूपाचा अडथळा होईल किंवा तेथे राहणा-यांना किंवा लोकांना फार अतिशय त्रास होईल अशा रीतीने, कोणताही प्राणी किंवा वाहन भाड्याने देण्याकरिता किंवा विकण्याकरिता ठेवणार नाही, कोणतेही फर्निचर किंवा वाहन स्वच्छ करणार नाही किंवा कोणताही घोडा किंवा इतर प्राणी धुणार नाही किंवा त्यास खरारा करणार नाही किंवा कोणत्याही घोड्यास किंवा प्राण्यास शिकविणार नाही किंवा घुसविणार नाही किंवा कोणतेही वाहन किंवा वाहनाचा भाग तयार करणार नाही किंवा एखाद्या अपघाताच्या प्रसंगी जागच्याजागी दुरुस्त करणे आवश्यक असेल त्याव्यतिरिक्त, कोणतेही वाहन किंवा वाहनाचा भाग दुरुस्त करणार नाही किंवा त्या ठिकाणी कोणतेही उत्पादन कार्य किंवा काम चालू करणार नाही.

**१०२.** कोणतीही व्यक्ती कोणत्याही रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी, जो कोणताही प्राणी किंवा वाहन यावर ओझे लादावयाचे किंवा त्यावरून ओझे उतरवावयाचे असेल किंवा उतारू घ्यावयाचे किंवा उतरवावयाचे असतील त्या प्राण्यास किंवा वाहनास, अशा प्रयोजनासाठी आवश्यक असेल अशा वेळेपेक्षा अधिक वेळ राहू देऊन किंवा उभे करून किंवा त्या ठिकाणी कोणतेही वाहन उभे ठेवून किंवा कोणतीही गुरे बांधून किंवा रस्त्याच्या किंवा सार्वजनिक जागेच्या कोणत्याही भागाचा वाहनासाठी किंवा गुरांसाठी थांबण्याच्या ठिकाणासारखा उपयोग करून किंवा रस्त्यात किंवा रस्त्यावर कोणतीही पेटी, गठ्ठा, गासडी किंवा इतर कोणतीही वस्तू गैरवाजवी वेळेपर्यंत राहू देऊन किंवा सक्षम प्राधिका-याने तयार केलेल्या व प्रसिध्द केलेल्या कोणत्याही विनियमाविरुध्द कोणतेही दुकान, टपरी, फळी, पिंप, टोपली यात किंवा यावर कोणतीही वस्तू विकावयास ठेवून किंवा मांडून किंवा इतर कोणत्याही रीतीने रस्त्यात अडथळा निर्माण करणार नाही.

रस्त्यावर कोणताही अडथळा निर्माण करणे.

**१०३.** कोणतीही व्यक्ती पायवाटेवर, बाबागाडीखेरीज कोणतेही वाहन किंवा प्राणी हाकून नेणार नाही किंवा त्याच्यावर बसून जाणार नाही किंवा त्यास ओढून नेणार नाही किंवा त्यास लोटून नेणार नाही किंवा त्यास सोडून देणार नाही किंवा अशा पायवाटेवर आडवा किंवा उभा राहील अशा रीतीने कोणताही प्राणी बांधून ठेवणार नाही.

पायवाट अडवणे.

**१०४.** [१] [महसूल आयुक्त किंवा आयुक्त] किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी याने केलेल्या आणि आधिसूचित केलेल्या, कोणत्याही विनियमाविरुध्द, कोणतीही व्यक्ती, कोणत्याही रस्त्यामध्ये किंवा सार्वजनिक ठिकाणी गर्दी जमेल अशा प्रकारचे कोणतेही नकलांचे, गायनवादनाचे, किंवा इतर प्रकारचे कार्यक्रम दाखविणार नाही किंवा जाणा-या येणा-या लोकांना अडथळा होईल किंवा रहिवाशांना त्रास होईल अशा प्रकारे मोठ्या जाहिराती, चित्रे, आकृत्या किंवा चिन्हे नेणार नाही.

नकलांचे, गायन-वादनाचे किंवा इतर प्रकारचे खेळ करणे.

**१०५.** कोणतीही व्यक्ती, कोणत्याही रस्त्यामध्ये किंवा रस्त्याजवळ किंवा रस्त्यावरून दिसेल अशा ठिकाणी किंवा सार्वजनिक ठिकाणी (सक्षम प्राधिका-याच्या आदेशान्वये त्या प्रयोजनाकरिता अलग राखून ठेवण्यात आलेल्या ठिकाणी असेल त्या व्यतिरिक्त) जवळच्या रहिवाशींना किंवा जाणा-या येणा-या लोकांना त्रास होईल अशा रीतीने कोणत्याही प्राण्याची कत्तल करणार नाही, प्राण्याचे शव किंवा कातडे धुणार नाही किंवा स्वतः स्नान करणार नाही किंवा अंग धुणार नाही.

रस्त्यावर किंवा रस्त्याजवळ किंवा सार्वजनिक जागी किंवा त्या जागेजवळ क्षोभक कृत्ये करणे.

**१०६.** कोणतीही व्यक्ती कोणत्याही रस्त्यात किंवा सार्वजनिक ठिकाणी,—

घोडे, वगैरे मोकळे सोडणे व हिंस्त्र कुत्री मोकळी राहू देणे.

(क) धोका, इजा, भय किंवा त्रास होईल अशा रीतीने कोणत्याही घोड्यास किंवा इतर प्राण्यास निष्काळजीपणाने मोकळे सोडणार नाही किंवा कोणत्याही हिंस्त्र कुत्र्यास मुसकी बांधल्यावाचून मोकळे राहू देणार नाही, किंवा

(ख) कोणत्याही व्यक्तीवर किंवा घोड्यावर किंवा इतर प्राण्यावर चालून जाण्यासाठी, त्याला त्रास देण्यासाठी किंवा भिवविण्यासाठी कोणत्याही कुत्र्यास किंवा इतर प्राण्यास अंगावर सोडणार नाही किंवा प्रेरित करणार नाही.

---

[१] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ५, अन्वये "कमिशनर" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१०७.** सक्षम प्राधिका-याच्या आदेशाद्वारे स्नानाकरिता किंवा धुण्याकरिता अलग राखून न ठेवलेल्या कोणत्याही सार्वजनिक विहिरीत, तलावात किंवा जलाशयात किंवा त्याच्याजवळ किंवा सक्षम प्राधिका-याच्या आदेशाद्वारे ज्यामध्ये अशा स्नानास किंवा धुण्यास मनाई करण्यात आली असेल अशा कोणत्याही तळ्यात, कुंडात, जलसेतूमध्ये किंवा नदीच्या, ओढ्याच्या, नाल्याच्या किंवा पाणी पुरवठ्याच्या स्त्रोताच्या किंवा साधनाच्या भागात किंवा त्याच्याजवळ, कोणतीही व्यक्ती स्नान करणार नाही किंवा धुणार नाही.

स्वतंत्रपणे राखून न ठेवलेल्या जागी स्नान करणे किंवा धुणे.

**१०८.** कोणतीही व्यक्ती कोणत्याही सार्वजनिक विहिरीतील, तलावातील, जलाशयातील, कुंडातील, तळ्यातील, जलसेतुमधील किंवा नदीच्या, ओढ्याच्या, नाल्याच्या किंवा पाणी पुरवठ्याच्या इतर स्त्रोताच्या किंवा साधनाच्या कोणत्याही भागातील पाणी, ते ज्या कोणत्याही प्रयोजनासाठी सक्षम प्राधिका-याच्या आदेशाद्वारे अलग राखून ठेवलेले असेल त्या प्रयोजनासाठी ते कमी उपयुक्त होईल अशा रीतीने दूषित करणार नाही किंवा करविणार नाही.

सार्वजनिक विहिरी, वगैरेमधील पाणी दूषित करणे.

**१०९.** कोणतीही व्यक्ती, कलम १०७ अन्वये सक्षम प्राधिका-याच्या आदेशाद्वारे स्नानासाठी अलग राखून ठेवलेल्या कोणत्याही ठिकाणी स्नान करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, बुध्दिपुरस्सर अनधिप्रवेश करून किंवा ते ठिकाण ज्या प्रयोजनासाठी अलग राखून ठेवलेले असेल अशा प्रयोजना व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी त्याचा वापर करून, अडथळा किंवा तिची गैरसोय करणार नाही.

स्नान करणा-यांस अडथळा करणे.

**११०.** कोणतीही व्यक्ती, कोणत्याही रस्त्यात किंवा सार्वजनिक ठिकाणी किंवा कोणत्याही रस्त्यातून किंवा सार्वजनिक ठिकाणातून दृष्टीस पडेल अशा प्रकारे व दिसेल अशा रीतीने, मग कोणतेही घर किंवा इमारत यातून दृष्टीस पडो किंवा न पडो, बुध्दिपुरस्सर व असभ्यपणे आपले शरीर उघडे टाकणार नाही किंवा कोणत्याही रस्त्यात किंवा लोकांच्या येण्याजाण्याच्या ठिकाणी किंवा कोणत्याही कार्यालयात, स्थानकात किंवा ठाणेघरात असभ्य भाषा वापरणार नाही किंवा असभ्य रीतीने किंवा दांडगाईने किंवा गैरशिस्तीने वागणार नाही.

लोकांसमोर असभ्य वर्तन करणे.

**१११.** कोणतीही व्यक्ती, रस्त्यावरील किंवा सार्वजनिक जागेतील कोणत्याही उतारूस जाणूनबुजून ढकलणार नाही, दाटी करणार नाही, धक्का देणार नाही किंवा अडथळा करणार नाही किंवा आडदांडपणाच्या हालचाली करून, धमकावणीचे हावभाव करून, विनाकारण कोणत्याही मनुष्यास त्रास देऊन, किंकाळ्या फोडून, ओरडून, घोड्यास किंवा गुरास जाणूनबुजून भिववून किंवा अन्य प्रकारे सार्वजनिक शांततेचा किंवा सुव्यवस्थेचा भंग करणार नाही.

रस्त्यावरील प्रवाशांना अडथळा करणे किंवा त्रास देणे.

**११२.** कोणतीही व्यक्ती, शांततेचा भंग व्हावा अशा उद्देशाने किंवा ज्यांपासून शांततेचा भंग घडून येईल असे धमकीचे, शिवराळ किंवा अपमानकारक शब्द किंवा वर्तणूक यांचा कोणत्याही रस्त्यात किंवा सार्वजनिक जागेत वापर करणार नाही.

शांततेचा भंग व्हावा अशा उद्देशाने गैरवर्तन करणे.

**११३.** कोणतीही व्यक्ती इतर व्यक्तींना, [१] [घोड्यांना] किंवा मालमत्तेस धोका, इजा किंवा भय यास कारणीभूत होईल अशा रीतीने पतंग उडविणार नाही.

पतंग उडविण्यास मनाई.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३, दुस-या अनुसूची अन्वये " घरांना " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**११४.** [ भिक्षा मागणे व दुर्गंधीयुक्त रोग उघड करणे ] हे कलम सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १० याच्या कलम १ (४), अनुसूची अन्वये निरसित करण्यात आले.

**११५.** कोणतीही व्यक्ती, कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्याजवळ, सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ किंवा लोकांच्या येण्याजाण्याच्या ठिकाणी किंवा अशा ठिकाणाजवळ, — रस्त्यात किंवा रस्त्याजवळ, इत्यादी ठिकाणी उपद्रव करणे.

(क) मलमूत्र विसर्जन करून उपद्रव देणार नाही, किंवा

(ख) आपल्या ताब्यात किंवा अभिरक्षेत असलेल्या सात वर्षाच्या वयाखालील कोणत्याही मुलाकडून उपरिनिर्दिष्ट उपद्रव होऊ देणार नाही, [१] [किंवा

(ग) ज्यामुळे जाणा-या येणा-या कोणत्याही व्यक्तीस त्रास होईल अशा रीतीने थुंकणार नाही किंवा कोणतीही धूळ, राख, केर किंवा कचरा टाकणार नाही.]

**११६.** कोणतीही व्यक्ती, कोणत्याही न्यायालयात, पोलीस ठाण्यात, पोलीस कार्यालयात, शासनाच्या किंवा कोणत्याही सार्वजनिक संस्थेच्या भोगवट्याखालील इमारतीत, अशा जागेच्या प्रभारी सक्षम प्राधिका-याने काढलेल्या आणि अशा न्यायालयात, ठाण्यात, कार्यालयात किंवा इमारतीत लावलेल्या नोटिशीचे उल्लंघन करून धूम्रपान करणार नाही किंवा थुंकणार नाही. सार्वजनिक इमारतीतील नोटिशींकडे दुर्लक्ष करणे.

**११७.** कलमे ९९ ते ११६ (दोन्ही धरून) यांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करणा-या कोणत्याही व्यक्तीस, अपराधसिध्दीनंतर, [२] [बाराशे रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. कलमे ९९ ते ११६ अन्वये अपराध करणा-यास शास्ती.

**११८.** (१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, ज्या स्थानिक क्षेत्रात हे कलम अंमलात आणील अशा कोणत्याही स्थानिक क्षेत्रात, जी कोणतीही व्यक्ती, तिची मालमत्ता असलेल्या किंवा तिच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही गुरांना सूर्यास्ता नंतर एक तास व सूर्योदय या दरम्यानच्या काळात कोंडून ठेवण्यात किंवा बांधून ठेवण्यात हयगयीने किंवा अन्य रीतीने कसूर करील अशा व्यक्तीस अपराधसिध्दीनंतर,– गुरे, वगैरे कोंडून ठेवण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

[३][(एक) पहिल्या अपराधाबद्दल एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा [४] [चार हजार रुपयापर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(दोन) दुस-या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा [५][ पाच हजार रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्यद्रंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

**स्पष्टीकरण**.-कुंपण, भिंत किंवा इतर बंदिस्त जागा यांमध्ये गुरांना चांगल्या रीतीने कोंडून ठेवलेले असल्याखेरीज, या पोट-कलमाच्या अर्थानुसार त्यांना कोंडून ठेवलेले आहे असे समजण्यात येणार नाही आणि त्यांना दोरीने किंवा दुस-या कोणत्याही बांधण्याच्या साधनाने चांगल्या रीतीने बांधून ठेवलेले असल्याखेरीज या पोट-कलमाच्या अर्थानुसार ती बांधून ठेवलेली आहेत असे मानण्यात येणार नाही.

---

[१] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १२ अन्वये हा शब्द व खंड (ग) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १४ अन्वये " शंभर रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १४ (१) अन्वये " पहिल्या अपराधाबद्दल " या मजकुराने सुरू होणारा आणि " दोन्ही शिक्षा होतील " या मजकुराने संपणा-या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १५ (अ) अन्वये " तीनशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १५ (ब) अन्वये " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1] [ **(१-क)** पोट-कलम (१) अन्वये त्या अपराधाची न्यायचौकशी करणाऱ्या दंडाधिकाऱ्यास.—

(क) आरोपी व्यक्तीच्या नियंत्रणाखाली असलेल्या गुरांच्या अपप्रवेशामुळे जिच्या मालमत्तेचे किंवा जमिनीच्या उत्पन्नाचे कोणतेही नुकसान झाल्याचे सिद्ध झाले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, ती आरोपी व्यक्ती, दंडाधिकाऱ्यास वाजवी वाटेल अशी दोनशे पन्नास रुपयांहून अधिक होणार नाही इतकी नुकसानभरपाई देईल ; आणि तसेच

(ख) ज्या गुरांच्या बाबतीत अपराध घडला आहे अशी गुरे राज्य शासनाकडे सरकारजमा केली जातील ; असा आदेश देता येईल.

**(१-ख)** पोट-कलम (१-क) अन्वये दिलेली कोणतीही नुकसानभरपाई ही, जणू ती या कलमान्वये लादण्यात आलेला द्रव्यदंड आहे असे समजून वसूल करता येईल.

**(१-ग)** या कलमाखाली अपराध दखलपात्र असेल. ]

(२) कोणत्याही व्यक्तीस, या कलमान्वये आवश्यक असल्याप्रमाणे जी कोंडून किंवा बांधून ठेवण्यात आली नसतील अशी कोणतीही गुरे पकडता येतील व ती जवळच्या कोंडवाड्यात घेऊन जाता येतील किंवा पाठवता येतील आणि त्यानंतर संबंधित मालक किंवा इतर व्यक्ती गुरे अपप्रवेश अधिनियम, १८७१ याच्या [2][[3]* * * किंवा यथास्थिति, हैदराबाद गुरे अपप्रवेश अधिनियम याच्या] तरतुदींच्या अधीन असतील. सर्व पोलीस अधिकारी व सर्व पोलीस पाटील आणि ग्राम पोलीस दलातील सर्व व्यक्ती आवश्यक असेल तेव्हा, अशा रीतीने गुरे पकडण्यास होणाऱ्या विरोधास आणि ती अशा रीतीने पकडणाऱ्या व्यक्तींकडून सोडविण्यास प्रतिबंध करण्याच्या कामी मदत करतील.

१८७१ चा १. १३३७ फसलीचा हैदराबाद ५.

(३) या कलमान्वये बसविण्यात आलेला कोणताही द्रव्यदंड, कायद्याद्वारे तरतूद केलेल्या वसुलीच्या इतर कोणत्याही उपायांस हानी न पोचवता, ज्या गुरांच्या बाबतीत अपराध घडला आहे अशा सर्व किंवा कोणत्याही गुरांची मग ती अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आलेल्या व्यक्तीची मालमत्ता असो किंवा तो अपराध घडला तेव्हा ती केवळ तिच्या ताब्यात असो, विक्री करून वसूल करता येईल.

प्राण्यांना निर्दयतेने वागविल्याबद्दल शिक्षा.

**११९.** जी कोणतीही व्यक्ती [4][ ज्या क्षेत्रासाठी आयुक्ताची नेमणूक करण्यात आलेली नाही अशा कोणत्याही क्षेत्रामधील ] कोणत्याही जागेमध्ये कोणत्याही प्राण्यास निर्दयतेने मारील, मारावयास लावील किंवा मार बसेल अशी व्यवस्था करील किंवा त्यास निर्दयपणे टोचणी लावील किंवा लावली जाईल अशी व्यवस्था करील किंवा वाईट रीतीने वागवील किंवा तसे वाईट रीतीने वागविले जाईल अशी व्यवस्था करील किंवा यातना देईल किंवा देववील किंवा देण्यात येतील अशी व्यवस्था करील तिला, अपराधसिद्धीनंतर एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या करावासाची किंवा [5][ अडीच हजार रुपयांपर्यंत ] असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

---

[1] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १४ (२) अन्वये पोट-कलमे (१-क), (१-ख) व (१-ग) समाविष्ट करण्यात आली.

[2] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ३० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " किंवा मुंबई राज्याच्या कच्छ व सौराष्ट्र प्रदेशात अंमलात असल्याप्रमाणेच्या अधिनियमाच्या " हा मजकूर वगळण्यात आला.

[4] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये " बृहन्मुंबई बाहेरील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १६ अन्वये " शंभर रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१२०. जी कोणी व्यक्ती समाधानकारक सबबीवाचून, कोणतेही राहण्याचे घर किंवा जागा किंवा त्याला जोडून असलेली कोणतीही जमीन किंवा मैदान यात किंवा यावर किंवा शासनाच्या मालकीचे किंवा सार्वजनिक प्रयोजनांसाठी विनियोजित असलेले कोणतेही मैदान, इमारत, स्मारक किंवा बांधकाम यावर किंवा होडी किंवा जहाज यावर जाणूनबुजून प्रवेश करील किंवा राहील, मग तिच्याकडून वस्तुतः कोणतेही नुकसान झालेले असो वा नसो, तिला अपराधसिद्धीनंतर [१][ पाच हजार रुपयांपर्यंत ] असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

जाणूनबुजून अतिक्रमण करणे.

१२१. जी कोणी व्यक्ती नगरपालिकेच्या किंवा महानगरपालिकेच्या अग्निशामक पथकास किंवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा आगवाल्यास (फायरमन) रस्त्यातील आग इशारा यंत्राद्वारे, निवेदन करुन, संदेशाद्वारे किंवा अन्य प्रकारे जाणूनबुजून, आगीची खोटी भयसूचना देईल किंवा द्यावयास लावील किंवा अशी खोटी भयसूचना देण्याच्या उद्देशाने जाणूनबुजून रस्त्यावरील आग इशारा यंत्राची काच फोडील किंवा इतर रीतीने त्यास नुकसान पोहोचवील तिला, अपराधसिद्धीनंतर तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा [२][ तीन हजार रुपयांपर्यंत ] असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

आगीची खोटी बातमी देणे किंवा आगीची सूचना देणाऱ्या यंत्रास नुकसान पोचवणे.

१२२. जो कोणी, सूर्यास्त किंवा सुर्योदय यांच्या दरम्यान.—

(क) एखादा अपराध करण्याच्या उद्देशाने कोणत्याही घातक उपकरणानिशी किंवा,

(ख) एखादा अपराध करण्याच्या उद्देशाने आपला चेहरा झाकून किंवा इतर रीतीने वेष पालटून, किंवा

(ग) कोणत्याही राहत्या घरात किंवा इमारतीत किंवा कोणत्याही जहाजावर किंवा होडीवर त्या ठिकाणी असल्याचा, समाधान कारण दाखविण्यास असमर्थ असून तेथे हजर असलेला किंवा

(घ) कुख्यात चोर असणारा आणि स्वतःबद्दल समाधानकारक माहिती देण्यास असमर्थ असा कोणत्याही रस्त्यावर आवारात किंवा इतर जागी पडून असलेला भटकत असलेला किंवा

(ङ) कायदेशीर सबबीवाचून (ही सबब सिद्ध करण्याची जबाबदारी अशा व्यक्तीवर राहील) [३][घर फोडीचे कोणतेही हत्यार जवळ बाळगलेल्या स्थितीत.

आढळून येईल. त्याला अपराधसिद्धीनंतर एक वर्षापर्यंत असून शकेल इतक्या परंतु लेखी नमूद करावयाच्या कारणांखेरीज जी एक महिन्यापेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीची असेल अशी कारावासाची शिक्षा होईल. तसेच तो [४][ एक हजार रुपयांपर्यंत ] असू शकेल इतक्या,द्रव्यदंडाच्या शिक्षेससुद्धा पात्र असेल. ].

सुर्यास्त व सूर्योदय यांच्या दरम्यान संशयास्पद स्थितीत सापडणे.

१२३. संघराज्याच्या सशस्त्र दलाल नसलेला व त्याप्रमाणे काम करणारा नसलेला किंवा पोलीस अधिकारी नसलेला जो कोणी, कायदेशीर प्राधिकाऱ्याने तसे करण्याचा प्राधिकार दिल्यावाचून कोणत्याही रस्त्यात किंवा सार्वजनिक जागेत कोणतीही तलवार, भाला, गदा, बंदूक किंवा इतर मारक शस्त्रे किंवा कोणताही स्फोटक किंवा दाहक पदार्थ घेऊन जाईल तो कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून निःशस्त्र केला जाण्यास पात्र असेल, आणि याप्रमाणे जप्त करण्यात आलेले शस्त्र किंवा पदार्थ, आयुक्त किंवा जिल्हा दंडाधिकारी आपापल्या प्राधिकाराखालील क्षेत्रात बसवील असा [५][ बारह हजार पाचशे रुपयांहून ] अधिक नसेल असा द्रव्यदंड देऊन दोन महिन्यांच्या आत सोडवून घेण्यात आला नाही तर, राज्य शासनाकडे सरकारजमा केला जाईल.

प्राधिकारावाचून शस्त्र बाळगणे.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम १७ अन्वये " वीस रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १८ अन्वये " शंभर रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या कलम ४ अन्वये " घर फोडीचे कोणतेही हत्यार बाळगलेल्या स्थितीत " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " कैदेची शिक्षा होईल " या मजकुराने समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १९ अन्वये " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २० अन्वये " पाचशे रुपयांहून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

ज्या मालमत्तेबद्दल कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण देता येत नाही अशी मालमत्ता ताब्यात असणे.

**१२४.** जी मालमत्ता चोरलेली किंवा लबाडीने मिळविलेली आहे असे सकारण वाटत असेल अशी कोणतीही वस्तू ज्या कोणाच्या ताब्यात असेल किंवा जो कोणत्याही रीतीने वाहून नेत असेल किंवा विकण्यासाठी किंवा तारण ठेवण्यासाठी देऊ करीत असेल त्यास. अशी वस्तू ताब्यात बाळगण्याचे किंवा तसे कृत्य करण्याचे कारण त्याने दंडाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने दिले नाही तर अपराधसिद्धीनंतर [१][ एक वर्षापर्यंत ] असू शकेल परंतु लेखी नमूद करावयाच्या कारणांखेरीज जी एक महिन्यापेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीपर्यंतची असेल इतक्या, कारावासाची शिक्षा होईल आणि तो [२][ पाच हजार रुपयांपर्यंत ] असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेससुद्धा पात्र असेल.]

सरकारी रुग्णालयात किंवा बराकीत किंवा लष्करी किंवा लढाऊ जहाजावर दारु इत्यादी घेऊन जाणे.

**१२५.** जो कोणी.—

(क) कोणत्याही सार्वजनिक रुग्णालयात अशा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या परवानगीवाचून कोणतेही स्पिरिट किंवा स्पिरिटयुक्त किंवा आंबवलेली दारु किंवा मादक द्रव्ये किंवा, पदार्थ घेऊन जाईल किंवा आत आणील किंवा घेऊन जाण्याचा किंवा आत आणण्याचा प्रयत्न करील, किंवा

(ख) त्याला सेना नियमावली (आर्टिकल्स ऑफ वॉर) लागू नसताना, अराजादिष्ट अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा वरचा दर्जा असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या मालकीचे नसलेले असे कोणतेही स्पिरिट, दारू द्रव्ये किंवा पदार्थ.—

(एक) मुंबईच्या दुर्गरक्षक सेनेचा भाग असलेल्या सेनेच्या भोगवट्यात असलेल्या बराकीत किंवा इमारतीत किंवा कोणत्याही लष्करी बराकीत, रक्षक चौकीत किंवा छावणीमध्ये, किंवा

(दोन) सरकारच्या मालकीच्या कोणत्याही लढाऊ जहाजावर किंवा तशा जहाजाच्या बाजूस, घेऊन जाईल किंवा घेऊन जाण्याचा प्रयत्न करील किंवा आत आणील किंवा आणण्याचा प्रयत्न करील त्याला, अपराधसिद्धीनंतर दोन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची किंवा [३][ तीन हजार रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील आणि असे स्पिरिट, दारू द्रव्य किंवा सरकारजमा मादक पदार्थ आणि ते ज्यात ठेवलेले असतील ती पात्रे राज्य शासनाकडे करण्यात येतील.

चोरीचा संशय असलेली मालमत्ता ताब्यात असल्याबद्दल किंवा देऊ केल्याबद्दल तारण व्यवसायी, वगैरेंनी पोलिसास माहिती न देणे.

**१२६.** जो कोणी तारण व्यवसायी जुन्या मालमत्तेचा विक्रेता किंवा धातूचे काम करणारा कामगार असेल किंवा आपापल्या प्रभाराधीन क्षेत्रात आयुक्तास किंवा [४][ अधिक्षकास ] तो तशी व्यक्ती आहे असे वाजवी रीतीने वाटत असेल आणि, भारतीय दंड संहितेच्या कलम ४१० मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही अपराधाद्वारे किंवा उक्त संहितेच्या कलमे ४१७, ४१८, किंवा ४२० अन्वये शिक्षापात्र असा अपराध करुन कोणत्याही मालमत्तेचा ताबा हस्तांतरित करण्यात आला आहे असा संशय असल्याबद्दल पोलीस अधिकाऱ्यांकडून लेखी किंवा छापील माहिती मिळाली असून ती मालमत्ता त्याच्या ताब्यात सापडेल किंवा त्यानंतर ती त्याच्या ताब्यात येईल किंवा विक्रीने, तारणाने किंवा अदलाबदलीने किंवा अभिरक्षेसाठी, फेरफारासाठी किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या कारणांसाठी त्याला देण्यात येईल तर, त्यास.—

१८६० चा ४५.

(एक) त्याने, ताबडतोब आयुक्ताला किंवा यथास्थिती, [४][ अधीक्षकाला ] किंवा पोलीस ठाण्यात अशी मालमत्ता ताब्यात असल्याबद्दल किंवा देऊ केली असल्याबद्दल माहिती न दिल्यास आणि ज्या व्यक्तीकडून

---

[१] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, यांच्या कलम ५ अन्वये " तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कैदीची किंवा १०० रुपयांपर्यंतच्या दंडाची किंवा दोन्ही " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २१ अन्वये " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २२ अन्वये " शंभर रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३ अनुसूची अन्वये " जिल्हा अधिक्षकास " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

ती मालमत्ता ताब्यात मिळाली असेल किंवा देऊ करण्यात आली असेल तिच्या नावाची व पत्त्याची उपरिनिर्दिष्ट माहिती देण्याविषयी सर्व वाजवी उपाययोजना न केल्यास, किंवा

(दोन) ती मालमत्ता, नेहमीच्या पोषाखाच्या किंवा इतर वस्तूप्रमाणे असल्यामुळे, दिलेल्या लेखी किंवा छापील माहितीवरुन ओळखता येण्याजोगी नसून, अशी माहिती मिळाल्यावर कोणत्याही प्रकारे लपविण्यात आली नसल्यास, अपराधसिद्धीनंतर त्याच्या ताब्यात असलेल्या किंवा त्याला देऊ केलेल्या मालमत्तेतील अशा प्रत्येक वस्तुच्या बाबतीत [1][दोन हजार रुपयांपर्यंत] वाढविता येऊ शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

**१२७.** जो कोणी कलम १२६ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे माहिती मिळाल्यानंतर, पोलिसांची आगाऊ परवानगी घेतल्यावाचून अशा कोणत्याही मालमत्तेत फेरफार करणे, ती वितळविणे, तिचे स्वरूप बदलणे किंवा लांबवणे या गोष्टी करील. करवील किंवा चालवून घेईल त्यास, कोणतीही अशी मालमत्ता, भारतीय दंड संहितेच्या कलम ४१० च्या अर्थानुसार चोरीची मालमत्ता असल्याचे किंवा जिच्या बाबतीत उक्त संहितेची कलमे ४१७, ४१८, ४१९ किंवा ४२० अन्वये शिक्षापात्र असा कोणताही अपराध घडला आहे अशी मालमत्ता असल्याचे सिद्ध झाले असता, तीन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. *अशी मालमत्ता वितळविणे वगैरे.* *१८६० चा ४५.*

**१२८.** जो कोणी, चौदा वर्षांपेक्षा जास्त वयाचा दिसत नसेल अशा कोणत्याही मुलाकडून कोणत्याही प्रकारची वस्तू, त्या मुलास उसने दिलेल्या, आगाऊ दिलेल्या किंवा त्याच्या स्वाधीन केलेल्या कोणत्याही रक्कमेबद्दल तारणनिक्षेप, तारण किंवा प्रतिभूती म्हणून घेईल किंवा अशा वस्तूच्या मालकाच्या न कळत व संमतीवाचून ती वस्तू अशा मुलाकडून विकत घेईल, त्याला अपराधसिद्धीनंतर [3][ दोन हजार रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. *मुलाकडून तारण घेणे.*

**१२९.** जो कोणी, सार्वजनिक मनोरंजनाच्या किंवा करमणूकगृहाच्या कोणत्याही जागेचा चालक असून जाणूनबूजून अशा जागेत दारू पिऊन धुंद होण्यास किंवा इतर बेशिस्त वर्तन करण्यास किंवा कोणत्याही प्रकारचा जुगार खेळण्यास परवानगी देईल त्यास, अपराधसिद्धीनंतर [2][ दोन हजार पाचशे रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. *सार्वजनिक मनोरंजन, वगैरेच्या जागी बेशिस्तपणे वागू देण्याच्या परवानगीबाबत-*

**१३०.** जो कोणी पत्त्यांचा, फाशांचा किंवा इतर खेळ खेळण्यात किंवा पण किंवा पैज लावणे किंवा खेळाच्या यशापयशावर किंवा त्यांनी केलेल्या हातावर पैज मारण्यात किंवा कोणत्याही खेळाचा, सामन्याचा करमणुकीच्या खेळाचा किंवा कसरतीचा शेवट अमूक तऱ्हेने होईल अशाबद्दल पैज मारण्यात, कोणतेही कपट करुन किंवा बेकायदेशीररीत्या युक्तीने किंवा लबाडी करुन कोणत्याही इतर व्यक्तीकडून स्वतः करिता किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीकरिता किंवा इतरांकरिता पैशाची कोणतीही रक्कम किंवा मौल्यवान वस्तू जिंकील, तो भारतीय दंड संहितेच्या कलम ४१५ च्या अर्थानुसार फसवणूक केल्याबद्दल दोषी आहे असे मानण्यात येईल आणि तो त्याप्रमाणे शिक्षेस पात्र होईल. *खेळांमध्ये फसविणे.* *१८६० चा ४५.*

[4][ **१३०-क.** जो कोणी जुगार किंवा पैज लावण्याच्या प्रयोजनाकरिता जमलेल्या रस्त्यातील लोकांमध्ये सामील होईल किंवा कोणत्याही अशा जमावात सामील होईल त्यास, अपराधसिद्धीनंतर [5][ दोन हजार पाचशे रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा योग्य समज दिल्यानंतर त्यास सोडून देण्यात येईल. ] *रस्त्यावर जुगार खेळणे.*

---

[1] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २३ अन्वये " पन्नास रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २४ अन्वये " शंभर रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २५ अन्वये " शंभर रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० यांच्या कलम १५ अन्वये कलम १३०-क दाखल करण्यात आले.

[5] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २६ अन्वये " पन्नास रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कलम ३३ अन्वये केलेले नियम वगैरेंचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**१३१.** [1][ [2][ कलम १३१-क मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, जो कोणी,—]

(क) कलम ३३ अन्वये केलेले कोणतेही नियम किंवा आदेश किंवा अशा नियमान्वये किंवा आदेशान्वये दिलेल्या लायसनच्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करील, किंवा

(ख) खंड (क) खालील कोणताही अपराध करण्यात अपप्रेरणा देईल, त्यास, अपराधसिद्धीनंतर,—]

(एक) ज्या नियमान्वये किंवा आदेशान्वये उक्त लायसन देण्यात आले असेल तो नियम किंवा आदेश जर कलम ३३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख), (छ), (ज), (झ), चा उप-खंड (एक) आणि (दोन) किंवा खंड (द) किंवा खंड (प) अन्वये केलेला असेल तर, आठ दिवसांपर्यंत येऊ शकेल इतक्या कारावासाची किंवा [3][ एक हजार दोनशे पन्नास रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

[4][(एक-क) ज्या नियमान्वये किंवा आदेशान्वये उक्त लायसन देण्यात आले असेल तो नियम किंवा आदेश जर कलम ३३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (द) चा उप-खंड (तीन) अन्वये केलेला असेल तर, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील; ]

(दोन) उल्लंघन करण्यात आलेला नियम किंवा आदेश कलम ३३ च्या पोट-कलम (१) च्या खंड [5][ (बख) किंवा (भ) ] अन्वये केलेला असेल तर तीन महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा [6][ बारा हजार पाचशे रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

(तीन) उल्लंघन करण्यात आलेला नियम किंवा आदेश किंवा ज्या नियमान्वये किंवा आदेशान्वये उक्त लायसन देण्यात आले असेल तो नियम किंवा ओदश कलम ३३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ढ) व (ण) अन्वये केलेला असेल तर [7][ पाच हजार रुपयापर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल;

(चार) उल्लंघन करण्यात आलेला नियम किंवा कलम ३३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये करण्यात आलेला असेल आणि त्याअन्वये वाहतुकीस अडथळा होईल किंवा लोकांची गैरसोय होईल अशा रीतीने कोणत्याही रस्त्यावर किंवा त्याच्या भागावर कोणताही माल विकण्यास किंवा विकण्यासाठी मांडून ठेवण्यास मनाई करण्यात आली असेल तर त्यास,—

(क) पहिल्या अपराधाबद्दल एक महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा [8][ दोन हजार पाचशे रुपयापर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील; आणि

(ख) नंतरच्या अपराधाबद्दल सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा [9][ पाच हजार रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल; आणि

---

[1] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३, दुसऱ्या अनुसूची अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १० अन्वये " जो कोणी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २७ (अ) अन्वये " पन्नास रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २७(ब) अन्वये हा उपखंड समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४ अन्वये " खंड(भ) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २७ (क) अन्वये " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या कलम २७(ड) अन्वये " दोनशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] वरील अधिनियमाच्या कलम २७(इ) (१) अन्वये " दोनशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[9] वरील अधिनियमाच्या कलम २७(ई)(२) अन्वये " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(पाच) उल्लंघन करण्यात आलेला नियम किंवा आदेश किंवा ज्या नियमान्वये किंवा ओदशान्वये उक्त लायसन देण्यात आले असेल तो नियम किंवा आदेश [१][ कलम ३३, पोट-कलम (१) च्या कोणत्याही खंडान्वये केलेला असेल आणि त्याच्या उल्लंघनाबद्दल या कलमान्वये कोणत्याही शास्तीची तरतूद करण्यात आलेली नसेल ] तर [२][ पाचशे रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

[३][ **१३१-कक.** सार्वजनिक करमणुकीच्या जागेच्या बाबतीत [४][ किंवा जेथे नृत्यशाळा चालवण्यात येते अशा जागेच्या बाबतीत ] या अधिनियमान्वये देण्यात आलेले लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीस, तसेच प्रत्यक्ष अपराध करणाऱ्या व्यक्तीस, असा अपराध घडू नये म्हणून, तिने सर्व योग्य व वाजवी सावधगिरी घेतली होती असे तिने सिद्ध केल्याखेरीज तिच्या, स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने तिच्या वतीने कृत्य करणाऱ्या तिच्या नोकराने किंवा इतर अभिकर्त्याने कलम १३१ अन्वये केलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल जणू तो अपराध तिने स्वतःच केल्याप्रमाणे, जबाबदार समजण्यात येईल. ]

नोकरांनी केलेल्या कृत्याबद्दल लायसनधारकाचे सार्वजनिक करमणुकीच्या जागेसंबंधीचे दायित्व.

[५][ **१३१-क.** (१) जो कोणी, सार्वजनिक करमणुकीच्या जागेच्या बाबतीत [६][ किंवा जेथे नृत्यशाळा चालविण्यात येते अशा जागेच्या बाबतीत ] या अधिनियमान्वये लायसन घेण्यात कसून करील [७][ किंवा कोणत्याही खाद्यगृहाच्या बाबतीत या अधिनियमान्वये आवश्यक असलेले नोंदणीपत्र मिळविण्यात कसूर करील किंवा विहित केलेल्या मुदतीत अशा लायसनचे, किंवा यथास्थिति, प्रमाणपत्राचे नवीकरण करून घेण्यात ] कसूर करील तर त्यास अपराधसिद्धीनंतर [८][ दोन हजार रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) तसेच, कोणत्याही अशा अपराधाबद्दलची न्यायचौकशी करणाऱ्या कोणत्याही न्यायालयाने ज्या सार्वजनिक करमणुकीच्या जागेच्या किंवा खाद्यगृहाच्या किंवा नृत्यशाळेच्या बाबतीत अपराध करण्यात आला असेल अशी सार्वजनिक करमणुकीची जागा [९][ किंवा खाद्यगृह ] [१०][ किंवा नृत्यशाळा चालविणारी ] व्यक्ती जोपर्यंत ती, त्याबाबतीत लायसन घेणार नाही, किंवा यथास्थिती, नवीन लायसन घेणार नाही [११][ किंवा नोंदणी प्रमाणपत्र किंवा नवीन प्रमाणपत्र करून देणार नाही ] तोपर्यंत [१२][ यथास्थिति, अशी जागा, नृत्यशाळा किंवा [४][ खाद्यगृह ] बंद ठेवावे ], असा निदेश देईल आणि त्यानंतर अशी व्यक्ती ताबडतोब अशा निदेशाचे पालन करील.

[१३][ सार्वजनिक करमणुकीच्या [१४][किंवा नृत्य-शाळेच्या] जागेच्या बाबतीत विनिर्दिष्ट मुदतीच्या आत लायसन न घेतल्याबद्दल किंवा खाद्यगृहाच्या बाबतीत नोंदणी प्रमाणपत्र न घेतल्याबद्दल किंवा लायसन किंवा प्रमाणपत्राचे नवीकरण करून न घेतल्याबद्दल शास्ती. ]

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, याच्या कलम २ अन्वये " इतर कोणत्याही खंडान्वये देण्यात आला असेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, याच्या कलम २७ (फ) अन्वये " पन्नास रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १४ अन्वये कलम १३१-कक समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ११ अन्वये कलम १३१ क समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ६ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, याच्या कलम ४ (अ) अन्वये " किंवा अशा जागेच्या बाबतीत या अधिनियमान्वये मंजूर करण्यात आलेले लायसन विहित केलेल्या मुदतीत नवीन करून घेण्यात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, याच्या कलम २८ (अ) अन्वये " पन्नास रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, याच्या कलम ४ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१०] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, याच्या कलम ६ (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[११] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, याच्या कलम ४ (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१२] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, याच्या कलम ६ (ब) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[१३] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, याच्या कलम ४ (क) अन्वये मूळ समासटीपेऐवजी ही समासटीप दाखल करण्यात आली.

[१४] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, याच्या कलम ६ (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) जर ती व्यक्ती अशा कोणत्याही निदेशाचे पालन करण्यात कसूर करील तर, तिला अपराधसिद्धीनंतर, एक महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा [१][ पाच हजार रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(४) पोट-कलम (३) अन्वये केलेल्या कोणत्याही कार्यवाहीस बाध न येता, न्यायालयाच्या निदेशाचे पालन करण्यात अशा व्यक्तीने कसूर केल्यास, आयुक्ताने, किंवा यथास्थिति, जिल्हा दंडाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, लेखी आदेशाद्वारे, अशा अधिकाऱ्याच्या मते न्यायालयाच्या निदेशाचे पालन होण्यासाठी वाजवीरीत्या आवश्यक असतील असे उपाय योजता किंवा असे उपाय योजविता येतील किंवा अशा बळाचा वापर करता किंवा अशा बळाचा वापर करविता येईल. ]

कलम ३१ अन्वये दिलेला आदेश न पाळल्याबद्दल शास्ती.

**१३२.** जो कोणी, कोणतीही जागा रिकामी करण्यास त्याला फर्मावणाऱ्या कलम ३१ खालील एखाद्या आदेशाचे उल्लंघन करील, तो आदेश पाळणार नाही, त्यास विरोध करील किंवा त्याप्रमाणे वागण्यात कसूर करील त्यास, अपराधसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कारावासाची शिक्षा किंवा [२][ पाच हजार रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

कलम ३५ अन्वये केलेले नियम, वगैरेंचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**१३३.** जो कोणी, कलम ३५ अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करील त्यास, अपराधसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा [३][ पाच हजार रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

कलम ३६ अन्वये केलेले नियम, वगैरेंचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**१३४.** जो कोणी, कलम ३६ अन्वये पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील, तो आदेश पाळणार नाही, त्यास विरोध करील किंवा त्याचे पालन करण्यात कसूर करील त्यास, अपराधसिद्धीनंतर, [४][ पाच हजार रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

कलमे ३७, ३९ किंवा ४० खालील नियमांचे किंवा निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**१३५.** जो कोणी, कलम ३७, ३९ किंवा ४० अन्वये कायदेशीररित्या केलेल्या एखाद्या आदेशाचे पालन करणार नाही किंवा त्याचे पालन न करण्याची अपप्रेरणा देईल त्यास, अपराधसिद्धीनंतर,—

(एक) पाळण्यात न आलेला किंवा ज्याचे पालन न करण्याची अपप्रेरणा दिलेली असेल असा आदेश कलम ३७ च्या पोट-कलम (१) अन्वये किंवा कलम ३९ किंवा कलम ४० अन्वये दिलेला असेल तर, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल. परंतु, ती लेखी नमूद करावयाच्या कारणाखेरीज, चार महिन्यांपेक्षा कमी असणार नाही आणि तो द्रव्यदंडाच्या शिक्षेसही पात्र असेल, आणि

(दोन) जर उक्त आदेश कलम ३७ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला असेल तर, एक महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा [५][ वीस हजार पाचशे रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, आणि

(तीन) जर उक्त आदेश कलम ३७ च्या पोट-कलम (३) अन्वये दिलेला असेल तर, [६][ दोन हजार पाचशे रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २८ (ब) अन्वये " दोनशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २९ अन्वये " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३० अन्वये " दोनशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३१ अन्वये " दोनशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३२ (अ) अन्वये " शंभर रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३२ (ब) अन्वये " शंभर रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१३६.** जो कोणी, कलम ३८ अन्वये कायदेशीररीत्या दिलेल्या कोणत्याही निदेशाचे पालन करणार नाही किंवा तो पालन न करण्याची अपप्रेरणा देईल त्यास, अपराधसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा [१][ पाच हजार रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्हीही शिक्षा होतील.

कलम ३८ अन्वये केलेले नियम, वगैरेंचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**१३७.** जो कोणी, कलम ४१ अन्वये पोलिसांनी दिलेल्या कोणत्याही निदेशास विरोध करील किंवा त्यानुसार वागण्यात कसूर करील त्यास, अपराधसिद्धीनंतर, [२][ पाचशे रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

कलम ४१ अन्वये केलेले नियम, वगैरेंचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**१३८.** [ कलम ४२ खालील आदेशाचे पालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.] हे कलम सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ९ अन्वये वगळण्यात आले.

**१३९.** जो कोणी, कलम ४३ अन्वये केलेल्या कोणत्याही विनियमाचे उल्लंघन करील किंवा उल्लंघनाची अपप्रेरणा देईल त्यास, अपराधसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कारावासाची किंवा [३][ दोन हजार पाचशे रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

कलम ४३ अन्वये केलेल्या विनियमाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**१४०.** जो कोणी, कलम ६८ अन्वये पोलिसांनी दिलेल्या कोणत्याही निदेशास विरोध करील किंवा त्यानुसार वागण्यात कसूर करील किंवा असा विरोध /कसूर करण्याची अपप्रेरणा देईल त्यास, अपराधसिद्धीनंतर, [४][ पाचशे रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

कलम ६८ अन्वये दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**१४१.** जो कोणी, कलमे ५५, ५६, [५][ ५५, ५७-क किंवा ६३-कक ] अन्वये दिलेल्या कोणत्याही निदेशास विरोध करील किंवा त्याचे पालन करणार नाही किंवा त्यानुसार वागण्यात कसूर करील किंवा अशा कोणत्याही निदेशास विरोध करण्यास किंवा त्याचे पालन न करण्यास अपप्रेरणा देईल त्यास, अपराधसिद्धीनंतर, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कारावसाची शिक्षा होईल. परंतु लेखी नमूद केलेल्या कारणांसाठी असेल त्याव्यतिरिक्त ती चार महिन्यांपेक्षा कमी असणार नाही. तसेच, तो द्रव्यदंड देण्यास सुद्धा पात्र होईल.

कलमे ५५,५६, [५][ ५७, ५७-क किंवा ६३-कक ] अन्वये दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३३ अन्वये " पाचशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३४ अन्वये " दोनशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३५ अन्वये " दोनशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३६ अन्वये " पन्नास रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४, अनुसूची अन्वये " ५७ किंवा ६३-अअ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

ज्या क्षेत्रातून निघून जाण्याबद्दल एखाद्या व्यक्तीस निर्देश देण्यात आला असेल त्या व्यक्तीने त्या क्षेत्रात परवानगीवाचून प्रवेश केल्याबद्दल किंवा तात्पुरत्या मुदतीकरिता परत येण्यास परवानगी दिली असताना त्या मुदतीनंतरही तेथे राहण्याबद्दल [७][ किंवा निवासस्थान किंवा निर्गमन किंवा आगमन यासंबंधी कळविण्यात कसूर केल्याबद्दल ] शास्ती.

[१][ **१४२.** कलम ६२ मध्ये तरतूद केलेल्या परिस्थितीत, आणि त्या रीतीने कोणत्याही व्यक्तीस अटक करण्याच्या व त्या जागेतून हलवण्याच्या अधिकारास हानी न पोहचवता, जी कोणी व्यक्ती,—

(क) कलमे ५५, ५६, [२][ ५५, ५७-क किंवा ६३-कक ] अन्वये तिला दिलेल्या निदेशाचे उल्लंघन करुन, ज्या क्षेत्रातून किंवा कोणत्याही जिल्ह्यातून किंवा जिल्ह्यांमधून किंवा त्याच्या भागातून [३][ किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रांमधून ] तिला निघून जाण्याबाबत निदेश देण्यात आला होता, त्या क्षेत्रात किंवा त्या जिल्ह्यात किंवा जिल्ह्यांमध्ये किंवा त्याच्या भागात [३][ किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये ] परवानगी घेतल्याशिवाय प्रवेश करील किंवा त्यात परत येईल तर ;

(ख) कलम ६२, पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या परवानगीनुसार कोणत्याही अशा क्षेत्रात किंवा उपरोक्त जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात [४][ किंवा कोणत्याही अशा विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये ] प्रवेश करील किंवा त्यात परत येईल, परंतु त्या कलमाच्या तरतुदीविरुद्ध वर्तन करुन, ज्या तात्पुरत्या मुदतीसाठी, प्रवेश करण्याची किंवा परत येण्याची परवानगी तिला देण्यात आली होती त्या मुदतीच्या समाप्तीनंतरही किंवा अशी परवानगी त्यापूर्वीच रद्द करण्यात आली असेल तर, ती रद्द करण्यात आल्यावर [५][ त्या क्षेत्रातून, जिल्ह्यातून किंवा त्याच्या भागातून किंवा, यथास्थिती, अशा विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमधून ] निघून जाण्यात कसूर करील किंवा अशा तात्पुरत्या मुदतीच्या समाप्तीनंतर किंवा परवानगी रद्द करण्यात आल्यावर त्या क्षेत्रातून स्वतः होऊन निघून जाऊन त्यानंतर पुन्हा परवानगी घेतल्याशिवाय तेथे प्रवेश करील किंवा परत येईल तर ;

[६][ (ग) कलम ५६ चे किंवा कलम ५७ चे पोट-कलम (२) याअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, आपल्या राहण्याच्या ठिकाणाविषयी किंवा आपल्या जाण्याचा किंवा येण्याचा दिनांक कळविण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील तर,]

त्या व्यक्तीस, अपराधसिद्धीनंतर, दोन वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल, परंतु अशी शिक्षा ही, लेखी नमूद केलेल्या कारणांसाठी असेल त्याव्यतिरिक्त ती सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही आणि ती व्यक्ती द्रव्यदंड देण्यासदेखील पात्र ठरेल.]

---

[१] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ४ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४, अनुसूची अन्वये " ५७ किंवा ६३ अअ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ८(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ८(ब)(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ८(ब)(दोन) अन्वये " त्या क्षेत्रातून निघून जाण्यात कसूर करील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ८(क) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ८(ड) अन्वये, समासटीपेत हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

**१४३.** जो कोणी पुरेशा कारणावाचून कलम ६३ च्या पोट-कलम (३) अनुसार स्वाधीन होण्यात कसूर करील त्याला, अपराधसिद्धीनंतर, दोन वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कारावासाची शिक्षा होईल व तो द्रव्यदंड देण्यासमुद्धा पात्र होईल. कलम ६३ च्या पोट-कलम (३) अनुसार स्वाधीन होण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

[1][ **१४३-क.** (१) जो कोणी कलम ६३-क च्या पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील त्यास, अपराधसिद्धीनंतर, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची शिक्षा, किंवा दोन्ही शिक्षा होतील. कलम ६३-क अन्वये दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

(२) जो कोणी कलम ६३-क च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशांचे उल्लंघन करील त्यास, अपराधसिद्धीनंतर, तीन वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील. ]

[2][ **१४३-ख.** (१) कोणतीही व्यक्ती, आयुक्ताच्या, किंवा यथास्थिति, जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीवाचून, आणि ज्या शर्तीस अधीन ठेवून अशी परवानगी देण्यात येत असेल त्या कोणत्याही शर्तीप्रमाणे असेल त्या व्यतिरिक्त, माणसे जमण्याचा संभव असेल अशा कोणत्याही ठिकाणी, ज्या प्रयोगात तिला हवा मिळण्याचे सर्व मार्ग बंद होतील, अशा रीतीने व श्वास कोंडल्यामुळे सामान्यतः मृत्यू घडेल इतका वेळ स्वतःस जमिनीखाली पुरुन घेणे किंवा कोणत्याही बंदिस्त खोलीत किंवा पात्रात किंवा इतर वस्तूत स्वतःस कोंडून घेणे असा कोणताही प्रयोग करणार नाही. धोक्याचे प्रयोग.

(२) जर कोणतीही व्यक्ती, या कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन करील किंवा उल्लंघन करण्याचा प्रयत्न करील तर, तिला, अपराधसिद्धीनंतर, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

१८९८ चा ५. (३) फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ * यात, काहीही असले तरी या कलमाखालील शिक्षापात्र अपराध हा दाखलप्राप्त अपराध असेल.]

**१४४.** कलम २१ अन्वये विशेष पोलीस अधिकारी म्हणून नेमण्यात आली असेल अशी कोणतीही व्यक्ती, पुरेशा कारणांवाचून असा विशेष पोलीस अधिकारी म्हणून काम करण्यात हयगय करील किंवा काम करण्याचे नाकारील किंवा तिची कर्तव्ये करण्यासाठी तिला देण्यात येईल असा कोणताही कायदेशीररीत्या दिलेला आदेश किंवा निर्देश पाळण्यात हयगय करील किंवा तो पाळण्याचे नाकारील तिला, अपराधसिद्धीनंतर, [3][ दोन हजार रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. विशेष पोलीस अधिकारी म्हणून काम करण्यात हयगय करणे किंवा काम करण्याचे नाकारणे.

---

[1] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १६ अन्वये कलम १४३-क समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ३१, अनुसूची अन्वये कलम १४३-ख समाविष्ट करण्यात आले.

[3] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३७ अन्वये "पन्नास रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

खोटे निवेदन, वगैरे केल्याबद्दल आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या गैरवर्तनाबद्दल शास्ती.

**१४५.** (१) जी कोणतीही व्यक्ती पोलीस अधिकारी म्हणून नोकरी मिळविण्याच्या किंवा नोकरीतून मुक्त होण्याच्या कारणाकरिता खोटे निवेदन करील किंवा खोट्या दस्तऐवजांचा उपयोग करील तिला, किंवा

(२) जो कोणताही पोलीस अधिकारी,—

(क) भित्रेपणाबद्दल दोषी असेल; किंवा

(ख) कलम २९ चे उल्लंघन करुन आपल्या पदाचा राजीनामा देईल किंवा आपली कर्तव्ये बजावण्याचे सोडून देईल ; किंवा

(ग) कायद्याच्या किंवा कोणत्याही नियमाच्या किंवा आदेशाच्या ज्या तरतुदीचे पालन करणे किंवा ती मानणे हे पोलीस अधिकारी म्हणून त्याचे कर्तव्य असेल त्या तरतुदीचा जाणूनबुजून भंग केल्याबद्दल किंवा त्यात हयगय केल्याबद्दल दोषी असेल ; किंवा

(घ) जो कर्तव्यपालन न केल्याबद्दल त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये कोणत्याही शिक्षेची तरतूद करण्यात आलेली नसेल असे कर्तव्य न केल्याबद्दल दोषी असेल ;

त्याला, अपराधसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येवू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा शंभर रुपयापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

रजा संपल्यावर कामावर हजर होण्यात कसूर केल्याचा परिणाम.

(३) रजेवर गेलेला जो कोणताही पोलीस अधिकारी, अशी रजा संपल्यावर वाजवी कारणाशिवाय कामावर स्वतः हजर होण्यात कसूर करील, तर त्याने पोट-कलम (२) खंड (ख) च्या कारणासाठी कलम २९ च्या अर्थानुसार आपल्या पदाची कर्तव्ये बजावण्याचे सोडून दिले आहे असे मानण्यात येईल.

नेमणुकीचे किंवा पदाचे प्रमाणपत्र किंवा इतर वस्तू देण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

**१४६.** जो कोणताही पोलीस अधिकारी, कलम ३० च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीनुसार आपल्या नेमणुकीचे किंवा पदाचे प्रमाणपत्र किंवा इतर कोणतीही वस्तू देण्यात जाणूनबुजून हयगय करील किंवा देण्याचे नाकारील त्याला, अपराधसिद्धीनंतर, एक महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा दोनशे रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

पोलीस अधिकाऱ्याने तापदायक रीतीने प्रवेश करणे, झडती घेणे, अटक करणे, इत्यादी.

**१४७.** जो कोणताही पोलीस अधिकारी,—

(क) कायदेशीररीत्या मिळालेल्या प्राधिकाराशिवाय किंवा वाजवी कारणाशिवाय कोणत्याही इमारतीत, जहाजात, तंबूत किंवा जागेत प्रवेश करील किंवा इतर व्यक्तीस प्रवेश करावयास लावील किंवा झडती घेईल किंवा घेववील ;

(ख) कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता त्रासदायक रीतीने आणि विनाकारण जप्त करील ;

(ग) कोणत्याही व्यक्तीस त्रासदायक रीतीने व विनाकारण अटकावून ठेवील, तिची झडती घेईल किंवा तिला अटक करील ;

(घ) त्याच्या अभिरक्षेतील कोणत्याही व्यक्तीवर विनाकारण कोणताही शारीरिक अत्याचार करील ; किंवा

(ङ) कायद्यान्वये तसा अधिकार नसेल अशी कोणतीही धमकी किंवा आश्वासन देऊ करील ;

त्यास अपराधसिद्धीनंतर, अशा प्रत्येक अपराधाबद्दल सहा महिन्यांपर्यंत वाढविता येवू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**१४८.** ज्या कोणत्याही अटक केलेल्या व्यक्तीस, ज्या दंडाधिकाऱ्याकडे किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे पाठविणे पोलीस अधिकाऱ्यास कायदेशीररीत्या बंधनकारक असेल, त्या दंडाधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे पाठविण्यास जो पोलीस अधिकारी त्रासदायक रीतीने आणि विनाकारण विलंब लावील त्यास, अपराधसिद्धीनंतर, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येवू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

अटक केलेल्या व्यक्तीस पाठविण्यात तापदायक विलंब लावण्याबद्दल शास्ती.

**१४९.** जी कोणतीही व्यक्ती, कलम ७० अन्वये दंडाधिकाऱ्याने किंवा पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही वाजवी निदेशास विरोध करील किंवा त्याचे अनुपालन ताबडतोब करणार नाही किंवा अशा निदेशास विरोध करण्यात किंवा त्यांचे अनुपालन न करण्यात मदत करील तिला, अपराधसिद्धीनंतर, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल, परंतु ती लेखी नमूद केलेल्या कारणांस्तव असेल तर, चार महिने मुदतीपेक्षा कमी असणार नाही आणि ती व्यक्ती द्रव्यदंडाच्या शिक्षेसही पात्र होईल.

कलम ७० अन्वये दिलेल्या निदेशास विरोध केल्याबद्दल किंवा त्याचे अनुपालन न केल्याबद्दल शास्ती.

[1][ **१४९-क.** जर पोलीस दलातील नसणारी कोणतीही व्यक्ती, याबाबतीत [2][ [3][ महाराष्ट्र] राज्यामधील] कोणत्याही क्षेत्रासाठी राज्य शासनाने, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये प्राधिकृत केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय पोलीस दलाचा गणवेष किंवा उक्त गणवेषाप्रमाणे दिसेल असा कोणताही पोषाख किंवा उक्त गणवेषाच्या कोणत्याही विशेष खुणा असणारा पोषाख घालील तर तिला, अपराधसिद्धीनंतर, [4][ दोन हजार रुपयांपर्यंत ] वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.]

पोलीसाच्या गणवेषाचा अनधिकृतपणे वापर केल्याबद्दल शास्ती.

**१५०.** या अधिनियमाविरुद्ध केलेले अपराध हे, आरोपी व्यक्ती किंवा व्यक्तींपैकी कोणतीही व्यक्ती शिपायाहून वरच्या दर्जाचा पोलीस अधिकारी असेल तेव्हा, ते फक्त इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने किंवा द्वितीय श्रेणी दंडाधिकाऱ्याच्या दर्जाहून खालचा दर्जा नसलेल्या दंडाधिकाऱ्याने दखल घेतल्याखेरील दखलपात्र असणार नाहीत.

अपराधी, जेव्हा शिपायाहून वरच्या दर्जाचा पोलीस अधिकारी असेल तेव्हाची अधिकारिता.

---

[1] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] मुंबई विधी अनुकूलन (राज्य व समावर्ती विषय) आदेश, १९५६ या अन्वये " राज्यामधील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समावर्ती विषय) आदेश, १९६० या अन्वये " मुंबई राज्यामधील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३८ अन्वये " दोनशे रुपयांपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अधिनियमाविरूद्ध केलेल्या विशिष्ट अपराधासाठी खटला भरणे हे, पोलिसांच्या स्वेच्छानिर्णयानुसार असणे.

**१५१.** राज्य शासनाने किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने केलेला नियम किंवा आदेश यांचे पालन करून तसे करण्यात आले असेल त्याखेरीज, कलमे ११७, ११९, १३१, १३७, १३९, १४० किंवा कलम १४४ अन्वये जो शिक्षापात्र असेल अशा अपराधामुळे गंभीर स्वरूपाचे नुकसान झाले नसेल व ताकीद देताच अपराध करण्याचे बंद केले गेले असेल तर, अशा अपराधाबद्दल पोलिसांनी खटला भरणे आवश्यक असणार नाही.

विशिष्ट खटले संक्षिप्त रीतीने निकालात काढणे.

[1][ **१५१-क.** (१) [2][ कलम ११७ अन्वये किंवा कलम १३१ चे [3][ उप-खंड ] (तीन), (चार) किंवा (पाच) अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाची दखल घेणाऱ्या न्यायालयास, ] आरोपीची सुनावणी होण्यापूर्वी विनिर्दिष्ट दिनांकापर्यंत आरोपी व्यक्तीने आपणास अपराध कबूल असल्याबद्दल डाक नोंदणी पत्राने कळवावे आणि न्यायालय विनिर्दिष्ट करील अशी [4][ दोन हजार रुपयांहून ] अधिक नसेल इतकी रक्कम न्यायालयाकडे पाठवावी असे आरोपी व्यक्तीवर बजावावयाच्या समन्सवर नमूद करता येईल.

(२) जर आरोपी व्यक्तीने अपराध मान्य केला आणि विनिर्दिष्ट रक्कम पाठविली तर तिच्याविरूद्ध अपराधाच्या बाबतीत कोणतीही आणखी कार्यवाही केली जाणार नाही. ]

इतर अधिनियमांखालील अपराधांबद्दल खटला भरण्यास बाधा न येणे.

**१५२.** या अधिनियमातील कोणत्याही मजकुराचा अर्थ, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दल कोणत्याही इतर अधिनियमान्वये कोणत्याही व्यक्तीवर खटला भरून तिला शिक्षा देण्यास, किंवा इतर कोणत्याही अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या एखाद्या अपराधाबद्दल तिच्यावर, या अधिनियमान्वये खटला भरून तिला शिक्षा देण्यास प्रतिबंध होतो असा केला जाणार नाही :

परंतु, असे खटले फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८* च्या कलम १०३ च्या तरतुदींना अधीन असतील. १८९८ चा ५.

## प्रकरण आठ

## संकीर्ण

फी, बक्षिसे, वगैरेंचा विनियोग.

**१५३.** या अधिनियमान्वये दिलेले लायसने किंवा लेखी परवानगी यासाठी दिलेली सर्व फी, आणि पोलीस अधिकाऱ्यांनी आदेशिका बजाविल्याबद्दल दिलेल्या सर्व रकमा आणि माहिती देणारे म्हणून पोलीस अधिकाऱ्यांस कायद्यान्वये देय झालेली सर्व बक्षिसे, समपहरणे आणि दंडादाखलच्या सर्व रकमा किंवा त्यांचे हिस्से हे, अशी कोणतीही फी किंवा रकमा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदीअन्वये जेथवर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या असतील तेथवर ती फी किंवा ती रक्कम वगळून राज्य शासनाकडे जमा करण्यात येतील :

---

[1] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १० अन्वये " कलम ३३ चे पोट-कलम (१) " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "चौकशी करणाऱ्या न्यायालयास" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३९(अ) अन्वये " परिच्छेद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३९ (ब) अन्वये " पंचवीस रुपयाहून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

परंतु, राज्य शासनाच्या मंजुरीने किंवा त्याबाबतीत राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमान्वये अशी कोणतीही बक्षिसे, समपहरण किंवा दंड याबद्दलची रक्कम संपूर्णतः किंवा अंशतः खास सेवेबद्दल पोलीस अधिकाऱ्यास देता येईल किंवा ती दोन किंवा अधिक पोलीस अधिकाऱ्यांमध्ये विभागून देता येईल.

**१५४.** [१][ पोलीस दलातील व्यक्तींना त्यांची कामे सोईस्कर रीतीने करता यावीत म्हणून बृहन्मुंबई [२][ या व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्यातील मुंबई प्रदेशातील] व तसेच राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जाहीर करील अशा [३][ महाराष्ट्र राज्याच्या ] उरलेल्या प्रदेशातील ] कोणत्याही घराचा किंवा जागेचा भोगवटा किंवा उपयोग केल्याबद्दल नगरपालिका कर किंवा इतर स्थानिक कर राज्य शासनाकडून देय असणार नाहीत. — पोलिसांच्या इमारतींबद्दल राज्य शासनाने नगरपालिका कर किंवा इतर कर न देणे.

**१५५.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये राज्य शासनाने किंवा दंडाधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने प्रसिद्ध केलेला किंवा दिलेला कोणताही आदेश किंवा अधिसूचना, आणि तो किंवा ती योग्य रीतीने प्रसिद्ध केली आहे किंवा दिली आहे हे, त्याची किंवा तिची राजपत्रातील एक प्रत किंवा दंडाधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने सही केलेली आणि अशा आदेशास किंवा अधिसूचनेस लागू असलेल्या या अधिनियमाच्या कलमाच्या तरतुदीनुसार प्रसिद्ध केलेल्या व काढलेल्या मूळ आदेशाची किंवा अधिसूचनेची खरी नक्कल असल्याबद्दल त्या दंडाधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली आदेशाची किंवा अधिसूचनेची एक प्रत सादर करून सिद्ध करता येईल. — आदेश व अधिसूचना प्रसिद्ध करण्याची पद्धती.

**१५६.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये किंवा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये किंवा बहुतांशी त्यास अनुसरून केलेला किंवा प्रसिद्ध केलेला कोणताही नियम, आदेश, निदेश, अभिनिर्णय, चौकशी किंवा अधिसूचना आणि त्यानुसार केलेले कोणतेही कृत्य, त्या कार्यपद्धतीत कोणताही दोष असल्याच्या किंवा कोणतीही नियमाबाह्यता झाल्याच्या कारणावरून बेकायदेशीर, रद्द, विधिअग्राह्य किंवा अपुरे असल्याचे मानण्यात येणार नाही. — कार्यपद्धतीत दोष असल्यावरून किंवा नियमबाह्यता झाल्यावरून नियम व आदेश बेकायदेशीर न ठरणे.

---

[१] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ३३ अन्वये "बृहन्मुंबईखेरीज इतर कोणत्याही प्रदेशात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय), आदेश, १९६० अन्वये "दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यातील कोणत्याही प्रदेशात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील आदेशाअन्वये "मुंबई राज्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कलमे ५५, ५६, [1][ ५७, ५७-क किंवा ६३-कक ] या अन्वये दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दलच्या खटल्यात गृहीत धरावयाच्या गोष्टी.

**१५७.** त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कलमे ५५, ५६ [1][ ५७, ५७-क किंवा ६३-कक ] अन्वये दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दलच्या खटल्यामध्ये आदेशांची अधिकृत प्रत सादर करण्यात आल्यावर, त्याविरूद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत आणि असे विरूद्ध सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपी व्यक्तीवर राहील आणि असे विरूद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत असे गृहीत धरण्यात येईल की,—

(क) तो आदेश, या अधिनियमान्वये तो काढण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याने काढला होता ;

(ख) उक्त आदेश ज्या मुद्यांवर व ज्या प्रयोजनांसाठी काढलेला होता ती अस्तित्वात होती आणि उक्त आदेश काढणे आवश्यक होते अशी तो काढणाऱ्या प्राधिकाऱ्याची खात्री झालेली होती ;

आणि

(ग) उक्त आदेश अन्यथा विधिग्राह्य आणि या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत होता.

अधिकारांचा वापर करण्यास सक्षम असलेले, रिक्त जागांचा कार्यभार धारण करणारे किंवा त्या जागांवर येणारे अधिकारी.

[2][ **१५७-क.** आयुक्त, दंडाधिकारी किंवा पोलीस अधिकारी यांचे पद रिक्त झाल्याच्या परिणामी, कोणताही अधिकारी, असा आयुक्त, दंडाधिकारी किंवा पोलीस अधिकारी यांच्या पदाचा कार्यभार धारण करील किंवा त्याच्या पदावर हंगामी किंवा कायमच्या स्वरूपात येईल तर असा अधिकारी, यथास्थिति, असा आयुक्त, दंडाधिकारी, किंवा पोलीस अधिकारी, यांना या अधिनियमान्वये अनुक्रमे दिलेल्या अधिकारांचा वापर करण्यास आणि त्यांच्यावर लादण्यात आलेली सर्व कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम असेल. ]

ज्या क्षेत्रामधून निघून जाण्यासंबंधी निदेश देण्यात आला असेल अशा क्षेत्रात प्रवेश करण्याची किंवा परतण्याची परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तीने करून दिलेले बंधपत्र दंडनीय ठरणे.

**१५८.** कलम ६३ च्या पोट-कलम (१) अन्वये परवानगी देण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने जर उक्त पोट-कलमान्वये लादलेल्या किंवा उक्त कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये तिने लिहून दिलेल्या बंधपत्रातील कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर केली तर, तिचे बंधपत्र दंडनीय करण्यात येईल आणि अशा बंधपत्रामुळे जी बांधली गेली असेल अशी कोणतीही व्यक्ती त्याबद्दल दंड भरील किंवा असा दंड का भरण्यात येऊ नये याबद्दल न्यायालयाचे समाधान होईल असे कारण दाखवील.

---

[1] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४, अनुसूची अन्वये "५७ किंवा ६३ अअ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७ याच्या कलम ५ अन्वये कलम १५७-क समाविष्ट करण्यात आले.

**१५९.** या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या किंवा त्यात केलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही नियमाच्या, आदेशाच्या किंवा निदेशाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये कोणत्याही महसूल आयुक्तावर, दंडाधिकाऱ्यावर किंवा पोलीस अधिकाऱ्यावर लादण्यात आलेल्या कोणत्याही कर्तव्यास किंवा त्यांना दिलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास अनुसरून किंवा अनुसरण्याच्या उद्देशाने [1][ कोणत्याही महसूल आयुक्ताने, दंडाधिकाऱ्याने ] किंवा पोलीस अधिकाऱ्याने सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृत्याबद्दल तो कोणताही दंड भरण्यास किंवा नुकसानभरपाई देण्यास पात्र असणार नाही.

कर्तव्यानुसार सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृत्याबद्दल कोणताही दंडाधिकारी किंवा पोलीस अधिकारी दंड भरण्यास किंवा नुकसान भरून देण्यास पात्र असणार नाही.

**१६०.** राज्य शासनाने किंवा त्याबाबतीत या अधिनियमान्वये किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये, दिलेल्या कोणत्याही अशा आदेशान्वये किंवा निदेशान्वये अधिकार दिलेल्या व्यक्तीने, प्राधिकार आहे असे समजून दिलेला असा आदेश किंवा निदेश सद्‌भावनापूर्वक अंमलात आणल्याच्या कारणावरून योग्य रीतीने नेमलेल्या किंवा प्राधिकार दिलेला कोणताही लोकसेवक किंवा व्यक्ती कोणताही दंड भरण्यास किंवा नुकसानभरपाई देण्यास पात्र असणार नाही.

प्रत्यक्ष प्राधि-कारान्वये केलेला कोणताही नियम किंवा दिलेला आदेश किंवा निदेश सद्‌भावनापूर्वक अमलात आणल्याबद्दल कोणताही लोकसेवक वर म्हटल्याप्रमाणे पात्र असणार नाही.

**१६१.** (१) पूर्वोक्तप्रमाणे कोणत्याही कर्तव्याचे किंवा प्राधिकाराचे निमित्त दाखवून, किंवा अशा कर्तव्याचे किंवा प्राधिकाऱ्याचे अतिक्रमण करून केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे [2][ महसूल आयुक्ताने, आयुक्ताने ] , दंडाधिकाऱ्याने, पोलीस अधिकाऱ्याने किंवा इतर व्यक्तीने अपराध केला आहे किंवा [3][ अशा महसूल आयुक्ताने, आयुक्ताने ] , दंडाधिकाऱ्याने, पोलीस अधिकाऱ्याने किंवा इतर व्यक्तीने अन्याय केला आहे असा आरोप करण्यात आला असेल तर किंवा उक्त अपराध किंवा अन्याय घडला किंवा करण्यात आला असेल तर तो पूर्वोक्त स्वरूपाचा आहे असे न्यायालयास दिसून आले असेल अशा बाबतीतील खटला किंवा वाद ज्या कृत्याबद्दल तक्रार करण्यात आली असेल ते कृत्य घडल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यानंतर केलेला असल्यास तो विचारार्थ स्वीकारण्यात येणार नाही किंवा तो फेटाळण्यात येईल :

वर म्हटल्याप्रमाणे कर्तव्याच्या निमित्ताने केलेल्या कृत्यांच्या बाबतीत वाद किंवा खटले.

---

[1] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याचे कलम ३, अनुसूची अन्वये " कोणत्याही फौजदारी न्यायाधिशाने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ६ अन्वये " कमिशनरने " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाअन्वये " अशा कमिशनरने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२][ विहित मुदतीच्या आत] दाखल न केल्यास ते विचारात न घेणे किंवा फेटाळून लावणे.

[१][ परंतु, पोलीस अधिकाऱ्याविरूद्ध असलेला असा कोणताही खटला, अपराध केल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने दाखल केला असेल तर, न्यायालयाला तो विचारार्थ स्वीकारता येईल.]

उपरोक्त वादात एक महिन्याची नोटीस देणे व तक्रार केलेल्या अन्यायाचा पूर्ण तपशील देणे.

(२) उपरिनिर्दिष्ट अन्यायाबद्दल नियोजित वाद दाखल करावयाचा उद्देश असलेली व्यक्ती, अन्याय केल्याचा आरोप असेल अशा व्यक्तीस, नियोजित वादाबद्दल कमीत कमी एक महिना अगोदर नोटीस देईल व ज्या अन्यायाबद्दल तक्रार केली असेल त्याबद्दलचा पूर्ण तपशील देईल व असे न केल्यास असा वाद फेटाळण्यात येईल.

नोटीस केव्हा देण्यात आली व प्रतिपूर्ती देण्यास तयार आहे किंवा नाही या गोष्टी वादपत्रात नमूद करणे.

(३) वादपत्रामध्ये, प्रतिवादीवर उपरोक्तप्रमाणे नोटीस बजावण्यात आली आहे हा मजकूर आणि नोटीस बजावण्याचा दिनांक देण्यात येईल, आणि तीत, प्रतिवादीने नुकसानीची प्रतिपूर्ती करण्याचे कबूल केले आहे काय आणि कबूल केलेले असल्यास, किती प्रतिपूर्ती देण्याचे कबूल केले आहे या गोष्टी नमूद करील. व उक्त नोटिशीची एक प्रत, ती नोटीस केव्हा व कशी बजावण्यात आली याबद्दलच्या वादीच्या शेऱ्यानिशी किंवा प्रतिज्ञापत्रानिशी वादपत्राबरोबर जोडण्यात येईल.

लायसने आणि लेखी परवानगी यात शर्ती, वगैरे विनिर्दिष्ट करणे व त्यावर सही करणे.

**१६२.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही लायसनमध्ये किंवा लेखी परवानगीत, ज्या मुदतीसाठी व ज्या जागेसाठी ती देण्यात आली असेल ती मुदत व ती जागा आणि ज्या शर्तींना आणि निर्बंधांना अधीन राहून ती देण्यात आली असेल त्या शर्ती व निर्बंध विनिर्दिष्ट करण्यात येतील आणि असे लायसन किंवा लेखी परवानगी सक्षम अधिकाऱ्याच्या सहीने देण्यात येईल आणि त्याबाबतीत त्यासाठी या अधिनियमाखालील कोणत्याही नियमान्वये विहित करण्यात आली असेल अशी फी आकारण्यात येईल.

---

[१] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३ (क) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ख) अन्वये " सहा महिन्यांच्या आत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) या अधिनियमान्वये मंजूर केलेले कोणतेही लायसन किंवा लेखी परवानगी, जर तिच्या शर्ती किंवा निर्बंधांपैकी कोणत्याही शर्तीचा किंवा निर्बंधाचा, ती दिलेल्या व्यक्तीकडून भंग करण्यात आला असेल किंवा अशी शर्त किंवा निर्बंध टाळण्यात आला असेल किंवा अशा लायसनचा किंवा परवानगीचा संबंध असलेल्या कोणत्याही बाबतीत कोणत्याही अपराधाबद्दल अशा व्यक्तीस सिद्धापराधी ठरविण्यात आले असेल तर, सक्षम प्राधिकाऱ्याला कोणत्याही वेळी ती निलंबित किंवा रद्द करता येईल. लायसने, इत्यादी रद्द करणे.

(३) जेव्हा असे कोणतेही लायसन किंवा लेखी परवानगी निलंबित किंवा रद्द करण्यात येईल तेव्हा किंवा लायसन किंवा परवानगी ज्या मुदतीसाठी मंजूर केली गेली होती ती मुदत संपेल तेव्हा, ज्या व्यक्तीस ते लायसन किंवा लेखी परवानगी देण्यात आली होती ती व्यक्ती, यथास्थिति, ते लायसन किंवा ती परवानगी निलंबित किंवा रद्द करणारा आदेश रद्द करण्यात येईतोपर्यंत किंवा ते लायसन किंवा ती परवानगी नवीन करण्यात येईतोपर्यंत लायसनवाचून किंवा लेखी परवानगीवाचून आहे असे या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांसाठी मानण्यात येईल. लायसने, इत्यादी रद्द केले गेले असेल तेव्हा ज्या व्यक्तीस ते देण्यात आले असेल त्या व्यक्तीजवळ ते नाही असे मानणे.

(४) असे कोणतेही लायसन किंवा लेखी परवानगी ज्या व्यक्तीस देण्यात आली असेल अशी प्रत्येक व्यक्ती लायसन किंवा लेखी परवानगी अमलात असेल त्या मुदतीत सर्व वाजवी वेळी, पोलीस अधिकाऱ्याने तसे करण्यास फर्मावल्यास असे लायसन किंवा लेखी परवानगी सादर करील. लायसन, इत्यादी मंजूर करण्यात आलेल्या व्यक्तीने फर्माविण्यात येईल तेव्हा ते सादर करणे.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनाकरिता, जिला लायसन किंवा लेखी परवानगी मंजूर करण्यात आली असेल त्या व्यक्तीच्या वतीने काम करणारा नोकर किंवा अन्य अभिकर्ता याने केलेले असे कोणतेही उल्लंघन किंवा अशी टाळाटाळ किंवा त्यावर सिद्ध झालेला आरोप म्हणजे, लायसन किंवा लेखी परवानगी मंजूर करण्यात आलेल्या व्यक्तीने (शर्तीचे किंवा निर्बंधाचे) उल्लंघन किंवा टाळाटाळ केली आहे, किंवा, यथास्थिति, त्याच्या बाबतीत अपराध सिद्ध झाला आहे, असे मानण्यात येईल.

**१६३.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये देणे आवश्यक असेल अशी कोणतीही जाहीर नोटीस ही लेखी व सक्षम प्राधिकाऱ्याच्या सहीनिशी देण्यात येईल आणि ती ज्या स्थानास लागू होईल त्या स्थानामध्ये मोक्याच्या सार्वजनिक जागेत तिच्या प्रती चिकटवून किंवा दवंडीद्वारे तिची घोषणा करुन, किंवा उक्त प्राधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा, इंग्रजी किंवा प्रादेशिक भाषेतील किंवा हिंदीतील स्थानिक वर्तमानपत्रात तिची जाहिरात देऊन किंवा या साधनांपैकी कोणत्याही दोन किंवा अधिक साधनांनी किंवा त्यास योग्य वाटेल अशा अन्य कोणत्याही साधनांनी प्रसिद्ध करण्यात येईल. जाहीर नोटिसा कशा द्याव्यात.

**१६४.** कोणतेही कृत्य करणे किंवा करण्याचे वर्जिणे किंवा कोणत्याही गोष्टीची विधिग्राह्यता जेव्हा या अधिनियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्याच्या संमतीवर, मान्यतेवर, घोषणेवर, अभिप्रायावर किंवा खात्रीवर अवलंबून असेल तेव्हा, अशी संमती, मान्यता, घोषणा, अभिप्राय किंवा खात्री यांचा आशय ज्यात अभिप्रेत असेल किंवा ज्यात त्याबद्दलचा मजकूर दिलेला असेल अशा सक्षम प्राधिकाऱ्याने सही केलेला लेखी दस्तऐवज हा त्याबद्दलाचा पुरेसा पुरावा असेल. सक्षम प्राधिकाऱ्याची संमती वगैरे त्याच्या सहीच्या लेखी दस्तऐवजावरून सिद्ध करणे.

नोटिसा, इत्यादींवर सहीचा ठसा मारता येईल.

**१६५.** समन्स किंवा अधिपत्र किंवा झडतीबद्दलचे अधिपत्र नसलेल्या प्रत्येक लायसनवर, लेखी परवानगीवर, नोटीशीवर, किंवा इतर दस्तऐवजावर या अधिनियमान्वये किंवा त्याखालील कोणत्याही नियमान्वये आयुक्ताची सही असणे आवश्यक असेल तेव्हा, जर त्यावर त्याच्या प्रतिरुप सहीचा ठसा मारला असेल तर असे लायसन, लेखी परवानगी, नोटीस किंवा इतर दस्तऐवज हा योग्य रीतीने सही केलेला आहे असे मानले जाईल.

हितसंबंधित व्यक्तीस कोणताही नियम किंवा आदेश विलोपित करण्याबद्दल, बदलल्याबद्दल किंवा त्यात फेरफार करण्याबद्दल राज्य शासनाकडे अर्ज करता येईल.

**१६६.** (१) या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या प्राधिकाराान्वये राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमात किंवा आदेशात, लोकांनी किंवा विशिष्ट वर्गाच्या लोकांनी काही कर्तव्ये किंवा कृत्य करणे आवश्यक केले असेल तेव्हा, किंवा त्यांनी स्वतः त्या नियमात किंवा आदेशात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वागावे किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील लोकांस त्याप्रमाणे वागण्याबद्दल आदेश द्यावा असे असेल तेव्हा, हितसंबंधित कोणत्याही व्यक्तीस, तो नियम किंवा आदेश बेकायदेशीर, जुलमाचा किंवा गैरवाजवी असल्याच्या कारणांमुळे विलोपित करण्याबद्दल, बदलण्याबद्दल किंवा त्यात फेरफार करण्याबद्दल राज्य शासनाच्या सचिवाकडे विज्ञापन सादर करुन शासनाकडे अर्ज करता येईल.

एखादा नियम किंवा आदेश बेकायदेशीर असल्याचे घोषित करण्याकरिता जिल्हा न्यायालयात वाद केव्हा दाखल करता येईल.

(२) उपरोक्तप्रमाणे अर्ज केल्यानंतर आणि तो पूर्णतः किंवा अंशतः नाकारण्यात आल्यावर किंवा अशा अर्जाचे उत्तर न मिळाल्याला किंवा राज्य शासनाचा त्यावरील निर्णय प्रकाशित झाल्याला चार महिने लोटल्यानंतर, हितसंबंधित व्यक्तीस आणि तो नियम किंवा आदेश कायद्याविरुद्ध आहे असे समजणारी व्यक्ती तो नियम किंवा आदेश पूर्णतः किंवा अंशतः कायद्याविरुद्ध आहे असे घोषित करण्यासाठी राज्याविरुद्ध वाद दाखल करण्यास सक्षम असेल. अशा वादातील निर्णयावर अपील करता येईल आणि जो नियम किंवा आदेश बेकायदेशीर आहे असे अखेरीस ठरविले जाईल, तो नियम किंवा आदेश राज्य शासन विलोपित करील किंवा बदलील किंवा कायद्यास सुसंगत होईल अशा रीतीने त्यात फेरफार करील.

निरसन आणि व्यावृत्ती.

**१६७.** (१) [१][ अनुसूची एक, भाग एक यात विनिर्दिष्ट केलेल्या ] अधिनियमिती, याद्वारे निरसित करण्यात येत आहेत :

परंतु,—

(एक) अशा कोणत्याही अधिनियमितीअन्वये विहित केलेले सर्व नियम, केलेल्या नेमणुका, दिलेले अधिकार, केलेले किंवा संमत केलेले आदेश, देण्यात आलेले निदेश आणि अशी प्रमाणपत्रे, दिलेली

---

[१] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ३४ (१) अन्वये " अनुसूची १ मध्ये विनिर्दिष्ट केलेले " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

संमती, परवाना, परवानगी किंवा लायसने, काढण्यात आलेले किंवा बजाविलेले समन्स किंवा अधिपत्रे, अटक केलेल्या किंवा स्थानबद्ध करुन ठेवलेल्या किंवा जामिनावर किंवा बंधपत्रावर सोडून दिलेल्या व्यक्ती, काढण्यात आलेली झडतीची अधिपत्रे, समपहरण केले बंधपत्र किंवा झालेली शास्ती ही जेथवर या अधिनियमाशी सुसंगत असेल तेथवर त्याअन्वये अनुक्रमे विहित करण्यात, देण्यात, संमत करण्यात, बजाविण्यात, अटक करण्यात, स्थानबद्ध करुन ठेवण्यात, सोडून देण्यात, समपहरण करण्यात आली आहेत व झाली आहेत, असे मानले जाईल.

(दोन) कोणत्याही मुंबई अधिनियमात, याद्वारे निरसित केलेल्या अधिनियमा कोणत्याही अधिनियमासंबंधी असलेले सर्व निर्देश हे जणू या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीसंबंधी केलेले निर्देश आहेत, असे समजले जाईल.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही मजकुरामुळे पुढील गोष्टीस बाध येतो असे मानले जाणार नाही :—

(क) एखाद्या क्षेत्रात या अधिनियमाच्या तरतुदी ज्या दिनांकास अमलात येतील त्या दिनांकापूर्वी अशा क्षेत्रात केलेल्या किंवा करु दिलेल्या कोणत्याही कृत्याची विधिग्राह्यता, विधिअग्राह्यता किंवा परिणाम किंवा फलित ;

(ख) अशा दिनांकापूर्वी अगोदरच संपादन केलेला, उपार्जित झालेला कोणताही अधिकार, विशेषाधिकार किंवा पत्करलेले कोणतेही बंधन किंवा दायित्व ;

(ग) अशा दिनांकापूर्वी केलेल्या कोणत्याही कृत्याच्या बाबतीत झालेली किंवा लादण्यात आलेली कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा ;

(घ) असा अधिकार, विशेषाधिकार, बंधन, जबाबदारी, शास्ती, समपहरण किंवा शिक्षा यासंबंधीचे कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना ;

(ङ) उपरोक्त दिनांकास कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही अधिकाऱ्यापुढे अनिर्णीत अवस्थेत असलेली कोणतीही कायदेशीर कार्यवाही किंवा अशी कार्यवाही चालू असताना केलेली किंवा करु दिलेली कोणतीही गोष्ट, आणि अशा कार्यवाहीतून उद्‌भवलेली अशी कोणतीही कार्यवाही किंवा अपील किंवा पुनरीक्षणाची कार्यवाही ही, जणू हा अधिनियम अमलात आला नसल्याप्रमाणे, यथास्थिति, दाखल करण्यात येईल, चालू राहील किंवा निकालात काढण्यात येईल.

१९५९ चा मुंबई ३४. [1][ (२-क) हा अधिनियम, मुंबई पोलीस (विस्तार व सुधारणा) अधिनियम, १९५९ अन्वये तो राज्याच्या ज्या भागास लागू करण्यात आला असेल त्या भागात अमलात आल्यावर, राज्याच्या त्या भागात अमलात असलेले अनुसूची एकच्या भाग दोनमध्ये व अनुसूची चारमध्ये विनिर्दिष्ट केलेले कायदे निरसित होतील :

परंतु, अशा निरसनामुळे पुढील गोष्टींना बाध येणार नाही :—

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याचा पूर्वीचा अंमल, किंवा तद्न्वये रीतसर केलेली किंवा करु दिलेली कोणतीही गोष्ट ; किंवा

(ख) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये संपादन केलेला, उपार्जित झालेला हक्क, विशेषाधिकार, किंवा पत्करलेले आबंधन किंवा दायित्व ; किंवा

---

[1] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ३४ (२) अन्वये पोट-कलम (२-क) समाविष्ट करण्यात आले.

(ग) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याविरूद्ध केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत झालेली कोणतीही शास्ती ;

आणि राज्याच्या संबंधित भागात हा अधिनियम अमलात आला नव्हता असे समजून कोणत्याही उपरोक्त हक्काच्या, विशेषाधिकाराच्या, आबंधनाच्या, दायित्त्वाच्या किंवा शास्तीच्या बाबतीत कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अमलात आणता येईल व अशी कोणतीही शास्ती लादता येईल :

परंतु आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकास अधीन राहून, अशा कोणत्याही निरसित केलेल्या कायद्यान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कृती (विहित केलेला कोणताही नियम, केलेली नेमणूक, दिलेला अधिकार, काढलेला किंवा दिलेला ओदश, दिलेला निदेश किंवा दिलेले प्रमाणपत्र, दिलेली संमती, परवानगी, दिलेला परवाना किंवा दिलेले लायसन, काढण्यात आलेले किंवा बजाविलेले समन्स किंवा अधिपत्र, अटक केलेली किंवा स्थानबद्ध केलेली किंवा जामिनावर किंवा बंधपत्रावर मुक्त केलेली व्यक्ती, दिलेले झडतीचे अधिपत्र किंवा समपहरण केलेले बंधपत्र यांचा यात समावेश होतो), या अधिनियमाशी विसंगत नसेल तेथवर, ज्यावेळी अशी गोष्ट करण्यात आली किंवा अशी कृती करण्यात आली त्यावेळी, राज्याच्या संबंधित भागात उक्त तरतुदी अमलात होत्या असे समजून या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीअन्वये केलेली आहे असे समजण्यात येईल, आणि या अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कृती याअन्वये तिचे अधिक्रमण होत नाही तोपर्यंत त्याप्रमाणे अमलात असण्याचे चालू राहील :

परंतु तसेच, त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील अशा कोणत्याही निरसित केलेल्या कायद्यासंबंधीचा किंवा त्याच्या कोणत्याही तरतुदीसंबंधीचा कोणताही निर्देश हा, या अधिनियमासंबंधीचा किंवा त्याच्या तत्सम तरतुदीसंबंधीचा निर्देश आहे असा अर्थ लावण्यात येईल.]

*(३) अनुसूची तीन मध्ये विनिर्दिष्ट केलेली अधिनियमिती ही, [१][ दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास ] लागू करताना अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत आणि अशा पद्धतीनुसार याद्वारे दुरूस्त करण्यात येत आहे.

[३][ ग्राम पोलीस आणि राखीव पोलीस यासंबंधीच्या कायद्यांची व्यावृत्ती.]

**१६८.** या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा, मुंबई ग्राम पोलीस अधिनियम, १८६७, [२][ मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशात अमलात असलेला तो अधिनियम किंवा सौराष्ट्र ग्राम पोलीस अध्यादेश, १९४९ किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अमलात असलेला कोणताही तत्सम कायदा ] याच्या किंवा राखीव पोलिसासंबंधी करण्यात येईल अशा कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदीवर परिणाम होणार नाही.

१८६७ चा मुंबई ८. १९४९ चा सौराष्ट्र अध्यादेश ३२.

* पोट-कलम (३) मध्ये रूपभेद करण्यात आलेले नाहीत. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० पहा.

[१] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये "मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ३५ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३५ (२) अन्वये "मूळ समास" टीपेऐवजी ही समास टीप दाखल करण्यात आली.

# अनुसूची एक

[ कलमे ३ आणि ५ आणि कलम १६७ ची [1][ पोट-कलमे (१) व (२-क) ] पहा ]

| वर्ष (१) | | क्रमांक (२) | संक्षिप्त नाव (३) |
|---|---|---|---|
| | | | [2][ भाग एक |
| १८९० | .. | चार | मुंबई जिल्हा पोलीस अधिनियम, १८९०. |
| १९०२ | .. | चार | मुंबई शहर पोलीस अधिनियम, १९०२. |
| १९४९ | .. | सोळा | पोलीस दल (नियंत्रण व मार्गदर्शन) अधिनियम, १९४९.] |
| | | | [3][ भाग दोन |
| १८६१ | .. | पाच | मुंबई राज्याच्या विदर्भ प्रदेशात अमलात असलेला पोलीस अधिनियम, १८६१. |
| १८९० | .. | चार | मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशात अमलात असलेला मुंबई जिल्हा पोलीस अधिनियम, १८९०. |
| १३२९ फसली | .. | दहा | हैदराबाद जिल्हा पोलीस अधिनियम. |
| १९५४ | .. | अठरा | सौराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५४. ] |

[1] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ३६ (१) अन्वये " पोट-कलम (१) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३६ (२) अन्वये " भाग एक " हे उपशीर्षक समाविष्ट करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३६ (३) अन्वये हे उपशीर्षक व त्यापुढील नोंदी जादा दाखल करण्यात आल्या.

## अनुसूची दोन

(कलम १४ पहा)

### पोलीस दलात नेमणूक केल्याबद्दलचे प्रमाणपत्र

क्रमांक ____________

[१][ महाराष्ट्र राज्य ]

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१**

..............................................

या अन्वये दिलेले नेमणुकीबद्दलचे प्रमाणपत्र.

१८६१ चा अधिनियम क्रमांक ५.

श्री. .................................... यांची

......................... म्हणून नेमणूक केली आहे आणि मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ या अन्वये पोलीस अधिकाऱ्यास जे अधिकार, कामे व विशेषाधिकार आहेत ते त्यास दिले आहेत.

सन १८६१ चा अधिनियम क्रमांक ५

[२][ निरीक्षक आणि ] फौजदार यांच्या बाबतीत छायाचित्र चिकटवावे

[३][ **बृहन्मुंबई / आयुक्त** .............................. याच्या प्रभाराखालील क्षेत्र ]

____________

**मुंबई जिल्हा पोलीस**

____________ यामध्ये

**रेल्वे पोलीस**

दिनांक .................... माहे .................. १९

सही ..........................................

पदनाम ..........................................

---

[१] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई राज्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १२ अन्वये "निरीक्षक आणि" हा मजकूर वगळण्यात आला होता, परंतु, सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १२ अन्वये हा मजकूर पुन्हा समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ३, अनुसूची अन्वये "बृहन्मुंबईत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## अनुसूची तीन

[ कलम १६७ चे पोट-कलम (३) पहा ]

| वर्ष (१) | क्रमांक (२) | संक्षिप्त नाव (३) | दुरूस्ती (४) |
|---|---|---|---|
| १८९८ . . | ५ | फौजदारी प्रक्रिया संहिता | अधिनियमा‸ कलम १ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ग) मध्ये—(एक) "कलकत्ता, मद्रास आणि मुंबई ही शहरे" या मजकुराच्या ऐवजी "कलकत्ता आणि मद्रास ही शहरे" हा मजकूर दाखल करण्यात येईल. (दोन) "कलकत्ता आणि मुंबई ही शहरे" या मजकुराच्या ऐवजी "कलकत्ता शहर" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

## [1][ अनुसूची चार

[ कलम १६७, पोट-कलम (२-क) पहा ]

| वर्ष (१) | क्रमांक (२) | संक्षिप्त नाव (३) |
|---|---|---|
| १९४६ . . | दहा | मध्यप्रांत व वऱ्हाडचा गुंडाबाबत अधिनियम, १९४६. |
| १९४७ . . | सतरा | मध्यप्रांत व वऱ्हाडचा विशेष पोलीस आस्थापना अधिनियम, १९४७. |
| १९५१ . . | एकोणतीस | हैदराबाद सार्वजनिक सुरक्षा उपाय अधिनियम, १९५१. |
| १९५३ . . | बारा | मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू केलेला पंजाब राज्य सुरक्षा अधिनियम, १९५३. |
| १९५५ . . | पंचवीस | सौराष्ट्र ग्रामरक्षक दल अधिनियम, १९५५. |
| १९५७ . . | सदतीस | हैदराबाद सार्वजनिक सुरक्षा उपाय (सुधारणा) आणि पुरवणी तरतुदी अधिनियम, १९५७ ] |

[1] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ३७ अन्वये ही अनुसूची जादा दाखल करण्यात आली.

शामुना—एच-६९१-भासंमरामु-२-०७-९,१२० पुस्तके-पीसी ४*